

॥ तुळशी मंजिऱ्या ॥
साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# तुळशी मंजिऱ्या

लेखक
**डॉ. गो. मो. रानडे**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती :
१९८४

•

प्रकाशक :
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

•

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय, वाई (जि. सातारा)

•

किंमत रु. २५-००

# अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


प्रस्तावना ........ ५

फोडिले भांडार ........ १२

तुळशी—वृंदावन ........ १५

तुलसीदासांचे रामचरितमानस—एक विहंगमावलोकन ........ १८

आजच्या संदर्भात तुलसीदासांचे रामचरितमानस ........ ३३

संत तुलसीदासांचे कल्पना–वैभव ........ ३९

मानसातील सूक्तिसुमने ........ ४४

रामचरितमानसातील ऋतुवर्णन ........ ५२

संत तुलसीदासांची भावभक्ति ........ ५७

समदृष्टि तुलसीदास ........ ६४

रामचरितमानसात हरि—हर—समन्वय ........ ६८

संत तुलसीदासांची संस्कृतनिष्ठा ........ ७३

रामचरितमानसातील –स्त्रियश्चरित्रम्◦ ........ ७९

तुलसींची –जगजननि जानकी ◦ ........ ८४

रामानुगामी लक्ष्मण ........ ९३

तुलसीचा रामरत भरत ........ १००

तुलसींचा भावभोळा केवट ........ ११०

रामचरितमानस व भावार्थरामायण ........ ११४

संत तुलसीदास व काही मराठी संत कवि ........ १२२

# प्रस्तावना

**माझे जबलपूर निवासी मित्र डॉ. गो. मो. रानडे यांच्या"तुळशी मंजिऱ्या" नावाच्या लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना मला अत्यंत आनंद होत आहे.**

डॉ. रानडे जबलपूर विद्यापीठात मराठी विभागाचे माजी प्रमुख व महिला महाविद्यालयाचे से. नि. प्राचार्य आहेत. मराठी भाषी साहित्य-सेवक अन्य भाषीय क्षेत्रांत स्थायिक होतो तेव्हा त्याच्यावर आपोआपच एक दायित्व येते. त्याच्या कर्मभूमीमधील साहित्याची ओळख मराठी भाषिकांना करून देणे, तसेच मराठी साहित्याचा परिचय तेथील वाचकांना करून देणे असे त्या दायित्वाचे उभयविध स्वरूप असते. डॉ. रानडे यांनी हे दुहेरी दायित्व योग्य प्रकारे सांभाळले आहे. 'रामचरितमानस' हा तुलसीदासांचा ग्रंथ हिंदी भाषेतील शाश्वत मूल्याची कलाकृती आहे. त्या ग्रंथाची ओळख १९७१ साली नागपूरच्या तरुण भारतातून "रामचरितमानस—एक विहंगमावलोकन' नामक लेखाद्वारे त्यांनी मराठी वाचकांना करून दिली. त्याचप्रमाणे "रामचरित मानस व एकनाथांचे भावार्थ रामायण" हा लेख हिंदीमध्ये लिहून त्यांनी तुलसी रामायणाच्या चतुःशताब्दीच्या वर्षी मध्यप्रदेश शासनाने काढलेल्या एका ग्रंथातून तो प्रसिद्ध केला. प्रस्तुत लेखसंग्रहातील सर्वच लेख त्यांनी मराठी नियतकालिकांतून यथाकाल प्रसिद्ध केले. आता हे सर्व मराठी लेख एकत्रितपणे पुस्तकरूपाने ते प्रसिद्ध करीत आहेत. प्रकाशनाचा भार महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने उचलला आहे. या लेखसंग्रहामुळे मराठी वाङ्मयात मोलाची भर पडेल.

तसे पाहिले तर रामचरितमानस (तुलसी रामायण) हा ग्रंथ मराठी भाषिकांना अगदीच अपरिचित नाही. बऱ्याच वर्षांपूर्वी नागपूरचे श्री. जामदार यांनी त्याचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला होता. अलीकडे काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला एक मराठी अनुवादही माझ्या पाहण्यात आला. मूळ ग्रंथाचे पठन—पारायण करणारी बरीच मंडळी महाराष्ट्रात आहेत. पण या ग्रंथाकडे मराठी भाषिकांनी मुख्यतः धार्मिक उपासनेतील पठनाचा ग्रंथ म्हणूनच पाहिले आहे. एक साहित्य ग्रंथ म्हणून त्याचे मूल्य ओळखून त्याचा परिचय करून देण्याचा प्रयन्त मराठीतून कोणी केल्याचे माझ्या पाहण्यात नाही. असा प्रयत्न डॉ. रानडे यांनी प्रस्तुत लेखसंग्रहात केला आहे—हे या संग्रहाचे मुख्य वैशिष्ट्य. या ग्रंथाच्या वाचनाने मराठी वाचकाला मूळ ग्रंथाचे साहित्यविषयक मूल्य तर कळेलच, त्याबरोबरच मूळ ग्रंथाचे परिशीलन करण्याकडेही त्याची प्रवृत्ती होईल. असा महत्त्वाचा ग्रंथ लिहिल्याबद्दल लेखक, आणि तो प्रकाशित करण्याबद्दल साहित्य संस्कृति मंडळ हे दोघेही अभिनंदनास पात्र आहेत.

माणसाच्या जीवनात काही गोष्टी अकल्पितपणे—योगायोगाने घडतात. डॉ. रानडे यांच्या जीवनात असाच एक योगायोग घडून आला. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी डॉ. रानडे यांच्या हस्ते स्थानिक रामलीला उत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. त्या प्रसंगी तेथील कार्यकर्त्यांनी तुलसीदासजींच्या रामचरितमानसाची एक प्रत रानड्यांना भेट म्हणून दिली. "मी या ग्रंथाचा समुचित उपयोग करीन" असे डॉ. रानडे यांनी त्यावेळी कार्यकर्त्यांना सांगितले. ग्रंथाचे पहिले वाचन चालू असतानाच डॉ. रानड्यांना जाणवू लागले की, "मराठी वाचकांना ज्याचा अवश्य परिचय व्हावयास हवा असा हा राष्ट्रीय ग्रंथ आहे." त्यांच्या मनोभूमीत या बीजभूत जाणिवेला जो पहिला अंकुर आला तो तरुण भारतात प्रसिद्ध झालेला त्यांचा उपरिनिर्दिष्ट लेख. त्यानंतर इतर लेख हळूहळू तयार झाले. प्रस्तुतचा लेखसंग्रह हे त्याचे दृश्य फल होय.

अनुक्रमणिका

या लेखांना निमित्तभूत झालेली घटना मला मात्र केवळ योगायोग वाटत नाही. प्रभु रामचंद्रांना लेखकाकडून सेवा करवून घ्यावयाची आहे असे मी संतवचनावर विश्वास ठेवून म्हणतो. संत स्वानुभवावरून सांगतात की, "परमेश्वराला ज्याच्याकडून काही कार्य करवून घ्यावयाचे असते त्या जीवावर तो तदनुकूल संस्कार करीत राहातो (देवोहि भावि परिकर्मणि संस्करोति)

तुलसीदासजी त्यांच्या काळातील एक महान संस्कृत पंडित होते. पण भगवान विश्वनाथांनी त्यांच्या मुखाने हिंदीतून रामकथा वदविली. त्यांच्याच देखत ती लोकप्रियहि झाली. मत्सरग्रस्त अन्य पंडितांना हे पाहवेना. त्यांनी तत्कालीन साक्षात्कारी संस्कृत पंडित व वेदान्ती श्री मधुसूदन सरस्वती यांच्याकडे तक्रार नेली. त्या महापुरुषाने तुलसीरामायणाचे अवलोकन केल्यावर अभिप्राय दिला तो असा – "या आनंदवनात (काशीक्षेत्रात) एक चालता बोलता तुलसीतरु आहे; तो असा आहे की त्याची कविता मंजरी रामभ्रमराने भूषित केलेली आहे" (मूळ संस्कृत वचन पहिल्या लेखात लेखकांनी पान ४ वर दिले आहे). प्रस्तुत लेखसंग्रहाला "तुळशी मंजिऱ्या" असे शीर्षक देण्यात लेखकाने दाखविलेली अपूर्व योजकता आता सहज ध्यानांत येईल.

रामचरितमानस हे तुलसीदासांच्या प्रतिभेतून प्रकट झालेले भक्तिरसप्रधान काव्य आहे. या काव्याचा आस्वाद वेगवेगळ्या भूमिकेतून घेत असतां लेखकाच्या बुद्धीतून एक एक लेख प्रकट झाला. विस्ताराच्या दृष्टीने लेख छोटे-मोठे वाटतील, पण सर्वच लेख सारगर्भ आहेत यात शंका नाही. लेखांच्या वाचनाने मला जाणवलें तें असें की, डॉ. रानड्यांच्या समीक्षक बुद्धीतून त्यांच्या हृदयातील आस्वादमय वृत्ति प्रकट झाली आहे; आणि त्या आस्वदमय हृदयाच्या तळाशी भक्तिभावाचा झरा झुळुझुळु वाहात आहे. नाहीतर, "रामाच्या जीवनयात्रेत लक्ष्मण पावलाप्रमाणे उमटला आहे. एवढे थोर भाग्य इतर कुणाचेच नव्हते." (पा. १०५); "अशा रामरत भरताला केवळ मौन प्रणाम करणेच योग्य" (पा. १०८); "तुलसीचा हा केवट धन्य झाला! भक्तराज तुलसी हे पात्र निर्मून कृतार्थ झाले!" (पा. १२४); अशा स्वरूपाचे उद्‌गार त्यांच्या वाणीतून बाहेर पडते ना. पण असा अंदाज करण्याचेहि कारण नाही. एका लेखात तर ते स्पष्टच बोलून गेले, ".....आणि ही भक्ति क्षणिक नसावी, तर ती शाश्वत हवी. श्रीरामराया, हेच माझे शेवटचे मागणे. भगवन्, देणार ना या आपल्या तुलसीभक्ताला एवढे एकुलते एक दान?"(पा. ५९). ही तर भक्ताने भगवंताला घातलेली आर्त हाकच आहे! लेखकाच्या भक्तिप्रवण हृदयाचा याहून अधिक कोणता पुरावा हवा?

प्रस्तुत लेखसंग्रह वाचून अशा प्रकारची जाणीव मला झाली. म्हणून प्रास्ताविकाच्या पानांची मर्यादा ओलांडूनहि लेखकाशी काही हितगुज करण्याचा मोह मला होत आहे.

संतांच्या उद्‌गारांतील साधर्म्य पाहून लेखकाच्या मुखातून शब्द निघाले, "विचारभावनांची अशी एकरूपता साऱ्याच संतांत पाहावयास मिळते......विधात्याने साऱ्याच भागवतांची अंतःकरणे एकाच मंगलकारी द्रव्याने घडविली आहेत असेच ही उदाहरणे पाहून म्हणावेसे वाटते" (पा. १३७). अगदी यथार्थ आहेत हे उद्‌गार! संतांच्या अंतःकरणांचे उपादान भूत द्रव्य एकच आहे. ते आहे "स्वरूपभूत आत्मतत्त्व". समर्थांनी स्पष्टच म्हटले आहे, "साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोनि एकच झाले । देहातीत वस्तु ॥" (दा. बो. ७ । ३ । ३१). अशाच संतांच्या मुखातून भक्तिरसामृत स्रवत असते ("अमृत हें मुखें स्रवतसे"'—तुकाराम) संतांच्या मुखातून प्रत्यक्ष भगवानच बोलत असतो ("सखा भगवंत, वाचा त्याची"—तुकाराम) जी अवस्था प्राप्त झाल्याने भक्तिरसपूर्ण काव्य संतवचनांतून प्रकट होते त्या अवस्थेला

अनुक्रमणिका

योगी ‘शक्तिपात’ म्हणतात आणि भक्त ‘अनुग्रह’ म्हणतात. म्हणून असे काव्य ईश्वरानुग्रहाचे चिन्हच असते. ईश्वरानुग्रहाची काही ठळक वैशिष्ट्ये अभिनवगुप्ताचार्यांनी अशी सांगितली आहेत :—

> **“तस्यैतत् प्रथमं चिह्नं रुद्रे भक्तिः सुनिश्चला ।**
> **द्वितीयं मंत्रसिद्धिः स्यात् सद्यः प्रत्ययदायिका ॥**
> **सर्वसत्त्ववशित्वं च तृतीयं तस्य लक्षणम् ।**
> **सर्वशास्त्रार्थवेतृत्वमकस्मात् तस्य जायते ॥**
> **कवित्वं पञ्चमं ज्ञेयं सालंकार मनोहरम् ॥”**

—ईश्वरानुग्रहाचा लाभ ज्याला झाला आहे अशा महात्म्याच्या ठिकाणी पाच चिन्हे आढळून येतातः (१) सुनिश्चल ईश्वरभक्ति; (२) वाणीमध्ये मंत्रसामर्थ्य; (३) सर्व प्राण्यांना वशीभूत करण्याची शक्ति; (४) सर्व शास्त्रांची अकस्मात् उपस्थिति; आणि (५) सालंकृत मनोहर काव्य निर्माण करणारी शक्ति. संतकाव्यामध्ये आपल्याला हे पाचहि विशेष आढळतात. भगवद्‌गुणगान हाच संतकाव्याचा एकमेव विषय असतो (जेहि महुँ आदिमध्यअवसाना । प्रभु प्रतिपाद्य राम भगवाना ॥). संतवाणीचा प्रभावच असा पडतो की ती कानावर पडताच श्रोता मंत्रमुग्ध होऊन जातो. श्रोत्याचे मन संतवाणी खेचून घेते आणि त्याला आपले अंकित बनवते. संतांच्या प्रतिपादनात सर्व शास्त्रे समन्वित झालेली दिसतात. आणि ती वाणी प्रकट होते ती सालंकृत व मनोहर रूपातच श्रोत्यासमोर येते. साहित्यशास्त्राच्या परिभाषेत सांगावयाचे म्हणजे संतांची काव्यनिर्मिति—ही ब्रह्मरस गोडी—हा भक्तिरस—एकव्यापाराभिव्यक्त असतो. म्हणूनच त्यांच्या काव्याची सर्व अंगे समप्राधान्याने खुलून उठतात, त्यांच्यात गौणप्रधान भाव नसतो. अशा काव्याला समर्थांनी ‘प्रासादिक’—ईश्वर प्रसादनिष्पन्न म्हटलेले आहे. “देवाचेनि प्रसन्नपणें । जे जे घडे बोलणें । तें तें अवघे श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥” (दा. बो. १४।३।६).

काव्यस्वरूपासंबंधी श्रीज्ञानेश्वरांचे एक वचन प्रसिद्ध आहे, तें असें— “वाचें बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व— । स्पर्शु जैसा ॥” वाणी आत्म्याचा आविष्कार आहे. आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाचा आविष्कार जी वाणी करते ती वाणी श्रेष्ठ होय. हिलाच काव्य संज्ञा आहे. असा आत्मप्रत्यय नेहमी रसरूपच असतो (रसो वै सः). रस हा तर काव्याचा आत्माच आहे. आता या रसात्मक काव्यातहि ज्यापासून परतत्त्वाचा स्पर्श रसिकाला जाणवतो तेंच वाणीचें सर्वश्रेष्ठ रूप होय. असें काव्य केवळ भक्तिरसात्मकच असू शकते असा सर्व संतांचा निर्वाळा आहे.

काव्य हें कविकर्म होय. लौकिक दृष्टीने हें कर्म कविबुद्धिगत असतें. बुद्धीच्या तीन प्रकारे चालणाऱ्या व्यापारावरून शास्त्रज्ञांनी बुद्धीच्या—स्मृति, मति, प्रज्ञा— अशा तीन अवस्था मानल्या आहेत. स्मृतीची अवस्था भूतकालीन अनुभवाशी संबद्ध असते. हे भूतकालीन अनुभव संस्काररूपाने अंतःकरणाशी एकात्मतेने राहतात; स्मृतिकाली ते जागृत होतात. मति ही वर्तमानकालीन अनुभवाशी संबद्ध असते. प्रज्ञा ही अनागताशी संबद्ध असते. (अतीतस्य स्मर्त्री स्मृतिः, वर्तमानस्य मन्त्री मतिः । अनागतस्य प्रज्ञात्री प्रज्ञा ।—राजशेखर, का. मी.). यापैकी स्मृति आणि मति या दोन अवस्था कालाशी जोडलेल्या असल्याने व्यक्तिसंबद्ध असतात. प्रज्ञा ही अवस्था मात्र व्यक्तिसंबद्ध नसते. ती कालातीत म्हणून वैश्विक अवस्था असते. प्रज्ञारूढ भूमिकेवरून कवि जेव्हा काव्यनिर्मिति करतो तेव्हा स्मृति व मतीचे त्याला साह्य मिळते. पण ते त्यांच्या कालसंबद्ध अवस्थेत नव्हे. प्रज्ञेच्या प्रकाशात त्या दोन्ही उजळून निघतात आणि त्यांचे व्यक्तिसंबद्ध रूप गळून पडते. कवि वर्तमानात उभा असतो; जुने अनुभव स्मृतिसंस्काररूपात जागृत होतात;

अनुक्रमणिका

प्रज्ञाप्रकाशाच्या दृष्टीतून तो त्यांच्याकडे पाहतो; तेव्हा त्या सर्वांचे स्वरूप त्रैकालिक आणि वैश्विक असल्याचे त्याला जाणवते. अशा अवस्थेतून त्याचे काव्य प्रकट होत असते. रामकथा हे त्याचे उत्तम उदाहरण होय.

काव्यनिर्मितीची ही मीमांसा राजशेखराच्या वचनाधारे शास्त्रीय पद्धतीने सांगितली. मौज अशी की हीच मीमांसा संतांच्या काव्यात इतक्या सुलभतेने आलेली आहे की ती शास्त्रीय मीमांसा आहे हें आपल्या लक्षातसुद्धा येत नाही. उदाहरणार्थ, तुलसीदासजींची पुढील चौपाई पहा—

**हृदय सिंधु मति सीपसमाना ।**
**स्वाति सारदा कहिय सुजाना ॥**
**जैं बरसैं वर वारि विचारु ।**
**होइ कवित मुकुतामनि चारु ॥**

"जाणते पुरुष सांगतात की हृदय हें समुद्रासारखे गंभीर आहे. आणि मति ही त्यातील एक शिंप आहे. देवी शारदा (प्रतिभा) हे स्वाती नक्षत्र आहे. हे स्वाती नक्षत्र उदित झालें असता मतिरूप शिंपेच्या उघडलेल्या मुखांत सद्‌विचाररूपी जलबिंदू पडला तर या योगातून जन्माला येते ते कवितारूपी सुंदर मौक्तिक—" या चौपाईतील रूपक मोकळे केलें तर कवीचा अभिप्राय स्पष्ट होतो. कवीच्या अगाध हृदयात स्मृति-संस्कार एकरूपतेने साठविलेले असतात. वर्तमान अनुभवाच्या निमित्ताने मति विकसित होते अशा वेळी प्रतिभा (प्रज्ञा) जागृत झाली तर त्या योगातून जे सद्‌विचार प्रकट होतात ती कविता होय. राजशेखरासारख्या पट्टीच्या काव्यमीमांसकाने शास्त्रीय भाषेत मांडलेले विचार तुलसीदासजी किती सहजतेने बोलून गेले, हे पाहिले म्हणजे मन आश्चर्यमुग्ध होते.

पण तुलसीदासजी आपल्याला त्या मुग्ध अवस्थेत राहू देत नाहीत. लागलीच ते दोहा गाऊ लागतात—

**जुगुतिबेधि पुनि पोहिअइ**
**रामचरित वर ताग ।**
**सज्ञन पहिरइ विमल उर,**
**सोभा अति अनुराग ॥ (बाल.११)**

"या कवितारूपी मुक्ताफलांना युक्तीने विद्ध करून (छिद्रे पाडून) रामकथेचा रेशमी दोरा त्या मोत्यांतून ओवला तर एक सुंदर मुक्ताहार बनतो. तो मुक्ताहार भावुक (सहृदय) सज्ञन आपल्या हृदयस्थलीं (अंतःकरणांत) धारण करतात. त्यावेळी त्याचे जे सौंदर्य अनुभवास येते त्याचे स्वरूप म्हणजे परम प्रेम." या दोह्यामधून तुलसीदासजी आपल्याला सांगतात तें असें— या कवितारूपी मोत्यांचा युक्तीने वेध करा. ही युक्ति म्हणजे उचितानुचित विवेक. यालाच साहित्यशास्त्रात व्युत्पत्ति अशी संज्ञा आहे. (उचितानुचितविवेको व्युत्पत्तिः । — राजशेखर, का. मी.) काव्यशास्त्रांत प्रतिभा, व्युत्पत्ति आणि अभ्यास यांना 'काव्यकरण' म्हटले आहे. या तिघांचाहि निर्देश येथे शारदा, युक्ति आणि सज्ञन (सत्संग) असा आला आहे. काव्यानुशीलनाची शिक्षा (शिक्षण) काव्यज्ञ देतात, तर भक्तिरसाची गोडी संतसहवासांत कळते. प्रासादिक संतकाव्यांत शास्त्रप्रज्ञा आणि काव्यप्रज्ञा कशा एकजीव होऊन प्रकट होतात याचे हे उत्तम उदाहरण आहे.

अनुक्रमणिका

आता आपण "सोभा अति अनुराग" या पदांचा थोडा विचार करूं. सोभा = शोभा, अर्थात् काव्यशोभा किंवा काव्यसौंदर्य. काव्याचे सौंदर्य रस प्रतीतीच अनुभवास येते तेव्हा 'सोभा' या पदाने येथे 'रसप्रतीति'च अभिप्रेत आहे, याबद्दल शंका नको. मुक्तामालेच्या रूपकाच्या संदर्भाने येथे 'रस' या ऐवजी 'शोभा' हा शब्द वापरला, एवढेच. येथे प्रतीत होणाऱ्या शोभेचे– सौंदर्याचें– रसाचें स्वरूप कसें आहे?'अति अनुराग' असें कवींचे त्यावर उत्तर आहे.'अति अनुराग' म्हणजे काय?अति = पर, श्रेष्ठ; 'अनुराग'= अनुरक्ति; म्हणून 'अति अनुराग' म्हणजे "परानुरक्ति". हा शब्द आपल्या कानावर पडताच काय होतें तें पहा. आपल्या हृदयातील काही स्मृति संस्कार एकाएकी जागृत होतात– "सा (भक्तिः) परानुरक्तिरीश्वरे" असें महर्षि शाण्डिल्यांचे वचन आठवते; "सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा" असें देवर्षि नारद म्हणाल्याचें आठवते; "परमानंद कृपायतन मनपरिपूरन – काम । प्रेम भगति अनपायिनी देहु हमहि श्रीराम ॥" अशी सनत्कुमारांसारख्या जीवन्मुक्तांनी केलेली मागणी आठवते; "प्रेम-भगति जलबिनु रघुराई । अभिअंतर मल कबहुं न जाई ॥" असे ब्रह्मर्षि वसिष्ठांचे म्हणणें आठवते; आणि या भक्तिरसाचा प्रत्यय भावुकांच्या मनाला जसजसा अधिकाधिक निर्मल करीत जातो तसतशा,

**"हो का तरंगु लहानु । परी सिंधूसि नाही भिन्नू ।**
**तैसा ईश्वरीं मी आनु । नव्हेचि मा ॥**
**ऐसेनि बा समरसे । दृष्टि जे उल्हासे ।**
**ते भक्ति पै ऐसे । आम्ही म्हणो ॥ (ज्ञा. १४।३८६-८७)**

या आत्मनिवेदनरूप अव्यभिचारी प्रेमभक्ती-संबंधीच्या ओव्या हृदयांत अधिकाधिक प्रकाशित होत जातात. समरसतेची-सामरस्याची प्रतीति हेंच भक्तिरसाचे बीज आणि फलहि आहे. "नायकस्य कवेः श्रोतुः समानोऽनुभवस्ततः" असे भट्टतौत नाट्याच्या संदर्भात म्हणतात, तर "हो का तरंगु लहानु । परी सिंधूसि नाही भिन्नू" असें ज्ञानेश्वर भक्तिरसातील सामरस्याबद्दल सांगतात. स्वरूपानुभवातून प्रकट झालेल्या संतवाणीतील प्रकाशकिरण भावुक श्रोत्याच्या हृदयाला क्षणभर का होईना, श्रवणावस्थेत स्पर्श करून जातो हें खास! संत नामदेव तर "नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥" असे स्पष्टच सांगतात. ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेला काव्यातील परतत्त्वस्पर्श हाच तर नसेल ना!

"Fine art is an art, which presents the Absolute in sensuous garb; and Aesthetical relation with the work of Art gives rise or leads to the experience of the Absolute" असें भारतीय ललितकलेचें स्वरूप असल्याचें डॉ. कांतिचंद्र पांडे सांगतात– कलेच्या माध्यमातून रसिकाच्या अनुभवास येणाऱ्या आनंदाला "प्रागानंद" असें नाव आहे. हा प्रागानंद 'पूर्णतास्पर्शा'मुळे होत असतो असें अभिनवगुप्ताचार्य म्हणतात. हा प्रागानंदच चढत्या भूमिकांच्याद्वारे 'जगदानंदा'त परिणत होतो. जगदानंदाच्या अवस्थेतील अनुभव संतमुखातून बाहेर पडतांना "चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम्', 'वासुदेवः सर्वमिदम्', "सीयराममय सब जग जानी' इत्यादि उद्गारांचे रूप घेऊन बाहेर पडतो.

ज्या आनंदाचा अनुभव प्राप्त व्हावा म्हणून योगी भरल्या संसाराचा त्याग करून रानावनात हिंडत राहतात आणि देहेंद्रियांना कष्ट देतात तोच "महानन्द सोपा करून" संत मातृवत्सलतेने त्याचा एक एक घास आपणा सर्वांच्या मुखात घालतात. ते संसार सोडायला सांगत नाहीत. एकाग्रतेने श्रवण करावें एवढीच त्यांची लहानशी अपेक्षा असते. एकाग्रतेने श्रवण केलें तर "तैसा मनाचा मारु न करिता । आणि इंद्रियां दुःख

अनुक्रमणिका

न देतां । येथ मोक्षु असे आयता । श्रवणाचि माजी ॥" (ज्ञा. ४/२२३) असें प्रतिज्ञापूर्वक सांगूनच ते आपल्याला श्रवणास बसवितात.

संतांच्या काव्याचे अनुशीलन करणाऱ्या अभ्यासकांना संतानी एक मोलाचा इशारा दिलेला आहे. तो मात्र दृष्टिआड होता कामा नये. तुलसीदासजींनी तो वर निर्दिष्ट केलेल्या रूपकातच सूचित केलेला आहे. कवितारूपी मौक्तिकांचे सौंदर्य ते मालेत असतानाच पूर्णतया प्रकट होते. भक्तिरसात्मक सौंदर्याची प्रतीति यावयास हे सर्व मोती रामचरिताच्या रेशमी दोऱ्यातच ओवले पाहिजेत. हा दोरा जोवर अंतःकरणाने पक्का पकडलेला असतो तोवरच भक्तिरसाचा आस्वाद मिळतो. जर का तो एखाद्या क्षणी सुटला किंवा तुटला तर सर्व मोती ओघळणारच. समर्थांनी हीच जाणीव आपल्याला स्पष्ट शब्दांत दिली आहे. ते म्हणतात– "कवित्वशब्द सुमनमाळा । अर्थपरिमळ आगळा । तेणें संतषड्पदकुळा । आनंद होय॥ऐसी माला अंतःकरणी । गुंफून पूजा रामचरणीं । ओंकार तंत अंतःकरणी । सोडूच नये ॥" (दा. बो. १४।३।१-२) 'ओंकार तंत' आणि 'रामचरितवरताग' यांचा अभिप्राय एकच आहे. आपल्या अंतःकरणातून तो सुटून जाऊ नये किंवा तुटू नये याकरिता संतांनी एक प्रभावी युक्ति सांगितली आहे. ती युक्ति आहे–**"भगवन्नाम".**

रामचरितमानस हे काव्य ईश्वरी प्रसादाने प्रकट झाले असे तुलसीदासजी स्वतःच सांगतात. "भनिति मोरि सिवकृपा बिभाति", "संभुप्रसाद सुमति हियँ हुलसी । रामचरितमानस कवि तुलसी ॥" इत्यादि त्यांची अनेक वचने त्यांच्यावर असलेल्या ईश्वरानुग्रहाची साक्ष देतात. या सर्व काव्याला अंतर्बाह्य रामनामाचा एकमेव आधार आहे. त्यामुळेच ते संत सज्जनांना ग्राह्य होईल असे ते विश्वासाने सांगतात (प्रभु सुजस संगति भनिति भलि होइहि सुजन मन भावनी). हा त्यांचा विश्वास कशावर आधारलेला आहे? ते सांगतात–

**एहि महँ रघुपतिनाम उदारा ।**
**अति पावन पुरान श्रुति सारा ॥**
**मंगल भवन अमंगल हारी ।**
**उमासहित जेहि जपत पुरारी ॥**

भगवन्नामाचे स्वरूप, शक्ति, प्रयोजन, परिणाम आणि महत्त्व यासंबंधी त्यांनी रामकथेच्या प्रास्ताविक भागातच विवेचन केलेले आहे. थोड्या शब्दांत व्यापक अर्थ प्रकट करणारे, सारगर्भ असूनहि प्रत्येकाला आकलन करता येण्याजोगे, शास्त्रपूर्ण असूनहि मनाला रोचक होणारे, इतके चांगले विवेचन रामचरितमानसाखेरीज अन्यत्र माझ्या वाचनात आलेले नाही. प्रत्येक अभ्यासकाने ते वाचावे, ऐकावे, समजून घ्यावे, मननाचा विषय करावे, निदिध्यासावे.

वरील चौपाईत तुलसीदासजींनी भगवन्नामाचे (रामनामाचे) जे सूत्र पकडले ते त्यांनी काव्य संपल्यावरहि सुटू दिले नाही. काव्यसमाप्तीच्या अखेरच्या दोह्यातहि ते रघुनाथाला नामप्रेमच मागतात.

**कामिहि नारि पियारि जिमि ।**
**लोभिहि प्रिय जिमि दाम ।**
**तिमि रघुनाथ निरंतर**
**प्रिय लागहु मोहि "राम" ।।**

अनुक्रमणिका

एवढेच नव्हे तर त्यांनी भगवान शंकरांनी पार्वतीला सांगितलेली रामकथाच भाषेतून गायनाकरिता निवडली याचे एकमेव कारण ती "रघुनाथ नामनिरत" आहे म्हणून. भगवान शंकराप्रमाणे तुलसीदासांचाहि 'राम' हा प्राण आहे. 'राम' हा शब्द आहे, अर्थ आहे, संतांची प्रतीति आहे. (कहऊं प्रतीति प्रीति रुचि मन की). या प्रतीतीच्या बळावरच संत म्हणू शकतात--'राम न जान नाम प्रभुताई',"तुझ्या नामाचा महिमा । तुज न कळे पुरुषोत्तमा ॥ "

डॉ. रानड्यांना रामरितमानसाची गंभीरता जाणवली आहे. ते म्हणतात,"जेवढे अवगाहन त्यात करावे तेवढी त्याची अगाधता जाणवते" (पा.७८). अगदी खरे आहे. या त्यांच्या वाक्यामुळे त्यांच्यासंबंधी माझ्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यांचा प्रस्तुत लेखसंग्रह मी वानगीदाखल समजतो. त्यांनी तुलसीमानसात खोल खोल बुड्या घ्याव्यात; त्यातील अनेक रत्ने वर आणावीत; आपल्या प्रतिभेने त्या रत्नांची 'तुळशी मंजिरी' बनवावी; आणि रामरायाच्या चरणी अर्पण करावी. श्रीरामराय मोठ्या आनंदाने प्रत्येक मंजिरीचा स्वीकार करील; या सेवेतच त्यांची प्रतिभा सार्थकी लागेल.

**भगति हेतु विधि भवन बिहाई ।**
**सुमिरत सारद आवति धाई ।।**
**रामचरित सर बिनु अन्हवाएँ**
**सो श्रम जाइ न कोटि उपाएँ**
**कवि कोविद अस हृदयँ विचारी ।**
**गावहि हरिजस कलिमलहारी ।।**

मुक्काम: श्रीक्षेत्र नासिक,
दि. १ नोव्हेंबर, १९८३

**ग.त्र्यं. देशपांडे,**
**नागपूर.**

अनुक्रमणिका

## फोडिले भांडार

काही वर्षापूर्वी जबलपूरच्या एका स्थानिक संस्थेने रामलीलेचे उद्‌घाटन करण्यासाठी निमंत्रित केले असता संत तुलसीदासांच्या रामचरितमानसाची एक सुबक प्रत मला भेट म्हणून दिली. तोपावेतो कधीच पूर्ण न वाचलेल्या त्या महान ग्रंथाचा समुचित उपयोग करण्याचे मी त्याच व्यासपीठावरून आश्वासन देण्यास चुकलो नाही. माझे मॅट्रिक पावेतोचे शिक्षण टिमारनी, हरदा व जबलपूर येथे हिंदी माध्यामातून झालेले असल्यामुळे क्रमिक पुस्तकातून तुलसी रामायणातील शिवपार्वती विवाह, शिवधनुर्भंग, रामवनगमन इत्यादी काही प्रसंगांशी माझा परीक्षेपुरता परिचय झालेला होता तेवढाच. पुढील काही महिन्यात या ग्रंथाचे अथपासून इतिपावेतो वाचन पूर्ण केले. ते करीत असताना त्यात मराठी संतपंत कवीशी साम्य, संस्कृत सुभाषितांचा चपखल हिंदी अनुवाद, गीता-भागवतादी ग्रंथातील काही संदर्भ, काव्यसौंदर्याची उदाहरणे यांचा जागोजाग प्रामुख्याने आढळ होऊ लागला आणि या ग्रंथाची पृष्ठे खाली वर टिपणांनी भरून गेली. मराठी व इतर साऱ्याच प्रादेशिक भाषात रामकथा सर्वपरिचित असली तरी एक प्रातिनिधिक राष्ट्रीय ग्रंथ म्हणून ज्याचा परिचय सर्वांना अवश्यमेव व्हावयाला हवा असा हा अद्‌भुत ग्रंथ असल्याची जाणीव दिवसेंदिवस बळावत गेली. याच दृष्टीने 'तुलसीदासांचे रामचरित मानस-एक विहंगमावलोकन' हा लेख मी लिहिला आणि कै.ग.त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांनी दि ४ एप्रिल १९७१ च्या तरुणभारतात त्याला प्रामुख्याने प्रसिद्धी दिली. हीच मान्यतेची पावती समजून या ग्रंथावर सातत्याने लिहीत राहण्याचे मी ठरविले आणि पुढील लेख क्रमाक्रमाने सिद्ध होत गेले. दुसरा लेख 'रा.च.मा. तील स्त्रियश्चरित्रम्' हा जून १९७२ च्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत प्रसिद्ध झाला. 'रा.च.मा. तील ऋतुवर्णन' हा लेख पुन्हा तरुणभारताने व 'संत तुलसीदास व काही मराठी संत' हा श्री. पां.वा. गाडगीळ यांनी आपल्या लोकमतमध्ये प्रकाशित केला. या मूळ मराठी लेखांचे हिंदी अनुवादही मी लगोलग करीत गेलो व ते युगधर्म, नवभारत, नवीन दुनिया, देशबंधु या स्थानिक नियतकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध होत गेले. योगायोगाने १९७४ हे वर्ष संपूर्ण भारतवर्षात मानसचतुःशताब्दी वर्ष म्हणून राष्ट्रीय पातळीवर साजरे व्हावयाचे ठरले. त्या निमित्ताने भोपाळ येथे स्थापित झालेल्या मध्य प्रदेश रामचरितमानस चतुःशताब्दी समारोह समितीने मजकडून लेख मागितला. मी लिहून दिलेला 'तुलसीदासजीका रामचरितमानस और एकनाथजीका भावार्थरामायण' हा हिंदी लेख समितीने १९७५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'रामचरितमानस-एक विश्लेषण' या ग्रंथात समाविष्ट केला. याच सुमारास बृहन्महाराष्ट्र परिषदेचे सरचिटणीस कै.रमेश मुळगुंद यांनी मला असे सुचविले की मानसचतुःशतीच्या त्या वर्षात मी दर महिन्याला परिषदेच्या 'मायमराठी' या मासिकात या विषयावर एक लेख लिहावा. त्याप्रमाणे पुढील सारे लेख ऑगस्ट १९७३ ते डिसेंबर १९७४ या काळात मायमराठीने प्रकाशित केले. माझ्या सहकार्याने ऑगस्ट १९७४ चा मायमराठीचा अंक मानस चतुःशताब्दी विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला. एका मराठी नियतकालिकाच्या या उपक्रमाविषयी प्रसन्नता व्यक्त करणारी प्रोत्साहक पत्रे त्या वेळचे उपराष्ट्रपती श्री.पाठक, राज्यपाल श्री.अकबर अलीखान, अर्थमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण, परिवहन मंत्री श्री.कमलापति त्रिपाठी व सहकारिता मंत्री यशवंतराव मोहिते यांनी मायमराठीला पाठविली. भावनात्मक ऐक्याच्या दृष्टीने पडणारे हे एक पाऊल असल्याचे या मान्यवरांनी स्पष्टपणे म्हटले. हे सारे लेख मराठीप्रमाणेच हिंदीतही प्रसिद्ध होत गेले व हिंदी-मराठीच्या जाणकारांनी त्यांजविषयी प्रशस्तिपर अभिमत वेळोवेळी दिले. आज देखील प्रस्तुत मानस हा ग्रंथ वाचताना त्याच्या अनुरोधाने आणखी कित्येक विषयांवर लेख लिहिणे शक्य आहे असे जाणवल्याशिवाय राहत नाही.

'तुळशीमंजिऱ्या'मधील लेखांच्या निमित्ताने तुलसीच्या मानसात अवगाहन करून त्यातील काही दैदीप्यमान उन्मेष शोधण्याचा विनम्र प्रयास केला आहे. ग्रंथाचे विहंगमावलोकन करीत असताना त्यात

अनुक्रमणिका

आढळलेल्या साऱ्या वैशिष्ट्यांचा धावता आढावा घेतला आहे. या लेखाच्या वाचकाला मूळ ग्रंथाची सम्यक् कल्पना यावी व तो समग्र वाचण्याची प्रेरणा व्हावी अशी अपेक्षा आहे. पुढील लेखातून क्रमशः तुलसीदासांची प्रज्ञाप्रतिभा, त्यांची भाविक वृत्ती व रसिक दृष्टि, त्यांची संस्कृतनिष्ठा व सूक्तिसुभाषितांच्या योजनेचे चातुर्य, मराठी संत पंतांशी त्यांचे विचारसाम्य इत्यादी अनेक विषयांचा विस्तारपूर्वक परामर्श घेण्यात आला आहे. त्यामुळे विहंगमावलोकन या लेखात आधीच उद्धृत झालेल्या कित्येक दोहे चौपायांची व काही विधानांची त्या त्या विषयानुरोधाने लिहिलेल्या पुढील लेखात स्वाभाविकच पुनरावृत्ति झालेली आढळून येईल. पण असे केवळ अपरिहार्यपणे झालेले आहे. यात आत्मसमर्थनाचा हेतू नसून वास्तविक स्थितीचे ते निवेदन आहे एवढे वाचकांनी कृपापूर्वक व उदारपणे समजून घ्यावे अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत ग्रंथातील लेखांचे स्फुरण राष्ट्रीय एकात्म भावनेच्या जोपासनेत आहे हे सांगणे परमावश्यक आहे. महाराष्ट्राबाहेर हिंदी भाषी प्रदेशात येथील समाजजीवनाशी शक्य तेवढे एकरूप होऊन राहण्यात एक विशेष आनंद आहे. साहित्य-संस्कृती आणि आचार-व्यवहार यांच्या परस्पर निकट परिचयातूनच ही अपेक्षित भावनिक एकात्मता साध्य होऊ शकणार आहे. या दृष्टीने स्थानिक व प्रादेशिक नियतकालिकांतून मराठीतील अनेक प्रख्यात संतकवींच्या मंगल वाङ्मयासंबंधी व महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय विचारांचे प्रतिध्वनि ज्याच्यातून उमटले आहेत अशा अर्वाचीन लेखकांच्या साहित्याविषयीचे लेख हिंदीतून लिहिण्याचा क्रम मी आचरीत आलो आहे. ज्योतिबा फुले यांजविषयीचे एक लहानसे हिंदी भाषेत लिहिलेले माझे पुस्तकही येथील माळी समाजाने प्रकाशित केले आहे. महाराष्ट्राला हिंदीच्या प्राचीन अर्वाचीन वाङमयसंपदेचे ओझरते तरी दर्शन घडावे या हेतूने मी केलेले काही प्रसिद्ध हिंदी कथांचे अनुवाद पुण्याच्या 'प्रसाद' मधून व पुढे अन्यत्र काही काळापूर्वी प्रसिद्ध झाले आहेत. तुलसीदासांप्रमाणेच पुढे १९७८-७९ साली भारताने आसेतुहिमाचल मोठ्या उत्साहाने सूरदासांची पंचशताब्दी साजरी केली. त्या निमित्ताने कृष्णैकभक्त सूरदासांच्या काव्यासंबंधी माझे १६ मराठी लेख मायमराठीने क्रमशः प्रसिद्ध केले. शिवाय सूरदासांच्या कृष्णकाव्याबरोबरच मराठीतील कृष्णकाव्याचा हिंदीतून परिचय करून देणारे माझे लेखही त्याच सुमारास प्रसिद्ध झाले.

थोडक्यात असे की विचारांच्या परस्पर आदान प्रदानाद्वारे भावनात्मक ऐक्य साधण्याच्या राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्नाला गोवर्धन पर्वताला आपल्या काठीचा टेकू देणाऱ्या सामान्य गोपबालाप्रमाणे हातभार लावण्याच्या प्रामाणिक उद्देशाने मी या तऱ्हेचा वाङ्मयीन प्रपंच करीत आलो आहे. अर्थात यात माझे स्वतःचे मौलिक असे काहीच नसून मी केवळ त्या ज्येष्ठश्रेष्ठ रचनाकारांच्या वाङ्मय भांडारातील साहित्य एखाद्या कोठाऱ्याप्रमाणे चोखंदळ वाचकांपुढे ठेवीत आलो आहे. तुकारामांच्या शब्दात असे म्हणणेच योग्य ठरेल की-

'.... धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही'

प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट लेखांना प्रसिद्धी देऊन ज्यांनी मला उपकृत केले व ज्यांचा उल्लेख या पूर्वी आलेला आहे त्यांचा मी सदैव आभारी राहणार आहे. ज्यांनी माझ्या या लेखांचे मनःपूर्वक कौतुक करून ते ग्रंथरूपाने प्रकाशित व्हावे म्हणून मला निरंतर प्रोत्साहित केले त्या डॉ.वि.भि.उपाख्य भाऊसाहेब कोलते यांचे आभार मानण्यासाठी मजजवळ पुरेसे शब्द नाहीत. ग्रंथ प्रकाशित करण्याचे मनावर घेतल्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व विशेषतः अध्यक्ष डॉ.सुरेंद्र बारलिंगे यांच्या विषयीची माझी कृतज्ञता अमाप आहे. ग्रंथाला साजेसे समर्पक मुखपृष्ठ तयार करणारे व सुबक छपाई करून ग्रंथाची

अनुक्रमणिका

सजावट करणारे या साऱ्यांचे आभार न मानणे कृतघ्नपणाचे ठरेल. सर्वांच्या अखेरीस या ‘तुळशीमंजिऱ्यां’चा रसिकास्वाद घेऊन आपल्या प्रस्तावनेने त्याचा आमोद शतगुणित करणाऱ्या डॉ.ग.त्र्यं. देशपांडे यांच्या विषयीचा माझा कृतज्ञ भाव व्यक्त करून हे निवेदन संपवितो.

**डॉ.गो.मो. रानडे**

‘मयूर’ ५८६ मदनमहल
जबलपूर
दि. १६ जुलै १९८३

अनुक्रमणिका

# तुळशी—वृंदावन

कविवर्य मोरोपंतांनी तुलसीदासांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे—

श्रीकृष्णमूर्ति जेणें केली श्रीराममूर्ति सज्जन हो ।

रामसुत मयूर म्हणे त्याच्या सुयशोऽमृतात मज्जन हो ।।

वृंदावनात प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाच्या मंदिरात त्याच्या पीतांबरधारी 'अंगवक्र अधरी धरि पावा' या मनमोहन रूपाला न भुलता तुलसीदासांनी असे म्हटल्याची दंतकथा आहे की—

कहा कहौं छबि आपकी भले बिराजे नाथ ।
तुलसी मस्तक तब नबै धनुषबाण लो हाथ ।।

आणि त्यांना श्रीकृष्णाने प्रत्यक्ष धनुर्धारी रामाच्या रूपात दर्शन दिले असे म्हणतात. कालमानपरिस्थितीशी पूर्णतः विसंगत अशी ही शांतता-सुबत्तेच्या काळातील मुरलीवादनाची सुखवादी वृत्ति स्वीकारणाऱ्या या देवतेऐवजी संस्कृतीच्या ऱ्हासकाळी 'सन्नद्धः कवचीखड्गी चापबाणधरो युवा' या स्वरूपात मरणासन्न भारतराष्ट्राला प्रेरणा देणाऱ्या उपास्यदैवताची गरज तुलसीदासांनी अचूक हेरली होती. आणि म्हणूनच त्यांच्यापूर्वीपासून चालत आलेली वल्लभसंपद्राय-प्रणीत कृष्णभक्तीची लाट थोपवून धरण्याची पराकाष्ठा त्यांनी उत्तर भारतात रामभक्तीच्या प्रचारपुरस्काराद्वारे केली. पुढे सतराव्या शतकात महाराष्ट्रातदेखील समर्थ रामदासांनी त्याच समान परिस्थितीत कटीवर हात विसावून उभ्या असणाऱ्या निवृत्त विठोबाला 'येथे कां रे उभा श्रीरामा' या सुप्रसिद्ध पदातील प्रश्न विचारल्याचे ऐकिवात आहेच. समकालीन संत एकनाथांनी आपले भावार्थरामायण तुलसींच्या रामचरितमानसावरून प्रेरणा घेऊन लिहिल्याची प्रमाणे उपलब्ध आहेत.

इ.स.१४९८ मध्ये उत्तरप्रदेशातील बांदा जिल्ह्याच्या राजापूर ग्रामी एका ब्राह्मण कुटुंबात तुलसीदासांचा जन्म झाला. मूळनक्षत्रात जन्मल्यामुळे परित्यक्त बालकाला आईबापांचे वात्सल्य लाभले नाही. पण त्यांचे गुरु नरहरानंद यांनी त्यांचे पालकत्व स्वीकारले व रामबोला असे नामकरण करून त्यांना राममंत्राची दीक्षा दिली. विलक्षण प्रतिभासंपन्न अशा या मुलाने पंधरा वर्षे काशीस राहून वेदोपनिषदांचे गाढ अध्ययन केले. विवाहानंतर प्रारंभी तुलसीदास अतिशय स्त्रीलंपट होते असे म्हणतात. पण एकदा त्यांच्या लघळपणामुळे शरमलेल्या त्यांच्या पत्नीने आपल्या माहेरी आलेल्या पतीला धिःकारले व 'माझ्या हाडामासाच्या देहावर करता तेवढे प्रेम श्रीरामावर कराल तर भवसागर तरून जाल' अशा मर्मभेदक शब्दात त्यांना कठोर वाक्ताडन केले. यामुळे उपरति होऊन तुलसीदासांनी संसाराचा त्याग केला व साधुत्व स्वीकारून रामोपासनेत काळ कंठू लागले. प्रारंभी हनुमंतांचा साक्षात्कार होऊन त्यांच्या प्ररणेने ते चित्रकूट येथे मंदाकिनीच्या तीरावर रामदर्शनाच्या अपेक्षेने राहू लागले. येथे त्यांना प्रभुरामचंद्राचे दर्शन घडल्याचे सांगतात.

तुलसीदासांचा जीवनकाळ हा उत्तर भारतात यावनीसत्तेच्या प्राबल्याचा व हिंदुधर्मसंस्कृतीच्या ऱ्हासाचा काळ होता. अकबर बादशहाच्या दीन-ए-इलाही आणि सर्वधर्मसमन्वयवादी भूमिकेच्या ठिगळाने

अनुक्रमणिका

हिंदुसंस्कृतीच्या फाटत चाललेल्या आकाशाला सांधणे शक्य नव्हते. नाइलाजाने कां होईना पण 'चारों बरन धरम छोड कलमा नमाज पढे' अशी लाजिरवाणी परिस्थिति येऊन ठेपल्याचे भूषण कवीने ज्या काळाचे वर्णन केले आहे त्याची अमंगल पूर्वचिन्हे तुलसींना दिसू लागली होती. यावनीसत्तेच्या राजकीय आक्रमणापेक्षा तिचे संस्कृतीवरील आघात अधिक घणाघाती, भयावह व विध्वंसक होते. या परिस्थितीकडे केवळ विमनस्कपणे पाहत राहून 'मला काय त्याचे?' ही वृत्ति स्वीकारणे आत्मघातकीपणाचे ठरणार होते. तुलसीदासांच्या शब्दात 'द्विज स्रुतिबेचक भूप प्रजासन । कोउ नहिं मान निगम अनुसासन' अशी अवस्था असताना आपल्या उपस्थितीने आपला नवरत्नदरबार भूषविण्याच्या अकबराच्या प्रलोभनाचा तुलसींनी पुढील दोह्यात अव्हेर करावा हे स्वाभाविकच होते—

हम चाकर रघुबीरके पटौ लिखौ दरबार ।
तुलसी अब का होइ हैं नरके मनसबदार ॥

श्रीरामाच्या दिव्य दरबारी सेवा रुजू झालेल्या मनसबदाराने मानवाच्या क्षुद्र दरबारात काय म्हणून बसावे? तुलसीदास व्यक्तिशः संतप्रवृत्तीचे असले तरी समाजविन्मुख मात्र मुळीच नव्हते. रंजलेगांजलेल्या देशवासीयांची कणव त्यांच्या अंतःकरणात होती. या दुरवस्थेविषयीची बोच सतत त्यांच्या मनात सलत असे. यातूनच रामाच्या उपासनेला समाजातील सर्व थरांना प्रवृत्त करण्याची प्रेरणा त्यांना झाली. मानवजीवनातील साऱ्या दुखःभोगांची परिसीमा गाठलेल्या मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्राच्या आदर्शाने समाजाला नवजीवन व नवचैतन्य प्राप्त होऊ शकेल असा तुलसींना विश्वास होता. याचे कारण असे की श्रीरामचंद्राने अवतार धारण केला होता तोच मुळी—

असुर मारि थापहिं सुरन्ह, राखहिं निज स्रुतिसेतु।
जग बिस्तारहिं बिषदजस रामजन्मकर हेतु॥

या एकमात्र लोकमंगलकारी महान् उद्देशाने. रामावताराच्या वेळी जी परिस्थिति होती जवळपास तशीच अवस्था सांप्रतकाळी असल्याचे तुलसींना जाणवत होते. आणि म्हणूनच विद्यमान दुर्दशेत रामकार्याची पुनरावृत्ति करण्याची प्रेरणा समाजपुरुषात जागृत व्हावयाला हवी होती. याच हेतूने त्यांनी वयाच्या सत्त्यात्तराव्या वर्षी रामचरितमानस या ग्रंथाच्या रचनेला प्रारंभ केला व सुमारे पावणे तीन वर्षांत हा अलौकिक काव्यग्रंथ रचण्याचा आपला संकल्प पुरा केला. या ग्रंथाद्वारे त्यांनी रामभक्तीची मुहूर्तमेढ रोवली व पुनश्च आसेतुहिमाचल भारतात स्वत्वस्वाभिमान, आत्मविश्वास व क्षात्रतेज जागृत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी रामचंद्राच्या अतुलनीय सामर्थ्याचे, शीलाचे व सौंदर्याचे दर्शन घडविले आहे. राम-हनुमानाच्या संबंधातून सेव्यसेवक भावाची अपूर्वाई दर्शवून अंतिम यशासाठी नेत्यावरील अचल निष्ठाभक्तीची गरज पटवून देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. लक्ष्मण व भरत त्यागतपस्येच्या व निःस्पृहतेच्या प्रतिमूर्ति आहेत. आणि रामराजाचे राज्य हा तर सर्वोत्तम राजसत्तेचा उत्तुंग आदर्शच आहे. तुलसीदासांनी अत्यंत सूक्ष्म नजरेने त्यांच्या समकालीन सामाजिक राजकीय परिस्थितीचे अवलोकन केलेले असल्यामुळे प्रस्तुत ग्रंथात जनतेचे दुःखदैन्य, शीलमर्यादांचा लोप, दुराचारदुष्प्रवृत्तींचा वाढता प्रकोप इत्यादींचे प्रसंगोपात्त मार्मिक वर्णन त्यांनी केलेले आहे. या ग्रंथात वर्णित पात्रांच्या रूपाने विराट मानवी जीवनातील विविध बऱ्यावाईट प्रवृत्तींचे चित्रण त्यांनी केले आहे. यादृष्टीने त्यांचा हा ग्रंथ म्हणजे भारतीय जीवनाला व्यापून उरणारा एक बृहद् कोशच आहे. पुढे यासंबंधीच्या प्रकरणात त्याच्या स्वरूपाचा सविस्तर परामर्श घेतला आहे.

अनुक्रमणिका

तुलसीदासांची ग्रंथरचना केवळ मानसापुरतीच मर्यादित नसून विनय-पत्रिता, कवितावली, तुलसीसतसई, दोहावली, रामाज्ञाप्रश्न, जानकीमंगल, बरवैरामायण इत्यादी आणखी ग्रंथांचीही रचना त्यांनी केली आहे. हे लिहिताना त्यांनी आपले वैयक्तिक पांडित्य व संस्कृतभिज्ञता यांना शक्यतोवर बाजूला सारून सामान्यजनांच्या अवधी, ब्रज इत्यादी बोली भाषांचा वापर हेतुपुरःसर केला आहे. आजतागायत भारतातील व परदेशातील अशेष हिंदीभाषी जनतेत व इतर अनेक भाषा बोलणाऱ्यामध्येदेखील रामचरितमानस हा ग्रंथ नित्य पठनात आहे हे त्याचे महत्त्व दुर्लक्षिण्याजोगे नाही. प्रारंभी बहुजनहिताय प्रादेशिक भाषातून ग्रंथरचना करणाऱ्या साऱ्याच साधुसंतांप्रमाणे तुलसींनाही तत्कालीन संस्कृताभिमानी पंडितांचा विरोध सहन करावा लागला. पण त्यांच्या मानसाची निर्विवाद थोरवी पटल्यामुळे त्यांचे समकालीन, काशी येथील वैराग्यशील विद्वान मधुसूदन सरस्वती यांनी देखील त्यांच्या ग्रंथाला पुढील शब्दात प्रशस्तिपत्र दिले—

आनंदकानने ह्यस्मिन् जंगमस्तुलसीतरुः ।
कवितामंजरी यस्य रामभ्रमरभूषिता ॥

रामचरितमानसाविषयी अकबराच्या दरबारातील तुलसीदासांचे समकालीन मुस्लिम हिंदी कवी रहीम म्हणतात—

रामचरितमानस बिमल गावहि बेद पुरान ।
हिंदुआनको बेदसम यवनन होई कुरान ॥

ग्रीयर्सन या पंडितानेही असे म्हटले आहे की हिंदीतील यच्चयावत् सारे ग्रंथ जरी नष्ट झाले तरी रामचरितमानस हा एकमेव ग्रंथ साऱ्यांची तूट भरून काढण्याजोगा आहे. मोरोपंतांनी तुलसीदासांच्या कार्याची पुढील आर्येत महति गाइली आहे—

श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गाया ।
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वश गा या ॥

तुलसींच्या जन्मतिथीविषयी मतैक्य नसले तरी त्यांच्या निधनाची तिथी सर्वमान्य आहे. इ.स.१६२४ मध्ये असीघाटावर त्यांचे देहावसान झाल्याविषयी पुढील दोह्यात म्हटले आहे—

संवत सोलहसो असी असीगंगके तीर ।
सावन सुक्ला सप्तमी तुलसी तज्यौ शरीर ॥

वृंदावनात तुलसीने रोपलेल्या भावनांचा उद्रेक म्हणजेच त्यांचे हे ‘रामचरितमानस’ आणि प्रस्तुत ‘तुळशी मंजिऱ्या’ या ग्रंथात लेखरूपाने संग्रहीत त्याचे उन्मेष म्हणजेच या तुळशी मंजिऱ्या. त्यांचा धुंद करणारा अक्षरसुवास हा आमचा शाश्वत ठेवा आहे.

अनुक्रमणिका

# तुलसीदासांचे रामचरितमानस—एक विहंगमावलोकन

संत तुलसीदासांचे नाव ज्याला माहीत नाही असा हिंदुस्थान देशात सहसा कोणीही आढळणार नाही. आमच्या या देशात नाना धर्मपंथांचा शतकानुशतके चाललेला खेळीमेळीचा संसार अनेक देवदैवतांनी गजबजलेला असला तरी राम या नावाचा परिचय नसणे ही एक अकल्पनीय गोष्ट आहे. एखाद्या गोष्टीत काही अर्थ नाही, कोण्या एका वस्तूला काही मोल नाही अथवा एखाद्या प्राण्यात जीव नाही हे भाव व्यक्त करण्यासाठी त्या त्या विषयात 'राम' नसल्याचे सहजच बोलण्याइतपत राम हा शब्द भारतीय जीवनाशी व भाषा संस्कृतीशी एकरूप झालेला आहे. आदिकवि वाल्मीकीने व मुनि वेदव्यास यांनी अजरामर करून ठेवलेली रामकथा हा अखिल भारताचा एकजात वारसा आहे. हिंदी ही येथील बहुसंख्यक जनतेची भाषा. आणि तुलसीदासजींचे 'रामचरितमानस' ही अशेष हिंदीभाषिकांची एकमेवाद्वितीय रामगाथा. इतर साऱ्या प्रादेशिक भाषातून रामायणाची रचना थोड्याफार बदलाने झालेली आहे. मराठीतदेखील यादव काळापासून आजतागायत अनेक कवींनी रामकथेची रचना केलेली आहे. तुलसीदासांनी आपल्या काळची परिस्थिती पाहून तिच्या अनुरोधाने तपशिलात थोडाबहुत बदल केला असला तरी मूळ प्रेरणा त्यांनीही वाल्मीकीपासूनच घेतल्याचे दिसून येईल. संस्कृत ही साऱ्या आर्यकुलोद्भव भाषांची जननी. साहजिकच भारतीय भाषातील सारे आध्यात्मिक-पौराणिक वाङ्मय संस्कृतचे ऋणी असणार आणि या दृष्टीने पाहता इतर वाङ्मयाप्रमाणे रामायणाच्या बाबतीतही परस्पर विचार साधर्म्य आढळले तर त्यात वाङ्मयीन चौर्याचा अथवा उधारउसनवारीचा ओझरताही स्पर्श झाल्याची कल्पना म्हणजे फाजील चिकित्साच ठरेल. प्रतिभेच्या न्यूनाधिकतेच्या अनुसाराने अथवा समकालीन परिस्थितीच्या अनुरोधाने काय वैशिष्ट्ये वा फेरबदल आढळतील तेवढेच. एरवी, प्रत्येक भारतीय कवीच्या प्रतिभेचा उद्रेक संस्कृतच्या सुपीक भूमीतूनच झालेला आहे हे कोणालाही अमान्य करता येणार नाही. मूळ कथा वारसा हक्काने चालत आलेली. तिच्यावर वैयक्तिक प्रतिभेचे संस्कार करून अथवा रुचीप्रमाणे कल्पनेचे साजश्रृंगार चढवून अनेक प्रादेशिक भाषातील कवींनी तिला जनताजनार्दनास समर्पित केलेले आहे. स्वाभाविकच यापैकी अनेकात कितीतरी साम्यस्थळे आढळतील. कोणात कथेच्या तपशीलात बदल करण्याच्या बाबतीत सारखेपणा आढळेल तर कोणी आपल्या विषयाच्या मांडणीची एक विशिष्ट पद्धत स्वीकारल्याचे दिसून येईल. काहीनी समान विचारसरणीचा अथवा दृष्टिकोनाचा अंगीकार केलेला असेल तर एखाद्या मुद्याचे विवरण करण्यासाठी अथवा आपल्या कल्पना स्पष्ट करण्यासाठी काहीनी नेमकी तीच सुभाषिते, रूपके वा दृष्टांत वापरल्याचे आपल्या प्रत्ययास येईल. पण यामुळे मूळ तत्त्वाच्या अथवा वस्तूच्या स्वरूपात फारसा भेद सापडेल असे नाही. याखेरीज अद्यावत अनुभवाने आणखी एका गोष्टीचे विस्मरण होता कामा नये. साधारणपणे अनेक प्रतिभावान कवींना सारख्याच प्रेरणा होत असल्याचे अथवा एकाच प्रकारचे विचार स्फुरत असल्याचे दिसून येते. All great men think alike या उक्तीत साठविलेले सत्य थोर प्रतिभावंतानाही लागू होते. आणि दुसरी गोष्ट अशी की या जगात परमेश्वराखेरीज पूर्णपणे मौलिक, अगदी नवीन असे काय असू शकेल? प्राचीन कविवर्यांच्या रचनांचा अभ्यास करताना ही वस्तुस्थिति जमेस धरूनच चालावयास हवे म्हणजे अनेक ग्रंथातून सापडणाऱ्या साम्यस्थळामुळे निर्मात्यांच्या मौलिकतेविषयी उगाच मनात संभ्रम उत्पन्न होण्याची धास्ती नको.

तुलसीदासांचे 'रामचरितमानस' जेथे नित्य पठनात नाही असे एकही गाव हिंदीभाषी भारतात औषधालाही मिळणे कठीण. या सर्वजनप्रिय रामायणाचा ओझरता परिचय करून घेतला तरी त्यावरून असे दिसून येते की गोस्वामीजींचे हे काव्य म्हणजे त्यांच्या समग्र जीवनानुभवाचे सार व त्यांच्या गाढ विद्याव्यासंगाचे फलितच आहे. अनेक सुंदर संस्कृत सुभाषितांनी उजळून निघालेले त्यांचे विचार या ग्रंथात

अनुक्रमणिका

जरी त्यांच्या शब्दात व भाषेत प्रगट झाले असले तरी ते वाचताना मूळ संस्कृतच्या सौरभाने मन मोहरून उठल्याशिवाय राहत नाही. रामायणातील विविध प्रसंगी चपखलपणे बसणाऱ्या संस्कृत सुभाषितरत्नांच्या सढळ वापराप्रमाणेच कवीने वेदोपनिषदे व भारतभागवतादी पुराण ग्रंथांच्या डोळस अभ्यासातून मिळविलेल्या तात्त्विक ज्ञानाचीही पेरणी जागोजागी योग्य निमित्त पाहून केलेली आहे. पूर्वीच्या साऱ्याच साधुसंतांनी व कवींनी ही सांस्कृतिक संपत्ति मनःपूर्वक वापरल्याने त्यांच्या विचारातील सारखेपणा कितीतरी ठिकाणी दाखवून देता येतो. या संदर्भात तुलसीदासांचे रामचरितमानस वाचताना ज्ञानेश्वरासारख्या त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या संतकवीप्रमाणेच वामनपंडितासारख्या उत्तरकालीन मराठी कवीशी त्यांच्या उद्‌गारांचे विलक्षण साम्य पाहून विस्मय व आनंद वाटतो. रामचरितमानसातून अशा काही निवडक संस्कृत व मराठी मधील समानार्थी रचनांचे अवलोकन उद्‌बोधक-मनोरंजक ठरेल.

ज्ञानेश्वर एकनाथादी संत स्वतः संस्कृतचे प्रगाढ ज्ञाते असूनदेखील सामान्यासाठी त्यांनी संस्कृतात बंदिस्त असलेले वेदोपनिषदांचे व भागवतपुराणादींचे सारे ज्ञान मराठीतून मुक्त हस्ताने उधळून दिले. एवढेच करून ते थांबले नाहीत तर ज्या मराठीतून या ज्ञानाचे पाट त्यांनी वाहविले त्या मराठी भाषेच्या अंगभूत लावण्याचा व रसाळपणाचा निर्वाळा जागोजाग त्यांनी दिला. तुलसीदास हेही संतकवीच. ब्राह्मण म्हणून संस्कृतचे गहन अध्ययन झालेले. त्यांच्या संस्कृतभाषा प्रभुत्वाची साक्ष रामचरितमानसात प्रत्येक कांडाच्या प्रारंभी त्यांनी जे ईशस्तुतिपर नितांत रमणीय श्लोक रचले आहेत त्यावरून सहजच पटते. पण त्यांच्याही संतहृदयाला बहुजनहिताय हे संस्कृतात जखडलेले जीवनपोषक ज्ञान जनबोलीत-म्हणजे खडी हिंदीत-विखरून दिल्याशिवाय समाधान व्हावयाचे नव्हते. साधुसंतांच्या काव्यरचनेचा हेतु केवळ आत्मोद्धार अथवा आत्मसंतोष हा नसून सकळ जनांचा उद्धार व संतोष हे त्यांचे ईप्सित होते. केवळ मातृभाषेचे पांगच त्यांनी फेडले नाहीत तर आपल्या बांधवांच्या सुखासमाधानासाठी ते अहर्निश वाणी व लेखणी यांच्याद्वारे अक्षरशः झिजले आहेत.

**तुलसीदासांची संस्कृतनिष्ठा**

रामचरितमानसाच्या प्रत्येक कांडात प्रारंभी तुलसीदासांनी निरनिराळ्या संस्कृत वृत्तांतून आपले आराध्यदैवत राम, शिव व हनुमान यांची स्तवने केलेली आहेत. रामाचे एकटे अथवा सीता व लक्ष्मण यांच्यासह त्यांनी ध्यान केलेले आहे. काही श्लोकातून रामनामामृताचे माहात्म्य त्यांनी गायिले आहे. ही सुंदर व सुश्लिष्ट श्लोकरचना त्यांच्या संस्कृतवरील प्रभुत्वाची प्रचीति देणारी आहे. लंकाकांडात व उत्तरकांडात काही छंदात मोरोपंताप्रमाणे चरणार्ध अथवा संपूर्ण चरण संस्कृतातच रचल्याचे दिसून येते. विशेषतः ब्रह्मदेव, शंकर, नारद आदींच्या तोंडून जेथे रामस्तुती करविली आहे तेथे रचना शक्यतोवर संस्कृतप्राय करण्याचा कवीचा कटाक्ष दिसतो. पहा—

'पस्यामि राममनामयं', 'मामवलोकय पंकजलोचन', 'तुलसिदास प्रभु पाहि प्रणतजन'.

**मार्मिक सुभाषितांची योजना**

संस्कृतातील मार्मिक सुभाषितांचा, अर्थगर्भ वचनांचा व आशयघन उक्तींचा उपयोग तुलसीदासांनी या ग्रंथात केला आहे. त्यातील काही निवडक उदाहरणांचा येथे परामर्श घेऊ.

अनुक्रमणिका

मूक होइ बाचाल पंगु चढइ गिरिबर गहन । (बालकांड, सोरठा २)

हा चरण 'मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिम्' या वचनांशी सहज तुळून पाहण्याजोगा आहे.

बालकांडात (दोहा ९६: चौपाई ३) 'पर घर घालक लाज न भीरा । बांझ कि जान प्रसव कै पीरा ।' या ओळी तर 'न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनाम्' या उक्तीचे सरळ रूपांतरच वाटतात.

'जानि न जाइ नारि गति भाई', 'बिधिहुँ न नारिहृदय गति जानी', आणि 'का न करै अबला प्रबल' या अयोध्याकांडातील (४७:७; १६२:२ व दो.४७) पंक्तीत अनुक्रमे 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः', आणि 'किं न कुर्वंति योषितः' या सुभाषितांची प्रतिबिंबे पडलेली आहेत.

गीतेतील दोन सुप्रसिद्ध सुभाषितें अशी आहेत--

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।। (अ.२ श्लो.६९)
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ।। (अ.२ श्लो.३४)

आणि तुलसीदासांनी त्यांचा उपयोग खालील ओळीत केलेला आहे--

एहि जग जामिनी जागहिं जोगी । परमारथी प्रपंच बियोगी ।। (अयोध्या.९३:२)
संभावित कहुँ अपजस लाहू । मरन कोटि सम दारुन दाहू ।। (अयोध्या.९५:४)

याच अयोध्याकांडातील दोन चौपायांचे पुढील सुभाषितांशी साम्य आढळते. पहा—

सकुचउँ तात कहत एक बाता । अरध तजहिं बुध सरबस जाता ।। (२५६:१) म्हणजेच

'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः'

आणि

'कर्मणो गहना गतिः' हे वचन खालील चौपाईत व्यक्त होते-

कठिन करम गतिजान बिघाता ।। (२८२•२)

किष्किंधा कांडातील दोन चौपायांत संस्कृतच्या एका अतिशय मार्मिक सुभाषिताचा जवळ जवळ अनुवादच तुलसीदासांनी केला असावासे वाटते—

कुपथ निवारि सुपंथ चलावा । गुन प्रगटै अवगुनहि दुरावा ।।

आणि

अनुक्रमणिका

बिपति काल कर सतगुन नेहा। श्रुति कह संत मित्र गुन एहा ॥ (७:२ व ३)

आता याच आशयाचे हे संस्कृतातील सुभाषित असे आहे—

पापान्निवारयति योजयते हिताय। गुह्यानि गूहति गुणान्प्रगटीकरोति।
आपग्दतं न च जहाति ददाति काले। सन्मित्र लक्षणमिदं प्रवदंति संतः॥

मनुस्मृतीतील 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या स्त्रीविषयक अनुदार विचाराची छाया जिच्यावर पडली आहे अशी एक चौपाई किष्किंधाकांडात आहे—

महावृष्टि चलि फूटि किआरी। जिमि सुतंत्र भए बिगरत नारी॥ (१५:४)

सुंदर कांडात समुद्रावर सेतू बांधण्याच्या प्रसंगी लक्ष्मणाने उद्योगाची प्रशंसा करून दैवाचा अधिक्षेप या शब्दात केला आहे--

नाथ दैव कर कवन भरोसा। सोषिअ सिंधु करिअ मन रोसा॥
कादर मन कहुँ एक अधारा। दैव दैव आलसी पुकारा॥ (५१:२)

या ओळी लिहिताना कवीच्या मनात जे सुभाषित घोळत असावे ते हे—

'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः। दैवेन देयमिति का पुरुषाः वदंति'॥

लंकाकांडातदेखील अशीच काही सुंदर संस्कृत सुभाषितांची हिंदी प्रतिरूपे आढळतात. एक सुभाषित असे आहे—

अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः

आणि तुलसीदासांनी रावणाचा मुलगा प्रहस्त याच्याकडून वदविले आहे--

बचन परम हित सुनत कठोरे। सुनहिं जे कहहिं ते नर प्रभु थोरे॥ (दो.९:५)

अंगदाने रावणाच्या दरबारात रोवलेला पाय कसा निश्चल होता ते सांगताना याच कांडात तुलसीदास म्हणतात—

भूमि न छाँडत कपिचरन देखत रिपु मद भाग।
कोटि बिघ्न ते संत कर मन जिमि नीति न त्याग॥ (दो.३४ स्व)

हा दोहा लिहिताना कवीच्या मनात ही सुभाषिते घोळत असावीत

अनुक्रमणिका

'विघ्नै पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः प्रारब्धमुत्तमजनाः न परित्यजंति'

आणि

'न्यायात् पथात् प्रविचलंति पदं न धीराः'

पुढे एके ठिकाणी संस्कृतातील 'परोपदेशे पांडित्यं सर्वेषां सुकरम् नृणाम्' हे सुभाषित, रावण आपल्या स्त्रियांना उपदेश देतो त्या संदर्भात, योजिल्याचे खालील चौपाईवरून दिसून येते--

पर उपदेश कुसल बहुतेरे । जे आचरहिं ते नर न घनेरे ।। (७८:१)

उत्तरकांडात काकभुशुंडिमुनि गरुडासमोर रामाच्या अंतःकरणाचे वर्णन ज्या शब्दात करतात तो दोहा 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' या संतहृदयवर्णनपर सुभाषिताचा सरळ हिंदी अनुवादच वाटतो—

कुलिसहु चाहि कठोर अति कोमल कुसुमहु चाहि ।
चित्त खगेस राम कर समुझि परइ कहु नाहि ।। (उत्तर.दो.९१ ग)

उत्तरकांडातील आणखी एक संतहृदय वर्णन करणारी चौपाई अशी--

संतहृदय नवनीत समाना । कहा कविन्ह परि कहै न जाना ।।
निज परिताप द्रवइं नवनीता । पर दुख द्रवहिं संत सुपुनीता ।। (१२५:४)

याच अर्थाचे संस्कृत सुभाषित प्रसिद्ध आहे ते हे--

सज्ञनस्य हृदयं नवनीतं यद्वदंति कवयस्तदलीकं ।
अन्य देह व्यलसत्परितापात्सज्ञनो द्रवति नो नवनीतं ।।

संस्कृत सुभाषितांचा केवढा जबरदस्त प्रभाव तुलसींच्या मनावर होता हे आतापावेतो आपण पाहिले. त्यांच्या संस्कृत ग्रंथांच्या सूक्ष्म अनुशीलनाची ज्याच्यातून प्रतीति घडावी असा केवढा तरी पुरावा प्रस्तुत रामचरितमानसात आहे. या अनुरोधाने आपण ग्रंथाची वर वर जरी पाहणी केली तरी कर्त्याच्या विचारावर पूर्वार्जित ज्ञानाचा खोल ठसा उमटलेला आढळात येईल. त्यांच्या काही विचारांचे साम्य पूर्वसरीशी ताडून पाहणे मनोरंजक ठरेल.

## संस्कृत काव्याशी समानार्थी रचना

मानसाच्या प्रारंभी तुलसीदासांनी सीतारामाचे अभिन्नत्व दर्शविणारा जो दोहा लिहिला आहे त्याचे स्फुरण रघुवंशाच्या प्रारंभी कालिदासाने पार्वती परमेश्वराची एकरूपता दाखविणारा जो श्लोक लिहिला त्यातच आहे. पहा—

अनुक्रमणिका

गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न ।
बंदउँ सीता राम पद जिन्हहि परम प्रिय खिन्न ।। (बालकांड: दो.१८)

आणि

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ प्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वदे पार्वतीपरमेश्वरौ ।। (रघुवंश, सर्ग १, श्लोक १)

रामचरिताची थोरवी आणि आपल्या बुद्धीची मर्यादा ओळखून कालिदासाने रघुवंशात सुरवातीसच कबूल केलेले आहे की—

क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः
तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ।। (रघु.स.१, श्लो.२)

आणि हाच भाव गोस्वामीजींनी दोन संदर्भात व्यक्त केला आहे तो असा—

राम सुकीरति भनिति भदेसा । असमंजस अस मोहि अँदेसा ।। (बाल.१४:५)

आणि

चरितसिंधु गिरिजामन वेद न पावहिं पारू ।
बरनै तुलसीदासु किमि अति मतिमंद गवाँरु ।। (बाल.दो.१०३)

अथवा

सागर सीप कि जाहिं उलीचे ।। (अयोध्या.२८३:२)

श्रीमद्भगवतगीतेतून काही समान स्थळांचे आता निरीक्षण करू. धर्मग्लानि व अवतार यांच्यासंबंधी श्रीकृष्णाने दिलेले आश्वासन--

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। (गीता,अ.४,श्लो. ७-८)

या श्लोकांत सामावलेले आहे. आणि बालकांडात पार्वतीला हीच अवतार—कल्पना समजावून सांगणाऱ्या शंकराच्या तोंडी तुलसीदासांनी घातल्या आहेत त्या चौपाया अशा आहेत—

जब जब होइ धरम कै हानी । बाढहिं असुर अधम अभिमानी ।।

अनुक्रमणिका

करहिं अनीति जाइ नहिं बरनी । सीदहिं बिप्र धेनु सुरधरनी ॥
तब तब प्रभु धीर बिबिध सरीरा । हरहिं कृपानिधि सज्जन पीरा ॥ (बाल.१२१:३,४)

अर्जुनाने गीतेच्या अठराव्या अध्यायात आपण मोहमुक्त झाल्याची जी कबुली श्रीकृष्णास दिली आहे ती अशी—

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वप्रसादान्मयाच्युत ।
स्थितो ऽ स्मि गत संदेहः करिष्ये वचनं तव ॥ (अ.१८.श्लो.७३)

तसाच प्रकार रामाने वनात आलेल्या भरतास समजावल्यानंतर झाला आहे. त्याने रामाला आपल्या शंकांचे निरसन झाल्याचे म्हटले आहे ते असे—

लखि सब बिधि गुरु स्वामि सनेहू । मिटेउ लोभु नहिं मन संदेहू ॥
अब करूनाकर कीजिअ सोई । जनहित प्रभु चित छोभु न होई ॥ (अयोध्या २६८:१)

आणखी एक साम्यस्थळ या अयोध्याकांडात उल्लेखनीय आहे. राम व भरत यांचा परस्पर प्रेमभाव पाहून गद्गद झालेले राजा जनक व त्याची राणी या विषयावर चर्चा करीत असता रात्र कशी निघून जाते याचे भानही त्यांना राहत नाही. असाच एक प्रसंग उत्तररामचरितात, राम आणि सीता यांनी परस्पर प्रेमालापात सहज घालविलेल्या रात्री-संबंधीही स्वतः रामानेच वर्णिलेला आहे. क्रमशः ही दोन्ही वर्णने अशी आहेत—

रामभरत गुन गनत सप्रीती । निसि दंपतिहि पलकसम बीती ॥ (२९०:१)

आणि

‘अविदित गति यामा रात्रिरेवं व्यरंसीत्’ (उत्तरामचरित,अंक १ श्लो.२७)

संस्कृत सुभाषितांप्रमाणेच तुलसीदासांनी आध्यात्मिक चर्चेचा केलेला उपक्रम देखील मूळ संस्कृत ग्रंथातून कसा उगम पावला आहे ते पाहण्यासारखे आहे. गीतेच्या तेराव्या अध्यायात श्लोक ७ ते ११ मध्ये ज्ञानाची अठरा लक्षणें जी ‘अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम्’ इ. सांगितलेली आहेत तीच तुलसीदासांच्या रामाने लक्ष्मणाला विराग्याची लक्षणे सांगताना अरण्यकांडात (दो.१५:४) वर्णिली आहेत. पुढे लक्ष्मणाच्या विनवणीवरून नवविधा भक्तीचे व भक्तिमार्गाचे विवरण रामप्रभूंनी केले आहे ते थेट श्रीमद्भागवतप्रणीत, श्रीकृष्णाने उद्धवाला सांगितलेल्या भक्तियोगाचे हिंदी रूपांतरच वाटावे एवढे सारखेपण त्या दोहोत आढळून येते. ‘श्रवणं कीर्तनं विष्णोरर्चनं पादसेवनं’ इ. नवविधा भक्तीचे स्वरूप व ‘मद्भक्ताः यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद’ हे आपल्या निवासाविषयीचे आश्वासन ज्यांच्यात शब्दशः सामावलेले आहे अशा किती तरी दोहे चौपाया रामचरितमानसातील अरण्यकांडात सापडतात (दो.१६:४) यातच पुन्हा एकदा राम-नारदसंवादाच्या निमित्ताने ज्या चौपाईत ज्ञानापेक्षा भक्ति श्रेष्ठ असल्याच्या भागवतातील सिद्धांताला गोस्वामीजींनी आपली मान्यता दर्शविली आहे ती चौपाई अशी—

अनुक्रमणिका

यह बिचारि पंडित मोहि भजहीं। पाएहुँ ग्यान भगति नहिं तजही ॥ (४३:५)

आणि शेवटी उत्तर कांडात भरताने संत-असंतांची लक्षणे विचारली असता त्यांचे जे विवरण रामाने केले आहे (दोहा ३७ व ३८ च्या काही चौपायामध्ये) ते तर गीतेत जे ठिकठिकाणी स्थितप्रज्ञ, भक्त, योगी, विरक्त, दैवी संपद्युक्त या नावाखाली आदर्श पुरुषांचे वर्णन आलेले आहे त्यांच्याशी पूर्णपणे मिळते जुळते आहे.

**ज्ञानेश्वरीशी विचारसाम्य**

संतांच्या अंतःकरणाप्रमाणेच त्यांच्या विचारातही बरेच वेळा विलक्षण साम्य दिसून येते. रामचरितमानसाच्या प्रारंभी तुलसीदासांनी प्रतिज्ञा केलेली दिसते ती अशी—

स्वांतः सुखाय तुलसी रघुनाथ गाथा।
भाषानिबंधमतिमंजुलमातनोति ॥

आपल्या भाषेच्या मंजुलतेची ग्वाही देऊन खडीबोलीतील आपल्या रचनेचे त्यांनी समर्थन केले आहे. पण 'स्वांतः सुखाय' ही रघुनाथगाथा आपण लिहितो हे जे त्यांनी म्हटले आहे त्या बाबतीत लक्षात ठेवावयास हवे ते हे की संताच्या 'अहं' चा व्याप अवघ्या संसाराला पुरून उरणारा असल्याने त्यांचे 'स्वांतः सुख' देखील 'आनंदे भरीन तीन्ही लोक' यातच असते. समर्थांचे मनाचे श्लोक हे केवळ त्यांच्याच पुरते मर्यादित नसून कोणीही त्यांत डोकावून स्वतःला पाहावे एवढा त्यांचा थोर व्यापविस्तार आहे. ज्ञानेश्वर-एकनाथादी संतांप्रमाणेच तुलसींची हिंदी रचनादेखील केवळ 'स्वांतः सुखाय' नसून बहुजनसुखाय आहे. विशेषतः ज्ञानेश्वरांचा व त्यांचा आपापल्या भाषामधून रचना करण्याचा उद्देश जसा एक आहे तसा आणखीही कित्येक बाबतीत त्यांच्यातील समान धर्म लक्षणीय आहे.

ग्रंथारंभी गणेशवंदन, ईशस्तवन, गुरुवंदन, संत असंतस्तवन, आपल्या मर्यादांविषयी विनम्र स्वीकारोक्ति इत्यादी अनेक बाबी दोघांमध्ये समान आहेत.

बालकांडात तुलसीदास म्हणतात--

जौं बालक कह तोतरि बाता।
सुनहिं मुदित मन पितु अरुमाता ॥ (बाल.दो.८:५)

आणि ज्ञानेश्वरांनी हेच खालील ओव्यात म्हटले आहे—

जैसा स्वभावो मायबापांचा। अपत्य बोले बोबडी वाचा ॥
तरि अधिकचि तेयाचा। संतोष आथी ॥ (ज्ञाने.अ.१ ओ.६४)
आणि बालक बोबडां बोलीं। कां वांकुडां विचुकीं पाउलीं।
चोज करूनि माउली। रिझवी जेंवि ॥ (अ.९ ओ.६)

अनुक्रमणिका

आपल्या ग्रंथाच्या मूळ प्रेरणेसंबंधी तुलसीदासांनीही ज्ञानेश्वरांप्रमाणेच व्यासादी पूर्व कवींचे ऋण मानले आहे. कसे ते पहा--

आणि तो मियां हा आतां । व्यासाचिं पदें पाहात पाहातां ।
आणिला श्रवणपथां । मऱ्हाटिया ॥ (ज्ञाने.अ.१८, ओ.१६८७)

आणि

तैसा व्यासाचां मागोवा घेतू । भाष्यकारांते पूसतु ।
अयोग्य ही मी न पवतु । कें जाईन ॥ (ज्ञाने.अ.१८, ओ.१७०१)

ज्ञानेश्वरांच्या प्रांजल कबुलीप्रमाणेच तुलसीदासांनीही म्हटले आहे—

एहि प्रकार बल मनहि देखाई । करिहउँ रघुपति कथा सुहाई ।
ब्यास आदि कवि पुंगव नाना । जिन्ह सादर हरि सुयस बखाना ॥ (बाल.१४:१)

ज्या शब्दात शिवचरित्राचे वर्णन करण्यास आपण असमर्थ आहोत असे संत तुलसीदासांनी म्हटले आहे जवळजवळ तशाच शब्दात गीतार्थ सांगण्यास आपली बुद्धि कशी उणी पडते याचे वर्णन ज्ञानेशांनी केले आहे. दोघांच्या उक्ती क्रमशः अशा—

चरित सिंधु गिरिजा रमन बेद न पावहिं पारु ।
बरनै तुलसीदास किमि अति मतिमंद गवाँरु ॥ (बालकांड; दो.१०३)

आणि

ऐसें जे अगाध । जेथ वेडावती वेद
तेथ अल्प मी मतिमंद । काइ होये ॥ (ज्ञाने.अ.१, ओ.७३)

अरण्यकांडात सुतीक्ष्ण मुनीने रामाची स्तुति करण्याचे सामर्थ्य आपल्याजवळ नसल्याचे म्हटले आहे—

कह मुनि प्रभु सुनु बिनती मोरी । अस्तुति करौं कवनबिधि तोरी ।
महिमा अमित मोरि मति थोरी । रवि सन्मुख खद्योत अँजोरी ॥ (११:१)

गीतार्थ मराठीत आणण्याचे अवघड कार्य स्वीकारताना ज्ञानेश्वरांनी देखील अशीच भावना खालील ओवीत प्रगट केली आहे—

हे अनावरत न विचारिता । वांयाचि धिंवसा उपनला चित्ता ।
एरवीं काई भानुतेजीं खद्योता । शोभा आयी ॥ (ज्ञाने.अ.१ ओ.६७)

अनुक्रमणिका

येथे केवळ कल्पनाच नव्हे तर शब्दांच्या योजनेतही विलक्षण साम्य आढळून येते. वेदांची असमर्थता, सूर्यापुढे काजव्याचे तेज या कल्पनांचे सारखेपण तर आहेच पण मतिमंद, खद्योत हे शब्ददेखील दोघांनीही वापरले आहेत. ज्ञानेशांच्या रचनेशी तुलसीदासांचा परिचय होता किंवा काय असा प्रश्न सहजच पडावा एवढे साम्य या दोघा संतांच्या रचनात आढळून येते.

ज्ञानेश्वरीशी समान असे आणखी एक रमणीय विचारसाम्याचे स्थळ रामचरितमानसात आहे. उत्तरकांडात दोहा २० ते २३ मधील चौपायात रामराज्याचे नितांत सुंदर वर्णन गोस्वामीजींनी केले आहे. आणि ज्ञानेश्वरांनी पसायदानाच्या निमित्ताने ज्या एका उदात्त मंगल संसाराची विश्वात्मक देवाजवळ अपेक्षा व्यक्तविली आहे त्याचे स्वरूप वरील रामराज्यातील समाजापेक्षा निराळे नाही.

**अन्य मराठी संतपंतांशी साम्य**

मराठीतील आणखी काही संतपंतांशी आवळी जावळी भासावी अशी रचना या ग्रंथात पाहावयास सापडते. येथे त्यापैकी काहींचा विचार करू.

एकनाथांच्या भावार्थ रामायणाचे एकच उदाहरण घेऊ. त्यांनी अरण्यकांडात सीताहरण करावयासाठी आलेल्या रावणाचे वर्णन असे केले आहे—

गुंफे नसतां श्रीरामलक्ष्मण । शून्य मंदिरी रिघे श्वान ।
तेंवीं आला दशानन । सीताहरणकार्यार्थी ॥ (अध्याय १६, ओवी २)

आणि रामचरितमानसाच्या अरण्यकांडात आश्रमाकडे जाणारा हा रावण पहा—

सो दससीस स्वानकी नाई । इत उत चितइ चला भडिहाई ॥ (दो २८ : ५)

मोरोपंतांनी विराटपर्वात परवशतेविषयी असे म्हटले आहे—

फारचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच ॥

आणि थोड्या निराळ्या संदर्भात परधीनतेचे तुलसीकृत वर्णन असे—

कत बिधि सृजी नारि जगमाहीं । पराधीन सपनेहुँ सुख नाहीं ॥ (बाल.१०३:३)

वामन पंडितांच्या नामसुधेतील हा सुप्रसिद्ध श्लोकार्ध वाचा—

अजित नाम वदों भलत्या मिसें
सकल पातक भस्म करीतसे ॥

अनुक्रमणिका

आता वरील पंक्तीचाच अनुवाद वाटावी अशी ही तुलसीदासांची चौपाई पहा—

बिबसहुँ जासु नाम नर कहहीं।
जनम अनेक रचित अघ दहहीं ॥ (बाल.११९:२)

तुलसीदासाचा भरत वनात रामास भेटावयास आला असता आप्तस्वकीयांसमोर आपल्या अवस्थेचे वर्णन करीत आहे—

ग्रह ग्रहीत पुनि बात बस तेहि पुनि बीछी मार।
तेहि पिआइअ बारुनी कहहु काह उपचार ॥ (अयोध्या.दो.१८०)

वरील वर्णनाशी तंतोतंत जुळावा असा हा श्लोक वाचून दोन भिन्न भाषिक कवींच्या विचारातील साम्याबद्दल विस्मय वाटतो. पहा—

आधीच मर्कट तशातहि मद्य प्याला,
झाला तशात मग वृश्चिकदंश त्याला।
झाली तशातच तया मग भूतबाधा,
चेष्टा किती मग वदू कपिच्या अगाधा ॥

आणखी एका साम्यस्थळाचे अवलोकन करून हा विषय संपवू. तुकारामांच्या एका अभंगात ब्राह्मणाच्या श्रेष्ठत्वाचे वर्णन आढळते ते असे—

जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट।
तुका म्हणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ (तु.व.अ.३२१)

तुलसीदासांनीही ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व असे वर्णिले आहे—

पूजिअ बिप्र सील गुन हीना।
सूद्र न गुन गन ग्यान प्रबीना ॥ (अरण्य.दो.३४:१)

**एकनाथांचे भावार्थरामायण व रामचरितमानस**

रामचरितमानस रचताना वाल्मीकि रामायणाचा आधार तुलसीदासांनीही घेतला आहे. एकनाथांनी भावार्थरामायणाची रचना करताना जेवढ्या प्रमाणात वाल्मीकीचे अनुसरण केले आहे तेवढे तुलसीनी केलेले दिसत नाही. त्यामुळे मुळात कथेचा गाभा जरी एकच असला तरी तपशील भरताना मात्र दोघांनीही आपापल्या रुचीप्रमाणे प्रसंगांची मांडणी केली आहे. येथे दोन्ही रामायणातील काही निवडक प्रसंगांची पाहणी करावयाची आहे.

अनुक्रमणिका

अरण्यकांडात (दो.२४:१,२) सीताहरण प्रसंगी तुलसीदासांनी जे वर्णन केले आहे ते असे की मूळ सीतेला रामचंद्रांनी अग्नीत लपवून ठेविले असून रावणाने हरण करून नेलेली सीता हे केवळ सीतेचे प्रतिबिंब होते. भावार्थरामायणात ही प्रतिबिंबाची कल्पना आढळत नाही.

तुलसींची शबरी रामाला 'कंद मूल फल' देऊन आतिथ्य करते (अरण्य.दो.३४). अन्यत्र शबरीने स्वतः चाखून रामाला गोड बोरे दिल्याचा व रामाने प्रेमपूर्वक ती बोरे स्वीकारल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. आणि शबरीची बोरे, सुदाम्याचे पोहे, विदुराच्या कण्या ही रामकृष्णांच्या भक्तवत्सलतेची प्रमाणे असल्याचे अनेक प्रादेशिक भाषातील पदातून वाचावयास सापडते. तुलसींची शबरी बोरे देत नाही.

सुवर्णमृगरूपी मारीचाने आपला पाठलाग करणाऱ्या रामाच्या आवाजात आर्त किंकाळी फोडली असता सीतेच्या आग्रहावरून लक्ष्मण रामाच्या साहाय्यार्थ जातो असा एक प्रसंग रामायणात आहे. मात्र जाताना आश्रमासमोर सीतेच्या संरक्षणासाठी सावधगिरी म्हणून तिने ओलांडू नये अशी जी लक्ष्मणरेषा तो काढतो तिचा इतर रामायणात जसा उल्लेख आहे तसा रामचरितमानसात नाही.

लंकाकांडात (दो.१०९:३) रावणाकडून परत आणल्यानंतर सीताशुद्धीसाठी अग्निपरीक्षेचा प्रसंग आहे. एकनाथांच्या भावार्थरामायणात रामाच्या या प्रस्तावाचा लक्ष्मणासहित साऱ्या नर-वानरांनी प्रखर निषेध करून सीतेच्या पावित्र्याचा निर्वाळा दिला आहे. केवळ लोकापवादाची शक्यता टाळण्यासाठीच आपण हे करीत आहोत, त्यात सीतेच्या चारित्र्याविषयी शंकेचा लवलेशही नाही असा खुलासा रामचंद्रांनी केल्यावरच साऱ्यांची या अग्निदिव्याला अनुकूलता लाभली आहे. असे काहीच तुलसीरामायणात दर्शविलेले आढळत नाही. तेथे लक्ष्मणाने अत्यंत आज्ञाधारकपणे रामाचा आदेश होताच अग्नि सिद्ध करून दिल्याचे दिसते.

तुकारामांच्या एका अभंगाचा वर उल्लेख झालाच आहे. ब्राह्मणाच्या जन्मजात श्रेष्ठपणाविषयी तुलसीदासांनी जागोजाग गौरवोद्‌गार काढले आहेत. पण उत्तरकांडात (दो.२९:२) त्यांनी राजघाटावर स्नानाचा सर्वच वर्णांना समान अधिकार दिला असून शूद्रांनाही त्यासंबंधी बंदी नसल्याचे दाखविले आहे. ब्राह्मणाच्या स्वयंभू महत्त्वाचे प्रतिपादन करणाऱ्या कवि-तुलसीदासापेक्षा येथील सर्वाभूती समदृष्टि बाळगणाऱ्या संतहृदय गोस्वामी तुलसीदासांचे दर्शन खासच अधिक विलोभनीय वाटते.

स्त्रीविषयक दृष्टिकोनाच्या बाबतीत तुलसीदासावर अनेकांनी अनुदारपणाचा आरोप केलेला आहे. विशेषतः त्यांचे काही उद्‌गार यासंबंधात वारंवार आठविले जातात. 'ढोल गवाँर शूद्र पशु नारी । सकल ताडनाके अधिकारी ॥' (सुंदरकांड,दो.५९:३) व 'अधम ते अधम अधम अति नारी' (अरण्यकांड,दो.३५:२), तसेच अरण्यकांडातील दो.४३ व ४४ च्या चार चौपायामध्ये स्त्रीच्या स्वरूपाचे जे निष्करुणपणे हिडीस वर्णन केले आहे व तेही रामचंद्राने नारदाला वर्णून सांगितल्याचे दाखविले आहे ते आज कोणालाही असह्य व अन्याय्य वाटावे असेच आहे. पण याबाबतीत सारेच प्राचीन साधुसंत व इतर पारमार्थिक रचना करणारे कवी स्त्रीचे याच प्रकारे चित्रण करताना आढळतात. स्त्री ही मोक्षमार्गात बाधक व सर्व दोष-दुर्गुणांची खाणच असल्याचे साऱ्यांनीच म्हटल्याचे दिसून येते. वाल्मीकि रामायणात व त्याच अनुरोधाने एकनाथांच्या भावार्थ रामायणातदेखील रामाने सीतेची अग्निपरीक्षा घेणे का आवश्यक आहे ते देवादिकांना समजावून सांगताना स्त्रीच्या दोषांचे अनुदार वर्णन कसे केले आहे ते पहा. त्यांनी स्त्रियात दाखविलेले दोष असे—

अनुक्रमणिका

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावतः ॥

वरील श्लोकात वर्णिलेल्या स्त्री दोषांची एकनाथांनी आपल्या भावार्थ-रामायणात युद्धकांड, अध्याय ६९, ओव्या १९ ते २७ मध्ये विस्ताराने मांडणी केलेली आहे. आणि याच वळणाने जाणारे तुलसीदास म्हणतात—

कामक्रोध लोभादि मद प्रबल मोह कै धारि ।
तिन्ह महँ अति दारुन दुखद माया रूपी नारि ॥ (अरण्य.दो.४३)

आणि

अवगुन मूल सूलप्रद प्रमदा सब दुख खानि ॥ (दो.४४)

**रामचरितमानसातील काही काव्यात्म वर्णने**

प्रस्तुत ग्रंथात व्यावहारिक ज्ञानाबरोबरच काव्यमय अशी वर्णनेही थोडीथोडकी नाहीत. पण येथे त्या साऱ्यांचा रसास्वाद घेणे मर्यादेमुळे शक्य नाही. त्यापैकी काहीकडे केवळ अंगुलिनिर्देश करणेच इष्ट होईल. त्यामुळे जिज्ञासूंना मूळ ग्रंथाचे परिशीलन करण्याची इच्छा झाली तर बरेच. लंकाकांडात (दो.८०: चौ.३,४) रथावर सुंदर रूपक केलेले आहे. त्यात शौर्य-धैर्य ही रथचक्रे, सत्य-शील या पताका, बल-विवेक-दम-परहित हे घोडे, क्षमा-दया-समता हे लगाम आणि ईश्वरभजन हा सारथी असे मार्मिक वर्णन आहे. किष्किंधाकांडात (दो.१४ ते १७ मधील चौपायात) वर्षा आणि शरद् या दोन ऋतूंचे नितांत रमणीय असे तपशीलवार वर्णन वाचले म्हणजे तुलसीदासांच्या कवीप्रतिभेचा आगळाच साक्षात्कार घडतो. आणि शेवटी शेवटी लंकाकांडात (दो.१२ (क) चौ. ३-४) चंद्रावरील काळ्या डागासंबंधी ज्या एकाहून एक सरस कल्पक उत्प्रेक्षा बसविल्या आहेत त्यात कवीच्या प्रतिभेचे पुन्हा एकदा दर्शन घेऊन हे वर्णन आटोपते घेऊ. हा डाग म्हणजे जणू राहूने चंद्रावर केलेल्या आघाताचा व्रण आहे; ब्रह्मदेवाने रतीचे सुंदर मुखमंडल निर्मिण्यासाठी चंद्रामधील सार भाग काढून घेतल्यामुळे त्या ठिकाणी पडलेले हे विवर आहे; विषाला आपलाच सहोदर म्हणून चंद्राने स्वतःमध्ये प्रेमभराने सामावून घेतले असून ही त्याचीच छाया आहे; आणि चंद्र हा प्रभु रामाचा भक्त म्हणून त्याने रामाच्या श्यामल मूर्तीस आपल्या हृदयात वसविले त्याची ही खूण आहे. आणि या सरसरमणीय कल्पना वाचून झाल्यावर एका रसिक कवीने सुचविलेल्या ज्या आणखी एका रसिक रंगेल उत्पत्तीची येथे सहजच आठवण होते ती अशी—

'रतिश्रांता शेते रजनिरमणी गाढमुरसि'।

तुलसीदासांनी ज्या सुभाषितवजा उक्तींनी हिंदी-भाषी भारतीयांच्या दैनंदिन भाषाव्यवहाराला प्रौढी आणून दिली आहे त्यापैकी काही अशा—

नवनि नीच कै अति दुखदायी । जिमि अंकुस धनु उरग बिलाई ॥
जहाँ सुमति तहँ संपति नाना । जहाँ कुमति तहँ बिपति निदाना ॥
बरु भल बास नरक कर ताता । दुष्ट संग जनि देइ बिधाता ॥

अनुक्रमणिका

मूरख हृदय न चेत जौ गुर मिलहिं बिरंचि सम ।।
पर हित सरिस धरम नहिं भाई । पर पीडा सम नहि अधमाई ।।
बडे भाग मानुसतन पावा । सुर दुर्लभ सब ग्रंथहि गावा ।।

आसेतुहिमाचल बहुसंख्य हिंदी जनतेने शिरोधार्य मानलेले आणि केवळ एकाच धार्मिक-सांस्कृतिक ग्रंथाची नित्यपठनासाठी निवड करावयाची म्हटल्यास ज्याला हिंदुमात्राने निःशंक मान्यता द्यावी अशा तोलामोलाचे हे रामचरितमानस रचून गोस्वामी तुलसीदासांनी भारतीय संस्कृतीच्या पोषण परिवर्धनाचे फार थोर कार्य केलेले आहे याबद्दल त्यांच्या विषयी कोणीही कृतज्ञ-विनम्रच व्हावे!

**

अनुक्रमणिका

[अनुक्रमणिका](#)

# आजच्या संदर्भात तुलसीदासांचे रामचरितमानस

काल व आज यात केवढे तरी अंतर आहे! कालच्या प्रत्येक गोष्टीचा आजशी मेळ बसणे कठीण आहे. वर्तमान पिढीचा असा सवाल आहे की आज रामचरितमानसासारखे ग्रंथ आम्ही वाचावेच काय म्हणून? एक काळ असा होता की आमचे सारे कवी स्तुतिस्तोत्रे गात ती भगवंताची व चरित्रे रंगवीत ती पौराणिक थोर स्त्री पुरुषांची अथवा साधुसंतांची. नरस्तुति अथवा कारुनारूच्या गोष्टी हे विषय काव्याला निषिद्ध मानले जात. प्राचीन काव्याचा हेतूच मुळी उत्तम संस्कार घडविण्याचा असे. त्यासाठी उत्तुंग आदर्शांचीच योजना व्हायची. रामकथा म्हणजे तर आदर्श जीवनाचे समग्र दर्शनच. म्हणूनच या कथेच्या पारायणात आज तागायत खंड पडलेला नाही.

कालच्या व आजच्या मानवी व्यवहारव्यापारात बाह्यतः तरी स्पष्ट भेद दिसू लागला आहे. आईबाप, बहीणभाऊ, गुरुशिष्य, मालकनोकर आणि राजाप्रजा यांच्या परस्पर संबंधांच्या ज्या कल्पना काल होत्या त्या आज तश्याच स्वरुपात विद्यमान नाहीत. वडीलधाऱ्यांविषयी श्रद्धाभक्ति, धाकट्याविषयी स्नेहवात्सल्य आणि सर्वांबद्दल प्रेमादर हा आजचा युगधर्म राहिलेला नाही. प्रस्थापित आचारधर्माविषयीच्या अश्रद्धेचा निदर्शक असा 'असेच कां?' हा प्रश्न आज प्रत्येक बाबतीत उपस्थित करण्यात येतो. श्रद्धाविश्वासाच्या वातावरणात असा प्रश्न मूळच धरू शकत नाही. आज घरोघरी आईबापांची तक्रार एकच. ती ही की मुले बहकल्यासारखी वागताहेत. वडील मंडळीच्या अपेक्षेप्रमाणे वागण्यास ती राजी नाहीत. हीच अवस्था विद्येच्या क्षेत्रात गुरुजनांची आहे. आपल्या विद्यार्थ्यातून उत्तम शिष्य निर्माण करणे त्यांना जमत नाही. शिक्षणशुल्काच्या मोबदल्यात अभ्यास विकणारे यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शिक्षकाची किंमत आता उरलेली नाही. आज्ञाधारकपणाच्या परंपरागत सीमारेषा पुसट होत चालल्या आहेत. एक गोष्ट मात्र खरी की धाकट्यांच्या अशा वागणुकीचा हेतु मुद्दाम वडील माणसांचा उपमर्द करावा असा कदाचित नसेलही. त्यांच्या हातून जे काही घडते त्यात काही गैर आहे असे जर त्यांना सांगितले तर त्यांना मोठा विस्मय वाटतो आणि ते हुज्जत घालू लागतात. चूक त्यांच्या गळी उतरविणे आता तितकेसे सोपे राहिलेले नाही.

आज भावाभावातील निर्हेतुक प्रेम दुर्मिळ झाले आहे. आजच्या अर्थप्रधान संस्कृतीत व्यक्तिमात्र आपापल्या सुखसोयीविषयी विशेष जागरुक आहे. स्वार्थाने माणसाला गुंडाळून घेतले आहे. आपल्या आधी आपल्या आप्तस्वकीयांच्या सुखसमृद्धीचा विचार ही अपवादात्मक बाब झाली आहे. स्वार्थ त्यागाच्या जुन्या-पुराण्या व्याख्या आता टिकेनाश्या झाल्या असून त्याग भावनेचा बव्हंशी लोप झाला आहे.

स्वामीसेवक हे शब्दच चालू युगाचे वाटेनासे झाले आहेत. आज तर मालक नोकरांच्या संबंधाचा पायाच निव्वळ आर्थिक आहे. स्वामीविषयी अढळ निष्ठा अथवा सेवकाविषयी पुत्रवत् प्रेम या दोन्ही गोष्टी भूतकाळात जमा झाल्या आहेत. साहजिकच त्यांच्यात परस्पर सद्भावना व विश्वास आढळून येणे सुतराम् शक्य नाही.

राजा प्रजाविषयक कल्पनाच मुळी आजच्या लोकशाहीच्या काळात थट्टेचा विषय ठरणार आहेत. एका व्यक्तीच्या हाती राजसत्ता आली म्हणजे हुकूमशाहीतच तिचे पर्यवसान व्हावयाचे. संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वावर राज्यकारभार चालविण्याची प्रथा मुळात कितीही चांगली असली तरी सगळीकडचा अनुभव मात्र अगदी निराळा आहे. व्यक्तिशः जबाबदारीतून प्रत्येकजणच मोकळा असल्याने कोणीच कोणाला जबाबदार उरलेला नाही. प्रजाजनांच्या अडीअडचणी ज्यांनी लक्षपूर्वक ऐकाव्या त्यांचे

चित्र असे शतधा विदीर्ण झालेले असल्याने त्या नीट समजून घेणेच जेथे दुरापास्त झाले आहे तेथे त्यांची सर्वांचे समाधान होईल अशी सर्वमान्य उकल सापडणे कठीणच. परिणामी असंतोष कायमचा वाट्याला आलेल्या जनतेने राजसत्तेला शिव्याशाप देण्यापलीकडे करावे तरी काय? आपले प्रश्न सुटावे म्हणून निरंतर चिडाचीड आणि चळवळी यांचा अवलंब करण्यावाचून प्रजेला दुसरे गत्यंतरच नाही. आणि जनतेच्या या नित्याच्याच रुष्टपणाची सवय झाल्यामुळे सत्ताधारी वर्ग निर्ढावल्यासारखा नित्य उदासीन भासू लागतो. प्रजाजनांशी एकरूप होणे त्याला जमत नाही. दोहोमधील खंदक सांधले जाण्याऐवजी दिवसानुदिवस रुंदावतच जातात.

वर उल्लेख केलेल्या सर्व प्रकारच्या संबंधांचे आदर्शच रामचरितमानसाने प्रस्तुत केले आहेत. त्यांच्या प्रकाशात आपले आजचे व्यवहार पारखून पाहणे सहज शक्य आहे. त्या प्राचीन परंपरांचे आज अक्षरशः पालन करणे जरी शक्य नसले तरी निदान त्या आदर्शांच्या दिशेने वाटचाल करीत दोहोतील दुरावा तर निश्चितच कमी करता येईल. याच उद्देशाने रामचरितमानसातील काही मापदंडांचा विचार आजच्या संदर्भात करणे उद्‌बोधक व मनोरंजक ठरेल.

(१) राम व त्यांचे बंधू यांनी लहानपणी ज्या गुरु वसिष्ठांजवळ विद्याभ्यास केला त्यांच्याविषयी या भावांची अपार श्रद्धा पदोपदी पाहावयास मिळते. वनवासाहून परत येताच रामलक्ष्मणांनी गुरु वशिष्ठ यांना पहाताच

धाइ धरे गुरु चरन-सरोरुह । अनुज सहितअति पुलक तनोरुह ।।

असे साष्टांग लोटांगण गुरूपुढे घातले आहे. गुरूविषयी हीच आदराची भावना रामचरितमानसाच्या प्रारंभी तुलसीदासांनीही प्रगट केली आहे ती अशी-

बंदउँ गुरुपदकंज कृपासिंधु नररूप हरि ।<br>
महामोह तमपुंज जासु बचन रविकर निकर ।।

गुरूला ब्रम्हा विष्णु महेश मानण्याच्या परंपरेला अनुसरुन अज्ञानांधकाराला सूर्यकिरणाप्रमाणे भेदून टाकणाऱ्या गुरूला हे वंदन आहे. गुरूजनाप्रमाणेच आदर ऋषिमुनीविषयीही बाळगण्यात येई. राजा दशरथाने विश्वामित्रांच्या आग्रहाखातर आपल्या मुलांच्या कोवळ्या वयाकडे न पाहता राक्षसापासून होमहवनांचे रक्षण करण्यासाठी रामलक्ष्मणाला वनात पाठविले ते केवळ श्रेष्ठांविषयीच्या विश्वासामुळेच. गुरूच्या आज्ञेपुढे आपल्या भय आशंकाची वाच्यता देखील दशरथाने केली नाही.

(२) कैकेयी ही रामाची सावत्र आईच होती. रामाविषयीच्या पक्षपाती वर्तनाबद्दल तिला दोष तरी कसा द्यावा? पण प्रत्यक्ष आपल्या पित्याने देखील तिच्या शब्दांना भूलून दिलेला वनवासाचा आदेश रामाला सहजच धुडकावून लावता आला असता. आणि जर हा राम आजच्या काळातला असता तर त्याने तसे केलेही असते. पण सावत्र असली तरी कैकेयी ही माताच होती ना! रामाने यत्किंचितही खेदखंत न बाळगता आईबापांची आज्ञा शिरोधार्य मानून वनवास स्वीकारण्यात जणू आज्ञाधारकपणाचा परमोच्च बिंदू गाठला आहे! राज्याभिषेकाऐवजी वनवासातील कष्टांचे सहज भावाने स्वागत करणारा राम हा आज केवळ कल्पनेचाच विषय ठरणार आहे. राज्यपदाविषयी रामाच्या कमालीच्या अनासक्तीची, अधिकार लालसेचा

त्याच्या मनाला स्पर्श देखील झालेला नसल्याची प्रचीति घडवून आणणारा एक प्रसंग तुलसीदासजींनी वर्णिला आहे. आपणास उद्या राज्याभिषेक व्हावयाचा आहे हे रामाला कळविण्यात आले तेव्हा हर्ष होण्याऐवजी रामाला मोठा विषाद वाटला. त्याची तक्रार अशी की—

जनमे एक संग सब भाई। भोजन सयन केलि लरिकाई ॥
करनबेध उपवीत बिआहा। संग संग सब भए उछाहा ॥
बिमल बंस यहु अनुचित एकू। बंधु बिहाइ बडेहि अभिसेकू ॥

राज्यतृष्णेने कोणाचा विवेक सुटला नाही? अधिकार लालसा नसते कुणाला? यांच्यासाठी आजपावेतो जगात केवढे अनर्थ झाले आहेत! पण रामाचे चरित्रच काही और आहे! एकाच वेळी जन्मलेल्या, बाळपणाचे सारे संस्कारच नव्हेत तर ज्यांची लग्ने देखील एकाच वेळी झाली आहेत अशा या भावांपैकी केवळ मोठ्या भावालाच राज्याभिषेक व्हावा ही गोष्ट रामाला पटत नाही. आपल्या घराण्यातील ही प्रथा अत्यंत अनुचित व पक्षपातीपणाची आहे असे रामाचे स्पष्ट मत आहे. केवढी थोर ही पक्षपातरहित विचारसरणी आहे!

(३) आणि भरत हा देखील रामाच्या तोडीस तोड, जणू प्रत्यक्ष रामाचेच प्रतिबिंब भासतो. आपल्यासाठी राज्यपद मागून घेऊन सावत्र भावाला वनवास देण्याचे यशस्वीपणे कारस्थान रचणाऱ्या आपल्या आईच्या युक्तिबाजपणाचे भरताला कौतुक करता आले नसते का? पण उलट दिसते काय, की आईची कठोर शब्दात निर्भर्त्सना करुन भरताने तिला आईऐवजी वैरीण म्हटले आहे. अशा आईचा मुलगा म्हणवून घेण्याची त्याला लाज वाटते. एवढेच नव्हे तर अशी दुष्ट वासना होती तर तू मला जन्मताच कां मारुन टाकले नाहीस आणि पतीकडून असे नीच वर मागताना तुझ्या तोंडात किडे कां पडले नाहीत असेही आपल्या आईला विचारण्यास त्याने कमी केले नाही.

(४) रामाबरोबर हट्टाने वनात जाण्याचा लक्ष्मणाने हेका धरल्याचे पाहून सुमित्रेला दुःख न होता आनंद व्हावा ही गोष्ट कल्पनेपलीकडील आहे. रामाविषयीचे तिचे वात्सल्य केवळ अलौकिकच म्हणावे लागेल. या प्रसंगी तिने लक्ष्मणाला काय म्हटले आहे ते पाहण्यासारखे आहे. ती म्हणते--

तात तुम्हारि मातु बैदेही। पिता राम सब भाँति सनेही ॥
अवध तहाँ जहँ राम निवासू। तहँइँ दिवस जहँ भानु प्रकासू ॥

आणि म्हणून--

अस जियँ जानि संग बन जाहू। लेहु तात जग जीवनलाहू ॥

आपल्या पुत्राची रामावरील निष्कपट भक्ती पाहून सुमित्रेचा हर्ष गगनात मावेनासा होतो. ती म्हणते--

भूरि भाग भाजन भयहु मोहि समेत बलि जाउँ।
जौं तुम्हरें मन छांडि छलु कीन्ह रामपद ठाउं ॥

आपल्या लक्ष्मणाला जणू सुमित्रेने पुत्र म्हणून सीतेच्या ओटीत घातले आहे. सीतारामांना आईबापांच्या ठिकाणी मानून त्यांच्या सेवेने जीवनाचे सार्थक करावयास आपल्या मुलाला सांगणारी सुमित्रा केवढी थोर आहे! रामसीता जर वनात जात आहेत तर येथे अयोध्येत तुझे काही एक काम नाही असे ती लक्ष्मणाला बजावते! आणि ही चरित्रे प्रत्यक्षात आपल्या या भारतभूमीत घडलेली आहेत या गोष्टीचा आपण बाळगावा तेवढा अभिमान थोडाच आहे.

(५) स्वामी-सेवक संबंधात दास्यवृत्तीची स्वप्नात देखील शंका येत नसे त्या काळात रामदूत हनुमानासारखे सेवक जन्माला येत. रामाचे अनुचर, सेवक, दासानुदास म्हणवून घेण्यात धन्यता मानणारे निषादराज गुह, सुग्रीव, बिभीषण निर्माण होत. आजची सैनिक शिस्त 'There is not to question why : There is but to do and die' ही असली तरी तिच्यामागे कायद्याचे भय आहे. पण त्या काळात तर ही शिस्त म्हणजे एक स्वयंस्फूर्त अशी सहजक्रिया होती. स्वामिकार्यात तिच्याखेरीज अन्य कोणताही पर्याय नव्हता. पराकाष्ठेची स्वामिनिष्ठा ही सहजस्फूर्त गोष्ट होती. आणि पुन्हा स्वामी कोणी सामान्य मानव नव्हता. पूर्णावतार प्रभु रामचंद्राचे स्वामित्व नाकारण्याचे करंटेपण कोण करणार? खुद्द रावण देखील मनात ही गोष्ट जाणून नव्हता असे नाही. मग वरपांगी त्याने रामाशी वैर का स्वीकारले असेना!

(६) राजा व प्रजा यांच्या परस्पर संबंधाविषयीची जी चर्चा रामचरितमानसात निरनिराळ्या प्रसंगी करण्यात आली आहे तिजवरून असे स्पष्ट दिसून येते की राजा जर अनियंत्रित, बेताल व अरेराव नसेल तर त्याच्या सत्तेला विरोध करण्याची कल्पना देखील प्रजेच्या मनाला स्पर्शून जाऊ शकत नाही. पुढील काळात राजाच्या वैयक्तिक अमर्याद अधिकारांना जे आव्हान देण्यात आले ते त्याच्या हातून घडू लागलेल्या राजमदजनित, विवेकशून्य व अन्याय्य वर्तनामुळे ही गोष्ट विसरता कामा नये. तसे जर नसते तर आजच्या लोकशाही राज्यपद्धतीच्या काळातदेखील रामराज्याच्या आदर्शांचा वेळोवेळी उद्घोष करावा लागता ना. राजाचा आचार व्यवहार कसा असावा व कसा असू नये याची मार्गदर्शक तत्त्वे या ग्रंथात जागोजाग विखुरलेली आहेत पहा:

(अ) ब्रह्मदेवाकडून प्रजापतिपदावर सुप्रतिष्ठित झाल्याबरोबर अधिकाराचा मद चढलेल्या दक्ष प्रजापतीचे हे वर्णन पहा--

बड अधिकार दच्छ जब पावा । अति अभिमानु हृदयँ तब आवा ॥
नहि कोउ अस जनमा जगमाही । प्रभुता पाइ जाहि मद नाही ॥

अधिकार पदावर गेल्यानंतरही अविकृत व निरभिमानी राहणारा विरळाच. प्रभुत्वाचा मद ज्याला चढत नाही असा क्वचितच कोणी जन्माला येत असेल असे जे वरील चौपाईत म्हटले आहे ते युगानुयुगाच्या अनुभवावरूनच.

(आ) अयोध्याकांडातील हा एक प्रसंग आहे. रामाबरोबर वनात चलण्याचा लक्ष्मणाने हट्ट धरलेला आहे. राम त्याला परोपरीने समजावून सांगत आहेत की यावेळी त्याने वनात येऊ नये. 'आपले वडील वृद्ध आहेत. भरतही सध्या येथे नाही. मीही वनात निघून गेल्यावर अयोध्येतील प्रजाजनांचा प्रतिपाळ करणे हे केवळ तुझेच काम आहे. आपल्या आश्रितांचे व प्रजेचे सुखदुःख जाणून घेऊन त्यांचे योग्य प्रकारे सांत्वन

करणे हे राजाचे परम कर्तव्यच आहे. आणि ते तुला करावयाचे आहे.' जो राजा या कर्तव्याला चुकतो त्याच्याबद्दल रामाने स्पष्टच असे म्हटले आहे की—

जासु राज प्रिय प्रजा दुखारी।
सो नृपु अवसि नरक अधिकारी ॥

प्रजेच्या सुखदुःखांविषयी बेफिकीर राहणाऱ्या राजाला नरकाशिवाय दुसरी कोणतीही गति सांगितलेली नाही.

(इ) दुसऱ्या एका प्रसंगी रामाला वनातून परत अयोध्येला नेण्यासाठी भरत सैन्यासह वनात आलेला आहे. त्याच्या हेतूविषयी लक्ष्मण साशंक आहे. भरताने ससैन्य यावे यात त्याला कपट दिसत आहे. रामाचा वध करून आपले राज्यपद निष्कंटक करण्याचा भरताचा डाव आहे असे लक्ष्मणाला वाटल्यावाचून राहत नाही. तो म्हणतो—

जौं जिय होति न कपट कुचाली। केहि सोहति रथ बाजि गजाली
भरतहि दोसु देइ को जाएँ। जग बौराइ राजपदु पाएँ ॥

लक्ष्मणाच्या मते सेनेसहित येण्यात भरताचे कपट तर आहेच पण त्याबद्दल भरताला दोष न देता जगाच्या व्यवहाराविषयी अर्थान्तरन्यासाने एक सामान्य नियमच त्याने सांगून टाकला आहे. राज्यपद लाभले म्हणजे माणसाचे माथेच भडकते असा हा सिद्धांत आहे. आणि राज्यमद ही महा भयंकर वस्तु आहे हे खुद्द रामाने देखील मान्य केले आहे-

कही तात तुम्ह नीति सुहाई। सब ते कठिन राजमदु भाई ॥

पण असे जरी असले तरी हा नियम भरताला मात्र लागू होणारा नाही असे सांगून रामाने भरतावरील आपला उत्कट विश्वास अशा शब्दात व्यक्तविला आहे—

भरतहि होइ न राजमदु बिधि हरि हर पद पाइ।
कबहुँ कि काँजी सीकरनि छीर सिंधु बिनसाइ ॥

राजपदच काय पण प्रत्यक्ष ब्रह्मा विष्णु महेशांचे पद मिळाले तरी भरताला त्या पदाचा अभिमान होणे शक्य नाही. कांजीच्या शिंतोड्यांनी का कुठे क्षीरसागर नासणार आहे? केवढा हा भरताविषयीचा भरंवसा!

(७) आता शेवटी, ज्या रामराज्याचा आदर्श आम्ही निरंतर जतन करून ठेवलेला आहे त्याचे जे सविस्तर वर्णन उत्तरकांडात आलेले आहे त्याचे स्वरूप थोडक्यात पाहू.

दैहिक दैविक भौतिक तापा। राम राज नहिं काहु हि ब्यापा ॥
सब नर करहिं परस्पर प्रीती। चलहि स्वधर्म निरत श्रुति नीती ॥

अनुक्रमणिका

रामराज्यातून त्रिविध तापांचे समूळ उच्चाटन झालेले असून सारेच प्रजाजन न्यायनीतीने वागणारे व आपापली विहित कर्मे आचरणारे असल्यामुळे आपसातील तंट्याबखेड्यांचा प्रसंगच तेथे उद्‌भवत नाही. म्हणजे त्यामुळे ओढवून येणाऱ्या आपत्तींचाही प्रश्न आपोआपच सुटला. परस्पर स्नेह व सहकार्याची भावना आणि 'आत्मवत्सर्वभूतेषु' असा व्यवहार यामुळे तेथील प्रजा दुःखक्लेशांपासून सर्वस्वी मुक्त आहे. आणि म्हणूनच रामराज्यात—

> नहिं दरिद्र कोउ दुखी न दीना ।
> नहिं कोउ अबुध न लच्छनहीना ॥

कोणी दरिद्री नाही की कोणी दीन दुखी नाही. एवढेच नव्हे तर कोणी मूर्ख अथवा कुलक्षणी देखील नाही. सर्वांनाच ज्ञानप्राप्तीची व आपापल्या योग्यतेप्रमाणे काम मिळण्याची हमी मिळाली तर गरीब-अमीरपणाची अथवा श्रेष्ठकनिष्ठपणाची विषम भावना मूळ तरी कसे धरू शकणार? सारेच सुखदुःखात एकमेकांचे संगीसोबती व परस्परांना मदत करण्याविषयी साऱ्यांची सारखीच तत्परता! अशा राज्यात 'गरिबी हटाओ' अथवा 'अज्ञान दूर करो' अशा घोषणांची गरजच उरणार नाही. आणि काकभुशुंडि मुनीने गरुडाला रामराज्याविषयी हेच सांगितले आहे—

> रामराज नभगेस सुनु सचराचर जग माहिं ।
> काल कर्म सुभाव गुन कृत दुख काहुहि नाही ॥

रामराज्यात सारेच उदार आहेत, परोपकारी आहेत, पुरुष एकपत्नीव्रती आणि स्त्रिया पतिव्रता आहेत. अशा राज्यात द्विभार्याप्रतिबंधक अथवा घटस्फोटविषयक कायद्यांचा प्रश्नच उद्‌भवू शकत नाही. तेथे दंडाचा संबंध केवळ यतींशीच येणार. कारण दंडधारण करण्याची त्यांनाच काय ती गरज आहे. कोणाला दंड देण्याचा राजावर कधीच प्रसंग येत नाही. आणि तेथे नृत्य करण्याचे काम नर्तकांचेच तेवढे आहे. राजा, त्याचे मंत्री अथवा राजकीय पुढारी यांच्या अवती भवती पिंगा घालण्याची वा गोंडा घोळण्याची रामाच्या राज्यात पद्धतही नाही व तिची जरूरीही नाही!

या निर्मल मानसात आपली प्रतिबिंबे पाहून जर आपण आपल्या विकृती दूर सारण्याचा प्रयत्न करू लागलो, आपले आजचे जीवन कालच्या सुखी जीवनाप्रमाणे घडविण्याची मनःपूर्वक व तळमळीने खटपट करू लागलो तर केवढे गोमटे होईल!

* *

अनुक्रमणिका

# संत तुलसीदासांचे कल्पना-वैभव

संत तुलसीदास हे थोर रामभक्त होते ही गोष्ट वादातीत असल्याने त्यांनी निर्मिलेला रामचरितमानस हा ग्रंथ भक्तीच्या निर्मल जलाने काठोकाठ भरलेला असावा यात नवल नाही. अंतःकरणातील भक्तीच्या उद्रेकाबरोबरच त्यांच्या प्रज्ञेचे उन्मेषही या ग्रंथात जागोजाग प्रगटले आहेत हे विशेष आहे. रामचरित्राचे अत्यंत भाविकपणे चालू असलेले हे कथनदेखील चरित्रनायकाइतकेच सुंदरपणे आविष्कृत व्हावे म्हणून अधूनमधून अतिशय आल्हादक अशा उपमारूपकांची ते सहजसुंदर योजना करतात. त्यांच्या वाट्याला आलेल्या प्रतिभेचे हे नवनवोन्मेष बहारीचे आहेत. येथे एक गोष्ट लक्षात येते ती ही की ज्याला मुळात आपण भक्त म्हणून ओळखतो व जो आपली भक्ति पद्यरूपाने प्रगट करतो असा सामान्य कवीही कित्येकदा आपल्या वर्णनचातुर्याने व कल्पनाविलासाने आपणाला विस्मित करून जातो. परमेश्वर हे सौंदर्याचे निधान. आणि अशा मौलिभूत सौंदर्यतत्त्वावर चित्त खिळल्याने तद्विषयक भावनांचा आविष्कार सहजसौंदर्याने नटूनच व्हावा हे स्वाभाविकच नाही का? ईश्वराचे गुणसंकीर्तन म्हणजेच सौंदर्याचे पूजनअर्चन. आणि ते करण्याची तीव्र तळमळ असली तर सामान्यबुद्धीच्या गुणगायकालाही हे कथन कौशल्याने करता येत असावे. मग ज्याला मुळातच प्रतिभेचे देणे लाभले आहे त्याची गोष्टच काय विचारावी? तुलसीदासजी पुरुषोत्तम रामाच्या नितांत रमणीय चरिताचे अनुगायन करीत आहेत. साहाजिकच रामाच्या तोडीची वर्णनशोभा त्यांच्या ग्रंथात प्रगट व्हावी ही उत्कट आकांक्षा त्यांना असणारच. रामाच्या रूपाने त्यांनी ज्या दिव्य सौंदर्याचे उद्घाटन केले आहे ते वाचकाला व श्रोत्याला मोहून न घेईल तरच आश्चर्य. येथे मानसातील कल्पनावैभवाच्या काही निवडक स्थळांचा परिचय करून घेऊ.

**चंद्रावरील डाग**

सीताविरहाने व्यथित श्रीरामांचे तिच्या शोधासाठी भ्रमण चालू आहे. सुबेल पर्वतावर वानरांच्या सान्निध्यात लक्ष्मणासह त्यांचा वास आहे. सुग्रीव हनुमंतादी प्रमुख वानरवीर त्यांच्या सेवेत तल्लीन आहेत. अशाच एका रात्री पूर्वेकडे उगवलेल्या चंद्राकडे बोट दाखवून रामाने तो कसा सिंहासारखा निर्भय आहे ते पाहण्यास सर्वांना सांगितले. चंद्राला सिंहाची उपमा दिल्यामुळे हे रूपक पूर्ण करणे क्रमप्राप्तच होते. श्रीराम म्हणाले—

पूरब दिसि गिरि गुहा निवासी । परम प्रताप तेज बलरासी ॥
मत्त नाग तम कुंभ बिदारी । ससि केसरी गगन बन चारी ॥

पूर्वेच्या गिरिगुहरात वास करणारा तेजप्रताबलयुक्त हा चंद्ररूपी सिंह अंधकाररूपी मदोन्मत्त हत्तीचे गंडस्थळ फोडून आकाशात निर्भय विचरण करीत आहे!

बिथुरे नभ मुकुताहल तारा ।
निसि सुंदरी केर सिंगारा ॥

आणि दुसऱ्याच क्षणी सीताविरहार्त रामाला रात्रीच्या मोहक सौंदर्याने भारून टाकले. मौक्तिकांप्रमाणे गगनात विखुरलेल्या तारकासमूहाकडे पाहून निशासुंदरीच्या शृंगाराची कल्पना रामाला सुचावी ही गोष्ट त्यांच्या मनात खोलवर दडून बसलेल्या सीतेच्या विरहव्यथेची अन्य प्रकारे झालेली अभिव्यक्तीच म्हटली

अनुक्रमणिका

पाहिजे. पण मानवी जीवन जगण्यासाठी अवतरले असले तरी अगदीच सामान्य जनासारखे वागणे रामाला शोभणार नाही म्हणून की काय त्यांनी स्त्री लावण्याच्या वर्णनाला तेवढ्यातच विराम देऊन विषयाला कलाटणी दिल्याचे तुलसीदासांनी दाखविले आहे.

कह प्रभु ससिमहुँ मेचकताई ।
कहहु काह निज निज मति भाई ॥

राम आपल्या सेवकांशी आता थोडे मनमोकळे बोलून मनोविनोद करण्याच्या विचारात दिसतात. ते विचारतात "गड्यांनो, हा चंद्रावर जो काळा डाग दिसतो आहे ना त्याबद्दल पाहू बरे कोण सर्वात चांगली कल्पना करतो ते!" आणि प्रभूनेच मोकळेपणाचा अवसर दिल्यानंतर कोणी काय म्हणून मागे हटावे? जो तो आपापली चंद्रावरील त्या डागासंबंधीची कल्पना खुल्या मनाने मांडू लागला.

कह सुग्रीव सुनहु रघुराई । ससि महुँ प्रगट भूमि कै झाँई ॥
मारेउ राहु ससिहि कह कोई । उर महँ परी स्यामता सोई ॥

सुग्रीवाचा दावा असा की हा डाग म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपल्या पृथ्वीचीच चंद्रावर पडलेली ती छाया आहे. कोणी सांगू लागला की राहूने चंद्राला दिलेल्या माराचा हा त्याच्या छातीवर उठलेला वळ आहे.

कोउ कह जब बिधि रति मुख कीन्हा । सार भाग ससि कर हर लीन्हा ।
छिद्र सो प्रगट इंदु उर माही । तेहि मग देखिअ नभ परछाही ॥

वानरातही चांगलाच रसिकपणा दिसतो. त्याशिवाय का कुणाला अशी रमणीय कल्पना सुचेल की ब्रह्मदेवाने स्त्रीसौंदर्याची परिसीमा जी रति तिच्या मुखाची निर्मिती करण्यासाठी तितक्याच मोहकतेने विनटलेल्या चंद्रातील सार भाग काढून घेतल्यामुळे तेथे जे छिद्र पडले आहे त्यातून पार दिसणारी आकाशाची ही पडछाया आहे! केवढी सरससुंदर कल्पना आहे ही!

आणि या कल्पनेच्या चढाओढीत खुद्द रामप्रभुही भाग घेत आहेत. यात आप्तजनाशी समरस होऊन त्यांच्यात आपुलकी व विश्वास ओतण्याचा त्यांचा चतुरपणा प्रगट होतो. श्रीरामांनी मांडलेली कल्पना अशी-

प्रभु कह गरल बंधु ससि केरा ।
अति प्रिय निज उर दीन्ह बसेरा ॥

समुद्रमंथनातून निघालेले चंद्र व विष हे दोघे सहोदर आहेत. परस्परांवर त्यांचे विलक्षण प्रेम आहे आणि म्हणून चंद्राने प्रेमभराने आपल्या लाडक्या भावाला हृदयाशी कवटाळले आहे. चंद्राच्या डागाबद्दलची रामांची ही कल्पना. आणि या पाठोपाठ लगेच त्यांनी या चंद्र-विष-युतीविषयी जे म्हटले आहे तो पुन्हा त्यांच्या वियोगपीडित हृदयाचा उद्रेक आहे. ते म्हणतात-

विष संजुत कर निकर पसारी ।

जारत विरहवंत नर नारी ॥

विषाला आपल्या हृदयात चंद्राने स्थान दिले हे त्याच्या बंधुभावाला साजेसेच असले तरी चंद्राने केवळ एवढेच केले असते तर रामाची काही तक्रार नव्हती. पण श्रीरामांचा चंद्रावर आरोप आहे तो हा की आपले सारे किरणजाल विषदिग्ध करून तो भूतलावरील विरहीजनांची आधीच पोळलेली अंतरे जाळून काढीत आहे. विरहवेदनेने पीडित एकजात साऱ्या नरनारींचा हा जो दारुण दुःसह छळ त्याने चालविला आहे त्यापासून प्रभु रामही सुटलेले नाहीत या गोष्टीची त्यांनी दिलेली ही कबुलीच नाही का?

शेवटी या चंद्रावरील कलंकासंबंधी हनुमंताने मांडलेल्या कल्पनेत विशेष चातुर्य प्रगट झाले आहे. यात एकाच वेळी या रामभक्ताने एकाहून अधिक हेतू साध्य केले आहेत. सीतामाईच्या स्मरणाने अधूनमधून रामचंद्रांना विव्हल होताना पाहून हनुमंतांचा अस्वस्थपणाही चरम सीमेला पोचत असावा असा तर्क अस्थानी ठरणार नाही. अशा या केविलवाण्या क्षणी रामांचे चित्त सीतेच्या स्मरणावरून अलगद दुसरीकडे कसे वळवावे हा हळुवार विचार हनुमंताच्या मनात आल्याशिवाय कसा राहील? म्हणून—

कह हनुमंत सुनहु प्रभु ससि तुम्हार प्रिय दास ।
तव मूरति बिधु उर बसति सोइ स्यामता अभास ॥

रामाला आपल्या भक्तिबळाने मोहून घेण्यासाठी हनुमंताने म्हटले की, "प्रभो, आपण सर्वांचे ऐकून घेतले. आपणही आपला विचार मांडला. पण मला मात्र यातील काहीच पटले नाही. आता आपण माझे मत ऐकून घ्या. हा जो चंद्र आहे ना, तो आपला खराखुरा भक्त आहे. आपणाशिवाय अन्य कोणताही विचार त्याच्या मनात नाही. आपली नयनमनोहर मूर्ति त्याने आपल्या अंतःकरणात साठवून ठेवली असून तिचे अहर्निश ध्यान करण्यातच तो मग्न असतो. ही आपली श्यामवर्ण छबि त्याच्या हृदयात विराजमान आहे. तिचेच प्रतिबिंब म्हणजे चंद्रावरील दिसणारा हा डाग आहे."

हनुमंताने अत्यंत बुद्धिचातुर्याने चंद्राला रामाचा अनन्य भक्त ठरवून मोठ्या खुबीने प्रभूला खुलविले. आणि चंद्राला आपला भक्त ठरविणाऱ्या या परमभक्त हनुमानाविषयीच्या स्नेहवात्सल्याने गद्‌गद झालेल्या रामरायाचे चित्त निश्चितच आपल्यावरील या प्रगाढ प्रेमभक्तीमुळे प्रफुल्लित झाले असेल. तुलसींचे चातुर्य हे की रामचंद्र चंद्राकडे एक सौंदर्यतत्त्व म्हणून आकर्षित होतात काय आणि कामी-विरही जनांच्या वेदना वाढविणाऱ्या चंद्राच्या दुष्प्रभावाला स्वतःच क्षणकाल बळी पडतात काय हे त्यांनी कुशलपणे येथे दाखवून दिले आहे. काही मानसमर्मज्ञांच्या मते तुलसीदासांनी या संदर्भात एक आगळे चातुर्य प्रगट केले आहे. चंद्रावरील डागासंबंधी ज्याने त्याने आपापल्या भाववृत्तींना अनुसरून कल्पना मांडल्याचे ते दर्शवितात. रामकृपेने वालीकडून राज्य परत मिळालेल्या सुग्रीवाच्या मनात भूमीविषयीचा लोभ असल्याचे त्याच्या उत्तरातून ध्वनित झाले आहे. त्याला चंद्रावर भूमीचीच छाया दिसत आहे! राहूने केलेल्या प्रहाराची खूण म्हणजे हा डाग असे म्हणणारा बिभीषणच असावा आणि रावणाने केलेल्या लत्ताप्रहाराची त्याची आठवण अद्याप ताजी असावी हे त्याने मांडलेल्या कल्पनेवरून स्पष्ट होते. चंद्रातील सारभाग काढून रतिमुख घडविल्याची कल्पना ज्याला सुचली तो दुसरा तिसरा कोणी नसून आपल्या नवपरिणीत वधूला घरी सोडून रामाबरोबर आलेला अंगदच असावा. तिच्या आठवणीचेच हे त्याच्या मनातील प्रतिबिंब म्हटले पाहिजे. रामाने चंद्रकिरणांना विषाने माखलेली मानण्यात व त्यामुळे विरहाग्नि प्रदीप्त होतो असे म्हणण्यात त्यांची

अनुक्रमणिका

मनोव्यथा दिसून आल्याशिवाय राहत नाही. आणि शेवटची हनुमानाची कल्पना तो खऱ्या अर्थाने भक्तराजकिरीट आहे हे सिद्ध करणारीच नाही का?

**रथावरील रूपक**

तुलसीदासांच्या कमनीय कल्पनेचा विलास आणखी एकेजागी त्यांनी केलेल्या रथावरील सांग रूपकात दिसून येतो. लंकाकांडामधील रामरावणाच्या युद्धाचा प्रसंग आहे. रावण रथारूढ होऊन आत्मसंरक्षणार्थ कवचादी धारण करून रणांगणावर आलेला आहे. उलट रामचंद्र मात्र खऱ्या अर्थाने पदाती-अनवाणी आहेत. तापसवेशात असल्याने अंगावर पुरेशी वस्त्रेही नाहीत. मग कवचादी संरक्षक उपचारांचा तर प्रश्नच उपस्थित होत नाही! बिभीषणाला चिंता वाटली की एवढ्या बलाढ्य रावणाशी राम सामना देणार कसे? आणि आपली ही चिंता त्याने रामाजवळ व्यक्त केली असता यत्किंचितही न डगमगता राम त्याचे समाधान करू लागले—

सुनहु सखा कह कृपानिधाना ।
जेहिं जय होइ सो स्यंदन आना ।।

"मित्रा बिभीषणा, अरे असू दे रावणाला रथारूढ. आपल्याजवळ तसा रथ नसला म्हणून काय झाले? त्याच्या अभावी जय व्हावयाचा टळणार आहे थोडाच! खरे तर असे आहे की ज्याच्या योगाने विजय प्राप्त होतो तो रथ काही निराळाच असतो." आणि मग रामाने त्या रथाचे वर्णन केले ते असे:

सौरज धीरज तेहि रथ चाका । सत्यसील दृढ ध्वजा पताका ।
बल विवेक दम परहित घोरे । छमा कृपा समता रजु जोरे ।।

हा जो जयशाली रथ आहे ना त्याची चक्रे आहेत शौर्य आणि धैर्य ही. आणि या रथावर फडकणाऱ्या सत्य-शीलाच्या ध्वजापताका त्यात आरूढ असलेल्या यौद्ध्याचा हेतू निर्भेळ धर्मयुद्ध लढण्याचा असल्याची साक्ष देत आहेत. शक्ति, विवेक, इंद्रियनिग्रह आणि परोपकार हे चार घोडे या रथाला जुंपलेले असून ते क्षमा, दया आणि समता यांच्या लगामांनी नियंत्रित आहेत. धर्मयुद्धासाठी रणांगणात उतरल्यानंतर ते या रथाला ओढीत अन्याय अविवेकरूपी शत्रूवर सरळ हल्ला चढविण्यास पुढे सरसावतील, इतस्ततः भरकटणार नाहीत याची खात्री बाळगण्यास हरकत नसावी.

ईस भजनु सारथी सुजाना । बिरति चर्म संतोष कृपाना ।।
दान परसु बुधि सक्ति प्रचंडा । बर बिग्यान कठिन कोदंडा ।।

बरे, अशा या अपूर्व-अलौकिक रथाचा सारथीही कोणी असा तसा नाही! प्रत्यक्ष भगवद्भजनाने सारथ्यकर्म आपणाकडे घेतले आहे आणि अन्याय अनीतीविरुद्ध पुकारलेल्या या संग्रामात वापरावयाची शस्त्रेही तशीच दिव्य आहेत. ही झुंज लढावयाची आहे संतोषसमाधानाचे खड्ग व वैराग्यविरक्तीची ढाल घेवून. दानाचा परशु, बुद्धिविवेकाचे अतुलित बल आणि ज्ञान-विज्ञानाचे प्रचंड कोदंड धारण करून या संघर्षात उतरावयाचे आहे.

अनुक्रमणिका

अमल अचल मन त्रोन समाना । सम जम नियम सिलीमुख नाना ॥
कवच अभेद बिप्र गुर पूजा । एहि सम बिजय उपाय न दूजा ॥

अपूर्व अशा या कोदंडाला साजेसाच त्याचा साजबाज असणेही आवश्यकच आहे. म्हणून बाण ठेवण्यासाठी निर्मल, सुस्थिर मनाचे तूणीर असून त्यात मनःसंयमन, अहिंसा, पावित्र्य आदि यम नियमांचे एकाहून एक सरस व अचूक लक्ष्यवेध घेणारे अनेक बाण आहेत. रामाने वर्णिलेले हे लोकविलक्षण बाण सामान्य झुंजी लढवीत आलेल्या युगायुगातील योध्यांना अश्रुतपूर्वच असणार! आणि म्हणूनच म्हणावयाचे की रामाने जे वापरले तेच रामबाण! आता बिभीषणाने रामाला कवचविहीन पाहून वर्तविलेल्या चिंताभीतीचे निवारणही रामाने केले ते गुरू-विप्रांच्या श्रद्धासन्मानाचे अभेद्य कवच आपल्या अंगावर सदोदित असल्याचे सांगून! एवंगुणविशिष्ट अदृष्ट-अश्रुत-पूर्व अशा या रथावर आरूढ झालेला व अशा अलौकिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असणारा रामासारखा योद्धा साऱ्या विपक्षीय असुरांना पुरून उरला नाही आणि विजयश्रीने त्याला वरले नाही तरच नवल! रामांनी बिभीषणाला आश्वासनपूर्वक धीर देऊन शेवटी सांगितले की—

सखा धर्ममय अस रथ जाके ।
जीतन कहँ न कतहुँ रिपु ताके ॥

"मित्रा, अशा धर्ममय रथाच्या आश्रयाने जो युद्धक्षेत्रात प्रवेश करतो त्याच्या समोर कोणता शत्रु लढण्यासाठी उभा ठाकणार आहे! मग पराजयाची शंकाच व्यर्थ नाही का? आणि लक्षात ठेव की—

महा अजय संसार रिपु जीति सकइ सो वीर ।
जाके अस रथ होइ दृढ सुनहु सखा मतिधीर ॥

सख्या बिभीषणा, तू बुद्धिमान आहेस. तू सदैव हे लक्षात असू दे की रावणादी शत्रू हे कुठल्या झाडाचा पालापाचोळा! इतके ते नगण्य आहेत. आपला खरा शत्रू आहे हा जन्ममरणांनी भयंकर ठरलेला संसार, हा सारा प्रपंच! हा शत्रू अत्यंत प्रबळ व सामान्यांना दुर्जेय असा आहे. पण आताच मी ज्या रथाचे वर्णन केले तसा सुदृढ व असामान्य रथ ज्याच्या जवळ असेल त्याला या संसार रिपूलाही सहज लोळविता येईल." आणि रामाने आश्वस्त केल्यानंतर स्वाभाविकच बिभीषणादी सुहृन्मित्रांचे समाधान होऊन त्यांच्यात पुन्हा नवीन उमेद-उत्साह व धैर्य-विश्वास संचरले यात आश्चर्य कसले?

तुलसीदासजींच्या कल्पनाविलासाचा अल्पसा परिचय प्रस्तुत प्रकरणाच्या आधाराने करून देण्याचा येथे प्रयत्न केला आहे तो केवळ वानगीदाखल. अशी कल्पनावैभवाने खच्चून भरलेली किती तरी उदाहरणे रामचरितमानस या ग्रंथात दाखविता येतील. पण ऊस गोड झाला म्हणून मुळापासून का खावयाचा असतो! अतृप्तीतच सुखही आहे आणि तुलसीदासांच्या रचनांचा अधिकाधिक आस्वाद घेण्याची तळमळ वाचकात उत्पन्न करण्याचे सामर्थ्यही आहे. म्हणून म्हणतो, वाचक हो, एवढेच पुरे!

* *

अनुक्रमणिका

## मानसातील सूक्तिसुमने

रामचरितमानसात रामचरित्राचे अनुगायन करण्यात रममाण होणाऱ्या भक्त तुलसीदासाबरोबरच प्रतिभेचे अमाप देणे लाभलेल्या कविप्रवर तुलसीचेही जागोजाग दर्शन घडते. संतांचा प्रमुख हेतु भक्ति की काव्यरचना हा वाद व्यर्थ आहे. केवळ तत्कालीन प्रथेचा अवलंब केल्यामुळेच ते पद्यात लिहितात असे म्हणून त्यांना कविमंडळातून पार बहिष्कृत करण्याचा प्रयत्न जेवढा बाष्कळ तेवढाच त्यांनी आपल्या कविप्रतिभेने जगाला दिपविण्यासाठीच हा सारा काव्यपसारा मांडला आहे असा आरोपही निर्घृणपणाचाच आहे. भक्तीसाठी अंतःकरणाचा सांद्रपणा जेवढा आवश्यक तेवढाच काव्यनिर्मितीला अंतरीचा रसस्निग्धपणा पोषक ठरतो. मुळात भक्तिभावाने ओतप्रोत असणाऱ्या अंतरातूनच अत्यंत भावपूर्ण उद्‌गार उचंबळून उठण्याची शक्यता कशी नाकारता येईल? त्यात अशा कविभक्तांना अथवा भक्तकवींना प्रतिभेचा दिव्य स्पर्श झालेला असला तर सोन्याहून पिवळे. 'परिमळ आणि सुस्वाद'-ही दोन्ही एकवटल्याचा हा आल्हाददायक अनुभव आपल्या अनेक संतकवींच्या रचनातून येतो. गोस्वामी तुलसीदासजीत अशाच प्रज्ञा-प्रतिभेचा मनोज्ञ संगम झालेला आढळून येतो. निमित्त रामगुणानुवादाचे असले तरी त्यांच्या मानसात जीवनानुभवाची कितीतरी सुस्पष्ट व हृद्य प्रतिबिंबे जागोजाग पडलेली आहेत. मोजक्या शब्दात, नेटक्या स्वरूपात एखादी नेमकी गोष्ट सांगणे हे जर सुभाषिताचे अथवा सूक्तीचे प्रमुख लक्षण असेल तर अशा सूक्तिसरोजांनी त्यांचे मानस तुडुंब भरले आहे. त्याच्या परिमलाचा अनुभव घेण्यासाठी निवडक सूक्तिसुभाषिते पुरेशी आहेत.

बालकांडातील काही प्रसंगी योजिलेल्या या सूक्ती आहेत. शंकराशी केलेल्या कपटाचा पश्चात्ताप झालेली सती अत्यंत अस्वस्थ व पतीच्या वियोगाच्या कल्पनेने विव्हल होऊन म्हणते:—

जल पय सरिस बिकाइ देखहु प्रीति कि रीति भलि।
बिलग होइ रसु जाइ कपट खटाई परत पुनि॥

प्रीतीमुळे साध्या पाण्याला देखील दुधाचा भाव चढतो. पण कपटरूपी आंबटाच्या शिंतोड्यानेही दूध नासून पाणी वेगळे पडते हा दैनंदिन जीवनातला अनुभव कोणाला नाही?

शंकराशी पार्वतीचा विवाह व्हावा म्हणून हिमवंताचे मन वळविणारे नारदमुनि शंकराच्या उग्रभयंकर रूपामुळे डळमळून जाण्याचे कारण नाही ही गोष्ट त्याच्या मनावर बिंबवीत आहेत. थोरामोठ्यांच्या दोषांना कसे नगण्य व दुर्लक्षणीय मानावयाचे असते हे समजावून सांगताना त्यांनी विष्णूची शेषशय्या, सूर्य व अग्नि यांचा सर्वभक्षकपणा, स्वच्छ व सांडपाणी यांना समान रूपाने सामावून घेण्याची गंगेची सर्वसमावेशक वृत्ति यांचे दाखले देऊन असे म्हटले आहे—

समरथ कहु नहिं दोषु गोसाईं।
रवि पावक सुरसरि की नाईं॥

मदनदहन करून रतीला अनंगरूपाने तो परत दिल्यावर आता शंकराने पार्वतीचा अंगीकार करावा ही विनवणी घेऊन गेलेल्या देवांतर्फे बोलताना वडिलांनी शासन केले तरी त्यांचे वात्सल्य कसे कायम राहते याविषयी एक मार्मिक उक्ति ब्रह्मदेवाच्या तोंडी घातलेली आहे—

अनुक्रमणिका

सासति करि पुनि करहिं पसाऊ ।
नाथ प्रभुन्ह कर सहज सुभाऊ ।।

मार खाऊन झोपी गेलेल्या बापुडवाण्या बालकाच्या अंगावरून कोणता पिता प्रेमभराने हात फिरवीत नाही?

स्मशानवासी शंकरासंबंधी हिमवंताची राणी मैना अनुकूल नव्हती ही गोष्ट मातृहृदयाला अनुसरूनच होती. विरक्त व संसारानुभवशून्य नारदाने आपल्या कोवळ्या सुंदर कन्येसाठी असला वर सुचविल्याबद्दल तिने राग प्रकट केला आहे—

पर घर घालक लाज न भीरा ।
बांझ कि जानि प्रसव कै पीरा ।।

वंध्येला प्रसववेदना कशा कळाव्यात हे खरेच नाही का?

उमा-शंकरांच्या विवाहोपरांत उमेला निरोप देताना तिची आई स्त्रीच्या नित्य पराधीन अवस्थेची तिला कल्पना देत आहे. पारतंत्र्यात तिने सुखाची खोटी आशा बाळगू नये असा निर्णयात्मक सल्ला आईने मुलीला दिला आहे—

कत बिधि सृजीं नारि जग माहीं ।
पराधीन सपनेहुं सुख नाहीं ।।

'पिता रक्षति कौमारे' पासून स्त्रीचे आजन्म पारतंत्र्य श्रुतिस्मृति पुराणोक्त मानणाऱ्या संस्कारांचेच हे प्रतिबिंब म्हणता येईल.

वेष पाहून भुलणे हे मूढपणाचेच लक्षण आहे. मोराचे रूप सुंदर असले तरी त्याचा आवाज कर्कश व त्याचे भक्ष्य सर्प असल्याने त्याच्या आकर्षकपणाला या गोष्टी अपकर्षकच ठरतात. तुलसीदासांनी साधूच्या कपटवेषात राहणाऱ्या एका राजाच्या संदर्भात असे म्हटले आहे. याच प्रसंगात हा कपटमुनी व त्याचा विपक्षी एक अन्य राजा यांच्या संभाषणाच्या ओघात मोठ्यांचे धाकट्याविषयीचे स्नेह अशा शब्दात वर्णिले आहे—

बडे सनेह लघुन्ह पर करही । गिरि निज सिरनि सदा तृण धरही ।।
जलधि अगाध मौलि बह फेनू । संतत धरनि धरत सिर रेनू ।।

पर्वताने तृणांकुर, सागराने फेस व धरित्रीने धूलिकण प्रेमपूर्वक शिरावर धारण केल्याचे आपण पाहतोच.

शिवधनुर्भंगाच्या प्रसंगीची एक परम सुंदर सूक्ति पहा. हे धनुष्य मोडण्याचे सामर्थ्य कोणातही नाही हे पाहून सीता आता कुमारीच राहते की काय या चिंतेने जनक व त्याच्या राण्या व्याकुळ आहेत. प्रत्यक्ष जानकीचीही मुद्रा दीनवाणी झालेली आहे. रामाला आता राहवेना. अधिक अंत पाहण्याची ही वेळ नव्हे. धनुष्य उचललेच पाहिजे हा विचार त्याच्या मनात त्याच क्षणी उसळून उठला. कारण—

तृषित बारि बिनु जो तनु त्यागा । मुएं करइ का सुधा तडागा ।।
का बरषा सब कृषी सुखाने । समय चुकें पुनि का पछितानें ।।

पाणी पाणी करीत माणूस मरून गेल्यानंतर त्याला अमृतमधुर पाण्याचे तळे दाखवून काय होणार आहे? सारे पीकच पाण्याच्या अभावी वाळून कोळ झाल्यावर पावसाच्या सरीवर सरी कोसळल्या तरी काय फायदा?

शिवचाप मोडल्याबद्दल रामलक्ष्मणांना जाब विचारणाऱ्या परशुरामाशी लक्ष्मण अत्यंत उपरोधिक शब्दांनी लढत देत आहे. निरुत्तर होऊ पाहणाऱ्या भृगुमुनींनी लक्ष्मणाचे केलेले हे वर्णन आहे—

मन मलीन तनु सुंदर कैसे ।
विष रस भरा कनक घटु जैसे ।।

लक्ष्मणाचे हे वर्णन परशुरामाच्या आकांडतांडवाचेच द्योतक असले तरी त्यातून वरून भलेपणाचा आव आणणाऱ्या पण आतून किडलेल्यांचा सहज बोध होतो.

अयोध्याकांडातील काही सुरम्य सुभाषितवजा उक्तींकडे आता वळू. रामाला राज्याभिषेक व्हावयाच्या बातमीने आबालवृद्धांना हर्ष झालेला असताना देवांना मात्र यात आपल्या स्वार्थाची हानि दिसून आल्याने ते अस्वस्थ झाले आहेत. हे घडून येऊ नये म्हणून काही विघ्न उपस्थित करण्याविषयी ते बुद्धिदात्री शारदा हिला विनवीत आहेत. या संबंधातील ही चौपाई आहे—

तिनहि सोहाइ न अवध बधावा ।
चोरहि चंदिनि राति न भावा ।।

चंद्राच्या हिमधवल चांदण्याने सारे चराचर उजळून निघत असताना चोरांना मात्र चांदणीरात्र गैरसोयीची वाटण्यासारखाच हा प्रकार आहे. याच संदर्भात स्वर्गासारख्या उन्नत लोकात राहून पृथ्वीवरील विषयांसंबंधी अशी अनिष्ट भूमिका घेणारे देवही सामान्य क्षुद्र मानवाप्रमाणेच दुसऱ्याचे बरे झालेले पाहू शकत नाहीत असा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे—

ऊँच निवासु नीचि करतूती । देखि न सकहिं पराइ बिभूती ।।

मंथरा कैकयीला रामराज्याभिषेकाविरूद्ध चिथावणी देत आहे. रामाचे आपल्यावर व आपले त्याच्यावर विलक्षण प्रेम असल्याचा कैकयीचा दावा आहे. तिची याबद्दल कुचेष्टा करून आता पूर्वीची स्थिति पालटली असल्याचे ती कैकयीच्या मनावर बिंबवू पाहत आहे. ती म्हणते—

रहा प्रथम अब ते दिन बीते । समउ फिरें रिपु होहिं पिरीते ।।
भानु कमल कुल पोषनिहारा । बिनु जल जारि करइ सोइ छारा ।।

अनुक्रमणिका

कमळांना विकसित करण्याविषयी ज्याची ख्याति तो सूर्यच वेळ आली व काळ पालटला म्हणजे सरोवराचे सारे पाणी शोषून घेऊन कमळांची राखरांगोळी केल्याशिवाय राहत नाही. या समर्पक दाखल्याने रामाचे प्रेम आता तुझ्यावर नाही ही गोष्ट मंथरा कैकयीला पटवून देत आहे. आणि शेवटी तिच्या दुष्ट सल्ल्याला बळी पडून पार उलटून गेलेल्या कैकेयीविषयी ही चौपाई काय म्हणते ते पहा—

को न कुसंगति पाइ नसाई।
रहइ न नीच मतें चतुराई॥

कुसंगती ही बाधकच ठरावयाची. नीचांच्या संपर्काने बुद्धीचे चातुर्य व मनाचा तोल लयाला जाणार नाहीत असे कसे बरे होईल?

राम वनात जात आहेत हे पाहून व्याकुळ विव्हळ झालेला लक्ष्मण 'मलाही बरोबर घ्या' म्हणून परोपरीने रामाला आळवीत आहे. आणि रामचंद्र त्याला आपल्या गैरहजेरीत भरत येईपर्यंत राज्यसूत्रे हाती घेऊन आपल्या प्रजेच्या कल्याणाची चिंता वाहण्याविषयी समजावीत आहेत. या प्रसंगी राजाच्या कर्तव्याविषयीचे एक कठोर पण शाश्वत सत्य रामप्रभूने वर्तविले आहे ते असे—

जासु राज प्रिय प्रजा दुखारी।
सो नृपु अवसि नरक अधिकारी॥

प्रजेला ज्याच्या राज्यात सुखाचा लाभ होत नाही त्या राजाला नर्काशिवाय दुसरी गति नाही हे जिवात जतन करावे केवळ रामचंद्रांनीच! आणि म्हणूनच म्हणावयाचे की रामराज्याच्या कोणी कितीही गप्पा वल्गना केल्या तरी शेवटी रामाचे राज्य तेच रामराज्य!

आणि आता अरण्यकांडातील काही सूक्तींचा आस्वाद घेऊ. सीताहरणाच्या आपल्या कुटिल कारस्थानात मारीचाला सामील करून घेण्याच्या स्वार्थी हेतूने त्याच्याकडे गेलेला रावण नम्रतेचा मोठा डौल आणीत आहे. या ठिकाणी तुलसीदासांनी गाइलेली चौपाई अशी आहे—

नवनि नीच कै अति दुखदाई। जिमि अंकुस धनु उरग बिलाई॥
भयदायक खल कै प्रिय बानी। जिमि अकाल के कुसुम भवानी॥

अकाली फुलणारी फुले हे एक दुश्चिन्हच ठरते. नीच माणसाने गोड भाषण केले तर त्यात त्याचा काही अहितकार कावाच असण्याची आशंका उत्पन्न व्हावयाची. अंकुश, धनुष्य, सर्प आणि मांजर हे वाकतात ते सावज टिपण्यासाठी, विनम्र भावाने प्रणिपात करण्यासाठी नव्हेच हे कोणास ठाऊक नाही?

याच प्रकरणी आपल्या उपदेशाने बोध न घेता खवळून उठलेल्या रावणाविषयी मारीचाच्या मनात आलेला विचार असा—

तब मारीच हृदय अनुमाना। नवहि विरोधे नहिं कल्याना॥
सस्त्री मर्मी प्रभु सठ धनी। बैद बंदि कवि भानस गुनी॥

अनुक्रमणिका

या चौपाईतील उत्तरार्धात ज्या नऊ व्यक्तींचा उल्लेख आहे त्यांच्याशी केलेले वैर म्हणजे प्राणाशी गाठ आहे ही गोष्ट कोणत्या सुबुद्ध माणसाच्या अनुभवाची नाही? शस्त्रधारी, आपले वर्म जाणणारा, सत्ताधारी, मूर्ख, श्रीमंत, वैद्य, भाट, कवि व स्वयंपाकी यांच्या हाती कोणाचेही अकल्याण करण्याचे सामर्थ्य वसत असते. म्हणून त्यांच्याशी मैत्री आहे तो पावेतोच क्षेम कुशलाची शक्यता आहे.

कानामनाला रिझविणाऱ्या काही सहज सुंदर सुभाषित कुसुमांनी दरवळत असल्यामुळेच सुंदर कांडाला ते नाव शोभून दिसते असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. रावण बिभीषण यांच्या संवादाचा हा प्रसंग आहे. रामप्रभूशी विरोध करण्याचे धोरण सोडून देण्यास रावणाला विनविणाऱ्या बिभीषणाचा सारा बोध पालथ्या घड्यावर ओतलेल्या पाण्यासारखा वाया जात आहे. तरीही बिभीषण समजावणीच्या स्वरात रावणाला सांगत आहेच की-

जहँ सुमति तहँ संपति नाना ।
जहँ कुमति तहँ बिपति निदाना ।।

सद्‌बुद्धि हेच वैभव व दुर्बुद्धि हीच अनर्थपरंपरांची जननी असे मानणारा सत्त्वशील बिभीषण रावणाच्या निमित्ताने साऱ्या मानवजातीलाच जणू सन्मार्गाचे योग्य निर्देशन करीत आहे.

बिभीषण रामचंद्रांकडे आल्यावर रामांनी रीतीप्रमाणे त्याला कुशल प्रश्न विचारले व रावणादी निशाचरांच्या अहर्निश सहवासात राहूनदेखील तो न्यायनीतिनिपुण राहिल्याबद्दल त्याची स्तुति केली. या वेळी ते म्हणतात:—

बरु भल बास नरक कर ताता ।
दुष्ट संग जनि देइ बिधाता ।।

नर्कवास पुरविला पण असत्संगति नको. 'फारचि बरी निरयगति' हा पंतांचा आर्यार्ध येथे चपखल बसणारा म्हणून सहजच आठवतो.

लंकापुरीत प्रवेश करण्यासाठी रामचंद्रांनी विधिपूर्वक समुद्राचे स्तवनवंदन केले पण तो वाट देण्याविषयी बघत नाही असे पाहून—

बोले राम सकोप तब भय बिनु होइ न प्रीति ।।

पोरे लाडावून जाऊ नयेत म्हणून त्यांच्यावर नुसते प्रेम करून चालत नाही. वचक बसणेही तेवढेच आवश्यक आहे. अशा हेतूने रामांना रागाने बोलणे भाग पडले. येथे त्यांनी लक्ष्मणाला जी नीति सांगितली आहे ती सर्वांनाच उपयुक्त आहे-

सठ सन बिनय कुटिल सन प्रीती । सहज कृपन सन सुंदर नीती ।।
ममता रत सन ग्यान कहानी । अति लोभी सन बिरति बखानी ।।
क्रोधिहि सम कामिहि हरिकथा । ऊसर बीज बएँ फल जथा ।।

अनुक्रमणिका

मूर्खांबरोबर नम्रपणाने वागणे, कुटिलांशी प्रेमाचा व्यवहार करणे, मुळातच कृपण असलेल्याला औदार्याचा उपदेश देणे, मायामोहात लिप्त असणाऱ्याला ज्ञानाच्या गोष्टी सांगणे, अत्यंत लोभी माणसाला वैराग्य शिकविणे, कोपिष्टाला शांतीचे माहात्म्य वर्णून सांगणे आणि कामांधाला भगवत्कथांचे निवेदन करणे या साऱ्या गोष्टी म्हणजे बरड जमिनीत पेरणी करण्यासारख्याच व्यर्थ आहेत. आणि असे म्हणून अग्निबाणाने समुद्राचे पाणी  शोषून घेण्यास रामप्रभु सिद्ध होताच समुद्र कळवळला व वठणीवर आला. या निमित्ताने तुलसीदासांनी दिलेला व्यावहारिक दाखला असा-

काटेहि पर कदरी फरइ कोटि जतन कोउ सींच ।
बिनय न मान खगेस सुनु डाटेहिं पइ नव नीच ॥

केळीला कितीही खतपाणी घाला वा तिची युक्ती-प्रयुक्तीने मशागत करा, तिला कापले तरच ती फळणार! नीच विनयाने वळत नसतात तर जरब बसवूनच त्यांना नमवावे लागते हा सर्वांचा नित्याचाच अनुभव आहे.

आता लंकाकांडातील काही निवडक सुभाषितांचा परामर्श घेऊ. वालिपुत्र अंगद रावणाच्या दरबारात दौत्य करण्यासाठी गेला आहे. त्यावेळच्या चातुर्यपूर्ण भाषणात रावणाची हर तऱ्हेने निंदा करून तो एके ठिकाणी चौदा जीवन्मृतांची त्याला नावे सांगतो व त्यांच्याचपैकी रावणही एक असल्याने अशा आधीच मेलेल्याला मारण्यात काय हंशील म्हणून आपण त्याला सोडीत आहोत असे म्हणतो. ज्यांना जीवन्मृत म्हणता येईल ते आहेत—

कौल कामबस कृपिन बिमूढा । अति दरिद्र अजसी अति बूढा ॥
सदा रोगबस संतत क्रोधी । बिष्णु बिमुख श्रुति संत बिरोधी ॥
तनु पोषक निंदक अघ खानी । जीवत सव सम चौदह प्रानी ॥

या चौदामध्ये कामी, विमूढ, संतत क्रोधी, विष्णुविमुख व श्रुतिसंतविरोधी इत्यादी कितीतरी विशेषणे रावणाला लावता येतील. आणि म्हणून तो मेल्याहून मेल्यागतच आहे असे अंगद त्याला स्पष्टपणे त्याच्या तोंडावर सांगतो.

रावणाचा मुलगा मेघनाद लक्ष्मणाशी झालेल्या तुमुल युद्धात मारला जातो. आपल्या लाडक्या मुलाच्या वधामुळे शोकमग्न झालेल्या व आक्रोश करीत असलेल्या आपल्या स्त्रियांचे सांत्वन करताना रावण जगाच्या नश्वर स्वरूपाचे व मृत्यूच्या अटळ स्वाभाविकपणाचे विवरण करीत आहे. या प्रसंगी त्याच्यासंबंधी तुलसीदास म्हणतात—

पर उपदेस कुसल बहुतेरे । जे आचरहिं ते नर न घनेरे ॥

रावणाने स्त्रियांनाच तेवढा वेदांत पढवावा. स्वतः मात्र आचार करावा तो पूर्णपणे विपरीत! परोपदेशे पांडित्य ही एक सहजसुलभ गोष्ट आहे हे खरेच नाही काय?

अनुक्रमणिका

आणि शेवटी उत्तरकांडातील काही सदुक्तींचा परिचय करून घेऊ. रामचंद्रांनी लक्ष्मणाला संतांची लक्षणे वर्णून सांगण्याच्या निमित्ताने एका चौपाईत सूत्ररूपाने धर्म-अधर्माचे अत्यंत मर्मग्राही विवेचन केले आहे. या संदर्भातील ही एक उक्ति—

परहित सरिस धर्म नहिं भाई ।
पर पीडा सम नहिं अधमाई ॥

सर्व मंगलाच्या भावनेने वागणे, दुसऱ्यांचे होईल तेवढे हित करणे हाच धर्म आणि जगाला उपद्रव देणे हेच धर्माला प्रतिकूल पापाचरण. संतांच्या विभूती जगाच्या कल्याणासाठी अवतरतात, दया हे धर्माचे मूळ आहे इत्यादी सुप्रसिद्ध उक्ती येथे सहज आठवतात. रंजले गांजलेल्यांच्या सेवेतच देव-धर्म पाहणाऱ्या आपल्या साऱ्या साधुसंतांनी सदा सर्वकाळ हाच उपदेश दिलेला आहे.

काकभुषुंडि मुनी गरुडाला आपल्या संपूर्ण पूर्वायुष्याची माहिती करून देत आहेत. त्या ओघात नीचांच्या स्वभावजन्य वर्तनाचे हे वर्णन आहे—

जेहि ते नीच बडाई पावा । सो प्रथमहिं हति ताहि नसावा ॥
धूम अनल संभव सुनु भाई । तेहि बुझाव घन पदवी पाई ॥
रज मग परी निरादर रहई । सब कर पद प्रहार नित सहई ॥
मरुत उडाव प्रथम तेहि भरई । पुनि नृप नयन किरीटन्हि परई ॥

ज्याने आपणास नावारूपास आणले त्याच्याच मुळावर उठण्याची दुष्ट-दुर्जनांना खोड असते. उपकाऱ्याशी अपकार हाच त्यांचा जन्मजात स्वभाव असतो. अग्नीपासूनच ज्याचा उद्‌भव तो धूरच अग्नीला झाकोळून टाकतो. जमिनीवर पडून साऱ्या पादचाऱ्यांचे लत्ताप्रहार सतत सोसणाऱ्या क्षुद्र धुळीचेच पहाना. वारा तिला उडवून ज्या उन्नत वातावरणात नेऊन सोडतो त्यालाच ती धुळीने माखून टाकते. एवढेच नव्हे तर राजाच्या मुकुटावर व त्याच्या डोळ्यात जाऊन बसण्यात तिला कोणतीच दिक्कत वाटत नाही. ही नित्याचीच उदाहरणे आहेत. ती लक्षात घेऊनच सूज्ञ कधी नीचांच्या वाटेला जात नाहीत. त्यांचा संपर्क शक्यतो टाळतातच. कारण असंगाशी संग म्हणजे प्राणाशी गाठ! खल कपट्यांच्या वर्तनाबद्दल पुढे आणखी एकदा विस्ताराने बोलताना असे म्हटले आहे की दुष्ट काहीही कारण नसताना वैर साधतात. साप व उंदीर यांच्याप्रमाणे ते विनाकारण लोकांचे अनहित करतात. व्यवहारातून सहजपणे निघालेल्या सिद्धांतांची मोजक्या शब्दात अभिव्यक्ति झाली की ती उक्ति हृदयंगम झालीच म्हणून समजावे, अशा सुंदर उक्तींत युगांचे ज्ञान व अनुभव पाहता येतात.

शेवटी आणखी एका चौपाईतील सूक्तिसौरभाने धुंद होऊन हे विवेचन संपवू. काकभुषुंडीच्या उपदेशाने कृतकृत्य झालेल्या भक्तराज गरुडाने केलेले हे संतांचे वर्णन आहे—

संत हृदय नवनीत समाना । कहा कबिन्ह परि कहै न जाना ॥
निज परिताप द्रवइ नवनीता । परदुख द्रवहिं संत सुपुनीता ॥

अनुक्रमणिका

संतांच्या मृदुमृदुल अंतःकरणाचे नवनीताशी साम्य आहेही व नाहीही असे संदिग्ध दिसणारे विधान येथे केले आहे. लोण्याप्रमाणे मऊ अंतःकरण असते हे म्हणणे यासाठी भाग आहे की त्याहून अधिक मऊपणा तुलनेसाठी शोधावयाचा कुठे? पण नवनीतालाही येथे व्यतिरेकाच्या द्वारे लाजविले आहे ते असे म्हणून की लोणी वितळते ते त्याला स्वतःला आच सोसवत नाही म्हणून, कढविले जाते तेव्हा. आणि संत विरघळतात-कळवळतात ते स्वतःच्या नव्हे तर ‘बुडति हे जन न देखवे डोळा। म्हणुनी कळवळ येत असे’ या कोमल भावनेने! म्हणूनच म्हणावयाचे की चैतन्यमय, संवेदनाशील संत कुठे व अचेतन, जड लोणी कुठे!

तुलसीदासजींच्या सूक्ती-सुभाषितांची ही निवडक उदाहरणे आहेत. या सूक्तिरूपी असंख्य कमळांनी बहरलेल्या रामचरितमानसाचे वर्णन रघुनाथपंडितांच्या ‘तुडुंबले ताम रसानपायें’ याच शब्दात यथार्थपणे करता येईल!

* *

अनुक्रमणिका

# रामचरितमानसातील ऋतुवर्णन

रामचरितमानस या ग्रंथात अध्यात्माचा हेतु प्रधान असून काव्य हा त्याचा तितकाच आकर्षक असला तरी गौण विशेषच म्हटला पाहिजे. गोस्वामी तुलसीदास हे अंतरंग प्रकृतीने संत तर प्रतिभाबलाने कवी आहेत. 'वाचे बरवे कवित्व', म्हणून "रामसुकीरति भनिति भदेसा । असमंजस अस मोहि अंदेसा ।।" असे म्हणत संकोचविनयाने त्यांनी रामकथेचे त्यांना शक्य तेवढ्या मंजुळ भाषेत निबंधन केल्याचे "स्वांतः सुखाय तुलसी रघुनाथ गाथा । भाषानिबंधमतिमंजुलमातनोति ।।" या श्लोकात म्हटले आहे. भक्तीचा हेतु मुख्य खरा. पण ती भक्ति प्रगट झाली आहे ती अशा शब्दात व अशा पद्धतीने की अनेक ठिकाणी त्यांच्यातील कवीचे विलोभनीय दर्शन, त्यांचा तसा उद्देश असो वा नसो, सहजपणे घडून जाते. 'न हि कस्तूरिकाऽमोदः शपथेन विभाव्यते.' मुळातलाच सौरभ दडवून ठेवता येत नाही तशीच त्याची जाहिरातही करावी लागत नाही. महाकाव्याच्या नानाविध विषयांना खुलविण्यासाठी अवश्यमेव असणारी ऋतुवर्णनांची मोहक मौज रामचरितमानसातहि आहे. किष्किंधाकांडात रामलक्ष्मणांचा वास प्रवर्षण पर्वतावर असतानाचा प्रसंग आहे. त्यांच्यातील संभाषणाच्या निमित्ताने वर्षा व शरद या दोन ऋतूंचे तुलसीदासजींनी मोठे मनोहारी चित्रण केले आहे.

**वर्षाऋतूचे वर्णन**

बरषा काल मेघ नभ छाए ।
गरजत लागत परम सुहाए ।।
लछिमन देखु मोर गन नाचत बारिद पेखि ।
गृही बिरति रत हरष जस विष्नुभगत कहुँ देखि ।।

'वर्षाऋतु येत आहे' अशी पूर्वसूचना देणारे मेघ आकाशाला वेढून घेत आहेत. या घनदाट मेघांचा गडगडाट ग्रीष्माने पोळून निघालेल्या प्राणिमात्राला परम आल्हाददायक न वाटला तरच नवल! आणि मोरांचा आनंद तर काही विचारावयासच नको. ते हर्षभराने नर्तनात दंग होऊन जातात. येथे मेघांना विष्णुभक्त व मोरांना विरक्त संसारी कल्पून तुलसीदासांनी बहार उडवून दिली आहे. भागवत भेटला की जलकमला प्रमाणे संसारात अलिप्तपणे राहणाऱ्या विरक्तवृत्तीच्या माणसांनी आनंदाने नाचावे तसे येथे झाले आहे.

घन घमंड नभ गरजत घोरा । प्रिया हीन डरपत मन मोरा ॥
दामिनि दमक रह न घन माहीं । खल कै प्रीति जथां थिर नाही ॥

मात्र वर्षाकालात पति अथवा पत्नी यांना परस्परांचा विरह अधिकच तीव्रतेने जाणवावा हा पूर्वापार अनुभव कवींनी व्यक्त केलेला आहे. प्रत्यक्ष प्रभु रामचंद्रांचीही या मानवी अनुभूतीतून सुटका नाही. मेघांची गर्जना व विजांचा कडकडाट एरवी कितीही सुखावह वाटला तरी सीतेच्या विरहामुळे तो भीतिदायक वाटत असल्याचे रामाने म्हटले आहे. वीज मेघात क्षणात चमकते तर दुसऱ्याच क्षणी नाहिशी होते. तिचे हे अस्थिर नर्तन एखाद्या खलकपटी व्यक्तीच्या प्रेमासारखेच अविश्वसनीय आहे. तिच्या निष्ठेवर मेघांनी कसे विसंबून राहावे?

अनुक्रमणिका

या पुढील चौपाईत जलभाराने पृथ्वीवर लवलेल्या मेघांना विद्येमुळे अधिकच विनम्र होणाऱ्या खऱ्या विद्वानाची उपमा दिली आहे. आणि पर्वतराजीवर कोसळणाऱ्या जलधारांबद्दल अशी कल्पना केली आहे की संतांनी विषाद न मानता दुष्टदुर्जनांचे वाग्बाण सोसावे तद्वत हे पर्वत पावसाच्या सरी सोसताहेत. आणि याच्या पुढील चौपाईत अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या किंवा थोडके वैभव प्राप्त झाल्यानेही उन्मत्त होणाऱ्या क्षुद्रजनाप्रमाणे लहानसान नद्या पावसाने तुडुंब भरून तट तोडून वाहू लागतात असे म्हटले आहे. पावसाचे मुळात निर्मल जल जमिनीच्या संपर्काने गढूळ झाल्याचे पाहून कवीने त्याची तुलना शुद्ध जीवाला वेष्टून घेणाऱ्या मायेशी केली आहे. आणि पुढील वर्णनही बहारीचे आहे :

सिमिटि सिमिटि जल भरहिं तलावा। जिमि सदगुन सज्जन पहिं आवा॥
सरिता जल जलनिधि महुं जाई। होइ अचल जिमि जिव हरि पाई॥

वरील चौपायात पावसाचे ठिकठिकाणी साचलेले पाणी तळ्यात सामावत गेल्याचे पाहून सज्जनात क्रमाक्रमाने सद्‌गुणांचा विकास होत गेल्याचे व नद्यांचे पाणी समुद्रात मिसळून गेल्याचे पाहून जगदीश्वरापावे तो पोचून तेथेच स्थिरपणे विसावणाऱ्या जीवाची आठवण कवीला झाली आहे.

हरित भूमि तृन संकुल समुझि परहिं नहिं पंथ।
जिमि पाखंड बाद ते गुप्त होहिं सदग्रंथ॥

हरित तृणाने संपूर्णपणे पृथ्वी आच्छादून गेल्यामुळे वाटा समजेनाशा व्हाव्यात हे स्वाभाविकच आहे. पाखंडी मतांच्या प्रसारामुळे सद्‌ग्रंथ नष्ट व्हावेत ही कल्पना अतिशय समर्पक आहे.

चौफेर डऱ्यांव डऱ्यांव असा बेडकांचा कोलाहल ऐकून वेदपठनरत बटूंची आणि वृक्षवल्लींना फुटणाऱ्या नव्या पालवीला पाहून साधकाच्या मनाला विवेक प्राप्त झाल्याची सुंदर कल्पना कवीला सुचली आहे. या उलट अर्क आणि जवास यांची पाने पावसाने झडून गेल्याचे पाहून चांगल्या राज्यात दुष्टांचे उपद्रवकारक उद्योग बंद व्हावेत तसे झाल्याचे कवीने म्हटले आहे. धुळीचे कोठे नावही राहिलेले नाही ही गोष्ट क्रोधामुळे धर्मज्ञान नष्ट झाल्याची व हिरव्यागार पिकांनी भूमि डंवरलेली पाहून परोपकारार्थ जीवन वेचणाऱ्या औदार्यशील धनिकाची कवीला आठवण झाली आहे. दाभिकांच्या मेळाव्याप्रमाणे रात्रीच्या निबिड अंधकारात काजव्यांचे थवे जागोजागी चमचम करीत आहेत. आणि या पुढे महावृष्टीचे वर्णन व तिजवरील उपमा अत्यंत हृदयंगम आहे —

महावृष्टि चलि फूटि किआरीं। जिमि सुतंत्र भएं बिगरहिं नारी॥
कृषी निरावहिं चतुर किसाना। जिमि बुध तजहिं मोह मद माना॥

संतत वृष्टीमुळे शेतांच्या पाळी फोडून पाण्याचे पाट वाहू लागतात हे दृश्य नेहमीचेच आहे. पण कवीचा पिंड तत्कालीन परिस्थिति व पूर्वावार मनुस्मृतिप्रणीत संस्कारांनी पोसलेला असल्यामुळे त्याने स्वातंत्र्य लाभले की स्त्रिया स्वैराचारी व्हावयाच्याच असे गृहीत धरून पाण्याला सैरावैरा धावू देणाऱ्या शेताच्या पाळींना हीच उपमा दिली आहे.

अनुक्रमणिका

कलियुगाचा प्रादुर्भाव होताच धर्म लुप्त व्हावा तसे पावसाळ्यात चक्रवाक पक्षी दिसेनासे झाले आहेत. आणि बरड जमिनीवर पाऊस पडला तरी त्यावर नावाला देखील तृणांकुर उगवत नाहीत हे पाहून कवी म्हणतो की हरिभक्तांच्या हृदयात जशी विषयांची वासना मूळ धरू शकत नाही तसाच प्रकार येथे झाला आहे.

वर्षाऋतूत असंख्य प्रकारचे जीवजंतू उत्पन्न होऊन पृथ्वीवर अल्पकाळ वावरू लागतात. सुराज्य आले की प्रजेची अनियोजित वाढ व्हावी ना, तसे! आणि पावसामुळे आपला पुढचा प्रवास थांबवून पांथस्थांनी ठिकठिकाणी मुक्काम केलेला पाहून ज्ञान प्राप्त झाल्यावर इंद्रियांची विषयाच्या दिशेने होणारी वाटचाल बंद झाल्याची कवीने कल्पना केली आहे.

कबहुं प्रबल बह मारुत जहं तहं मेघ बिलाहिं ।
जिमि कपूत के उपजें कुल सद्धर्म नसाहि ॥

प्रचंड वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांनी मेघ इतस्ततः सैरभैर होऊन नाहीसे झालेले पाहून कुपुत्र जन्मला की साऱ्या कुलधर्मांचा उच्छेद होतोच असे कवीने म्हटले आहे.

पावसाळ्यात दिवसा मधूनच अंधारून येताना तर मधूनच सूर्यदर्शन होताना आपण पाहतोच. कवीने याला अनुक्रमे कुसंगतीने नष्ट होणाऱ्या व सत्संगतीने उजळून उठणाऱ्या ज्ञानाची उपमा दिली आहे ती अत्यंत अर्थपूर्ण आहे.

**शरद ऋतु वर्णन**

आता हे शरद ऋतूचे वर्णन पहा. वर्षा संपून शरदाचे आगमन झाले आहे.

फूले कास सकल महि छाई । जनु बरषाँ कृत प्रगट बुढाई ॥

साऱ्या धरेवर फोफावलेला पांढुरका कास-दर्भ-म्हाताऱ्या झालेल्या वर्षाऋतूच्या पिकलेल्या केसांची आठवण करून देत आहे. ‘कृतांतकटकामल-ध्वज जरा’ वर्षेला दिसू लागली आहे!

उदित अगस्ति पंथ जल सोषा ।
जिमि लोभइ सोषइ संतोषा ॥

वर्षेच्या अवसानानंतर अगस्तीचा तारा उदय पावला आहे. त्याने जागोजाग साचलेले पावसाळी पाणी शोषून घेतले आहे; संतोषाने लोभाला शोषून घ्यावे तसे. आणि नद्या व तळी स्वच्छ निर्मल जलाने अशी तुडुंब आहेत जशी मद-मोह पूर्णपणे निपटून निघालेली साधुसंतांची निष्कलंक हृदये!

रस रस सूख सरित सर पानी । ममता त्याग करहिं जिमि ग्यानी ॥

अनुक्रमणिका

सरिता आणि सरोवरे हलके हलके शुष्क होण्याच्या मार्गाला लागलेली पाहून हळुहळू मायाममतेचा त्याग करून स्थितप्रज्ञतेच्या दिशेने प्रगति करीत जाणाऱ्या ज्ञानविवेकशील पुरुषाची कवीला उपमा सुचली आहे. योग्य वेळ येताच पुण्ये फळाला यावीत तसे शरदागमाबरोबर खंजन पक्षीही दिसू लागले आहेत.

आता चिखल तर नाहीच पण अजून धूळही नाही. एखाद्या नीतिमान राजाच्या कार्यासारखी जमिनीची निर्मल अवस्था आहे. आणि धनाच्या अभावी अज्ञानी प्रापंचिकाने झुरावे तशी जळावाचून व्याकुळ झालेल्या माशांची तडफड चालू आहे.

बिनु घन निर्मल सोह अकासा ।
हरिजन इव परिहरि सब आसा ॥

एखाद्या भगवद्भक्ताने साऱ्या आशांचा परित्याग करून निर्लेप व्हावे, अवधूत बनावे, तसे मेघांपासून पूर्णतः मुक्त झालेले निरभ्र आकाश दिसत आहे. आणि शरदातील क्वचित् प्रसंगी होणारी तुरळक वृष्टि एखाद्यालाच प्राप्त होणाऱ्या भक्तीसारखी वाटत आहे. वर्षाकाळ संपला व शरदाचे आगमन झाले हे पाहून राजे, तडीतापसी, व्यापार उदीम करणारे आणि भिक्षांदेहि करणारे आपापल्या व्यवसायाच्या निमित्ताने आपले शहर सोडून हर्षभराने बाहेर पडू लागले आहेत याची तुलसीदासांनी तुलना केली आहे हरिभक्तीचा लाभ घडताच अन्य श्रमांचा त्याग करणाऱ्या चारी आश्रमांतील लोकांशी. ते म्हणतात—

चले हरषि तजि नगर नृप तापस बनिक भिखारि ।
जिमि हरिभगति पाइ श्रम तजहिं आश्रमी चारि ॥

या पुढील चौपायातील एकाहून एक सरस कल्पना अशा आहेत. अथांग पाण्यात आहेत त्या मासळ्यांचे सुख काय वर्णावे! जणू श्रीहरीच्या चरणाशी आल्यामुळे सर्व भवबाधांपासून मुक्त झालेले भक्तच! आणि निर्गुण ब्रह्माने सगुण रूप धारण करून सुशोभित व्हावे तसे कमळे प्रफुल्लित झाल्यामुळे सरोवर शोभून दिसत आहेत! मधुकरांचे मंजुमधुर गुंजारव, आणि नाना प्रकारच्या पक्ष्यांचे श्रुतिमनोहर कूजन यांनी वातावरण मुखरित झाले आहे. रात्रीच्या आगमनाने खचून गेलेल्या चक्रवाक पक्ष्यांची स्थिती दुसऱ्याचे वैभव पाहून मत्सराने काळवंडून जाणाऱ्या माणसासारखी आहे!

चातक रटत तृषा अति ओही ।
जिमि सुख लहत न संकरद्रोही ॥

तृषेने व्याकुळलेला चातक 'पिहू पिहू' असा आर्त टाहो फोडत आहे. भगवान शंकराचे द्रोही सुखाच्या अभावी असाच अशांत आक्रोश करीत असतात! शरदकालीन दिवसाच्या ऊष्म्याचे निवारण करण्यास रात्री चंद्र तत्परच असतो. संतांचे दर्शन घडल्यावर पापे झडून गेल्यावाचून कशी राहतील?

देखि इंदु चकोर समुदाई ।
चितवहिं जिमि हरिजन हरि पाई ॥

अनुक्रमणिका

भगवंताचे दर्शन झाले म्हणजे भक्ताने जसे अनिमिष नेत्रांनी त्याच्याकडे पाहत राहावे तसे चकोरांचे समूह चंद्राकडे अधाशीपणाने टक लावून बसले आहेत, थंडीच्या भीतीने डासमच्छरांचे थवे पार कोठे नाहीसे झाले आहेत. यावर ब्राम्हणद्रोहाचा परिणाम कुळाचा नाश होण्यातच घडून यावयाचा ही तुलसीदासांना सुचलेली कल्पना ज्या विशिष्ट काळाचे ते प्रतिनिधि आहेत त्या काळाच्या संदर्भात समजून घेता आली तर बरे. अन्यथा आजच्या बदललेल्या मानवी मूल्यांच्या संदर्भात तिचे औचित्य टिकणे सर्वथा अशक्य आहे.

आणि शेवटी ही कल्पना

भूमि जीव संकुल रहे गए सरद रितु पाइ ।
सदगुर मिलें जाहिं जिमि संसय भ्रम समुदाइ ॥

वर्षा ऋतूत पृथ्वीवर उभ्दवलेले नाना प्रकाचे जीवजंतू शरदऋतू येताच आपोआप नष्ट होऊन गेले आहेत. सदगुरूच्या अनुग्रहामुळे संशयनिवृत्ति व्हावी व भ्रमजालांचा निरास व्हावा हे स्वाभाविकच नाही काय?

रामगुणानुवादाच्या उदात्त हेतूने बहरून उठलेल्या तुलसीदासांच्या मानसाला प्रामुख्याने परतत्त्वाचा स्पर्श झालेला आहे. काव्य हा घटक खरे तर दुय्यमच आहे. पण असे असले तरी अधून मधून अध्यात्माच्या जोडीनेच गोस्वामीजींनी लाभलेल्या कविप्रतिभेचे विलोल लास्य प्रगट झाल्याशिवाय राहत नाही. ऋतुवर्णनाच्या या दोनच ठळक उदाहरणावरून हेच सिद्ध होत नाही का?

* *

अनुक्रमणिका

# संत तुलसीदासांची भावभक्ति

रामचरितमानस हा ग्रंथ तुलसींच्या भक्तिभावाचा सहजसुंदर उद्रेक आहे. या रामगुणगायनाची फलश्रुति उत्तरकांडाच्या शेवटी ग्रंथसमारोपाच्या निमित्ताने त्यांनी "श्रीमद्रामचरित्रमानसमिदं भक्त्यावगाहंति ये । ते संसार पतंगघोर-किरणैर्दह्यंति नो मानवाः" अशी सांगितली आहे. "तुलसी मगन भये रामगुन गाके" अशी एका कवीने त्यांच्या श्रेष्ठ रामभक्तीची ग्वाही दिलेली आहे. भक्तिभावाने रामचरितरूपी मानससरोवरात अवगाहन करणाऱ्यांची अंगे या संसारसूर्याच्या प्रखर किरणांनी पोळून निघत नाहीत असे आश्वासन भाविकांना देणाऱ्या तुलसीदासांनी प्रस्तुत ग्रंथात यथास्थान भावभक्ति व आध्यात्म-वैराग्य यांनी ओथंबलेले विचार प्रगट करावेत हे स्वाभाविकच आहे. मानसाच्या प्रत्येक कांडाचा आरंभ शुद्ध संस्कृत भाषेत रचलेल्या स्तुतिपर श्लोकांनी होतो. कधी एकट्या कारुण्यामृतसागर श्रीरामाबरोबरच कुंदेंदीवरसुंदर रामलक्ष्मण, सीतालक्ष्मणसंयुत पथिक अभिराम रामचंद्र, शार्दूलचर्मांबर गिरिजावर रामप्रिय शंकर, अतुलितबलधाम रघुपतिप्रियभक्त वातजात हनुमान यांची स्तुतिस्तोत्रें भक्तिभावाने गाऊन कवीने आपल्या रामकथेचा विस्तार केला आहे. या साऱ्या स्तोत्रातून भावभक्ति अक्षरशः निथळते आहे. ग्रंथावसान प्रसंगी पुन्हा एकदा श्रीरामांचे अनादित्व, इतर देवांहून त्यांची श्रेष्ठता, त्यांच्या कथेचे अपूर्वत्व व त्यांच्या नामसंकीर्तनाची अलौकिक फलश्रुति इत्यादींचे श्रद्धापूर्वक वर्णन कवीने केले आहे. ही रामकथा शंकराने पार्वतीला, अगस्तीने शंकराला, काकभुषुंडीने गरूडाला, वाल्मीकींनी सामान्य जनांना आणि शेवटी तुलसीदासांनी आपणाला अशा विविध स्तरांवरून सांगितली जात असताना प्रभु रामचंद्राविषयीच्या उत्कट भक्तिभावाचे स्रोत त्या त्या वक्त्याच्या वाणीतून प्रवाहित झाले आहेत ते निराळे. आणि खुद्द कथेच्या गाभ्यात रामावताराच्या पूर्वपीठिकेचे विवेचन करताना कथेचे अविभाज्य घटकच असे जे ब्रम्हा व महेश त्यांच्या मुखानेही 'अशेषकारणपरं रामाख्यं ईशं हरिम्' ची स्तुति गाइली गेली आहे. कथानुगायन करणाऱ्या देव, ऋषि आणि कवींनी रामगुणगान करावे हे तर कथौघात स्वाभाविकही होते व आवश्यकही. या खेरीज भरत, गुह, हनुमंत आदींनी आणि संधि साधेल तेथे खुद्द कवि तुलसीने केलेली रामस्तुतीही जागोजाग आढळते. ही सारी स्थळे भक्तिरससिक्त आहेत.

भक्तीच्या परम हेतूने निर्माण झालेल्या या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की प्रत्यक्ष कथानायक रामांनीदेखील भक्तिमाहात्म्य लक्ष्मणाला समजावून सांगितले आहे. ग्रंथात अन्यत्र ठिकठिकाणी प्रवाहित झालेल्या भक्तिवाहिन्यांचे सारे निर्मल जल ज्याच्यात सामावले आहे असा भक्तिसागरच श्रीरामांनी केलेल्या भक्तिगौरवाच्या रूपाने निर्माण झाला आहे. सागरात स्नान केले म्हणजे समस्त तीर्थांच्या स्नानाचे पुण्यफल अलगद हाती येते. तुलसीप्रणीत भक्तीचे स्वरूप समजावून घेण्यासाठी अरण्यकांडात रामचंद्रांनी लक्ष्मणाला जे नवविधा भक्तीचे महत्त्व सविस्तर समजावून सांगितले आहे तेवढे जरी पाहिले तरी पुरेसे आहे.

लक्ष्मणाने रामाला विनंती केली की 'मला ज्ञान, वैराग्य, माया आणि भक्ति ही काय आहेत ते समजावून सांगा' आणि 'मी या साऱ्या गोष्टी तुला सूत्ररूपाने थोडक्यात समजावून सांगतो' असे प्रभूने आश्वासन दिले. ज्ञान, वैराग्य आणि माया यांचे विवेचन संक्षेपात करून झाल्यावर रामाने भक्तीवर विस्तारपूर्वक प्रवचन केले आहे ते असे:—

"लक्ष्मणा, ज्ञान विज्ञान यांचे आपापल्या ठिकाणी स्वतंत्रपणे महत्त्व आहे. पण ज्याते बेगि द्रवउँ मैं भाई । सो मम भगति भगत सुखदाई' मला द्रवित करते ती भक्ति व भक्तालाही परम सुखाची प्राप्ति होते ती

भक्तीमुळेच. या भक्तीला ज्ञानविज्ञानांच्या आधाराची गरज नसते. ‘भगति तात अनुपम सुख मूला। मिलह जो संत होइ अनुकूला’ ही भक्तीच सर्व सुखांचे मूळ आहे. ही परमसुखदायिनी वस्तु बाजारात मिळत नाही. ती प्राप्त होण्यासाठी परमावश्यक गोष्ट म्हणजे साधुसंगति”. आणि अशा या ‘सुखमूला’ भक्तीच्या साधनांचा रामचंद्रांनी विस्ताराने ऊहापोह केला तो सारांश रूपाने असा आहे.

भक्ती हे ईश्वरप्राप्तीचे सर्वजनसुलभ साधन असून त्यासाठी पहिली अट विप्रचरणरति व वर्णाश्रमर्धानुसार आपापली कर्तव्ये करण्याची दक्षता ही आहे. याचा परिणाम विनासायास वैराग्य उत्पन्न होण्यात होईल. आणि हे वैराग्य प्राप्त झाले तर लक्ष्मणा, भक्तीचे स्थूलमानाने जे नऊ प्रकार आहेत ते सारे मनात उदित होऊन मजविषयी खरेखुरे प्रेम वाटू लागेल. आता ही भक्ति कशी असावी?

संत चरण पंकज अति प्रेमा। मनक्रम बचन भजन दृढ नेमा॥
गुरु पितु मातु बंधु पति देवा। सब मोहि कहँ जानै दृढ सेवा॥

संतचरणी लीन व्हावे, मनवचनकर्माने भजनकीर्तनाची कास धरावी आणि माझी सेवा त्वमेव माता पिता त्वमेव’ अशा अनन्य भावाने करावी. माझे नामगायन करीत असता ज्याचे देहभान हरपते, कंठ दाटून येतो आणि कामक्रोधादि षड्रिपूंना जो पार पिटाळून लावतो त्याच्या मी सदैव मुठीत असतो.

बचन कर्म मन मोरि गति भजनु करहिं निःकाम।
तिन्ह के हृदय कमल महुँ करउँ सदा विश्राम॥

ज्याच्या ध्यानीमनी मी असतो, मनाने, वाणीने व प्रत्यक्ष कार्याने ज्यांची माझ्या भक्तीशिवाय अन्य विषयात रुचि दिसत नाही आणि जे फलाशारहित माझे नामसंकीर्तन करतात त्यांच्या अंतरात मी सदोदित वास करीत असतो.

वर भक्तीचे जे स्वरूप श्रीरामांनी लक्ष्मणाला विवरून सांगितले आहे ते भागवतात उद्धवाला श्रीकृष्णांनी समजावून दिलेले अथवा गीतेत श्रीकृष्णांनी अर्जुनाला उकलून दाखविलेले जे भक्तीचे स्वरूप आहे त्यापेक्षा निराळे नाही. आपण वैकुंठात वास करतो हा उगाच आपणावर ठपका आहे. खरे म्हणजे भगवंतांनी आपला जो पत्ता नारदाला आश्वासनपूर्वक दिला आहे तो मद्‌भक्ताः यत्र गायंति असा आहे. भक्तिभाव हा ईश्वरासारखाच अनादि—अनंत, शाश्वत—अविकृत असल्याने त्याच्या मूळ स्वरुपात बदल होण्याची शक्यता नाही. भक्त तुलसीदासांचा पिंड याच पुरातन संस्कार—विचारांवर पोसलेला असल्याने त्यांच्या या रचनेत व्यक्त झालेल्या भक्तीच्या स्वरूपात निराळेपणा असणे अपेक्षितही नाही ‘श्रवणं कीर्तनं विष्णोरर्चन पादसेवनं। अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्’ हे भक्तीचे जे नऊ प्रकार पूर्वापार चर्चिले गेले आहेत तेच तुलसीदासांनाही अभिप्रेत आहेत. मुख्य मुद्दा हा की तुलसीदास हे स्वतः परम भक्त असल्याने जेवढे अधिक भक्तिमाहात्म्य वर्णून सांगण्याचे अवसर सापडतील तेवढ्यांचा सढळ हाताने व मुक्त कंठाने उपयोग करून घेण्याची त्यांची वृत्ति आहे. आणि येथे लक्ष्मणाला निमित्त करून रामचंद्रांना भक्तीची महति गायला लावून ते स्वतःच पुलकित—प्रफुल्लित झाले असल्याचे दिसते.—

भगति जोग सुनि अति सुख पावा। लछिमन प्रभु चरनन्हि सिरु नावा॥

अनुक्रमणिका

हे वर्णन लक्ष्मणाचे आहे खरे. पण हेच तुलसीभक्तावर जर अलगद उचलून ठेवले तर दिसेल की ते किती चपखलपणे या भक्तीशिरोमणीवर बसते ते. मात्र एका गोष्टीचे स्पष्टीकरण मुख्यतः वरील भक्तिविषयक व्याखानाच्या संदर्भात व सामान्यपणे अन्यत्र काही प्रसंगी आलेल्या भक्तिविवेचनाच्या संबधात करणे आवश्यक आहे. तुलसीदासांच्या ब्राम्हणा विषयीच्या आत्यंतिक पक्षपाती भासू शकेल अशा धोरणाचा आढळ या ग्रथात जागोजागी होतो. वर्णाश्रमधर्मप्रणीत कर्मांवर त्यांनी अनेकदा भर दिला आहे. त्या काळी ब्राम्हणकुळात जन्मलेल्या, तत्कालीन रूढ प्रामाणिक समजुतीप्रमाणे धर्माचरण करणाऱ्या एका कवीने केलेले हे प्रवचन आहे ही प्राथमिकपणे महत्त्वाची गोष्ट. शिवाय भागवतादी ज्या मूळ प्राचीन ग्रंथातून या कथेची सारी प्राकृत सृष्टि उभारली गेली आहे त्यांचेही स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे. या दोन कसोट्यांच्या संदर्भात तटस्थपणे रामचरितमानसाचे अवगाहन करणे समंजसपणाचे ठरेल.

अरण्यकांडात भगवान शंकर उमेला रामाचे माहात्म्य वर्णून सांगताना म्हणतात—

उभा कहउँ मैं अनुभव अपना । सत हरि भजनु जगत सब सपना ॥

उमे, हरिभजनाशिवाय सारे व्यर्थ आहे. एका भजनापुढे सारे जग स्वप्नवत् आहे असे मी स्वानुभवावरून सांगू शकतो. यापुढे कथेचे सूत्र चालवीत त्यांनी राम-लक्ष्मण पंपासरोवरावर गेल्याचे सांगितले आहे. तेथे नारदमुनि त्यांना भेटण्यास आले आहेत. रामांचे पदवंदन करून नारदाने त्यांचेकडून एक वर मागितला आहे. आणि रामाने तो देण्याचे मान्य करताच नारद काय मागतात ते पहा—

जद्यपि प्रभुके नाम अनेका । श्रुति कह अधिक एक ते एका ।
राम सकल नामन्ह ते अधिका । होउ नाथ अघ खग गन बधिका ॥

दोहा—

राका रजनी भगति तव राम नाम सोई सोम ।
अपर नाम उडगन बिमल बसहुँ भगत उर ब्योम ॥

प्रभो, वेदपुराणांनी देवाची एकाहून एक सरस नावे सांगितली असली तरी रामाच्या नावाला तोड नाही. पापरूपी पक्ष्यांना व्याधाप्रमाणे हे नाम विनाशक ठरणारे आहे. शिवाय रामराया, तुमची भक्ति ही पौर्णिमेची रात्र असून तुमचे नाव हा साक्षात् रजनीनाथ चंद्रमाच आहे. इतर नावे ही केवळ लुकलुकणाऱ्या तारांगणांप्रमाणे आहेत. पण भगवन् तुमची ही भक्तिरूपी पौर्णिमा आम्हा भक्तांचे हृदयाकाश उजळीत राहो एवढी एकच माझी मागणी आहे. आणि श्रीरामाने ‘एवमस्तु’ म्हणून हा वर तर नारदाला दिलाच पण त्याबरोबरच हेही समजावून सांगितले की ‘आईने मुलाची करावी तशी मी आपल्या भक्तांची काळजीपूर्वक राखण करीत असतो. कारण ज्ञानी हे माझ्या दृष्टीने वयात आलेल्या पुत्रासारखे असून भक्त मात्र शिशूप्रमाणे आहेत असे मी मानतो—

मोरे प्रौढ तनय सम ग्यानी ।
बालक सुत सम दास अमानी ॥

अनुक्रमणिका

आणि ही गोष्ट जाणतात म्हणूनच—

अस बिचारी पंडित मोहि भजहीं।
पाएहुँ ग्यान भगति नहि तजहीं ॥

पंडित ज्ञानाची घमेंड न मिरवता विनम्रपणे माझी भक्ति करतात ती हे जाणूनच.

मुळातच ज्या भक्तिभावनेची तुलसीदासजींना अवीट गोडी तिचे श्रेष्ठत्व पटवून देण्याची एकही संधि या ग्रंथात त्यांनी सोडलेली नाही. लंकाकांडात ब्रह्मदेवाने रामप्रशस्ति केली असून ती प्रायशः ज्या भाषेत आहे तिला विशुद्ध संस्कृत तर म्हणता येणार नाहीच पण ती सामान्य हिंदीही नाही. पहाः

जन रंजन भंजन सोक भयं। गत क्रोध सदा प्रभु बोधमयं।
बिनु कारन दीन दयाल हिंतं। छबि धाम नमामि रमा सहितं ॥

आणि

अनवद्य अखंड न गोचर गो।
सब रूप सदा सब होई न गो ॥
इति वेद बदंति न दंत कथा।
रवि आतप भिन्नमभिन्न जथा ॥

भक्तांना आनंदविणाऱ्या, दुःखशोकांचा विनाश करणाऱ्या, सहज प्रेमाने दीन दुबळ्यांचे हित साधणाऱ्या, शरचापधारी परमसुंदर अशा रामप्रभूला नमन करून ब्रह्मदेवाने निर्दोष, अखंड, अगोचर या विशेषणांनी त्यांची स्तुति गाइली आहे. आणि हवाला दिला तो असा की 'हे मी तोंडपुजेपणा करण्यासाठी म्हणतो आहे असे मात्र आपण समजू नये. खुद्द वेदांनीच या शब्दात आपले वर्णन केलेले आहे'.

उत्तरकांडात पुलकित होऊन शंकर रामस्तुति करीत आहेत—

जय राम रमारमनं समनं।
भवताप भयाकुल पाहि जनं ॥

आणि

महि मंडल मंडन चारुतरं।
धृत सायक चाप निषंग बरं ॥
मद मोह महा ममता रजनी।
तम पुंज दिवाकर तेज अनी ॥

अनुक्रमणिका

अशा या रमारमण, भवतापग्रस्त भक्तांचा संरक्षक, असीम सौंदर्यशाली, शरचापधारी रामांची स्तुति करून शंकरांनी त्यांना महामदमोहमायेच्या काळ्याकुट्ट अंधकाराला आपल्या तेजाळ किरणांनी नष्ट करणाऱ्या सूर्याची उपमा दिली आहे. आणि पुढे तर याहूनही रमणीय कल्पना मांडल्या आहेत—

मुनि मानस पंकज भृंग भजे । रघुबीर महा रनधीर अजे ॥
तव नाम जपामि नमामि हरी । भवरोग महागद मान अरी ॥

मुनिजनांच्या मनःसरोजात दडून बसणाऱ्या भृंगा, हे रणधीरा श्रीरामा, तुम्ही जन्ममरणांच्या रोगावरील दिव्य औषधि आहांत. तुमचे अहंकाराशी उभे वैर आहे. आणि म्हणून प्रभो—

बार बार बर मागउँ हरषि देहु श्रीरंग ।
पद सरोज अनपायनी भगति सदा सतसंग ॥

माझे आपणाजवळ दुसरे तिसरे काही मागणे नाही. प्रभु रामराया, तुम्ही मला आपल्या चरणकमळांची अनन्य अविचल अशी भक्ति जर दिलीत तर तीत मला सारे काही लाभले.

वरील दोन्ही प्रसंगी स्तुतिगायनासाठी ज्या भाषेचा प्रयोग तुलसीदासांनी केलेला आहे त्या भाषेला कविवर्य मोरोपंतांच्या शब्दात प्राकृत भाषा म्हणणे उचित होईल. उत्कट भक्तिभावाने ओथंबलेल्या या दोन स्तुतीखेरीज आणखीही उदाहरणे देणे सहज शक्य आहे.

उत्तरकांडात काकभुषुंडिमुनींनी गरुडाला ज्ञान आणि भक्ति या मूलतः एकच असून त्यांत काही भेद नाही, दोहोंतही संसारातील क्लेशांचे निवारण करण्याचे सामर्थ्य असल्याचे सांगितले. पण लगेच असेही म्हणून टाकले आहे की हे सारखेपण जरी असले तरी ऋषींनी दोहोंत एक मोठा फरकही सांगितला आहे तो असा—

ग्यान बिराग जोग बिग्याना । ए सब पुरुष सुनहु हरिजाना ।
पुरुष प्रताप प्रबल सब भाँती ॥ अबला अबल सहज जड जाती ॥

हे हरिवाहना गरुडराया, ज्ञान, वैराग्य, योग आणि विज्ञान हे पुरुष असून त्यांचा प्रताप संशयातीत आहे यात शंकाच नको. पण माया ही स्त्री स्वभावतःच अबला व जन्मतःच निर्बुद्ध आहे. येथे लक्षात घ्यावयाचे ते हे की हिंदी भाषेतील व्याकरणात नपुंसक लिंग हा प्रकार नाही. त्यात केवळ पुल्लिंग व स्त्रीलिंग हे दोनच प्रकार आहेत. ज्ञान, वैराग्य आणि विज्ञान हे मराठीत व संस्कृतमध्येही नपुंसक लिंगी असून केवळ योग हाच पुल्लिंगी आहे. पण हिंदींप्रमाणे हे चारही शब्द पुल्लिंगी आहेत. ही गोष्ट समजून घेतल्याशिवाय तुलसीदासांनी त्या आधारावर बसविलेल्या सुंदर कल्पनेचा आनंद घेता येणार नाही. आता हे चार पुरुष एका बाजूला तर माया ही एकटी स्त्री दुसऱ्या पक्षाला. त्यांच्या संबंधी ते म्हणतातः—

पुरुष त्यागि सक नारिहि जो बिरक्त मति धीर ।
न तु कामी बिषयाबस बिमुख जो पद रघुवीर ॥

अनुक्रमणिका

कामी, विषयासक्त पुरुष नारीचा त्याग करू शकत नाही. केवळ विरक्त, धीमान, रामचरणानुरक्तच एवढा मनाचा निर्धार दाखवू शकतात. ज्ञानवंत ऋषीमुनीदेखील युवतींच्या लीलांनी वेडावल्याची व त्यांच्या मुखचंद्रावर लुब्ध झाल्याची असंख्य उदाहरणे दाखविता येतील. साक्षात् भगवान विष्णूची मायाच स्त्रीरूप धारण करून प्रगट होते. अशा या नारिरूप मायेला भुलणार नाहीत असे पुरुष विरळाच. पण—

मोह न नारि नारिकें रूपा।
पन्नगारि यह रीति अनूपा॥

हे गरुडा, पुरुष नारिमोहाला बळी पडला तरी एक स्त्री काही दुसऱ्या स्त्रीच्या मोहकतेला भुलत नाही. म्हणजे मायेला बळी पडतात ते ज्ञान, वैराग्य, योग आणि विज्ञान हे पुरुष. पण असे पहा की—

माया भगति सुनहु तुम दोऊ। नारि बर्ग जानइ सब कोऊ॥
पुनि रघुबीरहि भक्ति पिआरी। माया खलु नर्तकी बिचारी॥

माया आणि भक्ति या दोघीही स्त्रिया. मुळातच एकमेकींशी त्यांचे सख्य असणे संभवनीय कमीच. त्यातून भक्ति ही श्रीरामाची आवडती. मग काय विचारता? सामान्य नर्तकी असली तरी माया ही स्त्रीच आहेना?

भगतिहि सानुकूल रघुराया।
ताते तेहि डरपति अति माया॥

भक्तिविषयी रामाची अनुकूलता पाहून माया तिला वचकून असते. आणि ज्यांच्या अंतःकरणात ही रामाची भक्ति निरंतर वास करते—

तेहि बिलोकी माया सकुचाई।
करि न सकइ कछु निज प्रभुताई॥

रामभक्तीला हृदयी वसविणाऱ्यासमोर माया ठरू शकत नाही व त्याच्यावर आपल्या लीलाविलासांनी काहीही परिणाम करू शकत नाही. स्त्रीचा सवतीमत्सर येथे प्रभावी ठरला तर त्यात आश्चर्य नाही. ज्याच्या जवळ भक्ति आहे त्याच्यावर आपला अंमल चालणार नाही हे जाणून माया नेहमीच भक्तीचा हेवा करते व जेथे ती असेल तेथून दूर राहण्याचा प्रयत्न करते.

थोडक्यात असे की ईश्वराची प्राप्ति ज्या अनेक साधनांच्या आधारे होणे शक्य आहे त्या सर्वात तुलसीदासजींनी भक्तीचे अनन्य साधारण महत्त्व असल्याचे दाखवून दिले आहे. मुळातच त्यांचा हा ग्रंथ भक्तीचा ठेवा असल्याने त्यांनी तसे केले नसते तरच नवल. शेवटी या कथेची जी फलश्रुति शंकरांच्या तोंडून त्यांनी वदविली आहे ती अशी—

राम चरन रति जो चह अथवा पद निर्बान।
भाव सहित सो यह कथा करउ श्रवन पुट पान॥ (उत्तरकांड, दो., १२८)

अनुक्रमणिका

श्रीराम प्रभूच्या भक्तीची उत्कट आकांक्षा ज्यांच्या अंतःकरणात वसत असेल त्यांनी हे कथामृत आपल्या कानामनाचे द्रोण करून प्राशन करावे. निर्वाण पदाचा लाभ घडवून देण्याचेही सामर्थ्य त्यात आहे.

शंकराकडून पार्वतीने ही समग्र रामकथा एकाग्र चिताने श्रवण केली. तिजमुळे तिला झालेला आल्हाद फार थोर असल्याचे पार्वतीने म्हटले आहे. एवढेच नव्हे तर या कथामृतपानाने झालेल्या तृप्तीची जणू ढेकरच अशी उमेने दिलेली कबुली अशी—

मैं कृत कृत्य भइउँ अब तव प्रसाद बिस्वेस ।
उपजी राम भगति दृढ बीते सकल कलेस ॥

हे विश्वेश्वरा, ही कथा ऐकून मी कृतकृत्य झाले. माझ्या मनात श्रीरामप्रभूच्या निर्मल भक्तिभावनेचा उदय झाला आहे. माझे सारे भवताप आता नाहीसे झाल्याचा दिव्य अनुभव मला आला आहे.

आणि शेवटी संत तुलसीदासजींच्या भावभक्तीचा हा स्थूल आढावा ग्रंथावसानी त्यांनी योजिलेल्या त्यांच्याच शब्दात विरून जाऊ देऊ—

मो सम दीन न दीन हित तुम समान रघुबीर ।
अस बिचारि रघुबंस मनि हरहु बिषम भव भीर ॥
कामिहि नारि पिआरि जिमि लोभिहि प्रिय जिमि दाम ।
तिमि रघुनाथ निरंतर प्रिय लागहु मोहि राम ॥ (उत्तरकांड, दो., १३० क, ख.)

त्रिभुवनात मजसारखा हीन दीन नाही व तुमच्यासारखा दीनबंधु नाही. रामराया, मग कुणाकडे बरे मी माझ्या भवव्यथेचे गाऱ्हाणे घेऊन जावे? तुमच्या-शिवाय कोण माझी सुटका करू शकणार आहे? देवा, आता माझे एकच मागणे आहे. माझा लडिवाळ हट्ट पुरवून, प्रभो, मला कृतार्थ करा. विषयासक्त माणसाला जसा स्त्रीचा अनावर मोह असतो, अथवा लोभी धनिकाला संपत्तीचा जसा अतोनात लोभ असतो त्यापेक्षा अनेक पटींनी अधिक मोह मला पडू द्या तुमच्या भक्तिभावाचा. आणि ही भक्ति क्षणिक नसावी, तर ती शाश्वत हवी. श्रीरामराया, हेच माझे शेवटचे मागणे. भगवन्, देणार ना आपल्या तुलसीभक्ताला एवढे एकुलते एक दान?

* *

अनुक्रमणिका

# समदृष्टि तुलसीदास

वर्णाश्रमधर्माच्या महत्त्वाचे प्रतिपादन आपल्या साधुसंतांनी केले आहे ते व्यापक समाजहिताकडे लक्ष ठेवूनच असे त्यांचे जीवन व कार्य यांच्या आधाराने निःशंक म्हणता येईल. त्यांच्या वैयक्तिक जीवन व्यवहारात विश्वबंधुत्वाच्या भावनेचे मनोज्ञ दर्शन नेहमीच घडत आलेले आहे. वेदांगी 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' यांना वेदोपनिषदांच्या अध्ययनाच्या बाबतीत अनधिकारी ठरवून एके काळी उच्चतम आध्यात्मिक सुख-संतोषापासून वंचित केले असेल. पण पुढील काळात भगवान श्रीकृष्णाच्या अवतरणाबरोबरच केवळ कंसाच्या बंदीगृहाची लोखंडी कपाटेच तेवढी निखळून पडली नाहीत, तर वेदांनी पूर्वी कृपणपणे बंदिस्त करून ठेवलेल्या या अध्यात्मज्ञानाची कवाडेदेखील भगवंतांनी सर्वांसाठी सताड उघडी करून टाकली. त्यांनी वेदोपनिषदाचे गीतारूप दुग्ध पार्थवत्साला निमित्त करून अशेष मानवाला उपलब्ध करून दिले. स्त्रीवैश्यशूद्रांबरोबरच 'येऽपि स्युः पापयोनयः' अशा पापपुंजांनादेखील त्यांनी परागतीचे स्पष्ट आश्वासन दिले. या क्रांतिकारी परिवर्तनाने प्रेरित झालेल्या आमच्या साधुसंतांनी समग्र मानवजातीला ज्ञान, कर्म व भक्ती यांच्या भूमिकेवर एकत्र येण्याचे आवाहन करून सकल मंगलाच्या वाटा उजळल्या. संत ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वचि माझे घर' अशा थोर मतीच्या लोकांचा गौरव गायिला आहे. ज्या भागवत धर्माचा त्यांनी पाया घातला त्यातून उंचनिंच, स्त्रीपुरुष, रावरंक, स्पृश्यास्पृश्य इत्यादी एकजात साऱ्या मानवनिर्मित कृत्रिम भेदाभेदांचे समूळ उच्चाटन झालेले आहे. इतर प्रदेशांतील संतानीही आपापल्या रचनामधून आपल्या जीविताचे सारसर्वस्वच अशा या सर्वत्र समबुद्धीच्या गीताप्रणीत सिद्धांताचेच प्रतिपादन केलेले आहे. मग त्यांच्या रचनेचे विषय काहीही असोत.

तुलसीदासांनी आपल्या रामचरिताला 'मानस' असे म्हटले आहे. पण वस्तुतः ते रत्नाकरापेक्षा कणभरही कमी नाही. जीवन समृद्ध करणाऱ्या अगणित रत्नमाणिकांची त्यात रास आहे. आणि तुलसीसारखा संत केवळ स्वतःच्याच जीवनाची चिंता वाहील हे कसे बरे शक्य आहे? 'आत्मवस्तर्वभूतेषु' हा तर संतहृदयाचा स्थायीभावच. तुलसीदासांनी आपल्या या ग्रंथात भक्तिमार्गाचे अनुसरण करणाऱ्या केवळ नर-वानरांनाच नव्हे तर वनचरनिशाचरांनादेखील उद्धाराची हमी दिलेली आहे. एवढेच काय, पण रामप्रभूचा सहवास घडून आत्मोद्धार शक्य व्हावा म्हणून देवादिकांनीही वृक्षवल्लींची रूपे धारण केल्याचे त्यांनी दाखविले आहे. या सर्वसुलभ भक्तिपंथात भेदभावाला अजिबात थारा नाही. ब्राह्मणवर्गाच्या श्रेष्ठतेचे या ग्रंथात पदोपदी वर्णन केले असले, त्यांच्या पूर्वदिव्याची वारंवार आठवण करून दिली असली तरी ती काही विशिष्ट हेतुपूर्वकच केली असावी असे वाटते. तुलसीदासांच्या काळी त्यांना जो ब्राह्मण दिसत होता तो आपल्या गौरवशाली पूर्वपरंपरेशी विसंगत असे भौतिक सुखस्वार्थांनी अवलिप्त अधःपतित जीवन जगत असलेला. पुढे भूषण कवीने शिवाजीराजांच्या संदर्भात बोलताना आपल्या आधीच्या काळापासून विस्कळीत होत चाललेल्या व साऱ्या राष्ट्राला व्यापून उरणाऱ्या हिंदूंच्या केविलवाण्या परिस्थितीचे जे चित्रण केले आहे ते असे : "चारों बरन धरम छोड कलमा नमाज पढें, शिवाजी न होते तो सुनत होती सबकी." समर्थांनीही हीच व्यथा "तीर्थ क्षेत्रे मोडली । ब्राह्मणस्थाने नष्ट झालीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।" या शब्दात व्यक्त केली आहे. तुलसीदासांच्या वेळी हीच शोचनीय अवस्था त्यांना सर्वत्र दिसत होती. त्यांनी बुध्याच ब्राह्मणाच्या श्रेष्ठतेचे पवाडे गायिले आहेत असे वाटते. त्यांना ब्राह्मणांनी वर्णगुरु म्हणून पोकळ डौल मिरवावा हे परवडणारे नव्हते. ब्राह्मणाच्या नीतिमत्तेवर साऱ्या समाजाची मदार. त्यांच्या निष्कलंक व आदर्श आचाराचे इतरांनी अनुकरण करावयाचे. तेच भ्रष्ट तर इतरांची काय कथा? ही गोष्ट नाममात्र ब्राह्मण राहिलेल्यांना समजावून सांगण्याचा 'आंतरः कोऽपि हेतू' तुलसींचा असावा असा निष्कर्ष काढणे सहज शक्य आहे. पण हा प्रस्तुत लेखाचा प्रतिपाद्य विषय नव्हे.

अनुक्रमणिका

तुलसीदासांची दिव्य दृष्टि उच्चनीचपणाच्या फार वर उठून कोणते उदात्त स्वप्न पाहण्यात दंग होती याची प्रमाणे त्यांच्या मानसात ठिकठिकाणी सापडतात. त्यापैकी काहींचा परामर्श घेतला असता जी गोष्ट सहज कळून येते ती ही की तुलसीदास हे अत्यंत थोर व उदार मनाचे व समदृष्टीचे संत असून सर्वप्रकारच्या भेदभावांपासून पूर्णतः मुक्त होते. प्रथमच आपण त्यांच्या समबुद्धीने विस्मित होतो ते रामचरित मानसाच्या प्रास्ताविकाच्या ओघात जेव्हा ते म्हणतात 'बंदउँ संत असज्जन चरना' तेव्हा. संतचरणांचे वंदन तर सहज समजू शकते. पण असज्जनांची चरणवंदना उमजणे कठिण आहे. पण तुलसीदासांची संत दृष्टि म्हणजे काही वाईटावरच खिळणारी काकदृष्टि नव्हे. संत-असंतात ते साम्य पाहतात. दोघातही त्यांनी काही दुःखप्रद व प्राणघातक समानधर्म दिसून येतो. फरक एवढाच की संतांच्या वियोगामुळे प्राणहरण होते तर असंगाशी संग म्हणजेच प्राणाशी गाठ ठरते. याच प्रारंभिक प्रवचनात चौऱ्याऐंशी लक्ष जल-स्थल-नभवासी जीवांमध्ये समानपणे विद्यमान असलेले 'सीयराम' हे तत्त्व त्यांच्या सूक्ष्म दृष्टीला दिसते आणि त्या सर्वांनाच ते हात जोडून नमन करतात–

सीय राम मय सब जग जानी ।
करहुँ प्रनाम जोरि जुग पानी ॥

त्यांच्या हृदयाच्या औदार्याचे हे उत्तुंग निशाण आहे.

अयोध्याकांडात भरत आपल्या आप्तस्वकीयांसमवेत वनात श्रीरामाला भेटण्यासाठी जातात असा प्रसंग आहे. वाटेत निषादराज गुहाशी त्यांची भेट होते. गुह हा रामभक्त असल्याची माहिती मिळाल्याने भरताची त्याला भेटण्याची उत्सुकता शिगेला पोचते. गुह समोर येताच सग्ददित होऊन भरत त्याला कडकडून भेटतात. त्यांच्या मनात असा विचार देखील येत नाही की ज्या निषादाचे वर्णन–

लोक बेद सब भाँतिहिं नीचा ।
जासु छाँह छुइ लेइअ सीचा ॥

अशाप्रकारे केले आहे, म्हणजे ज्याच्या छायेला स्पर्श झाला तरीदेखील सचैल स्नान करावे असा ज्याचा नीचपणा, त्या निषादराज गुहाला आलिंगन द्यावे किंवा नाही. पणउलट भरताने त्याला गाढ आलिंगन दिले व प्रेमभराने त्यांचे अंग रोमांचित होऊन गेले असे कवीने म्हटले आहे. या प्रसंगी देवांनी पुष्पवृष्टि करून गुह-भरत-भेटीची वाखाणणी केली आहे. तुलसींनी या अपार प्रेमरसार्द्र मीलनाचे हर्षनिर्भरपणे जे वर्णन केले आहे ते भक्तीच्या क्षेत्रातील त्यांच्या 'सर्वत्र-सम-बुद्धीचे' द्योतक आहे. ते स्वतःच म्हणतात–

स्वपच सबर खस जमन जड पावँर कोल किरात ।
रामु कहत पावन परम होत भुवन विख्यात ॥

रामनामाच्या पुण्यकारक प्रभावाने स्वपच, शबर, कोल, किरात इत्यादि निम्न गणलेल्यांनीही सहज तरून जावे असे त्याचे महत्त्व आहे.

अनुक्रमणिका

गुहाबरोबर भरत जेव्हा श्रीरामांच्या आश्रमात पोहचतात तेव्हा श्रीराम भरत व शत्रुघ्न यांना जेवढ्या प्रेमाने भेटतात तेवढ्याच सुहृभ्दावाने गुहालाही आपल्या उराशी कवटाळून घेण्यास ते चुकत नाहीत. असाच प्रेमभाव लक्ष्मणांनीही गुहाला भेटून व्यक्त केला आहे.

एकवेळ भरताच्या बाबतीत असे म्हणता येईल की राम विरहाने व्यथित झाल्याने त्याला देह मन बुद्धीचे भान राहिले नसावे आणि म्हणून आपण कोणाला स्पर्श करावा अथवा करू नये याचा विवेक त्याला राहिला नसावा. परंतु वशिष्ठ मुनी तर सकलशास्त्रज्ञानविज्ञान-पारंगत होते ना? पण त्यांनी देखील निषादराज गुहाला आपल्या बाहूत सामावून घेतल्याचे वर्णन तुलसीदासांनी आवर्जून करावे ही गोष्ट विलोभनीय खचितच आहे. वशिष्ठ गुरुजींनी त्याना दंडप्रणाम करणाऱ्या रामलक्ष्मणांना 'धाइ धरे उर लाई', लगबगीने पुढे होऊन हृदयाशी धरले यात विशेष असे काही नाही. पण त्यानंतर प्रेमपुलकित झालेला केवट आपले नाव सांगून 'कीन्ह दूर ते दंड प्रनामू' दुरूनच दंडवत करतो. त्याला आपल्या हीनदीनतेची पुरेपूर जाणीव असल्याने त्याचे असे करणे सहज स्वाभाविक होते. पण वशिष्ठ मुनींनी जे केले ते मात्र उल्लेखनीय आहे—

रामसखा रिषि बर बस भेंटा।
जनु महि लुठत सनेह समेटा॥

किती हर्षगग्दद होऊन मुनींनी या रामसख्याला आपल्या उराशी घट्ट आवळून घेतले आहे! जणू जमिनीवर ओघळलेले प्रेमवात्सल्यच ते सावडून घेत आहेत! रामलक्ष्मण व त्यांचा भक्त केवट यांच्यात वशिष्ठांनी किंचित्ही भेदभाव केला नाहीं. त्यांच्या परम औदार्याची ही जागती ज्योत! रामभक्ताचा असा गौरव पाहिला की तुलसींच्या आवडत्या पद्धतीप्रमाणे 'नभ सराहि सुर बरसहिं फूला', देवांनी वाहवा व पुष्पवृष्टि करावयाचीच! वास्तविक पाहता ज्याचे आरोपण ते वशिष्ठावर करीत आहेत तो मनाचा मोठेपणा मुळात तुलसींचा स्वतःचाच आहे—

एहिसम निपट नीच कोउ नाही।
बड वसिष्ठ सम को जगमाही॥

केवटाचा हीनपणा व वसिष्ठांचा थोरपणा या परस्पर विरोधी गोष्टींचा केवढा सुंदर समन्वय या चौपाईत साधला गेला आहे! साधुसंतांना जन्मजात लाभलेली जी दृष्टीची विशालता तीच येथे प्रत्ययाला येते.

राम शबरीच्या पूजेचा व कंदमुळांचा स्वीकार करतात त्यांत त्यांची जी विलक्षण आत्मीयता प्रगट होते तिचे पुलकित होऊन कवीने केलेले वर्णन त्याच्या स्वतःच्या उदार मनोवृत्तीचा परिचय करून देणारे आहे.

काकभुषुंडिमुनीने उत्तरकांडात गरुडाला आपल्या पूर्वजन्माचे वृत्त सविस्तर कथन केले आहे. त्यावरूनही संतसज्जन हे उच्चनीच भेद सारून सर्वांशी समान व्यवहार कसा करतात व आपल्या स्नेहवात्सल्याने दुष्टदुर्जनांनादेखील कसे 'आपणासारिखे' करून घेतात याचाच बोध झाल्यावाचून राहत नाही.

अनुक्रमणिका

शेवटी रामराज्याचे सुस्पष्ट वर्णन करताना तुलसीदासांनी रामराजांच्या समदर्शीपणाचा गौरव केलेला आहे. आपापली कर्तव्यकर्मे करीत असलेल्या प्रजाजनांत सार्वजनिक क्षेत्रात कशी एकरूपता नांदत होती याची जाणीव प्रस्तुत वर्णनावरून येते. उदाहरणार्थ—

राजघाट सब बिधि सुंदर वर ।
मज्जहिं तहां बरन चारिउ नर ॥

राजघाटावर स्नानाच्या बाबतीत चारही वर्णांना समान स्वातंत्र्य होते.

सब नर करहिं परस्पर प्राती ।
चलहि स्वधर्मनिरत श्रुति नीती ॥

सर्वांचा परस्पर प्रेमभाव वाखाणण्यासारखा होता. कर्तव्यात चुकारपणाचा मागमूस नव्हता.

नहि दरिद्र कोउ दुखी न दीना ।
नहि कोउ अबुध न लच्छन हीना ॥

दारिद्र्य, रोगराई, अज्ञान यांची दुःखे रामराज्यात कोणाला शिवून जाण्याची प्राज्ञा नव्हती. सर्वत्र समतेचे हे उदात्तरम्य स्वप्न आहे मानसकारांचे! उदारबुद्धि, समदृष्टि तुलसीदासाचे ॥

* *

अनुक्रमणिका

# रामचरितमानसात हरि—हर—समन्वय

रामचरितमानसात तुलसीदासांनी दोन इष्ट देवतांचा समन्वय साधून त्यांच्या आराधने-उपासनेचे पुण्यफळ एकाच वेळी पदरात पाडून घेतले आहे. प्रभु रामचंद्र आणि देवाधिदेव महादेव या दोन्ही आराध्य दैवतांच्या भक्तीचे त्यांच्या मानसात भरते आलेले आहे. मूळ विषय आहे रामचरितकथनाचा. पण त्याच्या पूर्व पीठिकेच्या निमित्ताने ही जी कथा महेशाने उमेला सांगितली तीच याज्ञवल्क्यांनी भरद्वाजांना व काकभुशुंडि यांनी गरुडाला विवरून सांगितल्याचे तुलसीदासांनी म्हटले आहे. पण इतर कथाकारापेक्षा शिवाचे महत्त्व विशेष आहे. आणि ही गोष्ट काही विशिष्ट हेतूनेच सांगण्यात आल्याचे स्पष्ट आहे. शिवाला रामप्रभूंचा अनन्य उपासक म्हणून दर्शविण्याचा जसा या ग्रंथात पुन्हा पुन्हा प्रयत्न केला आहे तसाच श्रीरामचद्रांच्या उपास्य देवतेच्या रूपात भगवान शंकरांचे चित्रणही जागोजाग करण्यात आले आहे. प्रत्येक कांडाच्या प्रारंभी कवीने जे ईशवंदनपर शुद्ध संस्कृतात काही श्लोक रचलेले आहेत त्यात रामाच्या जोडीने शिवालाही नमन करणारे श्लोक आहेत. ही गोष्ट तुलसीदासांनी हेतुपुरस्सर केलेली आहे यात शंकाच नको. ज्या काळात प्रस्तुत ग्रंथाची रचना झाली तो काळच बव्हंशी या गोष्टीला जबाबदार आहे. इस्लाम धर्मातील शिया-सुन्नींचीच हिंदू आवृत्ति शैव-वैष्णव भेदाच्या रूपाने त्या काळी विद्यमान होती. पंथाभिमानाने माणूस किती आंधळा होतो याच्या प्रमाण पुराव्यांनी इतिहास खचून भरला आहे. नम्रपणा, विनीतभाव, सहिष्णुता आणि निराग्रही वृत्ति हे तर भक्तीचे आधारस्तंभ आहेत. पण जेथे सांप्रदायिक निष्ठा ऐकांतिक होते तेथे या गुणांचा पूर्ण अभावच असणार. समन्वयाच्या भावनेचा प्रसार साधुसंतांनी नेहमीच केलेला आहे. तुलसीदासांचा मानस हा ग्रंथ केवळ हिंदूंसाठीच आहे असे म्हणणे म्हणजे त्याच्या थोरवीला पायबंद घालण्यासारखेच आहे. शाश्वत मानवधर्माचा दिव्यसंदेश या ग्रंथात आहे. 'शिव अथवा विष्णु', 'केशवो वा शिवो वा' असल्या अतिरेकाला त्यात कुठून स्थान असणार? या वाढत्या दुष्प्रवृत्तीने व्यथित झालेल्या तुलसीदासांनी शैव आणि वैष्णव यांच्यात बळावत जाणाऱ्या रागद्वेषाचे निराकरण करण्याच्या संतसुलभ वृत्तीने रामचरितमानसात शिवाचे यथास्थान गौरवगान केले असून प्रत्यक्ष रामचंद्रांना शिवाचे व शंकराला श्रीरामाचे एकनिष्ठ उपासक दाखवून त्यांच्या परस्पर प्रेमभक्तीचे चित्रण उठावदारपणे केले आहे. मानसातील अशा काही प्रसंगांचे अवलोकन केले असता तुलसींच्या या समन्वयवादी भूमिकेचे यथार्थ दर्शन घडते.

बालकांडात भरद्वाज मुनींनी याज्ञवल्क्यांना 'रामनामात असा कोणता प्रभाव आहे की प्रत्यक्ष ज्ञान-गुण-राशि अशा भगवान शंकराने सतत या नामाचा जप करावा' असा प्रश्न विचारला. आणि त्यावर याज्ञवल्क्यांनी ही रामकथा सांगितली असे म्हटले आहे. या कथनाच्या ओघातच आपणास कळते की एकदा त्रेतायुगात शिव सतीसहवर्तमान अगस्ति ऋषींच्या आश्रमात गेले असतां ऋषींच्या इच्छेला मान देऊन—

कहत सुनत रघुपति गुण गाथा।<br>
कछु दिन तहाँ रहे गिरिनाथा॥

आणि रामगुणगाथेत काही दिवस रमून शंकर कैलासाला परत निघाले. वाटेत सीताशोधार्थ वनात भटकत असलेल्या विरही रामाचे त्यांना दर्शन घडले. हर्षगग्दद होऊन त्यांनी 'जय सच्चिदानंद जगपावन' म्हणून आपल्या आराध्य देवाला वंदन केले. एका सामान्य राजपुत्राला शंकरांनी बम्ह मानावे याचा सतीला विस्मय वाटला. आपला हा संशय शिवासमोर प्रकट करण्याचे धैर्य मात्र तिला झाले नाही. अंतर्यामी महेशांनी हे ओळखले व तिचा हा 'नारि सुभाऊ' जाणून सतीला समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की मुनि अगस्तींनी ज्यांची कथा आपणास ऐकविली व ज्यांच्या भक्तीची महति मी गाइली तेच हे प्रभु रामचंद्र.

अनुक्रमणिका

मुनिश्रेष्ठांनी सतत ज्यांची सेवा आराधना करावी तेच हे माझे इष्ट देव श्रीरामप्रभु. पण आपल्या समजावणीचा फारसा परिणाम होत नाहीसे पाहून शिवाने सतीला रामाची परीक्षा घेण्यास सांगितले. सतीने सीतेचे छद्मीरूप धारण केले आणि ती वनात भटकणाऱ्या रामलक्ष्मणांच्या पुढे पुढे चालत जाऊ लागली. पण तिच्या कल्पनेप्रमाणे राम तर स्तिमित झाले नाहीच पण उलट त्यांनीच तिला प्रणाम केला व 'वनात एकट्या कां भटकत आहांत? भगवान महेश कोठे आहेत?' असे विचारून विस्मित केले. अंतर्यामी रामांच्या नजरेतून तिचे हे कपट कसे सुटू शकेल? खजील होऊन सती शंकरापाशी आली. पुन्हा तिने त्यांना खोटेच सांगितले की 'मी रामाची परीक्षा न घेता आपल्याप्रमाणेच त्यांना प्रमाम करून परत आले.' ध्यानमग्न शंकरांना वस्तुस्थितीचे केव्हाच आकलन झाले होते. आपल्या परमश्रद्धेय अशा रामप्रभूची सतीने केलेली ही अमर्यादा व आपल्याशी केलेली प्रतारणा सहन करणे त्यांना केवळ अशक्य झाले. मनोमन त्यांनी निश्चय केला की—

एहितन सतिहि भेंट मोहि नाहीं।
सिव संकल्पु कीन्ह मन माहीं॥

'याचि देही' पत्नी म्हणून सतीची भेट मला घेता येणार नाही. शंकराची ही उग्र प्रतिज्ञा ऐकताच आकाशवाणी झाली—

अस पन तुम्ह बिनु करइ को आना। राम भगत संकर भगवाना॥

रामभक्त शंकराखेरीज अशी वज्रकठोर प्रतिज्ञा दुसरा कोण करू शकणार? आपल्या उपास्य देवाच्या सामर्थ्याची परीक्षा घेण्याचे सतीचे हे धाष्ट्य! एरवी सती केवढीही प्रिय कां असेना, तिचा हा प्रमाद शिवांना अक्षम्य वाटला. आपल्या लाडक्या सतीचा त्यांनी परित्याग केला व या भीषण प्रणाच्या पूर्तीसाठी ते अखंड समाधि लावून बसले. 'बीते संवत सहस सतासी'—सत्याऐंशी हजार वर्षे या अवस्थेत निघून गेली. सतीच्या विरह व्यथेने परिसीमा गाठली. समाधि सुटल्यानंतरही शिव आपल्या संकल्पापासून ढळले नाहीत. व्यथित व्याकुळ झालेल्या सतीला जीव नकोसा झाला. आपल्या पित्याकडे होणाऱ्या यज्ञाचे निमित्त करून ती माहेरी गेली. पिता दक्ष याने शंकराला यज्ञासाठी पाचारण केले नाही हा अपमान सहन न झाल्याचे कारण दाखवून तिने यज्ञाग्नीत स्वतःला जाळून घेतले. शंकराच्या अलौकिक रामभक्तीचे हे केवढे रुद्रजाज्ज्वल्य स्वरूप!

याज्ञवल्क्य ऋषि भरद्वाजांना रामकथा सांगत आहेत. अधून मधून प्रसंग पाहून शिवाचे चरित्रही ते सांगतात. याच संदर्भात रामचंद्र व महादेव हे दोघेही कसे परस्परांचे अन्योन्य भक्त आहेत त्याचे विवरण करताना ते म्हणतात—

सिव पद कमल जिन्हहिं रति नाहीं। रामहिं ते सपनेहुँ न सोहाई॥
बिनु छल बिस्वनाथ पद नेहू। राम भगत कर लच्छन एहू॥
सिव सम को रघुपति व्रत धारी। बिनु अघ तजी सती असि नारी॥
पनु करि रघुपति भगति देखाई। को सिव सम रामहि प्रिय भाई॥

अनुक्रमणिका

शिवचरणी जो रत नाही तो स्वप्नातही रामाला आवडणे अशक्य आहे. रामभक्तीची पहिली अटच मुळी विश्वनाथाविषयी निष्कपट भक्ति ही आहे. रामभक्तीसाठी प्रियतम पत्नीचा त्याग करणाऱ्या भगवान महादेवाहून श्रेष्ठ रामभक्त कोण असू शकेल?

आता लंकाकांडातील हा प्रसंग पहा. स्वतः रामचंद्रांनी सेतुबंधन प्रसंगी समुद्रतीरी शिवलिंगाची प्रतिष्ठापना व पूजा केली आहे. शिवशंकराविषयीच्या अपरंपार आस्थेने ते म्हणतात–

सिव द्रोही मम भगत कहावा। सो वर सपने हुँ मोहि न पावा॥
संकर बिमुख भगति चह मोरी। सो नारकी मूढ मति थोरी॥
दोहा – संकर प्रिय मम द्रोही सिव द्रोही मम दास।
ते नर करहि कलप भरि घोर नरक महुँ बास॥

'शंकराशी द्रोह करणाराने माझ्या भक्तीच्या वल्गना कराव्यात ! हे स्वप्नांतरीही शक्य होणारे नाही! शंकराविषयी अनास्था बाळगून मजविषयी प्रेम दाखविणाऱ्या मतिमंदाला नरकाशिवाय कोणत गति आहे?' रामेश्वर येथे स्थापिलेल्या या शिवलिगाच्या पूजन-अर्चनाची फलश्रुति सांगताना रामचंद्रांनी असे म्हटले आहे की या शिवलिंगाला गंगाजल वाहून निश्छलपणे याची आराधना करणारा निश्चितपणे मजपाशी पोचतो, सायुज्यमुक्तीचा त्याला सहज लाभ घडतो !

उत्तरकांडात काकमुषुंडीने गरुडाला श्रीरामांचे अयोध्येत पुनरागमन झाल्यावर देवामानवांमध्ये केवढा हर्ष दाटून आला होता त्याचे वर्णन करून सांगितले आहे. यावेळी आधी वेदांनी व नंतर शंकरांना रामाची स्तुस्तिस्तोत्रे गाइल्याचे म्हटले आहे. शिवप्रभूंनी रामाला अवधेश, शरणागतवत्सल, दशमुखादि निशाचरांचे नाशक, माया-मोहहरण, भवरोग-विनाशक, भवसागरपारद, भक्तसंतमुनिमनमानसभृंग इत्यादी एकाहून एक सरस संबोधनांनी आवाहन केले आहे. स्वतःला हीनदीन म्हणवून अशा या रामप्रभूचे अहर्निश नामसंकीर्तन करण्यात धन्यता मानली आहे.

गुनसील कृपा परमायतनं। प्रनमामि निरंतर श्रीरमनं॥
रघुनंद निकंदय द्वंद्वघनं। महिपाल विलोकय दीनजनं॥

हे जगन्नाथा, करुणाकरा, गुणवंता, प्रभो रामराया, या दीनाकडे लक्ष असू द्या व त्याला सर्व प्रकारच्या द्वैतातून मुक्त करा.

उत्तरकांडातच अन्य एका प्रसंगी अयोध्यापति रामराजांनी आपले पुरजन-परिजन, गुरुजन आणि द्विजगण यांना व्यावहारिक उद्‌बोधन व नीतिबोध केलेला आहे. सत्संगति व भक्ती यांचे महत्त्व समजावून सांगताना शंकराविषयीच्या आपल्या प्रेमभक्तीचे वर्णन त्यांनी केले आहे. आपली भक्ति करू इच्छिणाराविषयी खुद्द प्रभु रामांच्याच तोंडचे शब्द कसे विचारणीय आहेत पहा–

औरउ एक गुपुत मत सबहिं कहउँ कर जोरि।
संकर भजन बिना नर भगति न पावइ मोरि॥

अनुक्रमणिका

म्हणजे रामभक्तीसाठी प्राथमिक अटच मुळी शिवभक्तीची आहे! तिजविना कोणी रामाची भक्ति करू म्हणेल तर तो व्यर्थ खटाटोपच म्हणावयाचा!

उत्तरकांडात शिवकृत रामचरितकथनाचा समारोप आहे. ही कथा आपण कोणत्या हेतूने सांगितली हे उमेला सांगताना ते म्हणतात की "रामचरित अपार आहे, शतकोटि प्रविस्तर आहे. वेद-शारदा-शेषदेखील ते वर्णू शकत नाहीत. सहज भक्तीचा व हरिचरणांचा सहजपणे लाभ करून देणारी अशी ही कथा आहे. आणि म्हणूनच, उमे, एवढ्या विस्ताराने मी हिचे कथन केले." शिवशंकराच्या अनन्योत्कट रामभक्तीची त्याच्या या उद्गारांतून प्रचीती घडते.

ग्रंथाच्या समारोपात काकभुशुंडिमुनि गरुडाला आपल्या पूर्वजन्मांचे वृत्त सांगत आहेत. पूर्वजन्मात ते अनन्य शिवभक्त होते. विष्णु अथवा श्रीराम यांजविषयी त्यांना यत्किंचितही आस्था नव्हती. त्यांच्या गुरूने हरि-हरात असा भेद न करण्याचा अनेकदा उपदेश करूनही शिष्याच्या मनातील हरिद्रोह काही ते उपटून काढू शकले नाहीत. शिवभक्तीचा हा अतिरेकी हटवाद कायमच राहिला. या दोन्ही देवात परस्पर एकरूपता कशी आहे ती समजावून गुरू म्हणाले –

सिव सेवा कर फल सुत सोई। अविरल भगति राम पद होई ॥
रामहिं भजहिं तात सिव धाता। नर पाँवर कै केतिक बाता ॥
जासु चरन अज सिव अनुरागी। तासु द्राहँ सुख चहसि अभागी ॥

'अरे नतद्रष्टा, प्रत्यक्ष विधात्याने व शंकराने ज्याची आराधना करावी त्या प्रभु रामचंद्राशी द्रोह करून तू सुखाची अपेक्षा बाळगतोस तरी कशी? अरे, जे रामाच्या तेच शिवाच्या भक्तीचे फळ असते हे तुला कसे समजावे।' पण गुरूजींचा हा उपदेश पालथ्या घड्यावर पाणी ठरला. शिष्यालाच उलट गुरूचा राग आला. त्याला वाटले –

हर कहुँ हरिसेवक गुर कहेऊ।
सुनि खगनाथ हृदय मम दहेऊ ॥

"गरुडा, गुरुजींनी हराला हरिसेवक म्हणावे हे मला कसे बरे सहन होणार? माझ्या हृदयाचा त्यामुळे भडका उडाला!"

शिवभक्तीच्या या अतिरेकी अभिमानापायी शिष्याला रामाविषयी असा तिरस्कार वाटत होता. पुढे गुरूची अवज्ञा केल्याबद्दल प्रत्यक्ष शंकरानेच त्याला शाप देऊन शिक्षा केली असे काकभुषुडींनी वर्णन केले आहे.

रामचरितमानसातील वर दिलेल्या काही प्रसंगांच्या आधाराने असे म्हणता येईल की राम आणि शिव, हरि आणि हर या दोहोंना उपास्य देव मानून त्यांच्या भक्तीच्या बाबतीत तरतमभाव बाळगता कामा नये असे तुलसीदासांचे स्पष्ट मत आहे. आपल्या देशात नाना देवदेवतांच्या उपासना प्रचलित आहेत. रुचिभेदाप्रमाणे इष्टदेवता, कुलदेवता, ग्रामदेवता भिन्न असल्या तरी बहुसंख्य जनता सर्वच देवतांच्या बाबतीत श्रद्धाळू आहे हेही काही खोटे नाही. केवळ काही अतिरेकी लोक स्वतः तर आपल्या आवडत्या

पंथाभिमानात गुरफटून राहतात पण इतर पंथीयांविषयी मात्र कमालीची असहिष्णुवृत्ति बाळगतात. इतरांच्या दवताविषयी त्यांना मुळीच श्रद्धा वाटत नाही. शैव व वैष्णव या दोन संप्रदायातील ही परस्पर रागद्वेषाची व अनादराची वृत्ति तुलसीदासांच्या काळी विशेषत्वाने जाणवण्याइतपत बळावली होती. आसेतुहिमाचल परस्पर कटुतेचे हे विष पसरले होते. आणि या दोन्ही उपासना संप्रदायांच्या अनुयायांची संख्या उपेक्षणीय तर नव्हती. शैव-वैष्णवांची ही पंथनिष्ठा इतकी अतिरेकाला पोचली होती की वैष्णव संप्रदायाचे अनुयायी शिवाराधनेला निषिद्ध-निकृष्ट मानू लागले होते. श्रावणातील सोमवारी अथवा माघातील शिवरात्रीला शैवांनी शिवव्रत आचरावे तर वैष्णवांना या व्रताचे पूर्ण वावडे असावयाचे. साधारणतः हिंदू स्त्रिया हरितालिकेचा उपवास करताना दिसतात. पण वैष्णव पंथातील महिलांचा पार्वतीशी संबंधित या व्रताशी काडीचाही संबंध नसावयाचा. आणि दुर्दैव असे की साधुसंतांच्या निकराच्या प्रयत्नानंतरही या प्रवृत्तीचा पूर्णपणे बीमोड होऊ शकलेला नाही. शिक्षणाचा प्रसार व ज्ञानविवेक याजमुळे पूर्वी कधीकाळी दिसून येणारे आततायी स्वरूप मात्र राहिलेले नाही हे महद्भाग्यच! महाराष्ट्रात तर या संदर्भात एक अतिरंजित दंतकथा प्रचलित आहे. 'कपडे शिवणे' या शब्दप्रयोगातील शिवाचा वास असह्य होऊन कडव्या विष्णुभक्तांनी त्याऐवजी 'कपडे वैष्णवणे' असा हास्यास्पद शब्दप्रयोग प्रचलित केला असे चक्क सांगण्यात येऊ लागले. ही केवळ एक कपोलकल्पित व क्रूर विद्वेषमूलक विनोदाचाच विषय ठरणारी बाब असणेच अधिक संभवनीय आहे. आणि वैष्णवांनाही असे म्हणता येईल की त्यांचा पाणउतारा करण्यासाठी कुणा कल्पक शैवानेच ही कथा प्रचलित केली नसेल कशावरून? पण एकंदरीत असे की द्वेषाने द्वेष वाढतच जाणार आणि अशा हिडीस स्वरूपात हा पंथविद्वेष 'कोणे एके काळी' अस्तित्वात होता. समन्वयाची स्थापना व विश्वकुटुंबवृत्तीची जोपासना करणे हे तर साधुसंतांचे जीवनकार्य. त्यांना उपासनेच्या क्षेत्रातील ही 'शिवाशिव' कशी बरे खपणार? शैव-वैष्णवांच्या आपसातील कटुतेचा निरास करण्याच्या बाबतीत ज्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे अशा साधुसंतांत तुलसीदासांचे विशेष महत्त्व आहे. रामभक्तीइतकेच महत्त्व शिवभक्तीला देण्याचा संदेश त्यांच्या रामचरितमानसात आहे. जागोजागी राम व शिव यांच्या परस्पर प्रेमभक्तीचे वर्णन त्यांनी हेतुपूर्वकच केल्याचे स्पष्ट दिसते. हरि व हर या दोन्ही देवाधिदेवांविषयी समान श्रद्धाभक्ति बाळगण्याची शिकवण त्यांनी दिलेली आहे. दक्षिणेत तुलसीदासांचे समकालीन संतश्रेष्ठ एकनाथ यांनीदेखील हीच महत्त्वाची जनहितकारी चळवळ महाराष्ट्रात उभारली होती. त्यांच्या रचनांमधूनदेखील हाच हरि-हर-समन्वयाचा दृष्टिकोण स्पष्टपणे दिसून येतो. या जनहितैषी संतांचे आमच्यावर थोर उपकार आहेत. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आज हे पंथ अस्तित्वात असूनदेखील त्यांच्यात परस्पर सहिष्णुता व सुहृद्भाव यांचा पूर्वीसारखा अभाव राहिलेला नाही. हरि हर-समन्वयाच्या दृष्टीने रामचरितमानस हा एकमेवाद्वितीय ग्रंथ आहे व त्याचे कर्ते संत तुलसीदासजी धन्य आहेत!

* *

अनुक्रमणिका

# संत तुलसीदासांची संस्कृतनिष्ठा

भारतीय संस्कृतीत नाना देव व अनेक उपासना पद्धती असूनदेखील या विविधतेत एकरूपता आहे. प्रभु रामचंद्राच्या उपासनेचा मात्र याला अपवाद आहे. रामचरित्र ही आम्हा साऱ्यांचीच सर्वश्रेष्ठ कथा आहे. साऱ्या प्रादेशिक भाषांतून रामकथानुवाद झालेला आहे. साधारणपणे या सर्वांचे स्फुरण वाल्मीकिरामायणातच आढळून येईल. हिंदीभाषा-भाषी जनतेची एकमेवाद्वितीय रामगाथा म्हणजे तुलसीदासांचे रामचरितमानस. तेही याला अपवाद नाही. तपशीलात रुचिभेदानुसार थोडीफार कल्पनेची रंगत दिसली तरी मूळ गाभा तोच आहे. संस्कृत ही अशेष भारतीय भाषांची जननी. तिजपासूनच साऱ्या वाङ्मयाचे वाण सर्वांना मिळालेले. साहजिकच विचारांचे परस्पर साम्य निरनिराळ्या रामायणातूनही आढळल्यास नवल नाही. यात अंधानुकरण अथवा वाङ्मयचौर्य यांची शंका घेणे वेडेपणाचे ठरेल. प्रतिभेचा कमीअधिकपणा आणि त्या त्या काळची परिस्थिती यांच्या अनुषगाने प्रत्येकाचे काही वैशिष्ट्य असले तरी एवढे मात्र खरे की संस्कृतच्या सुपीक भूमीतूनच साऱ्या भारतीय कवींच्या प्रतिभेचे उन्मेष प्रगट झाले आहेत. मूळ रामकथेवर साऱ्या समाजाची वंशपरंपरा सत्ता चालत आली आहे. आपापल्या प्रतिभाबलनुसार सजवून ही कथा प्रादेशिक भाषातील कवींनी जनताजनार्दनाला समर्पित केली आहे. म्हणूनच तिच्यात साम्यस्थळेच अधिक आहेत. कोठे निवेदनपद्धती सारखी वाटेल तर कोठे कथेचा उलगडा करण्यात सारखेपणा दिसेल. काही ठिकाणी विचारांचे साम्य आढळेल तर कित्येक वेळा अभिव्यक्तीसाठी सारख्याच उक्तिसुभाषितांचा वा रूपकदृष्टांतांचा वापर झाल्याचे दिसून येईल. पण यामुळे कथेच्या मूळ स्वरूपात फारसा फरक पडत नाही. एकाहून अधिक प्रतिभावतांना सारख्याच विचारांचे स्फुरण होणे अशक्य नाही. शिवाय हेही विसरता कामा नये की या जगात पूर्णपणे नवीन, खऱ्या अर्थाने मौलिक असे ईश्वराशिवाय अन्य काहीच असत नाही. प्राचीन कविश्रेष्ठांचे अध्ययन करताना असे साम्य आढळल्यास त्यांच्या कर्तृत्वाविषयी शंकाकुशंकांची वर्तुळे उठू नयेत म्हणून ही मूलभूत गोष्ट लक्षात ठेवावयास हवी.

रामचरितमानसाचे स्थूल अवलोकन केले तरी एक गोष्ट आपल्या सहजच लक्षात येते ती ही की तुलसीदासांच्या संपूर्ण जीवनानुभवांचे व त्यांच्या प्रगाढ व्यासंगाचे सार त्यात सामावले आहे. त्यांच्या सुसंस्कृत विचारांची अभिव्यक्ति करणारी एकाहून एक सरस सुभाषिते वाचीत असताना मूळ संस्कृतच्या सुभाषित सौरभाने आपली मने दरवळून जातात. रामायणाच्या विविध प्रसंगात चपखल बसणाऱ्या सुभाषितरत्नांनी व वेदोपनिषदे आणि भारतभागवतादि पुराण ग्रंथ यांच्या मार्मिक अध्ययनाने कमावलेल्या ज्ञानाने हे काव्य तुलसीदासांनी समृद्ध केले आहे. साऱ्या प्राचीन साधुसंतांनी व कविवर्यांनी या सांस्कृतिक संपदेचा मनसोक्त उपयोग आपापल्या रचनांतून केल्याने त्यांच्या प्रवचनात कित्येक ठिकाणी एकरूपता आढळून येते. याद्दष्टीने रामचरितमानसाची तुलना इतर प्रादेशिक भाषामधील कवीशी करून पाहणे मनोरंजक ठरेल. पण प्रस्तुत लेखात तुलसींच्या संस्कृतनिष्ठेचा काही संस्कृत ग्रंथातील साम्यस्थळांच्या आधारे परामर्श घ्यावयाचा आहे.

रामचरितमानसाच्या प्रत्येक कांडाच्या प्रारंभी कवीने निरनिराळ्या वृत्तांतील संस्कृत श्लोकात ईशस्तवन केले आहे. हे सारे श्लोक म्हणजे तुलसीदासांच्या संस्कृत भाषेवरील असामान्य प्रभुत्वाचा व त्यांच्या अलौकिक कवित्वशक्तीचा साक्षात पुरावाच आहेत. श्रीराम, शंकर, हनुमंत इत्यादि त्यांची प्रमुख दैवते आहेत. या श्लोकातून त्यांची स्तुति केलेली आहे. काही श्लोक रामचरित्राचे माहात्म्य गाणारे आहेत, तर काही श्लोक रामायणाची दिव्यता सांगणारे आहेत. या साऱ्या श्लोकांची योग्यता स्वतंत्र शिवस्तोत्र अथवा रामस्तोत्र म्हणून नित्यपठन करण्याजोगी आहे. तुलसीदासांची ही रचना पाहून स्पष्ट होते ते हे की

तत्कालीन संस्कृत कविपरंपरेत वरिष्ठ स्थान मिळविणे त्यांना सहज शक्य होते. पण संस्कृतवर एवढे प्रभुत्व असूनदेखील त्यांनी रचना केली ती 'भाषा निबंधमतिमंजुलमातनोति' या प्रतिज्ञेप्रमाणे स्वभाषेत – म्हणजे खड्या हिंदी बोलीत. अवधी म्हणून हिंदीची ही बोली ओळखली जाते. सामान्य जनतेपावेतो ही जीवनपोषक रामगाथा पोचविण्याचा त्यांचा संत सुलभ उद्देश्य होता ना! ही त्यांची रचनाच मुळी 'बहुजनसुखाय' आहे. ती 'स्वांतः सुखाय' केल्याचे ते खुशाल म्हणोत. पण त्यांचा 'स्वांत' म्हणजे संताचा आहे. आपुल्यामध्ये विश्व सामावून घेणारा आहे. ही रामकथा संस्कृतमध्ये लिहिण्याची प्राज्ञा असूनदेखील त्यांनी ती सामान्यांच्या बोलीत लिहिली ती उगाच नव्हे. नाही म्हणावयाला त्यांची संस्कृतवरील अनन्य भक्ति त्यांनी या ग्रंथात ब्रह्मा, महेश, नारद आदींच्या तोंडी जेथे जेथे रामस्तवन घातले आहे तेथे तेथे संस्कृतप्रचुर अथवा संस्कृतप्राय रचना करून प्रगट केली आहेच.

**मार्मिक सुभाषितांची योजना**

संस्कृतभाषा मार्मिक सुभाषिते व अर्थघन उक्ती यांनी विनटलेली आहे. या वैभवाचा आपल्या काव्यरचनेत तुलसीदासांनी वापर करावा हे स्वाभाविकच होते. आशयाच्या अभिव्यक्तीसाठी त्यांनी काही संस्कृत सुभाषितांचा हिंदीतून प्रयोग केलेला आहे. काही उदाहरणे अशी –

मूक होई बाचाल पंगु चढै गिरिवर गहन ।
जासु कृपा सो दयाल द्रवउ सकल कलिमलदहन ॥

वरील सोरठा 'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् । यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम्' या श्लोकाशी तुळून पहावा.

पर घर घालक लाज न भीरा । बांझ कि जानि प्रसव कै पीरा ॥

ही चौपाई 'न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनाम्'चे रूपांतर आहे. संस्कृतातील 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः' अथवा 'किं न कुर्वंति योषितः' या उक्तींची आठवण करून देणाऱ्या या ओळी पहा –

बिधिहुँ न नारि हृदय गति जानी', 'जानि न जाइ नारि गति भाई' अथवा 'का न करै अबला प्रबल'.

आता गीतेतील हे दोन श्लोकार्ध पहा –

'या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्तिसंयमी'
'संभावितस्य चार्कीर्तिर्मरणादतिरिच्यते'

आणि

यांचा तुलसीदासांनी यथास्थान केलेला हिंदी प्रयोग असा आहे –

अनुक्रमणिका

एहि जग जामिनि जागहिं जोगी। परमारथी प्रपंच वियोगी ॥
संभावित कहुँ अपजस लाहू। मरन कोटिसम दारुन दाहू ॥

अर्थ तर यथोचित उतरला आहेच पण शिवाय तुलसीदासांनी अनुवादात रचनाही प्रासयुक्त करून सौंदर्य वाढविले आहे.

याच अयोध्याकांडात 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या सुभाषिताचा उपयोग खालील चौपाईत केलेला आहे –

सकुचउं तात कहत एक बाता।
अरध तजहिं बुध सरबस जाता ॥

किष्किंधाकांडातील या दोन चौपयांतर उघड उघड संस्कृतच्या एक सुप्रसिद्ध सुभाषिताचा अनुवादच आहे –

कुपथ निवारी सुपंथ चलावा। गुन प्रगटै अवगुनहि दुरावा ॥
विपति काल कर सत गुन नेहा। श्रुति कह संत मित्र गुन एहा ॥

आणि

ज्याचा हा अनुवाद आहे ते संस्कृत सुभाषित असे –

पापान्निवारयति योजयते हिताय
गुह्यानि गूहति गुणान्प्रगटी करोति।
आपग्दतं न च जहाति ददाति काले
सन्मित्र लक्षणमिदं प्रवदंति संतः ॥

सुंदर कांडात लक्ष्मण समुद्राला विनवून दैवावर भरंवसा ठेवण्याच्या वृत्तीचा निषेध करून उद्योगाचे महत्त्व सांगत आहे –

कादर मन कहुँ एक अधारा। दैव दैव आलसी पुकारा ॥

आणि या अर्थाचे संस्कृत सुभाषित असे –

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः
दैवेन देयमिति कापुरुषाः वदंति ॥

आता लंकाकांडातील ही चौपाई पहा –

अनुक्रमणिका

वचन परम हित सुनत कठोरे । सुनहिं जे कहहिं ते नर प्रभु थोरे ॥

संस्कृतच्या ज्या सुभाषिताचा हा अनुवाद आहे ते असे –

अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः

रावण आपल्या पत्नीची समजावणी करीत आहे. त्याच्याबद्दल कवीने जे म्हटले आहे ते संस्कृतातील 'परोपदेशे पांडित्यं सर्वेषां सुकरं नृणाम्' या संस्कृत उक्तीचे भाषांतरच आहे. पहा –

पर उपदेस कुशल बहुतेरे । जे आचारहिं ते नर न घनेरे ॥

आता उत्तरकांडातील काही श्रुतिमनोहर सुभाषितांचा आस्वाद घेऊ या. काकभुषुंडि मुनीने गरुडाजवळ रामाच्या अंतःकरणाचे वर्णन असे केले आहे –

कुलिसहु चाहि कठोर अति कोमल कुसुमहु चाहि ।

संस्कृत सुभाषितात अगदी हेच वर्णन केले आहे ते संत हृदयाचे. पहा –

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।

वरील काही उदाहरणावरून कळून येते की तुलसीदासांना संस्कृतमधील रमणीय सूक्तिसुभाषितांचे विलक्षण आकर्षण होते. ही केवळ वानगी झाली. शोध केल्यास आणखी कितीतरी सुभाषिते रामचरितमानसात सापडतील. त्यांच्या पूर्वार्जित ज्ञानाचा व गहन अध्ययनाचा प्रत्यय यावा अशा अनेक स्थलांकडे अंगुलिनिर्देश करता येईल. तुलसीदासांच्या पूर्वी होऊन गेलेल्या काही सुप्रसिद्ध संस्कृत कवींचा ठसा त्यांच्या काव्यावर उमटलेला आहे. अशा काही स्थलांची उदाहरणे येथे पाहू.

**वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।**

रामचरितमानसाच्या प्रारंभी सीतारामांच्या अभिन्नतेचे तुलसीदासांनी केलेले वर्णन रघुवंशाच्या प्रारंभी कालिदासांनी केलेल्या शिवपार्वतीच्या एकरूपतेच्या वर्णनाशी किती जुळते आहे ते पहा

गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न ।
बंदउँ सीताराम पद जिन्हहिं परम प्रिय खिन्न ॥

वरील दोहा कालिदासांच्या या श्लोकाशी तुळून पहावा –

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ प्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वंदे पार्वती परमेश्वरौ ॥

श्रीरामचरित्राची थोरवी एकीकडे व आपल्या बुद्धीचे तोकडेपण दुसरीकडे अशा जाणिवेने कालिदासांनी रघुवंशात व तुलसीदासांनी मानसात व्यक्त केलेल्या भावनातील साम्य व अभिव्यक्तीतील सारखेपणा वाचकाच्या सहजच मनात भरावा असा आहे. पहा –

क्व सूर्यप्रभवो वंश: क्व चाल्पविषया मतिः (कालिदास)

आणि

राम सुकीरति भनिति भदेसा ।
असमंजस अस मोहि अंदेसा ॥ (तुलसी)

असाच आशय तुलसीदासांनी शिवमहिमा गाण्याच्या बाबतीत व्यक्त केला आहे –

चरित सिंधु गिरिजा रमन बेद न पावहिं पारु ।
बरनै तुलसीदासु किमि अति मतिमंद गवाँरु ॥

अयोध्याकांडात राम व भरत यांच्या परस्पर प्रेमाच्या अलौकिकतेविषयी बोलता बोलता रात्र कशी निघून गेली हे राजा जनक व त्यांची राणी यांना कळले देखील नाही.
तुलसीदास म्हणतात –

राम भगत गुन गनत सप्रीति । निसि दंपतिहि पलक सम बीती ॥

या ओळी वाचताना भवभूतीच्या उत्तररामचरितातील जो श्लोकार्ध सहज आठवतो तो हा –

अविदित गतियामा रात्रिरेवं व्यरंसीत् ।

श्रीमद्भगवद्गीतेतील काही श्लोकांचा तर तुलसीदासांनी जणू शब्दशः हिंदीत अनुवाद केलेला वाटतो. 'ज्या ज्या वेळी धर्मग्लानि होते त्या त्या प्रसंगी मी अवतार घेतो' असे आश्वासन श्रीकृष्णांनी गीतेमध्ये या श्लोकांतून दिले आहे –

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
व
परित्राणाय साधूनां विनाशाय व दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनर्थाय संभवामि युगे युगे ॥

पार्वतीला आवताराविषयी माहिती सांगताना बालकांडात शंकराच्या तोंडी ज्या चौपाया तुलसीदासांनी घातल्या आहेत त्या गीतेतील वरील श्लोकांचा अनुवादच आहेत. पहा –

अनुक्रमणिका

जब जब होइ धरम कै हानी । बाढहिं असुर अधम अभिमानी ॥
करहिं अनीति जाइ नहिं बरनी । सीदहिं ब्रिप धेनु सुर धरनी ॥
तब तब प्रभु धरि बिबिध सरीरा । हरहिं कृपानिधि सज्जन पीरा ॥

आणि शेवटी आध्यात्मिक संदर्भातील काही साम्यस्थळांचा केवळ नामनिर्देश करून हे प्रकरण संपवू. गीतेच्या तेराव्या अध्यायात ज्ञानाची 'अमानित्वमदंभित्वं' इत्यादी जी अठरा लक्षणे सांगितली आहेत त्यांचे सविस्तर विवरण रामाने लक्ष्मणाला विरागी कोणाला म्हणावे हे समजावून सांगण्याच्या निमित्ताने अरण्यकांडात करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नवविधा भक्तीचे आणि भक्तिमार्गाचे जे विशद विवेचन लक्ष्मणाच्या विनंतीवरून रामप्रभूने केले आहे ते भागवतात श्रीकृष्णांनी उद्धवासमोर केलेल्या भक्तियोगाच्या विवेचनाहून निराळे नाही. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्' इ. नवविधा भक्तीचे प्रकार आणि 'मद्भक्तः यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद' हा भगवतांच्या निवासाविषयीचा निर्देश ज्यात आहे अशा चौपाया व दोहे रामचरितमानसाच्या या अरण्यकांडात आहेत. ज्ञानापेक्षा भक्ति श्रेष्ठ असल्याची ग्वाही रामनारदसंवादाच्या निमित्ताने दिली आहे ती या शब्दात –

यह बिचारि पंडित मोहि भजहि । पाएहुँ ग्यान भगति नहीं तजहीं ॥

आणि शेवटी उत्तरकांडात भरताने रामाला संतअसंतांची लक्षणे विचारली आहेत. दोहा ३७ व ३८ मध्ये रामाने विस्ताराने सांगितलेली ही लक्षणे वाचली असता गीतेतील स्थितप्रज्ञ, भक्त, योगी, विरक्त, केवल ज्ञानी इत्यादी आदर्श पुरुषांची लक्षणे नेमकी हीच असल्याचे दिसून येते.

रामचरितमानस हा व्यवहार ज्ञानाचा महान कोश आहे. जेवढे अवगाहन त्यात करावे तेवढी त्याची अगाधता जाणवते. त्याचे अध्ययन पूर्ण झाले असे म्हणण्याचे धाडस कोणी करील असे वाटत नाही. एवढे मात्र खरे की आपापल्या योग्यते क्षमतेप्रमाणे त्याचे सतत अवलोकन मनन करीत राहिले असता दर वेळी त्यात नावीन्याचाच अनुभव आल्याशिवाय राहत नाही. नवनवीन सौंदर्यस्थळांचे दर्शन वारंवार घडत राहते. आणि यात नवल तरी काय आहे? रामचरितमानस हे नितांत रमणीय असे लोककाव्य आहे. आणि रमणीयता हा विषयच मुळी नित्यनूतन आहे असाच सर्वांचा अनुभव आहे. 'क्षणे क्षणे यन्नवतां उपैति तदेव रूपं रमणीयतायाः' हेच खरे!

* *

अनुक्रमणिका

# रामचरितमानसातील ‘स्त्रियश्चरित्रम्’

रामकथेच्या निमित्ताने तुलसीदासांनी ज्या भव्यदिव्य चरित्राचे महावस्त्र विणले आहे त्याच्या आडव्याउभ्या धाग्यांत पुरुष व स्त्रिया यांची समान गुंफण केली आहे. स्त्रीरूपाचे अनेक भूमिकातील विलोभनीय दर्शन त्यात घडते. मायाब्रह्म, प्रकृतिपुरुष, उमामहेश, सीताराम या जोड्यांबरोबरच दशरथाच्या स्त्रिया, अत्रिपत्नी अनसूया, रावणाची भार्या मंदोदरी, जनकाची स्त्री आणि इतर अनेक स्त्रीपात्रे या भव्य चित्रपटावरून झरझरून जातात. पुरुषांप्रमाणेच यांच्यातदेखील संत असंत प्रवृत्ती, कोमल कठोर भाव, त्यागलोभ आणि विरक्ति-आसक्ती यांच्या छटा उमटलेल्या आहेत. साहजिकच जेथे जशा स्त्रीचे स्वभावरेखाटन असेल तेथे त्याच्या अनुरोधाने तुलसीदासांच्या लेखणीचे मृदु कठोर नर्तन झाल्याचे स्पष्ट दिसून येते. महेशाच्या प्राप्तीसाठी अपर्णा अवस्थेला प्राप्त होण्याइतपत उग्रतप आचरणारी उमा, आपल्या पुत्राच्या निष्कपट रामप्रेमाने हर्षपुलकित होणारी सुमित्रा, पितृआज्ञेपेक्षा पुत्रमोहाला वरचढ न होऊ देणारी माता कौशल्या, राजविलासी कोडकौतुकांना कस्पटासमान मानून वनवासातील कष्टांचा स्वेच्छेने स्वीकार करणारी जानकी, पातिव्रत्याची साक्षात् मूर्तीच अशी अनसूया, भोळ्या भावभक्तीने रामाला प्रिय झालेली शबरी, दुराचारी पतीला सन्मार्गावर आणण्यासाठी अहर्निश तळमळणारी मंदोदरी ही तुलसीदासांची काही अत्यंत मनोरम स्त्रीपात्रे असून त्यांच्या दर्शनाने वाचक हर्षनिर्भर झाल्याशिवाय राहत नाही. या भूमिकांच्या समांतर रेषेत असत् प्रवृत्तीची मूर्तिमंत प्रतीकेच भासावी अशी कपटकलापटु मंथरा, तिजमुळे विवेकभ्रष्ट झालेली स्वार्थांध कैकयी, ताडका, शूर्पणखा इत्यादि इतर पात्रेही या ग्रंथात रंगविलेली आहेत.

वर उल्लेखिलेल्या भल्याबुऱ्या स्त्रीचित्रणाच्या आधारे तुलसीदासांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण कसा असेल हे स्थूलमानाने जाणून घेणे सहज शक्य आहे. त्याबरोबरच काही स्त्रीपुरुष पात्रांच्या तोंडून काही प्रसंगी स्त्रियांचे चारित्र्य व त्यांचा स्वभाव याविषयी जे उद्गार निघाले आहेत त्यांचाही या संदर्भात उपयोग करून घेता येईल. हे करीत असताना या साऱ्याविचारांची तुलसीदासावरच प्रत्यक्षतः जबाबदारी टाकण्याचा मात्र हेतु नाही. कारण कवी हा सुष्ट दुष्ट अशा साऱ्याच पात्रांच्या मनाचा वेध घेत असतो. म्हणून स्त्रियांविषयी ज्या पात्रांनी प्रिय अथवा अप्रिय विचार व्यक्त केले आहेत त्यांच्याच अनुसाराने ते विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला तर तुलसीदासावर अन्याय होणार नाही. या संदर्भात आणखी एका गोष्टीचे विस्मरण होऊ न देण्याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक युगाची आपली स्वतःची अशी एक सामाजिक विचारसरणी असते, एक स्वतंत्र धर्म असतो, काही वैशिष्ट्ये असतात. ही सारी परिवर्तनीय असल्याने पुढील काळात ती गतार्थ होणे हे क्रमप्राप्तच असते. कालची जी मूल्ये ती आज तशाच स्वरूपात स्वाकारणे शक्यही नसते व इष्टही नसते. म्हणून हेही लक्षात ठेवावयास हवे की कोणत्याही साहित्यकलाकृतीचे आस्वादन करताना तिच्या निर्मितीच्या काळाचे त्याच्या साऱ्या बारीकसारीक तपशिलासह आकलन झाल्याविना तिचे मर्म उकलणे केवळ अशक्य आहे. तुलसीदासांच्या मानसात उमटलेली स्त्रीविषयक विचारांची प्रतिबिंबे व्यक्तिशः त्यांच्या स्वतःच्या विचारांचीच आहेत असे मानण्याऐवजी ती तत्कालीन लोकमताची अविकृत स्वरूपात उमटलेली प्रतिबिंबे आहेत असे मानणे म्हणूनच अधिक सयुक्तिक ठरेल. ही मते आजच्या संदर्भात अनुदार व अन्याय्य वाटणे स्वाभाविक असले तरी तुलसीदास ही व्यक्तिदेखील आपल्या स्थळकाल परिस्थितीचेच अपत्य होती ही गोष्ट लक्षात न घेतली तर दोन आपत्ती संभवतात. त्यामुळे कवीवर अन्याय्य केला असे तर होईलच पण वाचक या नात्याने आपली दृष्टिदेखील पूर्वग्रहदूषित होण्याची शक्यता आहे.

अनुक्रमणिका

येथे काही विवाद्य स्त्रीविषयक विचारांचा परामर्श शक्य तेवढ्या तटस्थ व अभिनिवेशरहित वृत्तीने घेण्याचा प्रयत्न केला आहे.

(१) उमेसारख्या आपल्या कुसुमकोमल कन्यकेने शंकरासारख्या रौद्र वराशी लग्न करावे हे तिच्या मातेला कसे आवडावे? पण उमेचा निग्रह व नारदादि मुनींची समजावणी यामुळे तिला संमति देणे भाग पडते. मुलीला सासरी पाठविताना आईने तिला जो उपदेश केला आहे त्यात असेही म्हटले आहे —

कत विधि सृजी नारि जग माही । पराधीन सपनेउँ सुख नाही ॥ (बालकांड)

परवशता ही जणू स्त्रीच्या पाचवीलाच पुजलेली आहे. आणि दास्य म्हटले म्हणजे त्यात हीन दीन वृत्ति व पराकाष्ठेची विनीतता आलीच. पतिव्रता धर्माची पहिली पायरी म्हणून ज्या पराधीनतेचा उपदेश आईने मुलीला केला आहे त्याची प्रेरणा मनुस्मृतीप्रणीत या परंपरागत दंडकात आहे —

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने । वार्धक्ये रक्षते पुत्रः न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

(२) रामचंद्राला राज्यपदाऐवजी वनवास देण्याचे कैकेयीचे कुटिल कारस्थान समजल्यावर ‘सुनि भए बिकल सकल नरनारी’ असे ज्यांचे वर्णन करण्यात आलेले आहे ते सर्व प्रजानन कैकेयीला शिव्याश्राप देऊ लागले. आणि तिच्या निमित्ताने सरसकट स्त्रीजातीविषयी चीड व्यक्तवू लागले —

सत्य कहहिं कवि नारि सुभाऊ । सब बिधिअगहु अगाध दुराऊ ॥
निज प्रतिबिंबु बरकु गहि जाई । जानि न जाइ नारि गति भाई ॥
काह न पावकु जारि सक का न समुद्र समाइ ।
का न करै अबला प्रबल केहि जग कालु न खाइ ॥ (अयोध्याकांड)

स्त्रीहृदय अगाध असून त्याचे तळ गाठणे सोपे नाही. एकवेळ आपले प्रतिबिंब धरता येईल पण स्त्रीच्या मनोव्यापाराचा छडा लावणे केवळ अशक्य आहे. अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडू न शकणारी, समुद्रात सामावू न शकणारी अथवा काळाच्या उदरात गडप न होणारी अशी कोणती गोष्ट या जगात आहे? या प्रश्नाचे उत्तर कोणतीच नाही’ हे एकच असणार. आणि नेमके हेच उत्तर ‘‘अबला असूनही तिच्या प्रबलतेचा तडाखा जिला बसला नाही अशी कोणती गोष्ट आहे?’ या प्रश्नाचेही उत्तर द्यावे लागते असे वरील पंक्तीत सुचविले आहे. या प्रसंगाच्या निमित्ताने जणू ‘स्त्रियश्चरित्रम् पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः’, ‘किं न कुर्वंति योषितः’ अथवा ‘अबला यत्र प्रबला’ इत्यादी पूर्वापार समजुतींचाच पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

(३) अयोध्येला परतल्यावर भरताला जेव्हा कळते की रामाला वनवास देण्यास व परिणामी आपल्या पित्याचा मृत्यु ओढवून आणण्यास आपली आईच सर्वस्वी जबाबदार आहे तेव्हा त्याचा क्रोध अनावर होतो. रामाविषयीच्या निःसीम भक्तीने भारलेल्या भरताच्या मनाला रामाऐवजी स्वतः आपण राजा होण्याची कल्पना स्वप्नात देखील शिवणे शक्य नव्हते. आपल्या आईच्या क्षुद्र स्वार्थपरतेची त्याला चीड येते हे स्वाभाविकच होते. कठोर शब्दात तो आईचा धिःकार तर करतोच पण सोबतच तिजमुळे कलंकित झालेल्या एकूण स्त्रीसमाजावरही तो भरपूर तोंडसुख घेतो. स्त्रीच्या मनाचा थांग प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही लागणे

कठीण आहे हे तर त्याने म्हटलेच पण त्यापेक्षाही अधिक म्हणजे सरसकट स्त्रियांना कपटी, पापी व दुर्गुणी ठरवून तो मोकळा झाला आहे. तो म्हणतो –

बिधिहुँ न नारि हृदय गति जानी । सकल कपट अध अवगुन खानी ॥ (अयोध्याकांड)

(४) अरण्यकांडात राम शबरीच्या आश्रमात प्रवेश करतात असा प्रसंग आहे. रामाची आराधना करताना शबरी स्वतःच्या निम्नवर्णाचा उल्लेख तर करतेच पण त्या बरोबरच स्त्री म्हणून आपणाकडे अधिकच उणेपणा येतो असेही ती म्हणून टाकते ते या शब्दात –

अधम ते अधम अधम अति नारी ।
तिन्हँ महँ में अतिमंद अधारी ॥

स्त्री ही मुळातच पुरुषापेक्षा कमी प्रतीची व हीनदीन आहे या आमच्या समाजाने उराशी कवटाळून धरलेल्या समजुतीचाच पुनरुच्चार शबरीच्या तोंडून करविण्यात आलेला दिसून येतो.

(५) अरण्यकांडाच्या अखेरीस नारदाने रामाला असे विचारले की 'पूर्वी मला विवाह करावासा वाटला असताना मला तसे करू न देण्यात आपला कोणता हेतु होता?'यावर श्रीरामाने स्त्रीरूपाचे विदारक आविष्करण करून 'अेवंदुर्गुणविशिष्ट स्त्रीपासून मी तुला वाचविले' असे नारदाचे समाधान केलेले आहे. रामाच्या शब्दात स्त्री ही सर्व मोहाचे मूळ आहे. ती जातपनियमांचे जलाशय आटविणारा ग्रीष्मऋतु आहे; कामक्रोधलोभादी बेडुकांना सुखद अशी वर्षा आहे; धर्मरूप कमळांना मलूल करणारी हिमवृष्टि आहे; पापरूपी घुबडांना सुखविणारी काळ कुट्ट रात्र आहे. एवढेच नव्हे तर बुद्धिबल शीलसत्य या माशांचे टाळू फोडणाऱ्या गळासारखी ही स्त्री असल्याचे सांगून शेवटी रामाने तिला सर्व पापांची खाणही म्हणून टाकले आहे. पहा –

अवगुन मूल सूलप्रद प्रमदा सब दुख खानि ।
ताते कीन्ह निवारन मुनि मैं यह जियँ जानि ॥

आता स्त्रीचे हे किळसवाणे व भयानक रूप पाहून देखील नारद तिच्याशी लग्न करण्याचे धाडस कसे बरे करील? वरील स्त्री विषयक उद्‌गार इतके स्पष्ट आहेत की त्यांच्यातील अनुदारपणावर अथवा त्यांच्यातील ऐकांतिकतेवर निराळे भाष्य करण्याची मुळीच गरज नाही. स्त्रीच्या निकृष्टपणाचे वर्णन करण्यासाठी यांच्यापेक्षाही प्रखर असे कोणते शब्द असतील?

(६) आता आपण तुलसीदासावर रामचरितमानसातील ज्या एका प्रसिद्ध चौपाईवरून स्त्रीशूद्रांविषयीच्या अनुदारपणाच्या आरोपांची सतत झोड उठत आलेली आहे तिचा समाचार घेऊ. वास्तविक या चौपाईतील उद्‌गार समुद्राने श्रीरामाजवळ काढले आहेत. अग्निबाणाने जलराशि शोषून घेण्याचा धाक रामाने दाखविताच वठणीवर आलेल्या समुद्राने आपली चूक कबूल केली आहे.

प्रभु भल कीन्ह मोहि सिख दीन्ही । मरजादा पुनि तुम्हरी कीन्ही ॥
ढोल गँवार सूद्र पसु नारी । सकल ताडनाके अधिकारी ॥ (सुंदरकांड)

अनुक्रमणिका

आपली मर्यादा ओळखून वागेल तोच खरा शहाणा. सर्वशक्तिमान प्रभु रामचंद्राशी केलेल्या उद्धटपणाबद्दल समुद्राला झालेला पश्चात्ताप उचितच आहे. पण त्या संदर्भात त्याने आपल्याच पायरीला इतरांनादेखील आणून बसविले आहे. स्त्रिया वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परागतिम्' या गीतेने दर्शविलेल्या औदार्याच्या अगदी उलट स्त्री शूद्रांना ढोल, गंवार आणि पशू यांच्या दावणीला बांधून केवळ थपडा खाण्यास सर्वस्वी पात्र म्हणजे 'ताडनाके अधिकारी' ठरवून टाकणारा समुद्र खरोखरोच अत्यंत अनुदार नाही का? पण त्याच्या या विधानामुळे ज्यांचा तो मानसपुत्र आहे त्या तुलसीदासावर सतत प्रखर टीकेच्या फैरी झडत आलेल्या आहेत. विशेषतः स्त्री पुरुष समानतेच्या या युगात तर त्यांना प्रतिगामी ठरविण्याची जणू अहमहमिकाच लागलेली दिसून येते. मग त्यांच्या बचावासाठी धावून येणारे काही भाष्यकार 'ताडनाके अधिकारी' अशा या पंचविषयांचा स्वतःला अनुकूल असा परस्पर संबंध दाखवून, प्रस्तुत उक्ति सगळ्याच नारी अथवा शूद्रांसाठी नसून केवळ 'पशुनारी' आणि 'गंवार शूद्र' यांच्या पुरतीच मर्यादित आहे असे समर्थन खुशाल करोत. पशु आणि गंवार यांना नामाऐवजी विशेषण ठरविण्याच्या या खटाटोपात बिचारा ढोलच तेवढा विशेषणावाचून राहून जातो हे त्यांच्या गावीही नसावे हे केवढे आश्चर्य!

(७) शेवटी लंकाकांडात रावणाच्या तोंडी घातलेल्या काही स्त्रीविषयक अनुदार विधानांचा विचार करू. श्रीरामाशी वैर सोडून सख्य करण्यातच आपले हित आहे हे रावणाला पटवून देण्यात मंदोदरीला यश तर आले नाहीच, उलट रावणाने तिची भरपूर थट्टाच उडविली. एवढेच नव्हे तर त्याने एकजात साऱ्याच स्त्रियांवर आठ दुर्गुणांचा आरोप करून टाकला आहे तो असा —

नारि सुभाउ सत्य सब कहहीं। अवगुन आठ सदा उर रहहीं।
साहस अनृत चपलता माया। भय अबिबेक असौच अदाया॥

तुलसीदासांच्या या रावणाने ज्या आठ अवगुणांचा आरोप स्त्रियांवर केला आहे त्यांचे मूळ वाल्मीकि रामायणात आहे आणि एकनाथांनी देखील आपल्या भावार्थ रामायणात निराळ्याच एका प्रसंगी प्रत्यक्ष श्रीरामाच्या तोंडून 'सामान्यतः स्त्रियांमध्ये आढळून येणाऱ्या' या दुर्गुणांचे वर्णन करविले आहे. (युद्धकांड : अध्याय ६९ : ओव्या १५—२७). वा मीकीचा श्लोक असा —

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभ्ता।
अशौचत्वं निर्दयत्व स्त्रीणां दोषाः स्वभावतः॥

स्त्रीला दुर्गुणांची पुतळी मानण्याची परंपरा सनातन व सार्वत्रिकच दिसते. आध्यात्मिक-पारमार्थिक मार्गात स्त्रीला धोंड मानून तिच्या पाशातून मुक्त होण्याचा उपदेश सारेच साधुसंत देत आले आहेत. शेक्सपीयरसारख्या पाश्चात्य नाटककाराचा हॅम्लेटदेखील 'Frailty thy name is woman' असे म्हणण्यास चुकत नाही. आणि आश्चर्य हे की प्राचीन गार्गी-मैत्रेयीसारख्या स्त्रीरत्नांची वेळी अवेळी बिरुदे गाण्यात धन्यता मानणारेही आम्हीच आहोत. 'यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः' हे मनूचेच दुसरे वचन वारवार कंठरवाने उच्चारणारेही आम्हीच. स्त्रीचा मातृरूपाने गौरव गाऊन 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' असा कृतज्ञतापूर्वक उद्‌घोषही आम्हीच करणार! वरील वर्तनात कोठे विसंगति तर नाही ना याचा काळजीपूर्वक विचार व्हावयास हवा. स्त्रियांविषयी आम्ही कोणता दृष्टिकोन बाळगावयाचा? वास्तव व अनुभव यावर आधारलेला की श्रुतिस्मृतिपुराणोक्त? जीवनाच्या विविधक्षेत्रात 'बाबावाक्यं प्रमाणम्' ही भूमिका घेणे आज अव्यवहार्य ठरत असताना स्त्रियांविषयीच्या वरीलसारख्या उक्तींचा विचार वर्तमानाच्या

अनुक्रमणिका

संदर्भात करण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय नाही. तसे जर आम्ही केले नाही तर मानवसमाजपुरुषाचे अर्धांगच अश्या स्त्रीवर्गावर घोर अन्याय झाल्याशिवाय राहणार नाही. आणखी एका गोष्टीचा गंभीरपणे विचार व्हावयास हवा आहे तो हा की ज्या दुर्गुणांची खाण स्त्रीला मानण्यात आले आहे त्यांपासून पुरुष खरोखरच मुक्त आहे का? शिवाय हेही विसरून चालणार नाही की आमचे अधिकांश प्राचीन साहित्य पौरुषेय म्हणजे पुरुष-निर्मित आहे. जर स्त्रियांनीही त्याच्या तोडीस तोड साहित्यनिर्मिती केली असती तर याच अवगुणांचा व दोषांचा त्यांनाही पुरुषजातीवर आरोप करता आला नसता का?

* *

अनुक्रमणिका

## तुलसींची ‘जगजननि जानकी ’

रामचरितमानसात सीतामाईचे दर्शन प्रथम घडते तुलसींच्या प्रास्ताविक निवेदनात जेव्हां ते आपल्या वंदनाच्या क्रमात तिला प्रस्तुत करतात या रूपात –

जनकसुता जगजननि जानकी ।
अतिसय प्रिय करुनानिधान की ॥
ताके जुगपदकमल मनावउं ।
जासु कृपा निरमल मति पावउ ॥

जनकतनया, रामप्रिया सीतेला साक्षात् आदिमायेच्या स्वरूपात पाहणाऱ्या तुलसींना तिचे चरणकमल वंदून निर्मळमति प्राप्त झाल्यास नवल नाही. सीतेचे मायारूपात पुन्हा एकवार वर्णन आले आहे ते जेव्हा तिने रामलक्ष्मणासमवेत अत्रीच्या आश्रमातून प्रस्थान केले तेव्हा –

उभयबीच श्री सोहइ कैसी ।
ब्रह्म जीव बिच माया जैसी ॥

आणि सीतेच्या या माहात्म्याचे सतत भान असल्यामुळेच लक्ष्मणही अहर्निश तिच्या पदारविंदांनाच वंदन करताना वाल्मीकि रामायणातही दिसतो –

नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुंडले ।
नूपुरेत्वभिजानामि नित्यं पादाभिवंदनात् ॥

प्रत्यक्ष परब्रह्माच्या मायेचे अलौकिक रूप वर्णावे तरी कसे? प्रभु राम स्वतः परब्रह्मच असूनदेखील सीतेच्या लावण्यावर ते मुग्ध आहेत. पुष्पवाटिकेत सीतेचे प्रथम दर्शन होताच त्यांची मनोऽवस्था कशी झाली ते निःसंकोचपणे त्यांनी लक्ष्मणाला सांगितले आहे –

जासु बिलोकि अलौकिक शोभा ।
सहज पुनीत मोर मनु छोभा ॥

रामाचे विकारविरहित मन देखील क्षुब्ध करणारे असे सीतेचे लावण्य होते. तुलसीदासांनी सीतेच्या सौंदर्याचे वर्णन करताना म्हटले आहे की –

सिय शोभा नहिं जाय बखानी ।
जगदंबिका रूप गुन खानी ॥
सिय बरनइ तेइ उपमा देई ।
कुकबि कहाइ अजसु को लेई ॥

अनुक्रमणिका

सीतेत रूप गुणांचा परमोत्कर्ष झालेला असल्याने तिचे सौंदर्य वर्णू पाहण्याइतका अथवा तिच्यासाठी उपमा शोधू पाहण्याइतका मूर्खपणा दुसरा कोणता असू शकेल? रामप्रभूतही कोटिमदनांचे सौंदर्य एकवटलेले आहे. हा समसमा संयोग केवढा मनोवेधक आहे! प्रथम दृष्टिक्षेपातच श्रीरामाने सीतेचे हृदय जिंकून घेतले आहे. ब्रह्म व माया यांची ही परस्पर प्रीति अविकृत व परमपुनीत असल्याचे कवीने म्हटले आहे. या प्रेमोद्भवानंतर जेव्हां उपवर सीता रामाच्या प्राप्तीस्तव गौरीमातेला प्रार्थना करते तेव्हा खऱ्या अर्थाने तिला 'वर' प्राप्ती होते. गौरीचे आश्वासन असे –

मनु ज हि राच्यौ मिलिहि सो बरु सहज सुंदर सांवरो ।
करूना-निधान सुजान सीलु सनेह जानत रावरो ॥

'सीते, तुझ्या मनाला रुचलेला सुंदर सावळा वर तुला अवश्य लाभेल'. रामचंद्राचे दुर्निवार आकर्षण तर मनाला ओढते आहे पण स्वयंवर मंडपात वडीलधारी माणसे उपस्थित आहेत ना? मग शालीन सीतेने रामाकडे कटाक्ष फेकण्याचे धारिष्ट्य तरी कसे करावे? रामाकडे लक्ष आहे पण दृष्टि खिळविलेली दिसते ती सखीजनावर! उपवर कुलीन कन्येची सहज सुंदर अशी शालीनता सीतेच्या या मनोज्ञ चित्रणात प्रकट झाली आहे. याच धनुर्भंगाच्या प्रसंगी सीतेच्या मनीची व्याकुळता वर्णनातीत होते जेव्हा तिच्या मनांत अशी आशंका निर्माण होते की 'रामाचा सुकुमार देह कुठे आणि हे वज्रकठोर शिवधनुष्य कुठे! कसे बरे उचलावे श्रीरामाने हे शिवधनुष्य! हे भगवान शिवशंकर! हे भवानी माते! हे देवांनो! या वज्रचापाला कुसुम कोमल करून टाका! म्हणजे रामाला ते सहज उचलता येईल. माझ्या वडिलांनी तरी कां असला अघोरी पण करावा? प्रभो, माझा हा धावा ऐकून माझी मनोकामना पुरवाल ना? रघुवीराची दासी होण्याचे भाग्य, हे प्रभो, मला लाभू द्याल ना?'आणि जणु सीतेचा हा आर्त धावा देवाने ऐकला. तसे नसते तर रामाने सहज लीलेने तो शिवचाप एखाद्या कम्पटासारखा उचलला असता कसा व एखाद्या खेळातल्या इवल्याशा धनुकलीप्रमाणे तो काडकन मोडला असता तरी कसा? शिवधनुर्भंगामुळे झालेल्या सीतेच्या हर्षनिर्भर अवस्थेचे शब्दांनी वर्णन करणे केवळ अशक्य आहे—

सीय सुखहि बरनिअ केहि भाँती ।
जनु चातकी पाइ जलु स्वाती ॥

चातकीला स्वाति नक्षत्राचे जलबिंदु लाभावे तशी सीतेची अवस्था झाली आहे. राम-लक्ष्मणावर तिने अशी दृष्टि खिळविली आहे की जणू चकोराने चंद्रावर दृष्टि खिळवावी!

विवाहानंतर सासरी आलेल्या नववधूशी कौशल्येचा व्यवहार मातृवत् असणे स्वाभाविकच होते. कारण सीतेविषयी तिने स्वतःच असे म्हटले आहे :—

पिता जनक भूपालमनि ससुर भानुकुल भानु ।
पति रविकुल कैरव बिपिन बिधु गुनरूप निधानु ॥

राजांचा मुकुटमणी जिचा पिता, सूर्यवंशातील श्रेष्ठ नृप जिचा सासरा, व रविकुल-कमलवनाला खुलविणाऱ्या चंद्रासारखा जिचा पति तिची योग्यता काय वर्णावी? अशा सुनेला सासूकडून प्रगाढ वात्सल्य न लाभले तरच नवल! सासूने तर तिला—

अनुक्रमणिका

नयन पुतरि करि प्रीत बढाई।
राखेउँ प्रान जानकिहिं लाई॥

डोळ्यातील बुबुळासारखी सीतेला जपणे व प्राणापलीकडे तिजवर माया करणे यात कौसल्येने कधीही कसूर केली नाही. जी तिला दिव्याची वात सारण्याइतपत साधी कामे देखील करू देत नसे ती कौसल्या आपल्या या आवडत्या सुनेला रामाबरोबर वनात जाऊ देईल हे कधी तरी शक्य होते काय? पण राज्यभिषेकाऐवजी लाभलेला वनवास देखील तेवढ्याच सहज भावाने स्वीकारणाऱ्या रामचंद्राची सहचरी सीता राजधानीत राहावयाला कशी बरे तयार होईल? वनासाठी हट्ट धरणाऱ्या सीतेची समजावणी करण्याचा रामाचा वृथा प्रयत्न तुलसींनी—

दिवस जात नहिं लागिहि बारा।
सुंदरि सिखवनु सुनहु हमारा॥

आणि—

हंसगमनि तुम्ह नहिं बन जोगू।
सुनि अपजसु मोहि देइहि लोगू॥

अशा शब्दात सांगितला आहे. पण 'हे ही दिवस हां हां म्हणता जातील निघून' अथवा 'तुझ्यासारख्या हंसगामिनीला वनात येऊ दिले तर लोक मला नावे ठेवतील या शिकवणुकीचा सहजी स्वीकार करणारी कोणी सामान्याची पत्नी सीता नव्हती. तिने आपल्या बुद्धिचातुर्याने रामाला निरुत्तर करणारा युक्तिवाद केला आहे. 'हे करुणाकरा प्राणनाथा, तुमच्याशिवाय स्वर्गही मला नरकासारखाच आहे' एवढेच नव्हे तर—

जहंलगि नाथ नेह अरू नाते।
पिय बिनु तियहि तरनिहु ते ताते॥
तनु धनु धामु धरनि पुर राजू।
पतिविहीन सबु सोकु समाजू॥
भोग रोगसम भूषण भारू।
जम जातना सरिस संसारू॥
प्राननाथ तुम्ह बिनु जग माहीं।
मो कहुं सुखद कतहुं कछु नाहीं॥
जिअ बिनु देह नदा बिनु बारी।
तौसिअ नाथ पुरुष बिनु नारी॥

'पत्नीला पतीपेक्षा श्रेष्ठ कोणतेही नाते नाही. पतिविरहित सुखोपभोगाच्या साधनांना काही अर्थ आहे का? पती नसेल तर ऐश्वर्यसमृद्धी घेऊन करावयाचे काय? पतीविना सुख केवळ अशक्य असून ते जिवंतपणीचे मरणच आहे. निष्प्राण देहाला का कोणी सजवू धजेल? पाणीचा नसेल तर नदीचे नदीपण कसे राहील? म्हणून हे प्राणनाथा, मला भलतीच गळ घालू नका' सीतेची ही अनन्य पतिनिष्ठा तिला वनवासाची दुःखे पतिवियोगाच्या दुःखाच्या तुलनेत कःपदार्थ वाटावयास लावणारी आहे. आणि शेवटी सीतेचा हा अढळ

अनुक्रमणिका

निश्चय पाहून हतप्रभ झालेले राम तिला वनात नेण्यास तयार झाले. सीता-लक्ष्मणासह रामाने वनात जाण्याची सिद्धता केली. प्रत्यक्ष अनुभवाने सीतेला वनाची दुःखे जाणवून ती परत फिरली तर श्रीरामाला ते हवेच होते. म्हणून याहून अधिक समजूत घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. मात्र जेव्हा दशरथाचा निरोप घेऊन सुमंत येतो व सीतेला परत अयोध्येस चलण्याचा आग्रह करतो, तेव्हा सीतेच्या निश्चयाची प्रखरता प्रत्ययाला येते. तिला राम हेच सर्वस्व असल्याने सासऱ्याचे सांगणेहि मानवत नाही. तिने सुमंताला दिलेले उत्तर असे आहे—

प्रभु करूनामय परम बिबेकी ।
तनु तजि रहति छांह किमि छेकी ॥
प्रभा जाइ कहँ भानु बिहाई ।
कहँ चंद्रिका चंदु तजि जाई ॥

वस्तूशिवाय छाया, सूर्यावाचून तेज अथवा चंद्रविरहित चांदणे यांची कल्पना तरी कशी करावी? पती व सुमंत दोघांनाही निरुत्तर करून सीतेने सासऱ्याला निरोप पाठविला तो असा की, 'माझ्या पित्याच्या व श्वशुराच्या घरात सर्व सुखे विद्यमान आहेत हे खरे; पण पतिविरहित ही सुखे माझ्या काय कामाची? रघुपतिपदाखेरीज अन्यत्र माझे मन रमावे तरी कसे? जेथे राघव तेथे सीता हीच खरीखुरी व सहजस्वाभाविक अवस्था आहे!' किती झाले तरी सीता ही वैदेही आहे. योगिश्रेष्ठ विदेहाची कन्या आहे! तिला तापसवेषात पाहून कोणत्याही लौकिक दृष्टीच्या पित्याला गहिवरून आले असते. पण जनक राजा मात्र किंचिन्मात्रही डगमगले नाहीत. उलट सीतेला या वेषात पाहून प्रेमाने ते म्हणाले—

पुत्रि पवित्र किये कुल दोऊ ।
सुजस धवल जगु कह सब कोऊ ॥

जनकाशिवाय कोणत्या पित्याने असे संतोषाचे उद्‌गार अशा प्रसंगी काढले असते? जेथे दशरथ एखाद्या सामान्य मानवाप्रमाणे माया मोहात गुरफटले आहेत तेथे विदेह जनक मात्र स्वकन्येच्या या वनवासाने क्षणभरही क्षुब्ध झाले नाहीत ही गोष्ट विशेष लक्षणीय आहे! आणि सीता खऱ्या अर्थाने त्यांचीच प्रतिमा असल्याने रात्री रामाला पर्णकुटीत एकटा सोडून आईबापांच्या आश्रमात राहण्याचा मोह सहजच टाळू शकते. संकोचामुळे ती तसे स्पष्ट बोलली नाही हा भाग निराळा. पतिनिष्ठेचे मूर्तिमंत उदाहरण असणाऱ्या सीतेला आपल्या वडीलपणामुळे अनसूयेने पतिव्रता धर्माची शिकवण जरी दिली असली तरी तिला एका गोष्टीची स्पष्ट कबुली द्यावीच लागली आहे ती अशी—

सुनु सीता तव नाम, सुमिरि नारि पतिव्रत करहि ।
तोहि प्राणप्रिय राम, कहिउँ कथा संसार हित ॥

सीतेच्या पतिपरायणतेचा आदर्श जगातील झाडून साऱ्या पतिव्रतांनी निरंतर आपल्या समोर असू द्यावा हीच सती अनसूयेने व्यक्तविलेली अभिलाषा व तोच तिने सीतेला दिलेला आशीर्वाद!

एका कुलीन घरंदाज नववधूला शोभेल असा सीतेचा लोभस संकोच व तिची शालीनता यांचे मनोज्ञ दर्शन घडविणारा एक उत्कृष्ट प्रसंग तुलसींनी रेखाटला आहे. वनमार्गावरून रामलक्ष्मणासमवेत जात

अनुक्रमणिका

असता वाटेत सीतेला काही खेडून स्त्रिया सहजच कुतूहलाने विचारतात की 'कोटिमदनांना लाजविणाऱ्या या जोडीत हे सुवदने, तुझे 'ते' कोणते?

कोटि मनोज लजावनिहारे ।
सुमुखि कहहु को आहि तुम्हारे ॥

कोणत्याहि नवविवाहहितेला हवाहवासा वाटणारा याहून चांगला आणखी कोणता प्रश्न असू शकेल? हाच तो सुपरिचित प्रश्न आहे की जो एखाद्या कुलवधूच्या साऱ्या स्वाभाविक लाजसंकोचाचा रक्तिमा तिच्या गालावर रिता करून सोडतो! या प्रश्नाचे उत्तर देण्याची तऱ्हाही मोठी न्यारी व लोभस असणार. ती चुकूनदेखील या प्रश्नाचे ते अमुक अमुक माझे 'ते' आहेत.' असे ताडकन् उत्तर देणार नाही. एक तर ती तिरप्या नजरेने तरी आपला अभिप्राय व्यक्त करील अथवा खाली मान घालून, पायाच्या आंगठ्याने जमीन खरवडत, हाताच्या बोटाला पदराचे टोक गुंडाळीत असे काही उखाण्यासारखे उत्तर देईल की विचारणाऱ्याने स्वतःच त्याचा भावार्थ समजून घ्यावा. सीतेने दिलेले उत्तर असे आहे—

'सहज सुभाव सुभग तन गोरे ।
नामु लखनु लघु देवर मोरे ॥'

दिराच्या परिचयाचे निमित्त करून पतीचा बोध करून देण्याची खुबी या उत्तरात असून ती ऋजु मनोहर आहे हेहि खरे, या खेरीज आणखीही एका माध्यमाचा प्रयोग झालेला आहे—

बहुरि बदनु बिधु अंचल ढाँकी ।
पियतन चितइ भौंह करि बाँकी ॥
खंजन मंजु तिरीछे नयननि ।
निज पति कहेउ तिन्हहि सियँ सयननि ॥

तिरपे नेत्रकटाक्ष व तेही डोक्यावरून समोर ओढून घेतलेल्या पदराच्या घुंघटातून, या प्रभावी माध्यमातून सीतेने आपल्या पतीचा ग्रामवधूंना परिचय करून दिला आहे. नवोढा युवतींना सहज शोभून दिसणारी ही पद्धत चिरपरिचित व आल्हादकारक आहे.

वनातील विपत्तींचा व आकस्मिक संकटांचा विचार करून रामचंद्रानी सीतेला आपले खरे स्वरूप अग्नीत लपवून ठेवण्याचा आदेश दिला. त्याला अनुसरून सीतेनेही तसेच केले व ती बाह्यतः प्रतिबिंब रूपाने वावरू लागली. मात्र हे रहस्य लक्ष्मणाला देखील कळू दिलेले नव्हते. आणि सीतेच्या दृश्य स्वरूपात तिळमात्र फरक पडलेला नव्हता. तेच रूप, तेच गुण व तेच शील तिच्या या प्रतिबिंब रूपातही विद्यमान होते.

माया मृगाच्या प्रसंगामुळे सीतेच्या जीवनाला एक अनपेक्षित वळण मिळाले. सीतेचा हट्टच एवढा जबरदस्त होता की स्वर्णमृगाचे अस्तित्व केवळ अशक्य कोटीतील आहे ही साधीसोपी गोष्ट राम काही तिला पटवू शकले नाहीत. एका कवीने रामाच्या या वर्तनाला 'विनाशकाले विपरीत बुद्धि' म्हटले आहे. तर दुसऱ्याने 'प्रायः समापन्न विपत्तिकाले धियोऽपि पुसां मलिनी भवंती' अशी मी मी म्हणणाऱ्यांच्या बुद्धीची

अनुक्रमणिका

संभावना केली आहे. राम मायामृगाचा पाठलाग करू लागले. लक्ष्मणावर सीतेच्या संरक्षणाचा भार त्यांनी सोपविला. पण मायामृगाने फोडलेल्या 'हा लक्ष्मणा''हे सीते' या आर्त टाहोने भेदरून गेलेल्या सीतेने लक्ष्मणाला रामाच्या साहाय्यार्थ जाण्याचा आदेश दिला. लक्ष्मणाने सीतेला समजाविण्याचा पुष्कळ प्रयत्न केली की, 'राम अजेय आहेत व ही करुण किंकाळी म्हणजे मायामृगाचे केवळ कपट आहे.' पण सीतेला काही ते पटले नाही. वाल्मीकी, एकनाथ इत्यादी कवींनी या प्रसंगी असे म्हटले आहे की लक्ष्मणाच्या समजावणीने सीतेचे समाधान तर झाले नाहीच, उलट तिने लक्ष्मणावर कामचुकारपणाचा, रामाविषयी अंतर्यामा वैराचा व सीतेविषयी कामुक अभिलाषेचा असह्य आरोप करून त्याला तेथून जाण्यास भाग पाडले. तुलसादासांनी मात्र सीतेच्या तोंडी असली कठोर भाषा न घालता एवढेच म्हटले आहे की—

मरमबचन जब सीता बोला।
हरि प्रेरित लछिमन मन डोला॥

'हरिप्रेरित' हे शब्द वापरून जणू कवीने लक्ष्मणाच्या संदर्भात 'बलीयसी-केवलमीश्वरेच्छा' हेच सूचित केले आहे. सीतेने केवळ 'मर्मवचने' बोलल्याचेच कवीने म्हटले आहे, ती काय बोलली ते मात्र सांगितले नाही. जगज्जननी सीतेच्या तोंडी अपशब्द घालण्याचे तुलसींनी कटाक्षाने टाळले आहे. रावण सीतेचे हरण करून जाऊ लागतो त्यावेळी मात्र ती म्हणते –

हा लछिमन तुम्हार नहिं दोसा।
सो फल पायउँ कीन्हेउँ रोसा॥

'लक्ष्मणाचा यात दोष नाही, माझ्याच आततायीपणाचे हे फळ आहे.' हे तिला आता पटते. पुढे पुन्हा एकदा अशोकवनात जेव्हा त्रिजटेकडून रामाच्या बाणाने रावण मरत नसल्याचे तिला कळते त्यावेळीही तिने पश्चात्ताप व्यक्त केला आहे. 'रामाने कपटमृगाबद्दल एवढे समजावून सांगितले असताही आपण ऐकले नाही, व्यर्थ हट्ट धरला आणि विनाकारण लक्ष्मणाला मर्मी लागेल असे बोललो.' आणि हे सारे जर तिने टाळले असते तर सीताहरणाचा प्रसंगच ओढवता ना! अशोक वनात राहूनही सीतेला निरंतर शोकातच डुंबून राहावे लागावे हा केवढा क्रूर दैवदुर्विलास होता!

लंकेत रावणाने सीतेला वशीभूत करण्याचे केलेले सारे प्रयत्न निष्फळ ठरले. एवढेच नव्हे तर त्याने धाकदपटशाचा केलेला प्रयोगही तिला यत्किंचितही भेडसावू शकला नाही. तिच्या निर्धारापुढे रावणाला हताशच व्हावे लागले. रावणाशी बोलताना ती 'तृन धरि ओट' म्हणजे तृण आड धरून बोलत असे, असे तुलसीदासांनी म्हटले आहे. या तऱ्हेने रावणाला कस्पटासमान मानून ती वेळोवेळी त्याची कानउघाडणी करी –

सुनु दसमुख खद्योत प्रकासा।
कबहुँकि नलिनी करइ बिकासा॥

कमलिनी उमलतात त्या सूर्याच्या प्रभेमुळे, काजव्याच्या टिमटिमणाऱ्या प्रकाशामुळे नव्हे हे ती रावणाला पुन्हा पुन्हा बजावून सांगत असे. एकवेळ तर तिने खडसावून स्पष्टच सांगून टाकले की रामप्रभूचा

नीलकमलाच्या वर्णाचा विशाल बाहू तरी माझ्या या कंठात पडेल अथवा तुझे तीक्ष्ण खड्ग तरी माझ्या मानेभोवती पडेल. पण तुझा अपवित्र हात माझ्या कंठाला कदापि स्पर्शू शकणार नाही.

रावणाने सीतेवर देखरेख करण्यासाठी जिची नेमणूक केली होती त्या त्रिजटेचे सीतेवर खरेखुरे प्रेम होते. आणि सीतेचाहि तिजविषयी मातेप्रमाणे ओढा होता. आपल्या मनातील गुज व सुखदुःखे सीता तिच्याजवळ मोकळी करी. रामचंद्राच्या वियोगाची ही असह्य अवस्था आता तिला अगदी नकोशी झाली होती. ती त्रिजटेला अनेकदा चिता रचून द्यायला सांगे. या विरहव्यथेतून सुटकेचा दुसरा कोणताच उपाय तिला सुचेना. पण तिचा असला आततायी हट्ट त्रिजटेने कधीच चालू दिला नाही. कधी कधी तर सीता अशोकवृक्षालाच विनवू लागे, की त्याने तरी तिला शोकमुक्त करावे!

लंकादहन केल्यावर पुन्हा लघुरूप धारण करून हनुमान सीतेचा निरोप घेण्यास आले आहेत. रामासाठी सीता आपला चूडामणि हनुमंताला देते. जयंताच्या प्रकरणाची आठवण करून देऊन आगळिकीला क्षमा न करणाऱ्या आपल्या बाणाचा प्रभाव रामाने विसरू नये असा निरोपही ती पाठविते. एवढेच नव्हे तर एक महिन्याच्या आत जर प्रभूंनी तिची येथून मुक्तता केली नाही तर सीता त्यांना पुनरपि जिवंत भेटणार नाही असा निर्वाणीचा संदेश पाठविण्यासही ती चुकत नाही.

सीतेचा निरोप घेऊन आलेल्या हनुमंताला रामाने तिजविषयी विचारले असता सीतेच्या विपन्न अवस्थेचे वर्णन करून त्याने सांगितले की, 'आपल्या विरहात सीतेला एक एक क्षण युगासारखा वाटतो. अहर्निश आपले चिंतन करीत कसाबसा सीतामाई काळ कंठीत आहे. आपणाशिवाय जगणे कठीण असूनही प्राण जात नाहीत हेच त्यांचे दुःख आहे. त्यांचे शरीर वियोगाग्नानीने जळून भस्म होत नाही याचे कारण एवढेच की अखंडपणे नेत्रातून चालणाऱ्या अश्रुधारामुळे अग्नी निष्प्रभ होऊन जातो. म्हणून प्रभो, सीतामाईचा निरोप एवढाच आहे की शक्य तेवढ्या लवकर शत्रूचा नाश करून आपण त्यांना घेऊन यावे.'

रामरावणाचे युद्ध बरेच दिवस रेंगाळत चालू आहे. रावण अजून मारला जात नाही. त्रिजटेकडून सीतेला ही वार्ता कळते. रावणाचा वध होत नाही हे आपल्याच दुर्दैवाचे फळ आहे असे सीता म्हणते. पुन्हा एकदा तिला मायामृगासाठी केलेल्या हट्टाविषयी व लक्ष्मणाला बोलू नये ते बोलल्याविषयी पश्चात्ताप होतो. या आपल्या कृतकर्माची शिक्षाच रावणाला अद्याप जिवंत ठेवून विधात्याने दिली आहे असेही तिला वाटते. यावर त्रिजटा मोठ्या चतुरपणे तिचे सांत्वन करून रावणावर रामाच्या बाणाचा परिणाम होत नाही याचे मोठे मार्मिक स्पष्टीकरण देते. 'सीते, खरे तर असे की रामाने रावणाच्या हृदयावर बाण मारावा व तो मरू नये असे घडणेच नाही. पण राम बाणच मारीत नाहीत त्याचे कारण असे की त्यांच्यापुढे फार मोठा पेच आहे. वासनेमुळे का असेना पण सध्या रावणाच्या हृदयात तुझ्याखेरीज दुसरे काही नाही. आणि तुझ्या हृदयात रामाचा निरंतर वास आहे ही गोष्ट रामाला माहीत आहे. बरे रामाच्या उरात अनंत कोटी ब्रह्मांडे सामावली आहेत हे कुणाला ठाऊक नाही? म्हणजे रावणाच्या हृदयावर मारलेल्या बाणामुळे पर्यायाने अखिल ब्रह्मांडाचाच विनाश ओढवणार आहे हे रामापासून लपलेले नाही. रामप्रभू याच अडचणीत असून हा प्रलय टाळता कसा येईल ही चिंता त्यांना लागून राहिली आहे.'

रावणाच्या वधानंतर रामाच्या आदेशानुसार हनुमंताने सीतेला या विजयाची वार्ता कळविली. सीतेच्या आनंदाला पारावार नाही. आता ती हनुमंताला सांगते की, 'अविलंब माझी श्रीरामाशी भेट घडवून प्रभूचे दर्शनसौख्य मला लाभू दे.' आणि रामाज्ञेप्रमाणे हनुमंत व बिभीषण सीतेला आणावयास जातात.

अनुक्रमणिका

सुस्नात व सालंकृत सीता पालखीत बसते. पालखी रामाच्या जवळ आल्यावर ते सीतेला पायीच आणण्याचा आदेश देतात. हेतू हा की आपल्या सीतामाईला वानरादींनी जवळून पाहावे. सीतेच्या अग्निपरिक्षेचा रामाने प्रस्ताव केला आहे. लक्ष्मण सुग्रीवादींना ही अग्निपरीक्षेची रामाची आज्ञा मुळीच रुचली नाही. पण रामापुढे त्यांना विरोध प्रगट करता येईना असे तुलसींनी दाखविले आहे. त्यांनी अनिच्छेने अग्नि सिद्ध केला आणि सीतेने अग्निदेवतेस प्रार्थना केली की, 'जर मी मनसा-वाचा-कर्मणा अहोरात्र रामप्रभूचेच चिंतन केले असेल तर हे पावका, तू मजसाठी चंदनासारखा शीतल होऊन जा.' आणि तुलसीदास म्हणतात की झालेही तसेच. सीतेचे केवळ प्रतिबिंब साऱ्या लौकिक कलंकानिशी जळून भस्म झाले—

प्रतिबिंब अरु लौकिक कलंक प्रचंड पावक महुँ जरे ॥

आणि अग्निदेवतेने मूळ रूपात सीता श्रीरामाला अर्पण केली ती अशी—

जिमि छीरसागर इंदिरा रामहि समर्पी आनि सो ॥

जणू क्षीरसागराने विष्णूला लक्ष्मीच अर्पण करावी तशी.

वनवासाचा अवधि संपवून सीता लक्ष्मणासह श्रीराम पुष्पक विमानातून अयोध्येला जात आहेत. वाटेत शुभ शकुन होत आहेत. सर्व प्रसन्न आहेत. श्रीराम मोठ्या उत्साहाने सीतेला जेथे काही विशेष घडले अशा सर्व स्थळांचा परिचय करून देत आहेत. 'सीते, याच रणांगणावर लक्ष्मणाने इंद्रजीताचा वध केला. आणि हनुमंताने व अंगदाने असंख्य राक्षसांचा संहार केला तो या ठिकाणी आणि आता रावणकुंभकर्ण आदींच्या निःपाताची ही जागा पहा. आता ती पहा, सेतुबंधानंतर शिवलिंगाची स्थापना मी त्या ठिकाणी केली आहे. सीते, श्रीशंकराला वंदन कर.' अशाप्रकारे श्रीराम साऱ्या महत्त्वाच्या स्थळांचा सीतेला परिचय करून देत आहेत. वाटेत दंडकारण्य, अगस्ति ऋषींचा आश्रम इत्यादि पाहात व ऋषींचे दर्शन घेत ते चित्रकूटाला पोचले. तेथून विमान अघमर्षिणी यमुना व गंगा यांच्यावरून उड्डाण करू लागले. सीता-रामांनी या पवित्र नद्यांना प्रणाम केले. तीर्थराज प्रयाग, त्रिवेणी संगम पार करून जेव्हा विमान अयोध्येच्या परिसरात प्रविष्ट झाले तेव्हा कृतज्ञतेने सर्वांची मस्तके विनम्र होणे स्वाभाविकच होते.

अयोध्येला पोचल्यावर सीतेने आधी आपल्या सर्व सास्वांना भेटून चरणस्पर्शपूर्वक त्यांना नमन केले. त्यांनीही सीतेला अखंड सौभाग्याचा आशीर्वाद दिला. सीतेला अभ्यंग स्नान घालून राजकुलोचित वस्त्राभूषणांनी अलंकृत करण्यात आले. रामाच्या डाव्या बाजूस सीता विराजमान झाली. सीतारामाच्या रूपाने साक्षात लक्ष्मीनारायणाचे दर्शन घडल्याने सर्वांची अवस्था हर्षगद्गद झाली. वशिष्ठादि ऋषिवर्यांनी सीतासमन्वित श्रीरामाला वेदमंत्रोच्चारपूर्वक राज्याभिषेक केला. रामराज्य अवतरले. प्रजा सर्वार्थाने सुखी झाली.

सीतेच्या दिनचर्येचे तुलसीदासांनी असे वर्णन केले आहे—

पति अनुकूल सदा रह सीता ।
सोभा खानि सुसील विनीता ॥

अनुक्रमणिका

जानति कृपासिंधु प्रभुताई।
सेवति चरण कमल मनलाई ॥

पतिसेवारत तर सीता होतीच पण कुलस्त्री म्हणून तिची कुटुंबविषयक कर्तव्यनिष्ठा देखील तेवढीच प्रखर होती. घरगुती कामातही ती तेवढीच दक्ष असे—

जद्यापि गृहँ सेवक सेवकिनी।
विपुल सदा सेवा बिधि गुनी ॥
निज कर गृह परिचरजा करई।
रामचंद्र आयसु अनुसरई ॥

नोकर असूनही घरकामे करीत, श्रीरामाच्या प्रसन्नतेकडे लक्ष पुरवीत, सास्वांची सेवाशुश्रूषा करीत व सर्वांच्या मानापमानाची चाड राखत सीता आपला संसार करीत होती. प्रत्यक्ष ब्रह्मादि देवतांनी जिला भक्तिपूर्वक वंदन करावे त्या जगदबिकेचे म्हणजे सीतेचे हे मनोज्ञ व विलोभनीय चित्रण करून तुलसीदासांनी आपल्या वाणी व लेखणीला पावन करून घेतले आहे. रामचरितमानसात सीतेच्या जीवनाचा करुण-दारुण असा उत्तरार्ध वर्णिलेला नाही. कदाचित भक्तराज तुलसींच्या ऋजु कोमल वृत्तीला ते मानवले नसावे. सीतेचे चित्रण त्यांनी सुखांतच केले आहे ते यामुळेच. त्यांनी केवळ एवढेच म्हटले आहे की कालांतराने लवकुश नामक दोघा सुंदर बालकांना सीतेने जन्म दिला—

दुइ सुत सुंदर सीता जाए।
लव कुस बेद पुरानन्ह गाए ॥

वेद पुराणातही प्रख्यात असे हे रामाचे दोघे प्रतिबिंबरूप लवकुश! सीतेचे हे दोघे पुत्र साक्षात रामासारखेच पराक्रमी व विजयी ठरले –

दोउ विजयी बिनई गुनमंदिर।
हरि प्रतिबिंब मनहुँ अति सुंदर ॥

जगज्जननिजानकी जनकसुता म्हणून जेवढी गौरविण्यास पात्र होती तेवढीच रामप्रिया सीता म्हणूनही तिचा लौकिक अक्षय ठरला आहे. आणि शेवटी लवकुशासारख्या अद्वितीय पुत्रांच्या मातृत्वाने ती विभूषित झाली ही गोष्टही सामान्य नव्हे!

* *

अनुक्रमणिका

# रामानुगामी लक्ष्मण

बालकांडात प्रारंभीच्या वंदनक्रमात तुलसींनी लक्ष्मणाचे श्रेष्ठत्व वर्णिले आहे ते अशा शब्दात— *रघुपति कीरति विमल पताका। दंड समान भयउ जस जाका* राघवाच्या विमल कीर्ति-पताकेचा दंडच असा लक्ष्मण दुसरा तिसरा कोणी नसून प्रत्यक्ष *'सेष सहस्रसीस जग कारन। जो अवतरेउ भूमि भय टारन॥'* — — भूभार हलका करण्यासाठी अवतरलेला साक्षात शेष म्हणजेच लक्ष्मण. तुलसींनी म्हटले आहे की हे नाव वसिष्ठांनी ठेवले ते यामुळे की सारी शुभ लक्षणे त्याच्यात एकवटली होती व तो श्रीरामाला अत्यंत प्रिय आणि साऱ्या जगाला आधारभूत होता : *'लच्छन धाम रामप्रिय सकल जगत आधार'* असे त्याचे वर्णन कवीने केले आहे.

निशाचराच्या उपद्रवांमुळे यज्ञकर्मात येणाऱ्या व्यत्ययाने त्रस्त विश्वामित्र असुरनाशार्थ अवतरलेल्या रामांची मागणी करण्यासाठी अयोध्येत आले आहेत. रामाबरोबरच लक्ष्मणाच्या सामर्थ्याचीही त्यांना कल्पना आहे. म्हणूनच त्यांनी दशरथाकडून या दोन्ही कुमारांची यज्ञरक्षणार्थ मागणी केली. दशरथाने जड अंतःकरणाने आपल्या दोघा पुत्रांना मुनींच्या हवाली केल्यावर *'पुरुषसिंह दोउ बीर हरपि चले मुनि भयहरन'* असे कवी म्हणतात. रामाप्रमाणेच लक्ष्मणही निर्भय निधडा असल्याचीच ही साक्ष नाही काय? आणि पुढे मिथिलेश जनकराजांना या बंधूंचा परिचय करून देताना विश्वामित्रांनी त्यांच्या तुल्यबलत्वाची ग्वाही दिला आहे. ते म्हणतात, *'रामलखन दोउ बंधु वर रूप सील बल धाम'* राम लक्ष्मण हे जोडनाव केवळ परस्पर बंधुप्रेमासाठीच विख्यात नाही, तर त्यात समसमासंयोगाचा सनातन ध्वनीही निनादत आहे. *'इन्हकै प्रीति परस्पर पावनि'* हे जसे खरे तसेच यांची सहज एकरूपता *'ब्रम्ह जीव इव सहज सनेहू'* अशी असल्याचे म्हटले आहे. जनकपुरीत राम-लक्ष्मण जेथे जेथे हिंडत तेथे या श्यामलगौर जोडीच्या समान सुंदरतेने आबालवृद्ध नरनारी मोहित होत. राम व लक्ष्मण यांच्यात तत्त्वतः भिन्नता अशी नव्हतीच. दोघेही तेज व सामर्थ्य; गुण व शील यांचे पुतळेच होते. स्वयंवर मंडपात जमलेले राजे या दोघांना पाहून हतप्रभ झाले. त्यांचेपैकी एकालाही शिवचाप मोडणे तर राहोच जागेवरून लवमात्र हलविणेही अशक्य झाल्याचे पाहून जनकराजांना साहजिकच क्षोभ उत्पन्न झाला. त्या भरात त्यांनी 'ही पृथ्वी निर्वीर झाली हे जर मला आधी कळते तर कशाला बरे असा भलताच पण करून सीतेवर कुमारीच राहण्याचा दुर्धर प्रसंग मी आणला असता?' असे उद्वेगाचे भाषण केले. ते ऐकून लक्ष्मणाचे क्षात्रतेज व कुलाभिमान उसळून न उठते तरच नवल! त्याने जनकाच्या या साऱ्यांनाच एका मापाने मोजण्याच्या निंदाव्यंजक भाषणाला तीव्र विरोध दर्शवून रामाला उद्देशून केलेले वक्तृत्व अत्यंत तेजस्वी आहे. लक्ष्मणाच्या भुवया वक्र झाल्या, ओठ फुरफुरू लागले व डोळे रक्तवर्ण झाले. त्याने जनकाला स्पष्ट बजावले की जेथे रघुवंशातील कोणी उपस्थित नसतील अशा समाजातच त्यांचे असले अनुचित भाषण खपून जाईल पण 'जनकराज, आम्ही येथे असताना अशी भाषा वापरणे खचितच गैर व उपमर्दकारक आहे'—*'रघुवंसिन्ह महुँ जहँ कोउ होई! तेहि समाज अस कहइन कोई'* एवढे बोलून लक्ष्मण मनात थोडा चरकला. श्रीरामाच्या भयाचे दडपण त्याच्या मनावर होते ना? एवढ्या रागाच्या आवेशातदेखील श्रीरामविषयीची विनम्र भावना लक्ष्मणात शाबूत राहिली हे त्याच्या व्यक्तिमत्वाचे एक विलोभनीय वैशिष्ट्य आहे. पुढील भाषण वरकरणी रामाला उद्देशून पण वस्तुतः जनकासह सर्वांना ऐकविण्यासाठीच त्याने केले आहे. 'श्रीरामा, तुमची अनुज्ञा असेल तर हे ब्रह्मांड मी चेंडूसारखे सहज उचलून भिरकावून देईन, अथवा एखाद्या फुटक्या घराप्रमाणे त्याच्या ठिकऱ्या उडवून टाकीन. मेरू पर्वताला एखाद्या मुळीप्रमाणे मी उपटून फेकीन, तेथे या जुन्यापुराण्या शिवचापाची ती बिशाद काय? कमळनाळाप्रमाणे हा चाप सज्ज करून शतयोजने धावून जाणे हे श्री रामा, तुमच्या प्रतापामुळे मला सहज शक्य आहे. ही गोष्ट मी मोठ्या अभिमानाने सांगतो आहे असे मात्र कोणी मानू नये. ती वस्तुस्थिति

आहे. आणि हे शिवधनुष्य एखाद्या छत्रीच्या दांड्यासारखे सहज मी मोडून टाकले नाही तर यावज्जन्म पुन्हा धनुष्यबाणाला मी स्पर्श करणार नाही'— *'जौं न करौं प्रभुपद सपथ कर न धरौं धनुभाथ'* लक्ष्मणाच्या या क्रोध आवेशाचे रामाला व विश्व मित्रांनाही मनातून कौतुकच वाटले असेल. पण इतर राजांसह सारेच या उद्‌गारांनी दडपून गेलेले पाहून श्रीरामांनी लक्ष्मणाला खुणावून शांत केले. रघुवंशाच्या महत्तेची एवढी जाणीव दिलेली पुरे असे मानून विश्वामित्रांनीच श्रीरामाला शिवधनुष्यभंगाचा आदेश दिला. रामाने सहज लीलेने शिवचाप तोडल्याचे पाहून काही विवेकशून्य वृथाभिमानी राजे मत्सराने रामाशी लढून सीतेला हिसकावून घेण्याच्या वल्गना करू लागले. मात्र जे विचारी होते त्यांनी रामाचे अलौकिक सामर्थ्य ओळखून त्याच्याशी स्पर्धा न करण्याचा व अकारण लक्ष्मणाच्या क्रोधाग्नीत पतंगाप्रमाणे भस्म न होण्याचा त्यांना सल्ला दिला — *'लखन रोषु पावक प्रबल जानि सलभ जनि होहु'* तुळशींच्या मानसात लक्ष्मणाच्या तापट स्वभावाचा वारंवार प्रत्यय येतो.

शिवधनुष्य भंगले ही विस्मयजनक वार्ता हां हां म्हणता त्रिभुवनात पसरली आणि परम शिवभक्त शीघ्रकोपी भृगुकुलरूपी कमलाचे सूर्यच अशा परशुराम मुनींनी पिसाटाप्रमाणे स्वयंवर मंडपात अचानक प्रवेश केला. सारे महाराजे व खुद्द जनकहि त्यांचा रौद्र अवतार पाहून गडबडून गेले. सर्वांची अवस्था *'बाज झपट जनु लवा लुकाने'*— एखाद्या बहिरी ससाण्याने लावा पक्ष्यावर झडप घालावी तशी होऊन गेली. सर्वांनी भराभर आपापली नावे पित्यासह सांगून परशुरामांना दंडप्रणाम केला. पण शिवचापाची खांडोळी पाहून कोपलेल्या जमदग्निसुताचे असल्या कृत्रिम विनम्रतेने समाधान होणे शक्य नव्हते. *'अति रिस बोले वचन कठोरा । कहु जड जनक धनुष्य केहि तोरा'* त्यांनी जनकाला सरळ मूर्ख म्हणून संबोधून हे धनुष्य कोणी तोडले म्हणून प्रश्न केला. जनकाच्या राण्यांची पाचावर धारण बसली. हा क्षत्रियांचा हाडवैरी आता कोणालाही जिवंत सोडणार नाही अशी सर्वांची खात्री होऊन चुकली. लोकांची उडालेली त्रेधातिरपिट पाहून श्रीराम शांत व विनम्र भावाने म्हणाले, 'हे मुने, हे धनुष्य तोडणारा आपलाच एक सामान्य सेवक असेल'. पण या स्पष्टीकरणाने परशुराम अधिकच खवळून उठले 'ज्याने हे धनुष्य मोडले असेल तो सहस्त्रबाहूप्रमाणे माझा शत्रू आहे. त्याने त्वरित बाजूला उभे राहावे'. आता मात्र लक्ष्मणाला शांत राहवेना. त्याने आपल्या स्वाभिमानी व ज्वालाग्राही स्वभावाची चुणुक दाखविली. जणू सहज भावाने स्मित करीत त्याने परशुरामाला सांगितले की 'आजपावेतो आम्ही अशा किती तरी धनुकल्या पोरखेळ म्हणून तोडल्या असताना आपण पूर्वी कधीच असे रागावल्याचे स्मरत नाही. मग याच धनुष्यावर आपला एवढा लोभ का?' परशुरामाच्या क्रोधाग्नीत तेल पडले 'अरे ए राजाच्या पोरा, तुझा काळ समीप आला आहेसे दिसते. त्रिभुवनात प्रख्यात असलेले हे शिवधनुष्य तुला माहीत नाही काय?' पण एवढ्या धमकावणीला लक्ष्मण कसला दाद देतो. त्याने उत्तराला प्रत्युत्तर चालूच ठेवले 'आमच्या लेखी सारी धनुष्ये सारखीच. त्यात हे तर जुनेपुराणे धनुष्य. रामाने हात लावताच त्याची खांडोळी झाला यात रामाचा काय दोष? कशाला आपण उगाच त्रागा करता?' आणि यावर चिडून गेलेले भृगुकुलमुनी आपला परशु उगारीत आपल्या कर्तृत्वाची बढाई मारणाऱ्या स्वरात बोलू लागले 'ज्याने आपल्या हयातीत पृथ्वीचे राज्य अनेकवार क्षत्रियापासून हिसकावून ब्राम्हणांना दान केले त्या या परशुरामासमोर लहान तोंडी मोठा घास घेणारा तू अजून बच्चा आहेस म्हणून मी तुला सोडून देतो. सहस्त्रबाहूचे हात तोडणाऱ्या या परशूकडे पहा व आपल्या आई-बापांना उगाच दुःखात लोटू नकोस.' परशुरामांच्या या बढाईखोर आत्मपरिचयाला लक्ष्मण भीक घालीत नाही. त्याच्या वाणीतील उपरोध व कुत्सितपणा यांना अधिकच तीव्रता आली. 'अहो महान पराक्रमी मुनिवर्य, पुन्हा पुन्हा हा परशु आपण कुणाला दाखवीत आहात? फुंकरीने पर्वताला उडवण्याचा हा वेडा प्रयास कशासाठी? *'पुनि पुनि मोहि देखाव कुठारू । चहत उडावत फूकि पहारू* पण याद राखा की *'इहां कुम्हडबतिया कोउ नाही । जो तरजनि देखत मरि जाही'*— केवळ बोट दाखविताच वेलीवरून पडणारे हे एखादे

कोहळ्याभोपळ्याचे बाळफळ आहे असे आपणास वाटले की काय?आपण भृगुऋषींचे चिरंजीव. आपल्या या जानव्याकडे पाहून मला राग आवरणे भाग आहे. कारण मुनिराज, देव, साधुसंत व गोब्राह्मण यांच्यापुढे आपले शौर्य दाखविण्याचे आमच्या कुळाचे ब्रीद नाही पुन्हा आमची स्थिति आपणासारख्यांच्या बाबतीत इकडे आड आणि तकडे विहीर अशी झालेली आहे. —*' बधें पाप अपकीरति हारें'*— आपणास मारावे तर पाप लागते. हार मानावी तर अपयश पदरी येते. म्हणून आपणास एकच गोष्ट सांगाविशी वाटते ती ही की आपले शब्दच कोटिवज्रांसारखे तीव्र व कठोर असताना आपण हे धनुष्य व हा परशु कशासाठी व्यर्थ धारण करता?' एवढे खवचट बोलून पुन्हा लक्ष्मणाने आपल्या तोंडून काही वावगे शब्द निघून गेले असल्यास परशुरामाकडून क्षमेची याचनाही केली आहेच! *'जो बिलोकि अनुचित कहेंउँ छमहु महामुनि धीर'*

लक्ष्मणाचा वरून बालिश दिसणारा पण परिणामी वर्मी झोंबणारा हा खवचट तिखट उपरोध आता मात्र परशुरामाला अगदी असह्य होऊन गेला. त्यांनी आता आपला मोर्चा विश्वामित्राकडे वळविला. या *'कुटिल कालबस निजकुल घालकु'* अशा मंद बालकाला ताबडतोब आवर घालण्यास त्यांनी विश्वामित्राला बजावले, पण ते देखील आपल्या बलतेजाच्या अहंकारात. त्यांनी *'भानुवंश राकेश कलंकू । निपट निरंकुश अबुध असंकू'* अशी भरपूर दूषणे लक्ष्मणासाठी वापरून 'त्याला आत्ताच मृत्यूच्या मुखात पडू द्यावयाचे नसेल तर त्याला आमचे सामर्थ्य व आमचा कोप यांची नीट जाणीव देऊन तोंड आवरण्यास सांगा' असा धाकच परशुरामाने विश्वमित्राला घातला. यावर विश्वामित्राने काही उत्तर द्यावे त्याआधीच लक्ष्मणाने पुन्हा कोपरखळी दिलीच 'मुनिमहाराज, आपण स्वतः हयात असताना आपली कीर्ति ख्याति इतरांनी ती कशाला गावी? आपण स्वतःच तर वारंवार आपली बढाई मारीत आहात! आणि एवढ्यानेही आपली तृप्ति होत नसेल तर पुन्हा उधळा ना आपली मुक्ताफळे! उगाच राग मनातल्या मनात दडपून ठेवून कष्टी कशाला होता?' आणि एवढे कुत्सितपणाने बोलून लक्ष्मणाने त्यांना सांगून टाकले की 'तुमच्या सारख्या धीरगंभीर वीरांच्या तोंडी असल्या शिव्या शोभत नाहीत –*'वीरव्रती तुम धीर अछोभा । गारी देत न पावहु सोभा'* आणि शिवाय आपणासारख्या शूराने केवळ वल्गना काय म्हणून कराव्यात? शत्रू समोर असताना वटवट करणे हे तर भित्र्यांनाच शोभते. –*'सूर समर करनी करहि कहि न जनावहि आपु । विद्यमान रन पाइ रिपू कायर कथहिं प्रतापु'*— म्हणून म्हणतो, काय करायचे ते करून दाखवा. काळाला तर तुम्ही मजसाठी हुकूम देऊन बोलावूनच ठेवले आहे.

लक्ष्मणाचे हे बोचरे चावरे भाषण ऐकून घेणे आता मात्र परशुरामाला केवळ अशक्य झाले. आपला फडशा परजीत ते म्हणाले की, 'आता मात्र कोणीही मला दोष देऊ नये. या पोरट्याची कडवट भाषा मी आतापावेतो ऐकून घेतली. केवळ एक पोर म्हणून याला सोडून द्यावे तो याचे आपले चालूच! विश्वामित्रमुनिकडे पाहून मी सारे सहन करीत आलो. नाहीतर या कुठाराने मी केव्हाच माझे गुरू भगवान शंकर यांच्या या अपराध्यास शासन करून गुरूच्या ऋणातून मुक्त झालो असतो.' लक्ष्मणाला पुन्हा उपहासाची उबळ आली. पुन्हा त्याची जीभ चुरचुरीत भाषा बोलू लागली, 'मुनिवर्य, आपले शीलचारित्र्य का कुणापासून लपून आहे? आईला मारून आपण पित्याच्या ऋणातून केव्हाच मुक्त झाला आहात हे सारे जग जाणते. आता गुरूच्या ऋणातून मुक्त व्हावयाचे तेवढे बाकी राहिले आहे. तेही आपण आमच्या माथी मारीत आहात, शिवाय ते ऋण फार जुने झाल्याने त्यावर व्याजही चांगले जबर वाढले आहे, म्हणून म्हणतो, आपण एखाद्या व्यवहारी माणसाला आणाल तर मी ते सव्याज फेडून टाकतो.' लक्ष्मणाचे हे उपरोधिक बोलणे ऐकून अगाचा तिळपापड झालेले परशुराम फडशा उगारून पुढे सरसावले. हे पाहून सारे सभागृह भयाकूल होऊन हाय हाय करू लागले. आता मात्र लक्ष्मणाने भृगुमुनींची खरमरीत शब्दात हजेरी घेतली. तो सरळच त्यांना म्हणाला—

अनुक्रमणिका

‘भृगुवर परसु दिखावहु मोही ।
बिप्र विचार बचहुँ नृपद्रोही ॥
मिले न कबहुँ सुभट रन गाढे ।
द्विज देवता घरहि के बाढे ॥

‘मुनिराज, बस करा आपली ही वटवट. पुन्हा पुन्हा मला परशु कसला दाखविता? आपण ब्राह्मण आहात म्हणून मी आपली गय करीत आलो तो आपण वाहवतच चाललात. अजून खऱ्या शूरवीराशी कधी प्रसंग पडलेला नाही म्हणून आपण स्वतःला मोठे गाढे रणशूर समजून बसला आहात. ब्राह्मण म्हणून तुम्ही आपल्या घरीच मोठे म्हणून मिरवू शकता आणि तुमच्यासारख्या क्षत्रिय द्रोह्याला मी जिवंत राहू देतो आहे तेही तुम्ही ब्राह्मण म्हणूनच.’

लक्ष्मणाचे शब्द परशुरामाच्या क्रोधाग्नीत आहुतीच ठरले. साऱ्या सभेची भीतीने गाळण उडाली. श्रीरामाने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून परशुरामाचा राग शांत करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले ‘मुनिवर्य, लक्ष्मण अजून हूड आहे. अद्याप त्याचे दुधाचे ओठदेखील वाळलेले नाहीत. आपण थोर आहांत. मुलाबाळांच्या चुका गुरुजनांनी पोटात घालावयाच्या असतात. आपण शांत व्हा व क्षमा करा.’ रामाच्या या विनवणीने मुनींचा पारा थोडा खाली आला न आला तोच लक्ष्मण पुन्हा मिस्किलपणे हसल्याचे त्यांना दिसून आले. त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. ‘रामा, हा तुझा भाऊ मोठा पापी दुरात्मा दिसतो– *‘गौर सरीर स्याम मन माही । कालकूट मुख पथमुख नाही’*–याच्या गोऱ्या गोमट्या शरीरात काळेकुट्ट मन दडले आहे. याचे ओठ तू म्हणतोस तसे दुधाचे राहिले नाहीत. ते तर काळकूटाने माखलेले आहेत. हा स्वभावाने अत्यंत कुटिल आहे. तुझ्यासारखा तर तो नाहीच.’

लक्ष्मणाला आपली वाचा आवरता येईना. पुन्हा तो थट्टेच्या स्वरात सांगू लागला की ‘हे मुने, क्रोध हा पापाचे मूळ आहे आणि तो करू नये ते करवितो. मी तर आपला सेवकच आहे. माझ्यावर काय बरे हा असला राग? मोडलेले धनुष्य का कोठे रागावल्याने सांधले जाणार आहे? आपले पाय उभे राहून दुखू लागतील. आपण आता खाली बसा ना! या धनुष्यावर जर आपले एवढे प्रेम असेलच तर– *‘जौ अति प्रिय तो करिअ उपाई । जौरिअ कोउ बडगुनी बोलाई’*–उगाच असे आकांड तांडव करण्याऐवजी ते मोडके धनुष्य जोडून देणाऱ्या एखाद्या हिकमती कारागिराला का बोलावून आणीत नाही?’लक्ष्मणाच्या या अविरत उपरोधपूर्ण बोलण्याचे भय वाटून सारे सभाजन थरथर कापू लागले. सर्वांनाच वाटू लागले की लक्ष्मणाची मूर्ति लहान खरी पण स्वारी एकूण अचाटच आहे! परशुराम तर रागाने देहभान हरपल्यागत झाले. ते रामाला म्हणाले ‘तुझा भाऊ म्हणूनच मी याला जिवंत सोडतो आहे. पण रामा, हा तुझा भाऊ विषरसाने भरलेल्या सुवर्णकलशासारखा आहे– *‘मन मलीन तनु सुंदर कैसे । विषरस मरा कनकवट जैसे’*– शरीराने सुंदर पण मनाने मलीन’ यावरही लक्ष्मणाचे हसणे आपले चालूच होते. शेवटी रामाने तिरप्या नजरेने त्याला खुणावून हा वात्रटपणा आटोपता घेण्यास बजावले. लक्ष्मण बोलावयाचा तर राहिला पण राम-परशुरामाच्या संभाषणातही अधूनमधून लक्ष्मण दुसरीकडे तोंड वळवून हसत असल्याचे परशुरामाच्या नजनेतून सुटले नाही. त्यांनी त्याच्या या वर्तनाला रामाची आतून फूस असल्याचाही संशय बोलून दाखविला. तुलसींच्या मानसात लक्ष्मण-परशुराम प्रसंगाला आगळेच महत्त्व आहे.

राज्यभिषेकाऐवजी वनवास भोगावयाचा आदेश शिरसावंद्य मानून श्रीराम वनात जावयास निघाले. ही वार्ता कळताच लक्ष्मण अत्यंत व्याकुळ झाला. राम आपल्याला बरोबर नेतात की नाही या आशंकेने

अनुक्रमणिका

त्याची अवस्था केविलवाणी झाली. वनात जाण्याची इच्छा त्याने बोलून दाखविली असता श्रीरामाने त्याचे अयोध्येतच राहणे का आवश्यक आहे ते सविस्तर समजावून सांगण्यास सुरुवात केली तेव्हा तर लक्ष्मणाचा जीव कासावीसच झाला. जणू कमलवनावर हिमवर्षाव व्हावा अशी त्याची अवस्था झाली. भरतशत्रुघ्न अयोध्येत नाहीत. आईबाप वृद्ध. त्यात रामाच्या वनगमनामुळे दुःखीकष्टी, प्रजेचा वाली कोणीच नाही आणि राजनीति तर ही की *'जासु राज प्रिय प्रजा दुखारी । सो नृप अवसि नरक अधिकारी'*— म्हणून प्रजेच्या सेवेसाठी लक्ष्मणाने अयोध्येतच राहावयास हवे असे रामाचे म्हणणे. पण लक्ष्मणाला ते काही पटले नाही. त्याने सरळच सांगितले की 'या मोठ्या नीतीच्या गोष्टी मोठ्यांसाठी. मी तर केवळ अज्ञ बालक आहे. मला आईबाप, गुरू, प्रजा इत्यादी कोणतीही नाती कळत नाहीत. मी फक्त एवढेच जाणतो की माझे सर्वस्व आपणच आहात—*'मोरे सबइ एक तुम स्वामी'*— मला अन्य कशाची चाडही नाही व गरजही नाही' आणि शेवटी लक्ष्मणाच्या निर्धारापुढे हार मानून रामानेही त्याला आईची अनुज्ञा घेऊन येण्यास सांगितले. आई अनुज्ञा देते की नाही अशी पुसटशी शंका लक्ष्मणाच्या मनाला स्पर्श करून गेली असेल. पण सुमित्रा म्हणजे काही कैकेयी नव्हे! तिने तर लक्ष्मणाच्या रामाविषयीच्या प्रेमाचे कौतुकच केले. जेथे राम तेथेच लक्ष्मण असणे हेच योग्य असल्याचा निर्वाळा देऊन तिने लक्ष्मणाला रामाबरोबर सहर्ष वनात जाण्यास सांगितले. ती म्हणाली —*'जौं पै साय रामु बन जाहीं । अवध तुम्हार काज कछु नाही'*— सीताराम वनांत असताना लक्ष्मणाने अयोध्येस राहावे ही कल्पनाच तिला असह्य वाटली. लक्ष्मणाचे हे रामप्रेम पाहून तिला धन्यता वाटली. वनात सीतारामांची मातापित्याप्रमाणे सेवा करण्याची शिकवण देऊन सुमित्रेने लक्ष्मणाला निरोप दिला. अशी सापत्न माता आणि असा सावत्र भाऊ ही उदाहरणे अन्यत्र सापडणे केवळ अशक्य आहे.

वनात गेल्यावर लक्ष्मणाने आईच्या शिकवणुकीप्रमाणे सीतारामांची सेवा आरंभिली. रात्री राम झोपू लागले की त्यांचे पाय चेपावयाचे, ते झोपले की बाहेर सशरचाप पहारा करावयाचा. निषादराज गुहाने जागोजागी पहारेकरी नेमून दिले व तो स्वतः लक्ष्मणासमवेत श्रीरामांना वनवास देणाऱ्या कैकेयीच्या कुटिलपणाबद्दल व विधात्याच्या मंद बुद्धीविषयी सखेद विस्मय करीत बसला. त्याचे बोलणे ऐकून लक्ष्मण त्याला हे कर्मभोग असून ते कुणालाच सुटले नाहीत असा वेदांत सांगू लागला. 'हे सारे दुःखभोग मायानिर्मित असून विरक्तपणे रामचरणांचे अनुसरण करणे हाच खरा विवेक होय. श्रीराम हे प्रत्यक्ष परब्रह्म असून सुखदुःखातीत आहेत. ते केवळ देव, भूमि व भक्त यांना असुरांच्या त्रासातून मुक्त करण्यासाठी मानवलीला करीत आहेत.' आणि निषादाला एवढा गहनगूढ वेदांत सांगणाऱ्या लक्ष्मणाचा मूळ तापटपणा पुन्हा एकदा सुमंताला निरोप देतांना दिसलाच. राम त्याला शांतपणे 'आमची चिंता न करण्यास पिताजींना सांगा' म्हणून समजावीत असता लक्ष्मणाने मात्र कुत्सित खवचट निरोप सांगितला. कैकेयीवर व तिच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या दशरथावरचा त्याचा राग चांगलाच उकळत होता. रामाने त्याला दटावले व चूप बसविले आणि त्याचा असला काही निरोप सांगू नकोस म्हणून तुमंताला ताकीद दिली.

राम आणि लक्ष्मण यांच्या स्वभावात व वृत्तीत अनुक्रमे असलेला नरमपणा व गरमपणा कवीने ठिकठिकाणी प्रकट केला आहे. भरत रामाच्या भेटीसाठी आल्याची बातमी वनात येऊन थडकली. सोबत चतुरंग सैन्य आणि अयोध्यावासी पौरजनही आहेत! कोणत्या हेतूने भरत आला असावा हा प्रश्न श्रीरामांना पडला खरा. पण त्यांनी त्याचे काही अतिरेकी निदान केले नाही. कारण भरताचा आपल्याविषयीचा प्रेमभाव त्यांना माहीत होता. लक्ष्मणाने मात्र रामालाच उलट असे म्हटले की 'आपण स्वभावाने सरळ व प्रेमळ आहात तसेच सर्वांना समजता. पण जग असे सरळ नाही. अचानक सत्तासंपदा मिळाल्याने उन्मत्त होणारे मूढच या जगात आढळतात. भरताला अकल्पित राज्यपद लाभल्याने तोही आपणास एकाकी गाठून काटा काढण्याच्या दुष्ट बुद्धीनेच वनात आला नसेल कशावरून? त्याचा हेतू शुद्ध असता तर त्याने बरोबर रथ,

अनुक्रमणिका

हत्ती, घोडे हा सारा लवाजमा कशासाठी आणला असता– *‘जौं जिय होति न कपट कुचाली । केहि सोहति रथ बाजि गजाली?॥’*आणि त्याला तरी दोष का द्यावा? ही तर जगरहाटीच आहे– *‘भरतहि दोसु देई को जाएँ । जग बौराइ राजपदु पाएँ ॥’* सारे जगच जिथे सत्तामदाने धुंद होते तिथे भरताकडून तरी निराळी अपेक्षा काय करायची?’ आणि लक्ष्मणाने आपल्या मताच्या समर्थनासाठी गुरुपत्नीगामी चंद्र, ब्राह्मणाशी उन्मत्तपणे वागणारा राजा नहुष, वेदशास्त्रविमुख बेन राजा आणि पदाचा उन्माद चढलेला सहस्राबाहु, इंद्र व त्रिशंकू यांची उदाहरणे देऊन टाकली. आणि हे बोलत असतांना लक्ष्मणाला जणु रणावेश संचरला व त्याने धनुष्याला हात घालून भरताला शासन करण्याची रामाकडून परवानगी मागितली. त्याच्या राग अनावर झाला– *‘अति सरोष माखे लखनु’* आणि लक्ष्मणाचे सात्विक संतापाचे हे उद्‌गार एकून सर्वजण भयभीत झाले. आकाशवाणी झाली. देवांनी लक्ष्मणाचे सामर्थ्य अतुल असल्याची ग्वाही तर दिलीच पण आपण करतो त्या कार्याची युक्तायुक्तता पाहून जर ते केले नाही तर एखादेवेळी मागाहून पस्तावण्याची पाळी येते असेही त्यांनी सुचविले. ही देववाणी ऐकून लक्ष्मण थोडा वरमला. श्रीरामाने त्याला सांगितले की ‘तू म्हणतोस ते खरे आहे. राजमदाने पिसाट होत नाही असा विरळाच! पण लक्ष्मणा, भरत मात्र त्यातला नाही हे लक्षात असू दे. तो सर्वस्वी निराळाच आहे –

> भरतहि होइ न राजमदु विधिहरि हर पद पाइ ।
> कबहुँ कि कांजी सीकरनि छीरसिंधु बिनसाइ ॥

राज्यपदच काय पण ब्रह्मा, विष्णु, महेशापैकी एखाद्याचे पद जरी प्राप्त झाले तरी त्यामुळे भरत विचलित होणार नाही. अरे, कांजीच्या शिंतोड्यांनी का कुठे समुद्र नासणार आहे?

रामाने भरताविषयी अशी ग्वाही दिली तेव्हा कुठे लक्ष्मण ताळ्यावर आला. श्रीरामाने त्याच्या रागाला आवर घालून त्याला शांत केले.

वर्षाऋतु संपून शरद आला पण सुग्रीवाने अद्याप सीतेसंबंधी काहीच माहिती आणली नाही याचा श्रीरामाला विषाद वाटला. रामाचे मनोगत जाणून त्वरित कार्य करण्यास लक्ष्मण सदाच तत्पर! सुग्रीवाने आपल्या हातून वालीचा वध करवून राज्य व तारा यांचा लाभ साधून घेतला आणि आता त्यांच्यातच मग्न होऊन तो आपली आठवणही विसरला अशी शका रामाने व्यक्तविली. लक्ष्मणाला तेवढे पुरे होते! सुग्रीव कृतघ्न ठरला असे मानून लक्ष्मणाने आपल्या शीघ्रकोपी स्वभावाप्रमाणे लगेच धनुष्य सज्ज केले व सुग्रीवाचा वध करण्याची तयारी दर्शविली. रामाने त्याला शांत करून सुग्रीवाला प्रेमाने अथवा धाकाने आणण्यास सांगितले. लक्ष्मण संतापून आल्याचे कळताच सुग्रीव, तारा, हनुमंत व अंगद या सर्वांचीच गाळण उडाली. त्यांनी आपण सीता शोधासाठी कोणते व कसे प्रयत्न करीत आहोत याची सविस्तर माहिती देऊन लक्ष्मणाला शांत केले.

सागर पार होऊन लंकेत जाण्याच्या प्रसंगीही लक्ष्मणाच्या तापट स्वभावाचा पुन्हा एकदा प्रत्यय येतो. रामाच्या एका बाणाने कोटि सिंधु शोषले जातील हे जरी खरे असले तरी जलधि हा आपला कुलगुरू असल्याने तसे करण्याऐवजी सागराला विनवूनच काही मार्ग काढणे बरे असा सल्ला बिभिषणाने रामाला दिला. पण हा मिळमिळीत विचार लक्ष्मणाला कसचा मानवणार? त्याने आपला विरोध दर्शवून समुद्राला शासन करण्याचा रामाला आग्रह केला. तो म्हणाला –

अनुक्रमणिका

नाथ दैव कर कवन भरोसा।
सोषिअ सिंधु करिअ मन रोसा ॥

‘समुद्राच्या भलेपणावर विसंबून राहणे म्हणजे केवळ दैवावर हवाला टाकणे होय. समुद्राला अग्निबाणाने शोषून टाकल्याशिवाय तो वठणीवर यायचा नाही’.

लक्ष्मणाचा नेहमीचाच शीघ्रकोपीपणा श्रीरामाला कौतुकाचा विषय वाटून ते अशा प्रसंगी नेहमीच हसून त्याला शांत करीत. पण या प्रसंगी मात्र शेवटी लक्ष्मणाचीच कल्पना खरी ठरली. श्रीरामाने अग्निबाणाची योजना करण्याची तयारी दर्शविताच शोषणाच्या भीतीने दीन झालेला समुद्र हात जोडून श्रीरामाला शरण आला. हे पाहून लक्ष्मणाला हर्ष व्हावा हे स्वाभाविकच होते.

मेघनादाशी युद्धात लक्ष्मणाला शक्ति लागली व तो मूर्च्छित होऊन पडला. राक्षसांनी त्याला आपल्या गोटात उचलून नेण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. तुलसी म्हणतात की *‘जगदाधार सेष किमी उठै’* प्रत्यक्ष शेषाला कोणी कसे उचलू शकेल? राम व लक्ष्मण यांना प्रत्यक्ष परब्रह्म व शेष मानणाऱ्या तुलसीदासांनी त्यांना मानवरूपात प्रस्तुत केले असल्यामुळे त्यांना मानवोचित सुखदुःखे भोगण्यासही लावली आहेत. लक्ष्मणाच्या अचेतन अवस्थेत श्रीरामाचा विलाप, सुषेण वैद्याला पाचारण, हनुमंताने द्रोणागिरीवरून संजीवनी आणणे इत्यादी गोष्टी सामान्य मानवासारख्याच येथेही घडल्या आहेत. ‘लक्ष्मणा, मी अयाध्येला कोणत्या तोंडाने जाऊ, माझ्यासाठी तू सर्वस्वाचा त्याग केलास, माझ्या सेवेत निरंतर राहिलास, तुझ्या सारखा प्रेमळ सुस्वभावी बंधु गमावून मी तुझ्या मातेला काय उत्तर देऊ?’श्रीरामाचा हा करुण विलाप तुलसींनी सविस्तर वर्णिला आहे. त्यावरून रामाच्या लक्ष्मणाविषयीच्या बंधुप्रेमाची कल्पना येते. रामाबरोबर सतत राहण्याची संधि मिळाल्याबद्दल भरतानेदेखील लक्ष्मणाला भाग्यशाली म्हटले आहे —*‘अहह धन्य लछिमन बडभागी । राम पदारबिंदु अनुरागी’*. सीतेपेक्षाही अधिक काळ रामाचा सहवास लक्ष्मणाला त्याच्या जीवनात लाभला. एवढे थोर भाग्य इतर कुणाचेच नव्हते. रामाच्या जीवनयात्रेत लक्ष्मण पावलाप्रमाणे उमटला आहे. म्हणजे रामायणात लक्ष्मणायनही बेमालूम मिसळून गेले आहे. एकूण असेही म्हणता येईल की लक्ष्मण हा केवळ रामाचा धाकटा भाऊ म्हणून शब्दार्थाप्रमाणे रामानुज अथवा रामानुगामीही होता. रामपदाचे अहर्निश अनुसरण करण्याचे, रामप्रभूच्या पावलावर पाऊल ठेवून जीवन जगण्याचे थोर भाग्य ज्याला लाभले तो दुसरा तिसरा कोणी नसूत रामानुगामी लक्ष्मणच!

* *

अनुक्रमणिका

# तुलसीचा रामरत भरत

श्रीरामाच्या सान्निध्याचे लक्ष्मणाला जसे भाग्य लाभले तसे भरताला लाभले नाही. श्रीरामाच्या वियोगाचे दुःख त्याला भोगावे लागले. पण या वियोगामुळेच त्याची रामभक्ती अधिकच उत्कट झाली. श्रीरामाखेरीज त्याने अन्य कशाचीही अपेक्षा बाळगली नाही. गंगामाईकडून त्याने जी एक मात्र मागणी मागितली ती ही—

'अरथ न धरम न कामरुचि गति न चहहुँ निरवान ।
जनम जनम रति रामपद यह वरदानु न आन ॥'

केवळ याच नव्हे तर जन्मोजन्मी रामभक्तीशिवाय भरताला कशाचीही अपेक्षा नाही. आणि रामाची अनन्य भक्ती हा तर तुलसींचा जिव्हाळ्याचा विषय. साहजिकच भरत हा त्यांचा आदर्श असल्यास नवल ते काय? त्याच्या चित्रणाचेवेळी तुलसींची अवस्था अंतर्बाह्य 'भरतरंगी' रंगल्यागत झाली होती. रामाज्ञेमुळे जनवासी झाला तरी भरत वृत्तीने वनवासीच राहिला. प्रजापालन व राज्यव्यवस्था यात अनुरक्त असूनही स्वतःविषयी तो पूर्ण विरक्त होता. रामाच्या आदेशानुसार सांसारिक कर्तव्ये बजावीत असताही जळकमळाप्रमाणे प्रपंचापासून अलिप्त होता. तुलसीदासांना रामभक्तीची खरीखुरी प्रेरणा भरतापासूनच मिळाल्याचे ते म्हणतात—

'सियराम - प्रेम पियूष - पूरन होत जनम न भरत को
कलिकाल तुलसीसे सठन्हि हठि रामसन्मुख करत को?'

रामभक्तीने ओतप्रोत भरत झाला नसता तर तुलसीसारख्यांना या कलियुगात कोणी बरे रामभक्तीला उद्युक्त केले असते, असा त्यांचा सवाल आहे.

गोस्वामीजींनी मानसाच्या प्रारंभिक भागात लक्ष्मणाच्याहि आधी भक्तराज म्हणून भरताला वंदन केले आहे. रामभक्तीच्या व्रतनेमाचे निष्ठेने पालन करणारा व एखाद्या लुब्ध मधुपाप्रमाणे श्रीरामचरणकमळात दडी मारणारा असे त्यांनी भरताचे वर्णन केले आहे.

श्रीराम व भरत यांचे परस्परांवरील प्रेम केवढे प्रगाढ होते ते दर्शविणारे लहानसान प्रसंगहि तुलसीने टिपले आहेत. जनकपुरीहून राम-सीता विवाह ठरला असल्याचे पत्र घेऊन दूत आला असता दशरथाने ते पत्र सभेत उत्सुकतेने वाचवून घेतले. अन्यत्र खेळण्यांत दंग असलेला भरत त्याचवेळी तेथे आला व त्याने पित्याला अनेक प्रश्न विचारले. *'पूछत अति सनेह सकुचाई । तात कहां ते पाती आई'*— बाबा, कुणाचे हे पत्र?माझे प्राणप्रिय बंधु राम-लक्ष्मण कोठे आहेत? ते खुशाल आहेत ना?' रामाच्या खुशालीचे वृत्त कळताच तो पुलकित झाला. श्रीरामाची भरताविषयीची अगदी अशीच वृत्ति दिसून येते.रामाचा अभिषेक करण्याचे ठरले तेव्हा सीतारामांना कांही शुभशकुन झाले. त्याचे अनेक अर्थ असतीलहि. पण आजोळाहून भरताच्या आगमनाचेच हे शुभसूचक चिन्ह आहे असे रामाला विशेषत्वाने जाणवले. *'पुलकि सप्रेम परसपर कहही । भरत आगमनु सूचक अहही ।'*— भरताची अनेक दिवसात भेट न झाल्याने श्रीरामांना त्याची खंत लागली होती.त्याच्या भेटीसाठी ते उतावीळ झाले होते. कारण *'भरत सरिस प्रिय को जगमाही'*— भरत त्यांचा जीव की प्राण होता. त्याच्या आठवणीने राम रात्रंदिवस व्याकुळ

अनुक्रमणिका

असत. *'रामहि बंधु सोच दिनराती । अंडन्हि कमठ हृदउ जेहि माती'*— कासवीचे अंतःकरण तिच्या अंड्यात दडलेले असते असे म्हणतात. तसे रामाचे चित्त भरतात दडले होते.

सुमंताबरोबर श्रीरामांनी अयोध्येत आपला कुशल संदेश पाठविला. आपली काळजी न करता ज्यापासून आपल्या वृद्ध पित्याला सुख होईल असे वागण्याचा त्याने सर्वांना निरोप पाठविला. भरतासाठी पाठविलेल्या विशेष संदेशात रामानी त्याला *'नीति न त्यजिअ राजपद पाएँ'*— न्यायनीतीने राज्य चालविण्यास सांगितले. प्राणपणाने प्रजेचे प्रतिपालन, सर्व मातांची मनोभावे सेवा, आप्तपरिजनांची यथोचित काळजी आणि मुख्यतः रामाच्या विरहाने व्यथित वृद्ध पित्याची जपणूक या भरताकडून रामाच्या अपेक्षा होत्या. शेवटी, आपला बंधुभाव निरंतर कायम राहू देण्याचा आवर्जून संदेश पाठविण्यास श्रीराम विसरले नाहीत.

अयोध्येत दशरथाचे रामवियोगाने देहावसान झाले. भरताला आजोळी निरोप गेला तो गुरुजींनी ताबडतोब बोलाविले आहे असा. लगबगीने निघालेल्या भरताला वाटेत अपशकुन झाले, वाईट स्वप्ने पडली. एक एक क्षण त्याला युगासारखा वाटला. कावळे, कोल्हे, कुत्रा व गाढवे यांचे अभद्र ओरडणे त्याला ऐकवेना. नद्या, तळी, बागा व सारे शहर त्याला विशोभित दिसली. स्त्री-पुरुषांची मुखे म्लान होती. कोणीच कांही बोलेना. केवळ त्याची माता कैकेयीच तेवढीच हर्षभराने त्याच्या स्वागतासाठी पुढे सरसावली. तिने भरताला आपल्या माहेरची खुशाली विचारली. ती कशीबशी सांगून भरताने प्रतिप्रश्न केला तो आपल्या घरच्या खुशालीबद्दल. इतर माता, रामलक्ष्मणादी कोठे आहेत म्हणून त्याने विचारले. कैकेयीचे डोळे कपटी अश्रूंनी डबडबले. ती मोठ्या काकुळतीने सांगू लागली, 'मंथरेच्या सहाय्याने मी सारे कांही सुरळीत जमवून आणले. पण दैवाने घात केला व महाराज देवाघरी निघून गेले.' भरत विव्हळ झाला. रामाच्या स्वाधीन आपणास न करताच पिताजी निघून गेल्याचे त्याला अपार दुःख झाले. त्याने आईला पित्याच्या निधनाने कारण विचारले. जे घडले होते ते तिने अथपासून सांगितले. तिच्या शब्दांचे शूळ भरताच्या कानामनाला असह्य भासले. आपणामुळे श्रीरामाला वनाला जावे लागले हे ऐकून क्षुब्ध झालेल्या भरताला क्षणभर पितृमरणाचाही विसर पडला. 'महाराज सफळ जीवन जगले व पुण्याईने स्वर्गाला गेले.आता त्यांच्यासाठी शोक करून काय होणार? तू आता राजकाजाकडे लक्ष घाल कसा' ही कैकेयीने आरंभलेली समजावणी जखमेवर मीठ चोळल्यासारखी, पिकलेल्या घावावर निखारा ठेवल्यासारखी भरताला दाहक वाटली. त्याचा राग अनावर झाला. आईचे नाते धुडकावून तो खवळून उठला, 'चांडाळणी, तुझी वृत्ती इतकी हीन होती तर तू जन्मताच माझ्या नरडीला नख कां लावले नाहीस? कुठे दशरथासारखा माझा पिता, रामलक्ष्मणासारखे माझे श्रेष्ठ बंधू आणि कुठे तुझ्यासारखी कुटिल आई! तुझ्या हृदयात अशी दुर्बुद्धि होती तर ते शतधा विदीर्ण कां झाले नाही? असले आसुरी वर मागताना तुझी जीभ कां झडून पडली नाही की तुझ्या थोबाडात किडे का पडले नाहीत? आणि पिताजींनी काय म्हणून तुझे मन राखावे? की मरणाच्यावेळी दैवाने त्यांचीही मति फिरविली? एकूण विधात्यालाही स्त्री-हृदयाची ओळख नीट पटलेली दिसत नाही. कपट, पाप व दुर्गुण यांनी ते खच्चून भरले आहे हे त्याला दिसले कसे नाही? अरेरे! ज्याला श्रीराम प्रिय नाही असा कोणीतरी या जगात असेल कां? एकटी तूच ग अशी कशी की जिला राम आवडेना? जा चालती हो, आपलं तोंड काळं कर! माझ्या समोरून निघून जा!'

आणि तेथून भरत तडक कौशल्येपाशी गेला. तिची दशा पाहून तो वरमून गेला. पिताजींच्या नावाने तो विलाप करू लागला. रामलक्ष्मण व सीतावहिनीना वनात पाठविणाऱ्या आपल्या जन्मदात्रीला व तिजबरोबर स्वतःलाही तो दूषणे देऊ लागला. "कैकेयी जन्मलीच कशाला? निदान वांझोटीच कां राहिली

अनुक्रमणिका

नाही? मजसारख्या अपेशी मुलाला प्रसवून तिने काय साधले? माझ्यासारखा नतद्दृष्ट उभ्या त्रिभुवनात तरी कुणी असेल कां? माते, तुझ्या या दुर्दशेस मीच कारण झालो नाही कां? पिताजींचा अंत, रामाचा वनवास या साऱ्याला मीच जबाबदार ठरलो! धिक्कार असो मला आणि जळो हे जिणे!!'

माता कौशल्येने भरताला उराशी कवटाळून धरले, त्याचे अश्रु पुसले व त्याला ती परोपरीने समजाऊ लागली, 'बाळ, कर्मगति का कोणाला टाळता आली आहे? दैवच फिरलं म्हणजे कुणाचं काही चालत नाही. एवढा अनर्थ कोसळला तरी मला मरण आले नाही. उगाच का बरे तू जिवाला त्रास करून घेतोस?' भरताने संयमपूर्वक स्वतःला सावरले व आता तो स्वतःच कौशल्या-सुमित्रा यांना विवेकाच्या गोष्टी सांगू लागला. शेवटी पुन्हां तो स्वतःला बोल लावू लागला, 'या कुलघातकी कृत्याला माझी लेशमात्रही संमति असेल तर जगातील सारी घोर पातके मला लागोत. माझ्या आईच्या या नीच कृत्याला माझी साथ असेल तर साऱ्या निंद्यात निंद्य पापांची फळे मला भोगावी लागोत. पण आई, मी असा पापी, दुराचारी असल्याची तुझ्या मनात पुसटशी जरी शंका असली तरी मला मरणाहून भयंकर दुःख वाटेल.' भरताच्या या निष्कपट वृत्तीने भारावलेली कौशल्या त्याचे सांत्वन करू लागली, 'बाळा, रामाविषयीच्या तुझ्या प्रेमाबद्दल कोण बरे शंका घेईल? एक वेळ चंद्र विष ओकू लागेल पण रामाविषयी तुझ्या मनात विपरीत भाव येणे त्रिकाळ अशक्य आहे! ज्या कुणाच्या मनात तुजविषयी असली अभद्र आशंका येईल त्याला स्वप्नातही सुख लाभणार नाही.'

मुनि वसिष्ठांच्या आज्ञेने भरताने दशरथाची उत्तरक्रिया यथासांग पार पाडली. त्याने मातांची समजावणी करून त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. रामदर्शनाच्या लोभाने कां होईना त्यांनी भरताचे म्हणणे ऐकले. गुरुजनांनी भरताला अनेक प्रकारे नीतीच्या गोष्टी सांगून संयमविवेक-पूर्वक विहित कर्तव्ये पार पाडण्याचा उपदेश केला–*'राय राजपदु तुम्ह कहुं दीन्हा । पिता वचन फुर चाहिय कीन्हा'*– 'महाराजांनी तुला राज्यपद देण्याचे वचन दिले ते तुला पुरे करावयास हवे. त्याचसाठी रामाने वनवास स्वीकारला व राजाने देह ठेवला. पित्याच्या आज्ञेचे पालन भल्याबुऱ्याचा विचार न करता पुत्राने करावे. राजसूत्रे हाती घेऊन जर तू प्रजेचे पालन केलेस तर महाराजांच्या आत्म्याला शांति लाभेल, श्रीरामालाहि त्यातच आनंद वाटेल व प्रजाजनांच्या सुखसंतोषातच तुझ्या मातांनाहि सुख वाटेल. श्रीराम वनवास संपवून परत आले म्हणजे तू त्यांना राज्य सोपवून त्यांची सेवा कर. पण तोपावेतो तुला राजधर्म हा पाळलाच पाहिजे.' भरताला हा सल्ला मानवला नाही. पण कौशल्यामातेने केलेल्या वत्सल समजावणीमुळे भरत सद्गदित झाला. तो म्हणाला–'मी आपणा सर्वांचा उपदेश ऐकून घेतला तो योग्य असेलही. पण माझी मनःस्थिती जाणून घेऊन आपण माझ्या बोलण्याची मला क्षमा करा. मी राज्य करावे यात आपणास माझे हित दिसले. पण माझ्या मते–

'हित हमार सियपति सेवकाई । सो हरि लीन्ह मातु कुटिलाई ॥'

श्रीरामाच्या सेवेवाचून माझे निराळे हित असूच शकत नाही. पण ते देखील आईच्या कुटिलपणामुळे मी गमावून बसलो आहे. सीतारामावाचून हे राज्य म्हणजे निव्वळ दुःख भार आहे. कपड्यावाचून भूषणे, वैराग्याशिवाय ब्रह्मविचार, आरोग्याविना देहभोग, हरिभक्तिविरहित जपतप आणि प्राणविहीन शरीर तसे हे सारे सारे रामचंद्राच्या अभावी आहे. मला रामापाशी जाण्याची अनुज्ञा देण्यातच हित आहे–

अनुक्रमणिका

*'कैकेयी सुअ कुटिलमति रामबिमुख, गतलाज'*— अशा मजसारख्याला राजा करून आपण सुखी व्हाल हा आपला भ्रम आहे.आपण जाणता की जो धर्मशील असेल तोच राजा होण्यास योग्य असतो. मी तसा नसताहि आपण मला राज्य दिले तर— *'मोहि राजु हठि देइहहु जबही । रसा रसातल जाइहि तबही'*— ही धरा रसातळाला जाईल. कारण सीतारामाच्या वनवासाला व पित्याच्या मृत्यूला कारणीभूत झालेला मजसारखा पापी या जगात कोणीही नसेल. एवढे अनर्थ ओढवले तरी निर्लज्जपणे प्राणधारण करून मी हे सारे ऐकतो, पाहतो आहे हेच नवल! कैकेयीपासून उत्पन्न झालेल्या या क्षुद्र देहावर प्रेम करणारे माझे प्राणच खरे तर नतद्रष्ट आहेत. माझ्या त्या आईने रामाला वनवास, पतीला स्वर्गवास, स्वतःला वैधव्य व अपयश, प्रजेला शोकसंताप देऊन मला मोठे सुख देण्यासाठी हे राज्य दिलेच आहे. आता आपण मला आणखी राज्यभिषेक कसचा करणार आहात? कैकेयीच्या उदरी जन्माला घालून दैवाने माझे एवढे हित साधले आहे. ते पुरेसे नाही काय? माझी स्थिती जन्माला घालून दैवाने माझे एवढे हित साधले आहे. ते पुरेसे नाही काय? माझी स्थिती एखाद्या भूतबाधा झालेल्याला वात व्हावा, त्यात त्याला विंचवाने डंख मारावा व त्यावर मद्य पाजावे अशासारखी विलक्षण झाली आहे. एकीकडे दैवाने मला दशरथसुत, रामानुज होण्याचे भाग्य दिले तर दुसरीकडे कैकेयीच्या पोटी जन्माला घालून ते हिरावून घेतले. मला 'राजतिलक' करण्यास आपण उत्सुक आहात यात राजाज्ञेचे पालन असेल हे खरे. पण कैकेयीखेरीज कोणालाही हे कार्य योग्य आहे असे वाटणार नाही. जी माझी सर्वात मोठी हानि तीच जर तुम्हाला माझा मोठा लाभ वाटणार असेल तर माझे ग्रहच वाईट असे म्हणावे लागेल. तसे नसते तर कौशल्येसारख्या प्रेमळ मातेने व परमज्ञानी गुरुजींनी मला असा आग्रह का बरे केला असता? श्रीरामांना जरी नाही तरी इतरांना तर अशीच शंका येईल की मी देखील या कटात सामील आहेच. पण मला त्याची विशेष चिंता नाही. माझे हृदय कढते आहे ते याच विचाराने की, सीतारामाच्या दुःखाला कारण मी झालो आहे. लक्ष्मण भाग्यशाली म्हणून त्याने रामाची पाठ सोडली नाही. आणि मी? त्यांना वनांत पाठविण्यासाठी जन्मलो! मी आपणास स्पष्टच सांगतो की, राज्यभिषेकांत मला मुळीच रूचि नाही. कारण— *'देखे बिनु रघुनाथ पद जिय कै जरनि न जाई'*— रामाच्या दर्शनाशिवाय कशानेही माझ्या मनाचा दाह शमणार नाही. मी सकाळीच रामाच्या भेटीसाठी जाणार! त्यांना शरण आलो म्हणजे माझे अपराध ते खचितच पोटात घालतील. वैऱ्याचेहि वाईट न करणारे श्रीराम मला क्षमा केल्याशिवाय कसे बरे राहतील? त्यांना विनवून मी पुन्हा अयोध्येला परत आणीन, कारण — *'जद्यपि जनमु कुमातु तें मैं सठु सदा सदोस'* जरी कुमातेच्या पोटी जन्मलो असलो तरी *'आपण जानि न त्यागिहहिं मोहि रघुबीर भरोस'*— प्रभु मला आपला म्हणून जवळ करतील असा मला पूर्ण भरंवसा आहे.

रामप्रेमाने ओतप्रोत असे हे भरताचे प्रदीर्घ बोलणे ऐकूण सर्वजण गदगद होऊन गेले. त्यांना वाटले की भरत म्हणजे जणू प्रत्यक्ष *'राम प्रेममूरति तनु आही'*— भरत म्हणजे मूर्तिमंत रामभक्ति! रामाकडे जाण्याच्या भरताच्या निर्णयाने सारेच जणु प्रसन्न झाले. प्रत्येकाने त्याच्याबरोबर जाण्याविषयी उत्सुकता दर्शविली. नगराची राखण करण्यासाठीही कोणीच राहण्यास तयार होईना! शेवटी भरतानेहि कुणालाच नाही म्हटले नाही.

सकाळी भरताने राज्यभिषेकाचे सारे साहित्य बरोबर घेण्यास सचिवास आदेश दिला. चित्रकुटाला जाऊन तेथे श्रीरामाला राजतिलक करण्याचे त्याने मनाशी ठरविले. आणि रथ, घोडे, पालख्या इ. सारा लवाजमाहि बरोबर घेण्यास त्याने सांगितले. कारण त्याच्या मते '*संपत्ति सब रघूपति कै आहीं*'—सारेच प्रभु रामचंद्राचे आहे. मग ते बरोबर कां न घ्यावे?

अनुक्रमणिका

भरताबरोबर त्याच्या माताहि पालख्यात बसून निघाल्या. हा सारा परिवार श्रृंगवेरपूरला आला. निषादराज गुहाला वाटले की, रामाविषयी काही कपटभाव मनात धरूनच भरत आला असावा कारण – *'जोपै जियँ न होति कुटिलाई । तौ कत लीन्ह संग कटकाई?'* हा सारा फौजफाटा कशाला त्याने बरोबर घेतला आहे? रामलक्ष्मणाचा घात करण्याचाच याचा हेतु असावा. आधी याने आपली अपकीर्ति करून घेतली. आता हा प्राणहि गमावणार! असा विचार करून गुहाने भरताशी झुंज देण्याचा विचार केला. पण भरताचा खरा हेतु कळल्याशिवाय तसे करू नये असे त्याच्या एका अनुभवी स्नेह्याने त्याला सांगितले. त्यालाहि ते पटले व अकारण भरताशी वैर पत्करण्याचे त्याने टाळले. तो उपहार घेऊन भरताच्या भेटीस गेला. हा रामाचा सखा असल्याचे भरताला कळताच त्याने गुहाला बंधुभावाने मिठी मारली. त्याच्या जातीविषयीचा विचारहि त्याच्या मनात आला नाही. आता निषादहि भरताबरोबर रामाकडे निघाला. वाटेत त्याने भरताला त्या साऱ्या जागा दाखविल्या जेथून राम, सीता, लक्ष्मण गेले होते, जेथे ते बसले होते, जेथे ते झोपले होते अथवा जेथे त्यांनी स्नान संध्या केली होती. भरताच्या डोळ्याचे व मनाचे जणू त्या जागा पाहून पारणे फिटले. रात्री सीता-राम दर्भाच्या पथारीवर झोपल्याचे ऐकून मात्र भरत विव्हल झाला. सद्‌गदित होऊन तो त्यांच्या या कष्टमय अवस्थेबद्दल हळहळून बोलू लागला. ज्यांनी दुःख कष्टाची सावलीही कधी पाहिली नाही त्यांच्यावर असला प्रसंग आपल्यामुळे आला याचे शल्य त्याला बोचत होते. तो आपल्या आईला साऱ्या अमगळाचे मूळ म्हणून *'धिक कैकेई अमंगल मूला'* या शब्दात निखंदू लागला आणि स्वतःलाहि तो नाना प्रकारची दूषणे देण्यास चुकला नाही. तो स्वतःविषयी म्हणाला –

मै धिग धिग अघ उदधि अभागी ।
सबु उतपातु भयऊ जेहि लागी ।
कुल कलक करि सृजेउ विधाता ।
साइं दोह मोहि कीन्ह कुमाता ॥

'मी साऱ्या पापांचा सागर, साऱ्या अनर्थ उत्पातांना कारण.मजसारख्या कुलकलंकाला जन्म देऊन वर माझ्या कुमातेने मला स्वामीद्रोहीहि केले आहे. निषादाने भरताला समजावून सांगितले की, यात त्याचा दोष नसून विधात्याचीच बुद्धि भ्रष्ट झाल्याचे हे लक्षण आहे. त्याने भरताला आश्वस्त केले की श्रीरामाच्या मनात त्याच्याविषयी प्रगाढ प्रेम आहे. त्याशिवाय कां त्यांनी निषादाजवळ भरताचे अमाप कौतुक केले?

सकाळी रामाच्या दिशेने हा सारा परिवार चालू लागला. पालखीत माता व गुरूजन आणि त्यांच्याबरोबर शत्रुघ्न. भरत मात्र मागाहून पायीच चालत होता. तो इतरांच्या आग्रहावरूनहि घोड्यावर बसला नाही. श्रीराम नव्हते का पायी चालत वनाला गेले! वास्तविक त्याने तर डोक्यावर चालून जावयास हवे –*'सिर भर जाऊं उचित असमोरा'*– भरताच्या श्रीरामाविषयीच्या भावना कमालीच्या कोमल होत्या. प्रयागराज तीर्थावर त्यांचा मुक्काम असताना भरताने गंगामाईला विनवून तिजकडून वर मागितला तो अलौकिक आहे –

अरथ न धरम न कामरुचि गति न चहहुँ निरबान ।
जनम जनम रति रामपद यह वरदानु न आन ॥

अनुक्रमणिका

रामभक्तीचा हा परमोच्च बिंदु आहे. रामरति हाच भरताचा मोक्ष, तेच त्याचे निर्वाण! आणि धर्मार्थकामादि पुरुषार्थ तर केवळ क्षुद्रच! गंगामाईने मृदुवाणीत 'तथास्तु म्हटल्याचा तुलसींनी निर्वाळा दिला आहे.

भरद्वाज मुनींच्या आश्रमांत जाऊन विनम्रपणे भरताने त्यांना अभिवादन केले. त्याची व्यथा जाणून अंतर्ज्ञानी मुनींनी त्याची समजूत घातली. कैकेयीची मति शारदेनेच भ्रष्ट केल्यामुळे जे काय घडले त्यात कुणाचाच दोष नाही. त्यांनी भरताच्या रामभक्तीचीही मनापासून वाखाणणी केली. भरत म्हणजे मूर्तिमंत रामप्रेमच असे ते म्हणाले *'तुम्ह तो भरत मोर मतएहू । धरें देह जनु राम सनेहू'*– आणि –*'भरत धन्य तुम्ह जसु जगु जमऊं'* असे म्हणून भरद्वाज मुनी प्रेमगग्दद होऊन गेले. शेवटी त्यांनी दशरथाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी भरताने राज्याचा स्वीकार करावा व श्रीरामालाहि त्यातच आनंद वाटेल अशा शब्दात भरताला आश्वस्त केले. मुनींच्या स्नेहवात्सल्याने भरत भारावून गेला पण त्याच्या मनातले शल्य मुनींना सांगितल्यावाचून त्याला राहवेना. तो म्हणाला की, 'माझे खरे दुःख आहे ते रामाच्या आजच्या अवस्थेबद्दल. त्यांचा तापस वेष, त्यांचे उन्हातान्हात अनवाणी भटकणे, कंदमूळफळाचा त्यांचा आहार, पाऊसपाण्यात कुशाच्या पथारीवर झाडाखाली आश्रयाला राहणे या साऱ्या गोष्टींच्या केवळ कल्पनेनेच माझे हृदय उलून जाते. मला दिवसा भूक नाही की रात्री झोप नाही. आणि या रोगावर काहीच औषध नाही या विचाराने माझ्या मनात काहूर उसळते. श्रीरामाने पुनरपि अयोध्येत येऊन राज्यकारभार करू लागावा हाच एक मात्र उपाय या माझ्या वर्तमान व्यथेवर आहे. तसे झाले तरच माझा रोग समूळ खणून निघेल *'मिटइ कुजोग राम फिरी आएं'*–आणि भरताच्या या उद्गारातून निथळणाऱ्या त्याच्या अवर्णनीय रामानुरक्तीने संतुष्ट झालेल्या मुनिवर्यांनी त्याला आश्वासन दिले की, 'तुझा हा सारा दुःखविषाद श्रीरामाचे दर्शन होताच निश्चितच नाहीसा होईल.'

मजल दरमजल करीत भरत परिवारजनासह चित्रकूटापासून थोड्याच अंतरावर येऊन पोचला. त्या रात्री सीतेला रामविरहाने दुःखी झालेल्या भरताचे आगमन झाल्याचे स्वप्न पडले ते तिने श्रीरामाला सांगितले. या स्वप्नामुळे रामाला आनंदहि झाला, व अस्वस्थताहि वाटली. काही वाईट बातमी येण्याची शक्यता व आशंका त्यांनी लक्ष्मणाला बोलून दाखविली. सकाळी उत्तर दिशेला धुळीचे गगनचुंबी लोट उठतांना त्यांना दिसले. थोड्याच वेळात कोलकिरात भरत येत असल्याची बातमी घेऊन आले. श्रीरामचंद्र हर्षपुलकित झाले. भरताच्या प्रेमळ आठवणीने त्यांचे डोळे पाणावले. मात्र भरताने चतुरंग सैन्य बरोबर आणल्याचे ऐकून रामाला विचार पडला. लक्ष्मणने आपल्या उतावळ्या स्वभावानुसार भरताच्या कुटिल हेतूची शंका बोलून दाखविली. 'भरताचे आपल्यावर नितांत प्रेम आहे हे खरे पण – *विषयी जीव पाइ प्रभुताई । मूढ मोहबस होहि जनाई*– सामान्यपणे अधिकाराचा माज ज्याला चढत नाही असा विरळाच. राज्य मिळताच भरताची तीच अवस्था झाली आहेसे दिसते. श्रीरामा, तुम्हाला एकांती गाठून तुमचा काटा काढण्याच्या हेतूनेच भरत आला असावा असे वाटते. *'जौं जिय होति न कपट कुचाली । केहि सोहति रथबाजी गजाली'* तसे नसते तर हा हत्ती घोडे व सैन्याचा सारा लवाजमा कशासाठी? आणि भरताला तरी दोष काय म्हणून द्यावा? साऱ्या जगातच असे घडत आले आहे.–*जग बौराइ राजपदु पाएं* –'राजमदाने जगच वेडेपिसे होते! त्याचे डोके ठिकाणावर राहत नाही.' आणि अनेक उदाहरणे देऊन लक्ष्मणाने आपल्या मताचे समर्थन केले. शेवटी श्रीरामाशी शत्रुभाव धरणाऱ्या भरताला धूळ चारण्याची प्रतिज्ञाहि त्याच्या स्वभावाप्रमाणे तो बोलून गेला. पण श्रीराम लक्ष्मणासारखे 'आशुरोष' थोडेच होते. त्यांचा अविचल – अथांग विवेक लक्ष्मणाला कसा समजावा? त्यांनी भरताविषयीचा आपला भरंवसा स्पष्ट शब्दात सांगून त्याच्याविषयी यत्किंचितहि शंका मनात न येऊ देण्याचा लक्ष्मणाला सल्ला दिला. ते भरताविषयी म्हणाले –

अनुक्रमणिका

*सुनहु लखन मल भरत सरीसा । विधि प्रपंच महँ सुना न दीसा ॥* लक्ष्मणा, अरे भरत साऱ्या जगाहून निराळाच आहे. राजमदाने त्याचा तोल सुटेल असा तो नाही. एवढेच काय, त्याहून मोठ्या पदामुळे देखील भरत विवेकापासून ढळणारा नाही–

'भरतहि होइ न राजमदु बिधि हरिहर पद पाइ ।
कबहुँ कि कांजी सीकरनि छीरसिंधु बिनसाइ ॥'

कांजीच्या शिंतोड्याने का कुठे समुद्र नासतो? अरे, एकवेळ अंधार सूर्याला गिळून टाकील, आभाळ ढगात सामावून जाईल, गोष्पदात अगस्ति मुनि बुडून जातील, मशकाच्या फुंकरीने मेरु पर्वत उडून जाईल, पण भरताला राजमद होणे शक्य नाही. लक्ष्मणा, मी तुला शपथेवर सांगतो की *'सुचि सुबंधु नहि भरत समाना'*, भरतासारखा भाऊ होणे नाही!-'

प्रातःकाळी गंगेचे स्नान करून व मातांची आज्ञा घेऊन भरत श्रीरामाच्या दर्शनाला निघाला. मधून पावले जड पडत. त्याच्या मनात शंका येई की श्रीराम आपल्याला भेट देतात की, आपला तिरस्कार करतात? पण पुन्हा श्रीरामाच्या बंधु प्रेमाची साक्ष पटून पावले जलद पडू लागत. शेवटी भरत श्रीरामाच्या पर्णकुटीजवळ येऊन पोहोचला. दुरुनच 'प्रभो रामराया, मी शरण आलो आहे, माझे रक्षण करा.' असे म्हणून त्याने शत्रुघ्नासह रामाला दंडवत प्रमाण केला. भरताला पाहताच रामाचे भान हरपले. लगबगीने ते त्याला भेटावयास निघाले. कुठे वस्त्र तर कुठे बाणाचा भाता, कुठे धनुष्य नी कुठे बाण! श्रीरामाला कशाचीच शुद्ध राहिली नाही. त्यांनी भरताला उचलून अधाशाप्रमाणे उराशी कवटाळून धरले. राम-भरतमीलनाचा हा अवर्णनीय प्रसंग शब्दांकित करणे आपल्या सीमित सामर्थ्याबहेरचे काम आहे असे तुलसींनी येथे म्हटले आहे! श्रीरामानंतर भरत लक्ष्मणाला भेटला व सीतामाईचे चरणरज आपल्या कपाळाला लावून त्यांना विनम्र प्रमाण केला. सीतेने त्याच्या मस्तकावरून स्नेहवात्सल्याने हात फिरविताच भरताला धन्यता वाटली. त्याचे मन साऱ्या कल्पित भय-आशंकातून मुक्त झाले!

आता भरताची अहोरात्र एकच विवंचना होती. श्रीरामाला परत अयोध्येला नेऊन राज्यभिषेक कसा करता येईल! हे गुरुजींच्या आज्ञेने होईल की मातांच्या प्रेमळ समजावणीने घडून येईल! आणि आपण तर रामाचे सेवकच आहोत, हट्ट कसा करावा? भरताला काही युक्ति सुचेना! गुरुजींशी सल्लामसलत करूनहि काही उपाय निघेना. रामलक्ष्मणाऐवजी भरत शत्रुघ्नांनी वनात राहण्याची गुरुजींची कल्पना भरताला अतिशय मानवली. पण रामाला ती पटली पाहिजे ना! सर्वजण रामापाशी आले. गुरुजींच्या मध्यस्थीने रामाच्या कानावर हा विचार घालण्यात आला. श्रीरामाने भरताची वाखाणणी केली –

'नाथ सपथ पितुचरन दोहाई । भयउ न मुअन भरत सम भाई -'

'त्रिभुवनात भरताच्या भ्रातृत्वाला तोड नाही! त्याची आर्त मी कशी बरे पुरवणार नाही?' हे श्रीरामाचे बोलणे ऐकून भरताला धीर आला. पुन्हा त्याने आपले दुर्दैव व आईचे कपट यांचा पाढा वाचला. सर्वांचे दुःख ज्यामुळे नाहीसे होईल व प्रजा सुखी होईल असे करण्यास त्याने रामाला कळवळून विनविले. भरताची व्यथा हृदय पिळवटून टाकणारी होती. श्रीरामाचे हृदय भरून आले व भरताला समजावून शांत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'जे घडले ते दैववशात्.त्यात दोष कुणाचाच नाही. तुझा तर नाहीच नाही. तुला का मी जाणत नाही? पिताजींनी सत्य व शब्द यासाठी प्राण दिले. तुला व मला त्यांच्या इच्छेप्रमाणे व गुरुजींच्या

आदेशानुसार जे इष्ट असेल तेच करावयास हवे' श्रीरामाचे भाषण ऐकून इंद्रासह सर्व देवांना काळजी पडली की भरताच्या हट्टामुळे राम वनातून परत गेले तर रावणाचा संहार तसाच राहील व आमचे संकट निवारण होणार नाही. श्रीराम देवा-मानवांची ही चिंता जाणून नव्हते असे थोडेच आहे! भरताच्या मनाजोगते कशाने होईल हा त्यांच्यापुढे मुख्य प्रश्न होता. आणि रामाच्या भक्तवत्सलतेची जाणीव असल्याने ते आपली मनीषा पुरविणारच ही भरताच्या मनाला खात्री होती –*अब करुनाकर कीजिअ सोई । जनहित प्रभु चित्त छोमु न होई*– लोककल्याणहि साधेल व आपलाहि नेमधर्म सुटणार नाही असे काही करावयास भरताने श्रीरामाला विनविले. त्याला वाटले की रामाला आपला प्रस्ताव मान्य होईल. ते अयोध्येस परतण्यास व त्यांच्याऐवजी भरतशत्रुघ्नास वनवास पत्करू देण्यास तयार होतील. पण रामाने काही निर्णय द्यावा त्यापूर्वी राजा जनकहि तेथे सहकुटुंब आल्याने हा प्रश्न तूर्त लांबणीवर पडला.

जनकराज परिवारासह काही दिवस चित्रकूटास राहिले. त्या अवधीत भरताच्या निरुपम शील स्वभावाविषयी व त्याच्या उत्कट रामभक्तीविषयी सर्वांची खात्री पटून भरताची श्रेष्ठता सर्वांच्या मनात बिंबली. कौशल्येने सीतेच्या आईजवळ भरताविषयी अत्यंत जिव्हाळ्याचे उद्‌गार काढले. खुद्द जनकराजांनीहि आपल्या राणीला भरताची थोरवी वर्णून सांगितली –*भरतु अवधि सनेह ममता की*– या शब्दात त्यांनी भरताच्या अमर्याद रामभक्तीचा गौरव केला. भरताविषयी त्यांची खात्री पटली की–– *परमारथ स्वारथ सुख सारे – भरत न सपनेहै– मनहूँ निहारे*– रामचरणानुरक्तीखेरीज भरताला अन्य कोणत्याहि स्वार्थ-परमार्थाची चाड नाही!

भरताची समस्या अद्याप सुटलेली नव्हती, रामाज्ञेप्रमाणे वागण्यास तो वचनबद्ध होता. त्याचे मन कसे राखता येईल हा रामापुढे पेचप्रश्न होता. वसिष्ठादींनाहि निर्णय घेता येईना. जनकासह सर्व भरताला समजावू लागले की त्याने रामाचा स्वभाव ओळखूनच काय तो विचार मांडावा. भरताने त्यांनीच मार्गदर्शन करावे अशी जनकासह सर्व गुरुजनांना विनंती केली. सर्वजण श्रीरामाकडे आले. त्यांची दिङ्‌मूढ अवस्था रामाने ओळखली. पुन्हा इंद्रादि देवांनी भरताची बुद्धी फिरविण्याची शारदेला विनंती केली. पण तिने ही गोष्ट करणे आपल्या सामर्थ्याबाहेरचे असल्याचे स्वच्छ सांगितले –*भरत हृदय सियराम निवासू । तहँ कि तिमिर जहँ तरनि प्रकासू*– सूर्याला अंधाराने कसे झाकता येईल? रामसीता ज्याच्या हृदयात वसत आहेत अशा भरताचे हृदयपरिवर्तन कसे करावे? भरत रामाच्या आज्ञेप्रमाणे वागण्याचे सर्वांसमक्ष आश्वासन देऊन बसला होता. पण स्वतः श्रीरामाला निर्णय घेणे तितकेच सोपे वाटत नव्हते. त्यांनी शपथपूर्वक असे सांगितले की 'जनकराज जशी आज्ञा देतील तसेच होईल'. आता जनकापुढे पेच! त्यांनी संकोचाने भरताकडे पाहिले. सर्वांना विनम्र भावाने वंदन करून भरत बोलू लागला. 'आपण सारे पितृतुल्य परमपूज्य आहात. मी लहान तोंडी मोठा घास घेतो आहे याची आपण मला क्षमा करा.बालस्वभावानुसार मी पित्याच्या व श्रीरामाच्या शब्दांचे उल्लंघन करून सर्वांसह येथे येण्याची धिटाई केली. आपणासमोर अधिक काही बोलावे हे उचित नव्हे. आपण द्याल ती आज्ञा शिरसावंद्य मानीन एवढेच सांगतो' आणि एवढे बोलून गहिवरून भरताने श्रीरामाच्या पायावर डोके टेकले! भरताच्या या विलक्षण भक्तिविषयी तुलसी म्हणतात – *जासु विलोकि भगति लवलेसू । प्रेम मगन मुनिगन मिथिलेसू ॥ महिमा तासु कहै किमि तुलसी । भगति सुमायँ सुमति हियँ हुलसी* –'ज्याच्या भक्तिलेशाने जनकासारख्या योग्यांनीहि प्रेममग्न व्हावे त्याच्या महिमेचे वर्णन तुलसीसारख्यांनी कसे करावे? केवळ भरताच्या भक्तीचे स्मरण केले तरी त्याचे सात्त्विक भाव बहरुन उठतात!'

अनुक्रमणिका

शेवटी सर्वांच्या अनावर उत्सुकतेची जाणीव होऊन श्रीराम बोलू लागले —'बा भरता, तू धर्मनीति जाणणारा आहेस; मनसावाचाकर्मणा तू निर्मळ आहेस. गुरुजनांसमोर मी तुझे कौतुक कसे करावे? पित्याच्या आज्ञेचे आपण दोघांनीही पालन करावे हाच आपला धर्म आहे. त्यांनी सत्यव्रताच्या पालनार्थ देह ठेवला. त्यांच्या अचानक अवसानाने प्रजेची कुचंबणा व कुटुंबाची वाताहत झाली नाही ती केवळ गुरुजनांच्या कृपेमुळेच! या प्रसंगी आपण रघुवंशाला शोभेल असेच विवेकपूर्ण वर्तन करावयास हवे आणि म्हणून मला असे वाटते की तू सर्व त्रास व संताप सोसूनहि प्रजेचे पालन करावे यातच सर्वांचे कल्याण आहे!' श्रीरामाने केलेल्या या सूत्ररूप मार्गदर्शनाने भरताच्या मनातून साऱ्या शोक संकोचाचे व शंकाविवंचनांचे पार उच्चाटन झाले. —*मुख प्रसन्न मन मिटा विषादु*— त्याचे मुख उजळून उठले. मन निरभ्र झाले आणि हात जोडून तो श्रीरामाला म्हणाला —*अब कृपाल जस आयसु होई । करौ सीस धरि सादर सोई*—'आपण द्याल ती आज्ञा मला शिरोधार्य आहे'. आणि रामाची इच्छा म्हणून भरत अयोध्येला परत जाण्यास सहर्ष सिद्ध झाला. 'मी व माझे सारे प्रजाजन आपल्या आज्ञेप्रमाणेच आपल्या विरहाचे दुःख सोशीतच का होईना पण आपल्याशिवाय अयोध्येत राहू'.अशा शब्दात त्याने रामाला आश्वस्त केले.

भरताचे हे निष्कपट आश्वासन मिळताच श्रीरामाने त्याला आपण परत येईपावेतो अयोध्येत जाऊन प्रजापालनार्थ राज्यसूत्रे हाती घेण्याचा व गुरुजींच्या आज्ञेप्रमाणे वागण्याचा उपदेश केला. या प्रसंगी त्यांनी राजप्रमुखाचे स्वरूप वर्णन केले ते असे —

मुखिया मुखसो चाहिये खान पान कहुँ एक ।
पालइ पोसई सकल अँग तुलसी सहित विवेक ॥

'मुख हे एकटेच खातपीत असले तरी ते पोषण मात्र सर्व अवयवांचे करते.जो मुखिया अथवा राजप्रमुख असतो त्याने असेच कार्य करावयास हवे की ज्याची परिणति प्रजाजनाच्या हितातच होईल.' भरताने श्रीरामाच्या खडावा मागून घेतल्या व त्यांना भक्तिभावाने मस्तकी धारण केले. या दोन खडावा म्हणजे जणु प्रजेच्या संरक्षणासाठी भरताला लाभलेले पहारेकरीच. भरताला निरोप देताना रामप्रभूंनी त्याला उराशी कवटाळून प्रेमाश्रूंनी चिंब करून टाकले. भक्तिप्रेमाचा तो अभूतपूर्व सोहळा होता! त्याचे वर्णन करताना तुलसींची भावभक्ति बहरून उठली आहे.

सर्वांचा निरोप घेऊन भरतशत्रुघ्न सपरिवार परत निघाले. अयोध्येला पोचल्यावर भरताने सचिव, ब्राह्मण, प्रजाजन सर्वांना वेगवेगळे भेटून आपापल्या विहित कर्तव्याचे पालन करण्याची व त्याच्याकडून ज्या अपेक्षा असतील त्या निसंकोचपणे पूर्ण करवून घेण्याची सर्वांना विनंती केली. शेवटी गुरुजीकडून अनुज्ञा मिळवून, मुहूर्त पाहून त्याने श्रीरामाच्या पादुकांची विधिपूर्वक सिंहासनावर प्रतिष्ठापना करविली व आपण व्रतस्थपणे शेजारीच नंदिग्राम या ठिकाणी पर्णकुटीत राहण्याचा निश्चय केला. मुनिवेष धारण करून व आहार विहारात नेमस्त राहून भरताने रामवियोगाचा अवधि घालविण्याचे ठरविले —*भूषण वसन भोग सुख भूरी । मन तन बचन तजे तिन तूरी*— सर्व सुखसाधनांचा तृणवत् त्याग केला. मात्र पादुकांच्या साक्षीने तो चोखपणे राज्यव्यवहार पाहू लागला. श्रेष्ठ भ्रातृभावाचे प्रतीक म्हणजे भरतभाव! उत्कट प्रेमभक्तीची पताका म्हणजे भरताची रामरति! त्याग, वैराग्य व अनासक्ति यांची कसौटी म्हणजे विरही भरताची जीवनचर्या! तुलसी म्हणतात की अशा या रामरत भरताचे वर्णन करण्यास कोणता कवि आपल्या सीमित प्रतिभेने धजावेल? शेषगणेशगिरा देखील येथे अपुरे पडतात! त्यांची गति मंदावते! *बरनत सकल सुकवि सकुचाही । सेस गनेस गिरा गमु नाही*—अशा या रामरत भरताला केवळ मौन प्रमाण करणेच योग्य!

अनुक्रमणिका

* *

# अनुक्रमणिका

# तुलसींचा भावभोळा केवट

अयोध्येचा निरोप घेऊन श्रीराम सीतालक्ष्मणासह सुमंताबरोबर रथात गंगातीरी येवून पोचले. 'मज्ञनु कीन्ह पंथश्रम गयऊ । सुचि जलु पिअत मुदित मन भयऊ.' गंगेत मज्ञन व जलपान याजमुळे श्रम परिहार झाल्यानंतर निषादराज गुहाच्या भेटीचा प्रसंग आहे.गुहाने अशोकवृक्षाखाली त्यांना विश्रांतीसाठी 'कुसकिसलयमय' मृदुल शय्या आंथरून दिली. ब्राह्म मुहूर्तावर उठून प्रातर्विधी व स्नान उरकून रामाने सुमंताला निरोप दिला. आता त्यांना गंगेच्या पार जावयाचे आहे. ज्या श्रीरामांविषयी 'जासु नाम सुमिरत एक बारा । उतरहिं नर भवसिंधु अपारा'– ज्याच्या नामस्मरणमात्रेकरून अपार भवसिंधु तरून जाता येते – असे म्हटले आहे ते राम केवटाकडून नौकेची मागणी करीत आहेत. आणि हे बरोबरच आहे. कारण तूर्त त्यांची भूमिकाच मुळी 'चरित करत नर अनुहरत'– मानवानुसारी लीला करण्याची आहे. तुलसीदासांनी आपल्या 'कवितावली' च्या अयोध्या कांडात असे म्हटले आहे की ज्यांच्या केवळ स्मरणामुळे अजामिळादी पापपुंजांचा उद्धार झाला आणि अधनाशिनी गंगेचा उद्भवच मुळी ज्यांच्या पदनखातून झाला ते प्रभु श्रीराम गंगेच्या पलिकडे जाण्यासाठी नाव मागत आहेत हे पाहून नावाडी केवट बुचकळ्यात पडला. प्रत्यक्ष परमात्म्याला आपल्या नावेत वाहून नेण्याची संधि ज्याला मिळाली तो केवट केवढा भाग्यवान असेल! पण आपण जेव्हा असे पाहतो की केवट या भाग्याचा स्वीकार करण्यात कुचराई करीत आहे तेव्हा आपणास आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. रामाने नाव मागावी आणि त्याने खुशाल म्हणावे की 'मी माझ्या नौकेत आपणास बसू देणार नाही. आपला डाव मी पुरतेपणी ओळखला आहे!' म्हणे 'कहइ तुम्हार मरमु मैं जाना!' केवढा हा उद्दामपणा! पण केवटाला असे म्हणताना काहीही संकोच वाटत नाही. त्याला काय हे माहीत नाही की रामाच्या पदाब्जरजात काही विलक्षण जादू आहे? त्याशिवाय का त्यांच्या चरणस्पर्शाने प्रत्येक वस्तूचे मानवात रूपांतर होते? तो सरळच रामावर आरोप करतो की "शिळेसारख्या टणक वस्तूची जेथे आपल्या पायधुळीने स्त्री होऊन जाते तिथे माझ्या या लाकडी नावेचा काय पाड! रामा, आपला पाय लागताच माझ्या नौकेची अहल्या होणार नाही कशावरून? 'तरनिउ मुनि घरिनी हो जाई । बाट परइ मोरि नाव उडाई ॥' आणि माझी नावच जर नाहीशी झाली तर माझ्या जीविकेचे साधनच नाही का मी गमावून बसणार? वाः! हे होणे नाही! श्रीरामा, मला दुसरा कुठला धंदाही येत नाही. माझ्या कुटुंबाचे पोषण देवा, या नावेनेच होते ना? 'एहि प्रतिपालउं सब परिवारू!" आणि केवटाचे हे भय अनाठायीही नव्हते.थोडक्याच काळापूर्वी विश्वामित्राबरोबर जात असता रामाच्या पदस्पर्शाने शिळेची अहल्या झाल्याची बातमी जगजाहीर झालेली होती ना! तीच गत आपल्या नौकेची होऊ नये ही केवटाची चिंता स्वाभाविकच होती. रामाला आपल्या नौकेत बसू देण्याचा धोका का म्हणून त्याने पत्करावा? त्याऐवजी कमरेइतक्या उथळ पात्राची माहिती रामाला देण्यास तो तयार होता. रामाने सहज तेथून चालत पलिकडे जावे! नाव हेच चरितार्थाचे साधन! तेच नाहिसे झाले तर त्याने घरधनिणीला काय बरे उत्तर द्यावे! आणि कसे आपल्या पोराबाळांचे पोषण करावे? यासंबंधी 'कवितावली' त तुलसीदासांनी म्हटले आहे की "परसें पग धूरि तरै तरनी, घरनी घर क्यों समुझाइहौं जू । तुलसी अवलंबु न और कछु लरिका केहि भाँति जियाइहौं जू ।"– पायधुळीचा स्पर्श होताच नावेची स्त्री झाली तर गृहिणीला मी कसे बरे समजवावे! आणि मुलाबाळांना पोसावे कसे! केवटाची ही काळजी साहजिकच नाही का? शिळेची जर अहिल्या होऊ शकते तर 'पाहन ते बनबाहनु काठकों कोमल है, जलु खाइ रहा है'– पाषाणापेक्षा कोवळी अशी ही लाकडी नाव आणि ती देखील सतत पाणी खात असलेली – या नावेचे काय व्हावयाचे? पण केवटाला एक पर्याय सुचला. "रामाचे पाय जर चांगले धुवून घेतले तर कदाचित त्यांच्या स्पर्शाचा तसा काही परिणाम व्हावयाचा नाही!" बिचारा भोळा केवट! खरेच तो रामाला म्हणतो "जौं प्रभु पार अवसि गा चहहू! मोहि पद पदमु पखारन कहहू ॥""रामराया, खरोखरच जर आपणास माझ्या नावेतून पार जायचे असेल तर निदान मला आपले पाय तरी धुवू द्या". हा

अनुक्रमणिका

केवटाचा भोळा भाव पाहून रामाला हसू येणे स्वाभाविक होते. कवितावलीत आपल्या या अटीवर तो अडूनच राहिलेला दाखविला आहे. आपल्या या भोळेपणाला राम हसलेत तर खुशाल हसोत. पण "पावन पाय पखारिके नाव चढाइहौं"— रामाचे पावन पाय धुवूनच मी त्यांना नावेत घेईन! आणि हा त्याचा हट्ट पाहून राम सीतेकडे पाहून खदखदून हसले! पण केवट भोळा असला तरी तो व्यवहारीही होता ना!

पायधुणीची ही अट चमत्कारिक असेलही पण केवटाच्या भावभोळ्या अंतःकरणाते ते निष्कलंक प्रतिबिंबच नाही का? रामाविषयी त्याच्या प्रेमभक्तीबद्दल तर शंकाच नको. पण चरितार्थाचे एकमेव साधन असलेल्या नौकेविषयीची त्याची कृतज्ञताही तेवढीच सखोल आहे. गरीब बिचारा! त्याने स्वतःच कवितावलीत आपल्या अवस्थेचे जे वर्णन केले आहे ते पहा. 'पात भरी सहरी, सकल सुत बारे बारे, केवटकी जाति कछु बेद ना पढाइ हौं.' 'पानभर मासळीने कशीबशी आपल्या लहानग्यांची मी गुजराण करतो, जातीने मी केवट आहे. मुलांना वेद थोडेच शिकविता येणार आहेत?' श्रीरामाशी त्याने युक्तिवाद तरी किती करावयाचा! त्याची विवंचना गैर आहे असे कसे बरे म्हणावे? त्याची ही अटही चुकीची म्हणता यावयाची नाही. रामाच्या पदस्पर्शाने नावेची स्त्री झाली तर त्याने आणखी एक बाईल कशी पोसावी? म्हणूनच तो रामाकडून भाड्याची अपेक्षाही बाळगत नाही. भक्तिभावाने तो त्यांना गंगेपलिकडे नेणार आहे. पण पाय धुवविण्याची अट त्यांनी मानली तरच! नाही तर तो त्यांच्याशी पुढे बोलायलाही तयार नाही. तो केवट नाही की त्याची कुठली नावबीव नाही असे तो रामाला स्वच्छ सांगून टाकतो. मग त्याच्या हटवादीपणाने चिडून लक्ष्मणाने त्याला बाण मारला तरी चालेल!

केवटाचा हा विलक्षण भोळेपणा पाहून श्रीरामाला मनोमन आनंद वाटल्याशिवाय राहिला नाही. त्यांच्या नजरेतून केवटाची विवंचना सुटली नाही. रामासारखे उतारू लाभावे आणि त्याने त्यांना गंगापार नेऊ नये! पण रामाच्या पदधूलीचे त्याचे भयही वाजवीच नव्हते का? त्याच्या या निष्पाप बालसुलभ वृत्तीने श्रीराम रुष्ट कसे होतील? मोकळ्या मनाने केवट आपली आशंका त्यांच्यापुढे बोलून दाखवीत होता, त्यात लपवाछपवी मुळीच नव्हती, ही गोष्ट राम पूर्णपणे जाणून होते. केवटाचा हा पेच सीता-लक्ष्मणांच्याही लक्षात आला आहे किंवा नाही हेही श्रीरामाला जाणून घ्यावेसे वाटले—

सुनि केवट के बैन प्रेमलपेटे अटपटे।<br>
बिहँसे करुनाऐन चितइ जानकी लखन तन ॥

केवटाचे बोल 'वाकुडे विचुके' वाटावे इतके भोळेभाबडे खरे पण ते 'प्रेमलपेटे' भक्तिप्रेमाने चिंब होते याविषयी रामाला यत्किंचितही शंका नव्हती. सीता व लक्ष्मण यांच्यादेखील लक्षात ही गोष्ट यावयास हवी अशी अपेक्षा त्यांच्याकडे पाहताना श्रीरामाच्या नजरेतून ओसंडत होती. प्रभूसमोर त्याचक्षणी करावयास हव्यात अशा तीन गोष्टी होत्या; केवटाची समजावणी करणे, नावेविषयीचे त्याचे भय नाहिसे करणे आणि त्याच्या मदतीने गंगेच्या पलिकडे उतरून जाणे. शेवटी त्यांनी अट मान्य केली. 'केवट, चल, तूच शेवटी जिंकलास. आम्हाला तुझी अट मान्य आहे. आता असे कर की तुझी नौकाही राहील व आम्हालाही गंगा ओलांडून जाता येईल. मात्र आता उशीर करू नकोस. लवकर आमचे पाय धुवून काढ आणि ने बाबा आम्हाला एकदाचा पलिकडे.' अखिल ब्रह्मांडाला वामनावतारात केवळ तीन पायाने व्यापून उरणाऱ्या परब्रह्माने एका सामान्य नावाड्याची नदीपल्याड जाण्यासाठी विनवणी करावी हे आश्चर्य तर खरेच! रामाची अनुज्ञा मिळताच केवट वाडगा भरून गंगाजल घेऊन आला. त्याच्या हर्षाला गगन ठेंगणे झाले. श्रेष्ठ पुण्यफलानेही न लाभणारी ही संधि त्याला मिळाली होती. रामप्रभूचे पादप्रक्षालन करताना तो ब्रह्मानंदात

मग्न झाला होता. ‘अति आनंद उमगि अनुरागा । चरन सरोज पखारन लागा.’ त्याच्या या महद्भाग्याचा कोणालाही हेवा वाटावा.पण भगवंताच्या सेवेची संधि लाभलेल्याचा हेवा करणे म्हणजे पापच नाही का? देवांनी पुष्पवृष्टि करून त्याच्या या अहोभाग्याविषयी मान्यता दर्शविली. देहबुद्धि नाहिशी झालेला केवट परमानंदात विलीन झाला. देवांनाही त्याच्याएवढा पुण्यपुंज कोणी आढळेना! कवितावलीत सहकुटुंब त्याने पादप्रक्षालन केल्याचे म्हटले आहे. त्याचा हा स्नेहभक्तीने चिंब भाव पाहून रामाला केवढा आनंद वाटला! त्यांनी सीता व लक्ष्मण यांच्याकडे पाहून प्रसन्न हास्य केले. रामचरणांचे तीर्थ सहकुटुंब प्राशन करून स्वतः बरोबर आपल्या पितरांचाही उद्धार केवट करीत होता! आधी स्वतः भवसागर तरून जाण्याची व्यवस्था चतुरपणे करून नंतरच भक्त भगवंताला गंगेच्या पार नेणार आहे! भक्ताच्या हट्टाचा हा अपूर्व विजयच म्हणावयाचा!

गंगा उतरून पलीकडे तीरावर श्रीराम, सीता व लक्ष्मण उभे आहेत. केवट कृतज्ञतेने गद्‌गद झाला आहे. प्रभूला तो निःशब्द दंडवत करतो. रामाच्या मनात त्याला काहीच न दिल्याचा संकोच घोळत आहे. ‘न नाथ उतराई चहौं.’ मला भाडे नको असे केवट म्हणाला म्हणून काय झाले? पतीच्या मनीचा भाव ओळखण्यात सीतामाई पटाईत आहेत. रामाचा संकोच ओळखून त्या आपल्या मणिमुद्रिका रामाच्या हवाली करतात. प्रभू भाड्याच्या रूपात केवटाला या वस्तू देऊ पाहतात. आणि आता मात्र केवटाच्या व्याकुळपणाची परिसीमा होते. भावनिर्भर होऊन तो रामचरणांना विळखा घालतो. त्याने का अशा क्षुद्र भौतिक लाभाची श्रीरामाकडून अपेक्षा बाळगली होती? ‘प्रभो, आपण मला आणखी जास्त लाजवू नका. मला आपणाकडून काय मिळावयाचे राहिले आहे म्हणून हे देत आहांत? साऱ्या भवबाधांपासून, दुःखभोगांपासून मुक्तीचे अद्‌भुत दान आपणच ना मला दिले आहे? मग आता आणखी काय देणे बाकी राहिले आहे प्रभो! ही क्षुद्र मजुरी? ती तर मी जन्माचीच करीत आलो आहे. आज तर तिचे सार्थक झाले! देवाने माझ्या नशिबाची कवाडे आज सताड उघडून दिलेली आहेत. अशी मौल्यवान मजूरी आज मला मिळाली आहे. आता मला काही काही नको—‘अब कछु नाथ न चाहिअ मोरे। दीनदयाल अनुग्रह तोरे ॥ फिरतीबार मोहि जो देवा । सो प्रसादु मैं सिर धरि लेवा’—मला आपल्या कृपेशिवाय काही नको. मला सर्व मिळाले. आपणाला मला काही दिल्याशिवाय राहवतच नसेल तर वनवासाहून परतताना आपण जे काही मला द्याल त्याचा स्वीकार आपला प्रसाद म्हणून मी आनंदाने करीन’. आपल्या या निर्धारावर केवट अढळ होता. काही घ्यावयास तो तयार झाला नाही. लक्ष्मण व राम आग्रह करूनही त्याला वळवू शकले नाहीत. शेवटी रामाने त्याला आपल्या निर्मल भक्तीचा वर दिला व त्याचा निरोप घेऊन पुढील पंथाला लागले.

रामचरितमानस व कवितावली यामधील हा केवटाचा ऋजुमनोहर प्रसंग तुलसीदासांच्या स्वतंत्र प्रतिभेचा उन्मेष वाटतो. वाल्मीकि रामायणात नौका आणण्यास रामाने निषादराज गुहाला सांगितले आहे आणि त्याच्या अमात्याने नाव आणली आहे. राम सीतालक्ष्मणासह या नावेतून गंगापार गेल्याचे येथे वर्णन आहे. एकनाथांच्या भावार्थरामायणात थोडे निराळेपण आढळून येते. गुह नौका आणतो असे त्यातही म्हटले आहे. सीता व लक्ष्मणांना आधी नौकेत बसवून श्रीराम स्वतः नावेत बसू लागणार तेवढ्यात निषादाची आई आक्रोश करू लागते ‘आम्हा समस्तांच्या घाता । श्री रघुनाथा करू नको’—‘श्रीरामा, थांब, तू नौकेला स्पर्श करून आमचा घात करू नकोस. तुझ्या चरण धूलीने पाषाणदेखील तरून जातात असे आम्ही ऐकिले आहे. मग या साध्यासुध्या लाकडी नौकेची काय गत होईल?’ नावेवरी आमुचें जिणे । ते उद्धरेल तुझेनि चरणें । मग आम्ही काय करणें । येणें जाणें खुंटेल ॥ ऐसे अगाध तुझे चरण । तुझे पदींचे रजःकण । लागतां जडाचें उद्धरण । त्यांचे क्षाळण करीन ॥ ‘देवा, ही नावच तरून गेली तर आम्ही जगावे कसे? आमच्या पोटावरच पाय पडणार नाही का? म्हणून रामराया, आधी तुझे पाय धुवू दे म्हणजे जडाचा उद्धार करणारी पायधूळ

निघून जाईल. मग तू खुशाल नावेत बैस.' आणि निषादीचा हा भोळा भाव पाहून रामाने तिजकडून पाय धुववून घेतले. भावार्थरामायणातील या वर्णनाच्या संदर्भात एकनाथांनी अध्यात्मरामायणातील या श्लोकाचा उपयोग केलेला आहे–

क्षालयामि तव पादपंकजं नाथ दारुदृषदोः किमंतरम् ।
मानुषीकरणचूर्णमस्ति ते पादयोरिति कथा प्रथीयसी ॥

'भगवंता, तुझी पायधूळ म्हणजे वस्तुमात्राला मनुष्यरूप देणारे जादूचे चूर्ण आहे. पूर्वी याच्याच प्रभावाने शिळेची अहल्या झाल्याची कथा सुप्रसिद्धच नाही का? आणि ही आमची नाव तर साधी लाकडाची. कशी बरे ती या प्रभावातून सुटेल? रामराया, आम्हाला क्षमा कर. पण तुझे पाय स्वच्छ धुवून काढल्याशिवाय आम्ही तुला नावेत बसू देणार नाही.' निषादीकडून पाय धुवून घेतल्यावर राम नौकेत बसले असे हे एकनाथांच्या भावार्थरामायणातील वर्णन आहे.

केवटाचा हा भोळाभाव आणि त्याचा हा बालसुलभ हट्ट त्याच्या निरागस, निष्कपट अंतःकरणाची प्रतिबिंबे आहेत. देवासमोर हाच शैशवभाव घेऊन जावयाचे असते. अहंकारी प्रौढत्वाने फुगलेल्या मनोभावाने का कुठे देवाची प्राप्ती होत असते? ईश्वराच्या सान्निध्यापासून नुकतीच विमुक्त झालेली अवस्था म्हणजेच शैशव. त्यात नाना प्रकारच्या सांसारिक विकृतींनी शुद्ध जीव अवलिप्त झालेला नसतो. साहजिकच त्या अवस्थेतील मनोदशा ही खऱ्या अर्थाने निर्मळ-निर्विकार असते. अशा वृत्तीचे भक्तच ईश्वराला विशेषत्वाने प्रिय असतात. मानसाच्या अरण्यकांडात श्रीरामांनी नारदाला भक्तिमार्गाची महत्ता समजावून सांगताना हेच सांगितले आहे 'मोरे प्रौढ तनय समज्ञानी । बालक सुत सम दास अयानी' –ज्ञानी भक्त हे प्रौढ मुलांसारखे पण भोळे भक्त अर्भकासारखे असतात. केवटाचा भावभोळा हट्ट म्हणजे बालहट्टच नाही का? पण या बालिशपणातच त्याचे रामाविषयीचे उत्कट निर्मल प्रेमही सामावलेले आहे. आणि तुलसींनी मानसाच्या प्रारंभी एका निराळ्या संदर्भात साऱ्या जगाचा एक अनुभव सांगून टाकला आहे तो या प्रसंगाला तर अगदी तंतोतंत जुळणारा आहे. ते म्हणतात 'जौं बालक कह तोतरि बाता । सुनहिं मुदित मन पितु अरु माता ॥'– बालकाचे बोबडे बोल आणि त्याची 'वांकुडी विचुकीं पाउलें' आईबापांच्या विशेष कौतुकाचा विषय होतात असे ज्ञानेश्वरांनीही म्हटले आहे. केवटाचे 'प्रेमलपेटे अटपटे' बोल ऐकून रामचंद्र हर्षनिर्भर न होते तरच नवल! ऋषिमुनि, जपीजोगी, ज्ञानीकर्मठ अशा सर्वच प्रकारच्या भक्तांचा प्रभूच्या दरबारी मेळावा आहे. पण आपल्या मुग्ध बालवृत्तीने त्याचे मन मोहून घेणाऱ्या केवट भक्ताचे त्यात काही आगळेच स्थान आहे! बापाला घोडा बनवून, त्याच्या पाठीवर बसून, त्याला आपल्या गुडघ्यांनी चालवयाला लावणाऱ्या आपल्या बालकाविषयी पित्याला काही विशेषच प्रेम वाटले तर त्यात आश्चर्य कसले! या स्नेहवात्सल्याचे शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य आहे. केवटाविषयी प्रभु रामचंद्रांची अगदी हीच भावना असावी. तुलसींचा हा केवट धन्य झाला! आणि त्याच्या निर्मात्याला धन्य धन्य वाटणे. साहजिकच नाही काय? भक्तराज तुलसीदास हे पात्र निर्मून कृतार्थ झाले आहेत!

* *

अनुक्रमणिका

# रामचरितमानस व भावार्थरामायण

मुनिवाल्मिकी हे रामायणाचे आदिकवि. पुढील काळातील सारी रामकाव्ये व सगळ्या रामगाथा त्यांनाच केंद्र कल्पून किरणजालाप्रमाणे आसमंतात फाकल्या. प्रादेशिक भाषांना वाचा फुटू लागण्यापूर्वी कालिदास-भवभूतींनी देववाणीत आपापल्या रुचीप्रमाणे रामचरित्राचे पुनर्लेखन केले. त्याचाही पूढिलांनी मागोवा घेतला आहे. हिंदूप्रमाणेच जैन व बौद्ध कवींनीदेखील आपापल्या पंथाच्या मुशीत ओतून या कथेला आवडीप्रमाणे आकार दिला आहे. या कथामंदाकिनीतून निरनिराळ्या मर्यादित प्रसंगांचे कालवेही निघाले आहेत. वेगवेगळ्या कालखंडात नाना-प्रकारांनी आळवली जात असताना या कथेचे वाल्मीकिप्रणीत स्वरूप जसेचे तसे कायम राहणे शक्य नव्हते. साहजिकच व्यक्ति-काल-रुचिसापेक्ष थोडा फार फरक तिच्या तपशीलात आढळणे अपरिहार्यच होते. पण असे असले तरी मूळ कथेचा गाभा मात्र अविकृतच राहिला आहे ही गोष्ट विसरता कामा नये.

रामचरितमानस ही तुलसीदासांची रामकथा व भावार्थरामायण ही एकनाथांची रामगाथा. या दोहोंची रचना साधारणपणे एकाच कालखंडात थोड्याफार अंतराने उत्तर व दक्षिण भारतात झालेली आहे. तुलसींचा जन्म इ. स. १४९८ मध्ये झाला असा एक समज आहे. पण दुसऱ्या दोन मतानुसार ते इ. स. १५२७ अथवा १५३३ मध्ये जन्मल्याचा निर्वाळा देण्यात आला आहे. एकनाथांचे जन्मवर्ष इ. स. १५२८ हे निर्विवाद असल्याने जर ते तुलसींचे समकालीन होते असे मानले तर दुसऱ्या दोन मतांप्रमाणे तुलसीदासांचा जन्म एकनाथांच्या जवळपासच्या वर्षातच झाला असणे अधिक संभवनीय वाटते. परंतु जन्मतिथीच्या वादात शिरण्याचे या लेखात कारण नाही. त्यांच्या रचनाच तेवढ्या अभिप्रेत आहेत. या दोन समकालीन संतकवींच्या रचनांचे स्थूल अवलोकन करून त्यात सारखेपणा कोठे आढळतो, कोणत्या तपशीलात भिन्नता दिसून येते व कोणत्या ठिकाणी मुळाबरहुकुम अथवा मुळापेक्षा निराळी वर्णने केली आहेत हे पाहण्याचा हेतु येथे आहे.

**ग्रंथांचे स्वरूप**

दोन्ही ग्रंथांची रचना सात-सात कांडात केलेली आहे. केवळ वाल्मीकिप्रमाणे एकनाथांनी ज्याला युद्धकांड हे नाव दिले आहे त्याचे नामकरण तुलसींनी लंकाकांड असे केले आहे. यातील अधिकांश प्रसंगांचे घटनास्थळ लंका असल्यामुळे ते नाव अन्वर्थकच आहे. मानसात प्रत्येक कांडाचा कथाभाग सलग असा दोहे, चौपाई, सोरठा, छप्पय इ. छंदात सांगितला आहे. भावार्थरामायणात कांडांची विभागणी अनेक अध्यायात केलेली असून सारी रचना ओवीबद्ध आहे. तुलसींनी संपूर्ण रचना स्वतः केली आहे. भावार्थात युद्धकांड अध्याय ४४ पावेतोचीच रचना नाथांची असून पुढील भाग गावबा या नाथ शिष्याने रचलेला आहे. आपणाकडून साक्षात रामप्रभूने हा ग्रंथ लिहवून घेतल्याचे नाथांनी म्हटले आहे. मानसात रामजन्मापासून रामराज्याभिषेकापर्यंतचा कथाभागच तेवढा वर्णिला असून ग्रंथाचा शेवट अध्यात्म-भक्ति चर्चेने करण्यात आला आहे. वाल्मीकिप्रमाणेच भावार्थरामायणात रामाच्या जीवनातील पुढील सीतात्यागाचा करुण प्रसंग, लवकुश जन्म, अश्वमेध यज्ञ, लवकुशांचे राससभेत आगमन, भूमिकन्या सीतेचे पातालगमन आणि शेवटी लक्ष्मण व राम यांची अवतार समाप्ति हा सारा कथाभाग सविस्तर वर्णिलेला आहे. उत्तरकांडात रावणादींच्या उत्पत्तीच्या निमित्ताने पौलस्त्यकथा, इंद्ररावणयुद्ध, अहिल्योपाख्यान इत्यादींचाही समावेश आहे. तुलसीदासांनी मात्र रामकथेतील हे दुःखद प्रसंग बुध्याच लिहिले नसावेत असे वाटते. काहींच्या मते ते मुळात तुलसीने लिहिले असून मानसाच्या जुन्या आवृत्त्यात ते असल्याचेही सांगितले जाते. परंतु उपलब्ध

मानसात मात्र एवढाच कथाभाग आढळतो. यावरून पुढील काळात कोणीतरी तुलसीच्या नावावर हा भाग मुळात जोडला असण्याची व म्हणून तो प्रक्षिप्त असण्याची शक्यता नजरेआड करता येत नाही.

दोन्ही कवींनी रामचरित्रकथनासोबत अधूनमधून अध्यात्म-भक्तीवर रूपकालंकारयुक्त प्रवचने केलेली आहेत. दोन्ही काव्ये प्रासादिक, रसाळ व सर्वांना सुलभ अशा भाषेत रचलेली आहेत. तुलसींनी उत्तर हिंदुस्थानातील बहुप्रचलित अवधी या खड्याबोलीतच संपूर्ण रचना केली आहे. युद्धवर्णनाच्या प्रसंगी दोघांही कवींच्या—विशेषतः नाथांच्याअंगात वीरश्री संचरल्याचा भास होतो. पण असे असले तरी दोन्ही काव्ये आहेत भक्तिरसप्रधानच हे मनात भरल्याशिवाय राहत नाही. दोघांच्या विवेचनाचे नीतिशिक्षण, सदाचार प्रशंसा, भक्तिज्ञानवैराग्यनिरूपण हे वैशिष्ट्य असून त्यांची संतसुलभ निराग्रही, विनयशील व मर्यादायुक्त वृत्ति जागोजाग प्रकट होते. या दोन्ही ग्रंथातून तत्कालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीची प्रत्यक्षाप्रत्यक्ष चित्रे उमटली आहेत. परकीय सत्तेच्या वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या समाजाची ढासळलेली नीतिमत्ता ही तिच्या हलाखी-लाचारीतूनच उगम पावलेली असते. या हीनदीन अवस्थेची चित्रणे दोन्ही काव्यात आहेत. कलियुगाचे रेखीव वर्णन करून संत तुलसींनी परधर्मीयांच्या अमदानीत झालेल्या जनतेच्या नैतिक अधःपतनाचा बोध करून दिला आहे. नाथांनी रावणाच्या बंदीगृहातील देवांची दैना सविस्तर वर्णून पारतंत्र्याविरुद्ध समाजाला सावध केले आहे. प्राप्त परिस्थितीवर मात करून आपल्या धर्माचे स्वराज्य स्थापन करण्याची प्रेरणा या प्रतिकूल परिस्थितीच्या विदारक दर्शनातून कुणाला तरी मिळावी हाच दोघाही संतकवींचा 'आंतरःकोऽपि हेतु' असावा. तुलसींनी रामराज्याचे तपशीलवार वर्णन केले आहे तसाच आदर्श डोळ्यापुढे ठेवून नाथांनी एक प्रकारे तत्कालीन समाजाच्या समंजस अपेक्षांनाच वाचा फोडली आहे.

**कथाविस्तार**

तुलसी आणि नाथ यांच्या रामचरितमानस व भावार्थरामायण या ग्रंथातील कथाकथनात साधारणतः साम्यवैषम्य कोठे आहे व त्यांचे वैशिष्ट्य कशात आहे याचा आढावा प्रत्येक कांडाच्या अनुरोधाने संक्षेपात घेण्याचा प्रस्तुत लेखात स्थूल प्रयत्न करण्यात आला आहे.

**बालकांड**

बालकांडात प्रारंभी मंगलाचरणात इतर वंदनाबरोबरच दोघांनी संतांबरोबर असज्जनांनाही वंदन केले आहे. नाथांनी दशरथाचे विजयाभिगमन व त्यानंतर पुत्रकामेष्टियज्ञ, पुरोडाशविभाग, कौसल्येचे दोहदकथन व रामजन्म असे वर्णन केले आहे. तुलसींनी प्रारंभी सतीने रामाची घेतलेली परीक्षा, त्यामुळे तिच्यावर झालेला शंकराचा रोष, सतीची दक्षयज्ञात आत्माहुती, पार्वतीजन्म, मदनदहन, शिवपार्वतीविवाह, मनुशतरूपातपस्या, रावणजन्म व त्याचे अत्याचार, देवांचा विष्णूकडे धावा, असे क्रमशः वर्णन करून रामावताराची पूर्वपीठिका निवेदन केली आहे. रामजन्मापूर्वी दशरथाने पुत्रकामेष्टि यज्ञासाठी ऋष्यश्रृंग मुनींना आणविल्याचा उल्लेख दोन्ही ग्रंथात आहे. नाथांनी ऋष्यश्रृंगाला अप्सरांनी आपल्या चेष्टांनी कसे मोहित केले याचे अत्यंत श्रृंगारिक वर्णन केले आहे. तुलसींनी मात्र केवळ एका चौपाईत 'सृंगी रिषिहि बसिष्ठ बोलावा । पुत्रकाम सुभ जग्य करावा ॥' एवढेच सांगून श्रृंगारादीला फाटा दिला आहे. संपूर्ण मानसातच तुलसींनी हा विवेक पाळल्याचे दिसून येते. भावार्थरामायणात रामजन्मापासून रामकृत शिवधनुर्भंग, सीता परिणय, अयोध्याप्रवेश एवढा कथाभाग बालकांडात आहे. पण मानसात बालकांडात

रामजन्मापासून रामलक्ष्मणांचे विश्वामित्रासह वनगमन, अहिल्योद्धार, जनकपुरगमन, शिवचापभंग, सीताविवाह, परशुरामाचे गर्वहरण आणि अयोध्येत पुनरागमन असा कथाभाग रंगविलेला आहे. कैकेयीस डोहाळे पुसणाऱ्या दशरथाजवळ तिने भरताला राज्य व रामाला वनवास देण्याविषयी मागणी केली आहे.कौशल्येला डोहाळे विचारले असता तिने धनुष्यबाणांची मागणी करून रावणाचा निःपात करण्याची मनीषा प्रगट केली आहे. ती अंतर्बाह्य रामरूप झाल्याचे नाथांनी दाखविले आहे. हा दोहदकथनाचा प्रसंग मानसात आलेला नाही. शिवधनुर्भंगानंतर परशुरामाच्या आगमनासंबंधी दोन्ही ग्रंथात थोडा फरक आहे. तुलसीदासजींनी रामाने धनुष्य तोडल्यावर "तेहि अवसर सुनि शिवधनुभंगा। आये भृगुकुलकमलपतंगा ॥" असे म्हणून क्रोधाविष्ट भृगुऋषींनी जनकाच्या सभास्थळीच उपस्थित केले आहे. येथे परशुरामाशी लक्ष्मणाने अत्यंत तिखट-खवचट भाषण केले असून रामाने त्यांचा राग शमविणारे शांत भाषण केले आहे. तुलसींनी रंगविलेला हा परस्पर संवाद फार बहारीचा आहे. भावार्थरामायणात वरात घेऊन अयोध्येला निघालेल्या दशरथाच्या वऱ्हाडाला वाटेत अपशकुन होतात. वादळ सुटते. सूर्य झाकाळला जातो. व अशा थाटात परशुरामाचा नाट्यपूर्ण प्रवेश रंगविला आहे. येथे परशुरामाने एकट्या रामाशीच युद्ध व संवाद केल्याचे म्हटले आहे. शेवटी परशुरामाने श्रीरामांचे सामर्थ्य ओळखले ते त्यांनी वैष्णवधनु चढविल्यानंतरच असे दोघांनीही दाखविले आहे.

राम रमापति कर धनु लेहू। खेंचहुँ मिटै मोर संदेहू ॥ (तुलसी. बाल. दो. २८४ : ७)

आणि

असो युद्धाची अटाटी। सांडिली शस्त्र धरावयाची गोष्टी।
विष्णुचाप आहे माझे मुष्टीं। तें तूं जगजेठी सज्जी पां ॥४५॥
जरी तूं हें सज्जिसी संपूर्ण। तरी तुवां मज जिंतिले जाण ॥ (भावार्थ. बालकांड, अ. २६ ओ. ४५-४६)

**अयोध्याकांड**

भावार्थरामायणात अयोध्याकांडाचा प्रारंभ रामलक्ष्मणाच्या शस्त्रास्त्रविद्येच्या शिक्षणाने होतो. रामाला राज्यभिषेकाची तयारी, रामवनगमन, भरताचे वनात रामाला भेटून पादुकांसह परत येणे व नंदिग्रामवास हे त्यातील विषय आहेत. जवळजवळ हाच कथाभाग रामचरितमानसातही आहे. भावार्थात अयोध्याकांडात वर्णिलेला श्रीरामकृत काकनिग्रहाचा प्रसंग मानसात मात्र अरण्यकांडात घेतलेला आहे. शिवाय या दोहोंच्या आशय व अभिव्यक्तीतही फरक आहे. श्रीरामाने यज्ञार्थ जमविलेल्या मृगमांसाचे झडप घालणाऱ्या कावळ्यांपासून सीता रक्षण करीत आहे. कावळ्याचा वेष धारण केलेला सुदसुव नामक गंधर्व सीतेच्या लावण्यावर लुब्ध होऊन तिच्या स्तनांवर कामुकपणे झेपावतो. सीतेला त्याचे निवारण करणे शक्य होत नाही. त्रस्त होऊन ती जमिनीवर कोसळते. एवढ्यात श्रीराम तेथे येतात व ईषिकामंत्राने मंतरलेली दर्भाची काडी त्या काकवेशधारी गंधर्वावर सोडतात. तो त्रिभुवनात फिरतो पण त्याला संरक्षण मिळत नाही. शेवटी नारदाच्या उपदेशानुसार सीतारामांना शरण आल्यावरच राम त्याला एका डोळ्याने आंधळा करून सोडून देतात. असा हा भावार्थरामायणातील कथा-भाग आहे. नाथांनी सीतेच्या सौंदर्याचे व कावळ्याच्या कामुकचेष्टांचे फारच श्रृंगारिक वर्णन केले आहे. तुलसीदासांनी मात्र सीतेच्या सौंदर्यावर भुलून नव्हे तर रामाच्या सामर्थ्याची परीक्षा घेण्याच्या मूर्ख हेतूने काकवेशधारी इंद्रपुत्र जयंत सीतेच्या चरणांना आपल्या चोचीने टोचतो असे दाखविले आहे. जयंताच्या या आचरटपणाचा उल्लेख पुन्हा लंकाकांडात मंदोदरीने

रावणाला समजावताना केला आहे. रामाने जयंताचा एक डोळा फोडून त्याला जीवदान दिले असे मानसातील वर्णन आहे. तुलसीदास रामसीता यांना प्रत्यक्ष ब्रह्म व मायाच मानतात. म्हणून त्यांच्या संबंधी ते सर्वत्र अत्यंत मर्यादेने लिहितात. सीतेला माता म्हटल्यानंतर तिच्या लावण्याचे श्रृंगाररसपूर्ण वर्णन ते करतील हे संभवनीयही नाही.

**अरण्यकांड**

भिल्लीण शबरीचा श्रीरामाशी भेटीचा प्रसंग दोन्ही रामायणात सारखाच आहे. फरक आहे तो एवढाच की रामांनी तिला आत्मज्ञानाचा उपदेश केल्याचे नाथांनी तर नवविधा भक्तीचा उपदेश केल्याचे तुलसींनी म्हटले आहे. योगाग्नीने निजतेज चेतवून तिने आत्मदाह केल्याचे व ती अक्षय लोकात गेल्याचे दोघांनीही दाखविले आहे. विराधवधाच्या संदर्भात तपशीलात थोडा फरक आहे. रामलक्ष्मणासमवेत असलेल्या सीतेचे हरण करून तिला आपली पत्नी होण्याचा आग्रह धरणाऱ्या विराधाला रामाने बाण मारला व दिव्य देह धारण करून तो निजधामाला गेला असे भावार्थात वर्णन आहे. मानसात तो रामलक्ष्मणाला आडवा आला एवढेच म्हटले आहे. हा विराध म्हणजे रंभेवर आसक्त होऊन उन्मत्तपणा केल्याबद्दल कुबेराने श्राप देऊन राक्षस केलेला तुंबर नावाचा गायक असल्याचे भावार्थरामायणात म्हटले आहे.

रावणाने केलेल्या सीताहरणाच्या संदर्भात लक्षणीय अशा एक दोन बाबी आहेत. मानसात रामाने स्वतःच वनातील जोखमी लक्षात घेऊन सीतेला आपले खरे रूप अग्नीत लपविण्यास व प्रतिबिंबरूपाने वावरण्यास सांगितले आहे. “तुम्ह पावक महुँ करहु निवासा । जौं लगि करौं निसाचर नासा ॥”. आणि रामाज्ञेप्रमाणे सीतेने “निज प्रतिबिंब राखि तहँ सीता । तैसइ सील रूप सुविनीता ॥” स्वतः छायारूपाने वावरताना आपल्या मूळ स्वरूपात व वर्तनात काहीही बदल दिसू दिला नाही. भावार्थरामायणात यतिवेषधारी रावण जेव्हा सीतेला लक्ष्मणरेषेच्या बाहेर येवून भिक्षा घालण्यास सांगतो तेव्हा ती आश्रमाच्या आत जाऊन आपले मूळ रूप अग्नीत लपविते व छायारूपाने बाहेर येऊन वावरते असे म्हटले आहे. तुलसींनी लक्ष्मणरेषेविषयी या जागी काहीही सांगितले नाही. पण पुढे लंकाकांडात रामाशी विरोध न करण्याविषयी मंदोदरी रावणाची समजावणी करीत असताना मात्र त्याला हिणवून या लक्ष्मणरेषेचा उल्लेख ती करते. “रामानुज लघु रेख खचाई । सोउ नहिं नाघेहु असि मनुसाई ॥” हे शब्द तुलसींनी तिच्या तोंडी घातले आहेत. या संदर्भातील तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी की रामाच्या अपराजेयतेविषयी निःशंक असल्यामुळे मायामृगाने फोडलेल्या ‘हे लक्ष्मणा, हे सीते’ या आर्त टाहोने लक्ष्मण विचलित होत नाही. पण सीता मात्र भेदरून घाबरून त्याला रामाच्या रक्षणासाठी जाण्याचा आग्रह करते. त्याच्या समजावण्याचा अनुकूल परिणाम होणे तर दूरच, उलट सीता लक्ष्मणावर अत्यंत रुष्ट होते. बेभान झाल्यागत ती लक्ष्मणावर असे गलिच्छ आरोप करते की त्याच्या शीलाविषयी जाणीव असणाऱ्या कुणाच्या कल्पनेतदेखील ते येणार नाहीत. “तू विश्वासघातकी, कपटी आहेस. माझी अभिलाषा धरून तू सेवेचे सोंग घेऊन रामाबरोबर आला आहेस. रामाचे बरेवाईट झाले म्हणजे मला बळकावण्याची तुझी इच्छा आहे. पण याद राख, मी तुला कधीही लाभणार नाही.” अशा हिडीस व मर्मभेदक आरोपांचा मारा करून शेवटी सीतेने लक्ष्मणाला तेथून जायला लावले. जाताना त्याने लक्ष्मणरेषा काढून तिचे उल्लंघन न करण्याची विनवणी सीतेला केली. या रेषेच्या अनुल्लंघनीयतेचे विस्ताराने वर्णन नाथांनी केले आहे. हे झाले भावार्थरामायणातील वर्णन. मानसकार तुलसीदासांनी सीतामातेच्या तोंडी असली किळसवाणे आरोप करणारी भाषा घालण्याचे टाळले आहे. त्यांनी केवळ एवढेच म्हटले आहे की “मरम वचन जब सीता बोला । हरिप्रेरित लछिमन मन डोला ॥”

अनुक्रमणिका

शेवटी नाइलाजाने लक्ष्मणाने तेथून जाताना सीतेच्या रक्षणाचा भार वनदेवता व स्थानदेवता यांच्यावर घातल्याचे तुलसींनी दाखविले आहे.

याच अरण्यकांडात नाथ व तुलसी या दोघांनी सीताहरणासाठी लपतछपत आलेल्या यतिवेषधारी रावणाचे जे वर्णन केले आहे त्यात विलक्षण साम्य आहे. हे सहजोद्‌भव आहे की परस्परांच्या रचनांच्या परिचयातून स्फुरलेले हे वर्णन आहे असा विचार पडावा इतका विस्मयकारक सारखेपणा त्यात आहे. "गुंफे नसता श्रीरामलक्ष्मण । शून्य मंदिरीं रिघे श्वान ॥ तेंवी आला दशानन । सीताहरण कार्यार्थी ॥" हे नाथांनी केलेले वर्णन "सो दससीस स्वानकी नाई । इतउत चितइ चला भडिहाई ॥" या तुलसींनी केलेल्या रावणाच्या वर्णनापेक्षा निराळे आहे काय?

**किष्किंधाकांड**

या कांडात सुग्रीवाचा पक्ष घेऊन आपल्यावर बाण सोडल्याबद्दल वालीने श्रीरामाला दोष दिला आहे. भावार्थात रामाने आपला घात करण्यासाठी अधर्मयुद्ध केल्याचे दोषारोपण वालीने केले आहे. रामचरितमानसात वालीने रामाला 'आपण मला व्याधाप्रमाणे कां मारले?' असा प्रश्न विचारला आहे. पण रामाच्या हातून मरण आल्याबद्दल संतोष व्यक्त करून अंगदाला आपल्या चरणी रुजू करून घेण्याबद्दल वालीने श्रीरामाला विनविले आहे. वालिवधाने शोकविव्हल झालेल्या तारेने 'सीता तुज समवेत राहणार नाही, ती पुन्हा वनवासाला जाईल व तुला तिचा विरह सहन करावा लागेल' असा शाप श्रीरामाला दिल्याचे नाथांच्या रामायणात म्हटले आहे. दोन्ही ग्रंथात विरहव्यथित तारेला जीव व देह यातील फरक व आत्म्याचे अमरत्व समजावून श्रीरामाने तिचे सांत्वन केल्याचे म्हटले आहे. याच कांडात सीतेच्या शोधार्थ वानरांसह भटकणाऱ्या हनुमंताची एका विशाल विवरात एका तापसीशी भेट झाल्याचे वर्णन आहे. मानसात 'तेहि सब आपनि कथा सुनाई' एवढेच म्हणून आपली व विवराची हकीगत केवळ सहा चौपायात तापसीने सांगितली आहे. पण भावार्थरामायणात तापसी व हनुमंत यांचा संवाद विस्ताराने वर्णिला असून या संदर्भात मयासुराची कथा व त्याने निर्मिलेल्या या अद्‌भुत विवराची साद्यंत माहिती देण्यात आली आहे.

**सुंदरकांड**

हनुमंताने लंकेत प्रवेश केल्याचे वर्णन भावार्थात आले आहे ते किष्किंधाकांडाच्या शेवटच्या अध्यायात. पण मानसामध्ये ते सुंदरकांडाच्या प्रारंभी आलेले आहे. एकनाथांनी सुंदरकांडात मंदोदरीच्या जन्माची कथा आणि राजेंद्रमोक्षाचे उपाख्यान वर्णिले आहे. तुलसीदासांनी या गोष्टींचा समावेश आपल्या ग्रंथात केला नाही. आणखीही एक फरक आहे तो असा की नाथांनी याच कांडाच्या चाळिसाव्या अध्यायात सेतुबंधाचे कार्य पूर्ण होऊन रामचंद्राने लंकेत प्रवेश केल्याचे प्रदीर्घ वर्णन केले आहे. तुलसींनी सुंदरकांडाऐवजी लंकाकांडाच्या प्रारंभी सेतुबंधनाचे व रामाच्या लंकाप्रवेशाचे थोडक्यात वर्णन केले आहे. प्रस्तुत वर्णन वाल्मीकिप्रमाणेही याच क्रमाने असल्याचे दिसून येते. याच सुंदरकांडात एकनाथांच्या विनोदबुद्धीचा प्रत्यय देणारा एक गमतीचा प्रसंग आहे. तेहतिसाव्या अध्यायात मारुतीच्या शेपटीला लंकेत होती नव्हती तेवढी सारी वस्त्रे गुंडाळूनही काम भागेना असे वर्णन आहे. राजस्त्रियांच्या उत्तमोत्तम वस्त्राभरणापासून पीतांबर श्वेतांबर व इतर रेशमीवस्त्रांचे कापड दुकानातील साठे संपुष्टात आले तरी पुच्छ काही गुंडाळले जाईना. शेवटी सर्वांच्या अंगावरील वस्त्रेही उतरविण्यात आली व नग्न स्त्रीपुरुष मागेपुढे हात लावून लपण्यासाठी पळू लागले. तरीही पुच्छ उघडेच राहिले. शेवटी मेहुणे-पाहुणे, दिवाळ सणासाठी

अनुक्रमणिका

आलेल्या लेकी-जावई यांचीही वस्त्रे फेडण्यात आली. सारे विवस्त्र! आणि नाथांचा विनोदाचा उमाळा येथेच संपत नाही. या साऱ्या कापडावर ओतण्यासाठी राज्यात होती नव्हती ती सारी तेलातुपाची टाकी रिकामी झाली. सारे कापड व सारे तेलतूप संपले.यावर विद्युन्माली नामक राक्षसाने जेव्हा असे सुचविले की आता सीतेलाही विवस्त्र करा तेव्हा दचकून हनुमंताने आपले पुच्छ आवरते घेऊन गुंडाळले जाऊ दिले. भावार्थातील हे वर्णन मानसात नाही.

**युद्धकांड अथवा लंकाकांड**

रामायणात युद्धकांडाचे महत्त्व थोर आहे. श्रीरामरायाने 'विनाशायच दुष्कृताम्' घेतलेल्या अवताराची सांगता यातच झाली आहे. रावणासकट समस्त राक्षसकुळाचा निःपात हाच रामावताराचा हेतु. तो याच कांडात पूर्णत्वाला गेला आहे. असुरांचा नाश, देवांची रावणाच्या बंदीगृहातून मुक्तता व आदर्श रामराज्याची स्थापना होण्यासाठी आवश्यक परिस्थितीची निर्मिति या गोष्टी याच कांडात झाल्या आहेत. आपापल्या काळच्या पारतंत्र्यजन्य अवस्थेतून पार पडून प्रजाजनांना सुखासमाधानाचे धर्मराज्य कसे लाभेल ही विवंचना नाथ व तुलसी या दोन्ही संतांना होती. साहजिकच प्रस्तुत युद्धकांडातील रामरावणांचा अभूतपूर्व असा समर प्रसंग रंगविताना दोघांनाही स्फुरण यावे यात नवल नाही. तुलसीदासांनी या युद्धवर्णनात पुनरुक्तीचा तर नाथांनी पाल्हाळ व अतिशयोक्ती यांचा आश्रय घेतला आहे. या कांडात दोघांनीही बरेच स्वातंत्र्य घेतले असल्याने दोघांच्याही तपशीलात काही ठळक व उल्लेखनीय भिन्नता आढळते.

वाल्मीकिप्रमाणे भावार्थात ज्याला युद्धकांड म्हटले आहे त्यालाच तुलसी लंकाकांड म्हणतात. सीतेला भेवडावून वश करण्यासाठी रावणाने श्रीरामाचे कपटशिर तिच्यापुढे ठेवले पण रामाच्या सामर्थ्यावर सीतेचा भरवसा असल्याने तिने हे कपट ओळखल्याचे भावार्थरामायणात म्हटले आहे. रामाच्या कपटशिराप्रमाणेच मायिक सीतेच्या वधाचा व रामाला भ्रमित करण्याचा रावणाचा प्रयत्न नाथांनी वर्णिला आहे. पण भक्त तुलसीला राम व सीता यांच्यासंबंधी असली कल्पनाही मानवणे शक्य नसल्याने या प्रसंगाचे वर्णन त्यांनी मानसात केले नाही. तुलसीदास श्रीरामाला मानव मानीत नाहीत. प्रभु म्हणूनच सर्वत्र ते त्यांचे चित्रण करतात. म्हणून अशा गोष्टीविषयी त्यांच्या भक्तीचा हळुवारपणा स्पष्ट प्रत्ययाला येतो. रामसीता यांच्या संदर्भात मरणादि मानवोचित गोष्टींची शक्यताही जमेस धरण्यास ते तयार नाहीत.

अंगदशिष्टाई, मंदोदरी रावण संवाद, इंद्रजीताशी रामलक्ष्मणांचे झालेले युद्ध व त्याने रामलक्ष्मणांना नागपाशात व नंतर शरबंधात बांधणे इ. वर्णने दोन्ही ठिकाणी बरीच सारखी आहेत. केवळ इंद्रजीताऐवजी हे युद्ध मेघनादाशी झाल्याचे तुलसींनी म्हटले आहे. भावार्थात मेघनाद हे नाव नाही. अहिरावण, महिरावण यांचे प्रसंग भावार्थाप्रमाणे मानसात नाहीत. इंद्रजीताच्या बाणांनी लक्ष्मण मूर्च्छित झाला, त्यावर रामाने घोर विलाप केला व हनुमंताने श्रीरामाचे सांत्वन करून काळापासून लक्ष्मणाला कोणत्याही लोकातून परत आणण्याची प्रतिज्ञा केली असे नाथांनी दाखविले आहे. हे वर्णन तुलसींनी केले नाही. यानंतर सुषेण वैद्याने द्रोणागिरीवरील दिव्य औषधीने लक्ष्मणाला सावध केले असे वर्णन भावार्थात आहे. पुढे पुन्हा रावणाच्या बाणाने लक्ष्मणाला शक्ति लागल्याचे वर्णन त्रेचाळिसाव्या अध्यायात आहे ते वाल्मीकिप्रमाणे आहे. रामचरितमानसात थोडी भिन्नता आढळून येते. मेघनादाच्या बाणाने लक्ष्मणाला शक्ति लागते. सुषेणाच्या आदेशानुसार हनुमंत उत्तरेकडून औषधीसह द्रोणागिरीच उचलून आणतो. वाटेत

भरताच्या बाणाने त्याला मूर्छा येते असे वर्णन तुलसींनी केले आहे. लक्ष्मणाला रावणाच्या शस्त्राने जी शक्ति लागते तिचे निवारण स्वतः श्रीरामांनी केले व ती शक्ति वर आकाशात निघून गेली असे त्यांनी म्हटले आहे.

विजय प्राप्त व्हावा म्हणून इंद्रजिताने यज्ञ आरंभिला व लक्ष्मण सुग्रीव आदींनी त्याचा विध्वंस केला असे भावार्थात सांगितले आहे. युद्धभूमीतून निराश होऊन परत गेलेल्या रावणाने हा यज्ञ केल्याचे व रामसेनेने तो उधळून लावल्याचे मानस सांगते. भावार्थरामायणात रामाच्या हातून मरण यावे यासाठी उत्सुक असलेला रावण युद्धात रामस्तुति गातो, 'श्रीराम माणूस नव्हे जाण' असे म्हणतो व पुन्हा पुन्हा आपल्याला हात व शिरे कां उगवतात याचे कारण "श्रीरामामृत कूपिका । अखंड माझे हृदयीं देखा" असे तो श्रीरामाला सांगतो. नाथांच्या या वर्णनाहून निराळे तुलसींनी केलेले वर्णन आहे. रावणाच्या नाभीत अमृतकुंभ असल्याने तो मरत नाही हे बिभिषणाकडून कळल्यानंतर रामाने नाभीवर बाण मारून रावणाचा वध केला असे ते म्हणतात. आणखीही यासंबंधात एक गोष्ट उल्लेखनीय आहे. मानसात असे वर्णन आहे की रावणाला मारणे कठीण जात आहे हे कळल्याने सीता अस्वस्थ होते. तिची समजावणी करताना त्रिजटा तिला मोठे चातुर्यपूर्ण स्पष्टीकरण देते. 'राम रावणाच्या उरात बाण मारण्याचे टाळीत आहेत कारण सीते, सध्या रावणाच्या हृदयात तुझाच वास आहे. तुझ्या हृदयात सदोदित राम वसलेले आहेत. आणि ही सारी भुवने रामहृदयातच सामावलेली आहेत. रामापुढे हाच तर पेच आहे. राववणाच्या हृदयावर बाण मारला तर पर्यायाने अखिल ब्रह्मांडाचाच नाश होण्याची भीती आहे!' तुलसीने त्रिजटेकडून करविलेले हे विश्लेषण चमत्कृतिपूर्ण व मनोहर आहे.

रावणवधानंतरचा हा प्रसंग पहा. तुलसींच्या रामाने मारूतीला सीतेचे कुशल विचारून येण्यास सांगितले आणि मारूतीने आदेशाचे अक्षरशः पालन करून सीता कुशल आहे असे येऊन कळविले. यावर नाथांच्या जांबवानाने केलेला विनोद मानसात नाही. त्याने हनुमंताला विनोदाने म्हटले "अरे सांगकाम्या, तू खराखुरा ब्रह्मचारीच आहेस. तुला पतिपत्नीची सूचक भाषा कशी कळावी? अरे बाबा, रामाने केवळ सीतेचे कुशल विचारून येण्यास का तुला पाठविले होते? तू सीतेला बरोबर घेऊन यावेस असा रामरायाचा मनोदय तुला समजला नाही".

सीतेला रामाकडे नेण्यासाठी बिभीषणाने आणलेल्या पालखीत बसून तुलसींची सीता येऊ लागते. पण जवळ आल्यानंतर सर्वांना तिचे दर्शन घडावे म्हणून स्वतः रामच तिला पायी चालत आणावयास सांगतात. एकनाथांची सीता मात्र स्वतःच पालखीत बसण्यास नकार दर्शवून म्हणते "पारकां पायीं राम सांपडे । तरी साधक कां शिणती बापुडे ॥" आणि "श्रीरामाची निज प्राप्ती । प्रवहणाची न लगे गती । परपायीं रघुपती । न भेटे निश्चितीं कोणाही ॥" बिभीषणाला सीतेने असे रोकडे उत्तर दिले आहे. या पुढील सीतेच्या अग्निपरीक्षेचा प्रसंगही दोन्ही ग्रंथात थोड्या फरकाने आलेला आहे. सीतेची अग्निपरीक्षा कां करून घ्यावयास हवी हे सांगताना श्रीरामाबद्दल तुलसींनी केवळ एवढेच म्हटले आहे की "तेहि कारन करुनानिधी कहे कछुक दुर्बाद" म्हणजे श्रीराम काही कठोर शब्द बोलते झाले यापलिकडे तुलसी जात नाहीत. उलट भावार्थरामायणात स्त्रीजातीसंबंधी एकूण समाजाच्या पूर्वापार काय समजुती आहेत याविषयी बोलताना श्रीरामचंद्रांनी स्त्रीच्या जन्मजात दोषादुर्गुणांचे विस्ताराने विवरण केले आहे.

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावताः ॥

अनुक्रमणिका

एवढ्या चारित्र्यसंपन्नशील सीतेलादेखील श्रीरामाने सामान्य स्त्रीच्या मापाने मोजावे याबद्दल लक्ष्मण, हनुमान इत्यादींनी आपला रोष स्पष्ट शब्दात व्यक्त केला आहे. पण शेवटी रामाने आपण ही अग्निपरीक्षा केवळ लोकापवाद राहू नये म्हणून करीत आहोत व सीतेच्या शुद्धतेविषयी आपल्या मनात यत्किंचितही शंका नाही असे प्रांजलपणे कबूल केले तेव्हाच या अग्निदिव्याला सर्वांची संमति लाभू शकली. तुलसीदासांनी हा प्रसंग अत्यंत संक्षेपात वर्णिला आहे. सीतामातेच्या अग्निपरीक्षणाचा करुण दारुण प्रसंग व रामप्रभूच्या तोंडून सीतामाईच्या निमित्ताने झालेले स्त्रीदोषांचे विदारक व कठोर विश्लेषण या दोन्ही गोष्टी तुलसीजीसारख्या ऋजुकोमल मनाच्या भक्ताला वर्णनाजोग्या वाटल्या नाहीत. मात्र त्यांनी हे स्त्रीदोषविवरण अन्य संदर्भात मंदोदरी जेव्हा रावणाची समजावणी करते तेव्हा रावणाच्या तोंडी घातले आहे, रामाच्या तोंडी नव्हे.

नारि सुभाउ सत्य सब कह हीं । अवगुन आठ सदा उर रहहीं ।
साहस अनृत चपलता माया । भय अविवेक असौच अदाया ॥

**आणि शेवटी उत्तरकांड**

उत्तरकांडात तुलसीदासांनी रामराज्याभिषेक, सीतेचे आपल्या सास्वांचे मन राखून दक्षतेने घरकामात लक्ष घालणे, सर्व बंधूंचे एकत्र व आनंदाने राहणे इत्यादी वर्णन करून पुढे "दुइ सुत सुंदर सीता जाए । लवकुस वेद पुरानन्ह गाए ॥" या शब्दात सीतेला दोन पुत्र झाल्याची गोड बातमी देऊन जणू "रामाला राज्य मिळाले, सर्व भावंडे आपापल्या स्त्रियांसहवर्तमान सुखाने राहू लागली, लोकांत आनंदी आनंद झाला" असे सांगून ही रामकथा साठा उत्तराच्या कथेप्रमाणे सफळ संपूर्ण झाल्याचे दाखविले आहे. कथा सुखांत करण्याच्या पौर्वात्य दंडकाचे जणू त्यांनी अक्षरशः अनुसरण केले आहे. सीतारामाच्या जीवनातील पुढील कारुण्यपूर्ण प्रसंग त्यांनी रंगविले नाहीत तेही त्यांच्या प्रवृत्तीला साजेसेच होते. सीता त्यागाच्या निमित्ताने रामावर अनेकांनी आक्षेप घेतले आहेत. हा विषयच मर्मस्पर्शीही आहे आणि विवाद्यही आहे. तो टाळण्यात तुलसींनी आपल्या संतसुलभ अनाग्रही भूमिकेचीच बूज राखली आहे. भावार्थरामायणात मात्र ग्रंथस्वरूपात यापूर्वी वर्णिलेला पुढील सारा कारुण्यपूर्ण कथाभाग विस्तारपूर्वक वर्णून सांगितला आहे. या साऱ्याच्या अधेमध्ये अनेक कथाप्रसंग गोवून नाथांनी भावार्थरामायणाचा अफाट विस्तार केला आहे. वास्तविक पाहता हे त्यांच्याच भूमिकेशी थोडेसे विसंगत वाटते. त्यांनी स्वतःच ग्रंथाच्या प्रारंभी "अफाट न करावा ग्रंथ । ग्रंथी बोलावा मुख्यार्थ ॥" असे म्हटले आहे (बालकांड; अध्याय १; ओवी ११८). याच्या विपरीत त्यांचे ग्रंथकर्तृत्व अचाट अफाट आहे. ही सारी रचना ओवीबद्ध म्हणजे गद्यप्राय असल्याने पाठांतराच्या दृष्टीने सुकर नाही. ते आटोक्याबाहेरचे काम आहे. याच्या उलट तुलसीदासांचे रामचरितमानस हे दोहे, चौपाई, सोरठा, छप्पय इ. गेय छंदामध्ये निबद्ध असल्यामुळे त्यांचे पाठांतर करणे सुलभ आहे. म्हणूनच आज अशेष हिंदी भाषाभाषी भारतीयात व भारताबाहेरील हिंदी बोलणाऱ्या जनतेत मानस हा सर्वश्रेष्ठ व सर्वांत अधिक लोकप्रिय असा धर्मग्रंथ म्हणून मान्यता पावलेला ग्रंथ आहे. जेथे त्याचे पठन-पाठन होत नाही असे एकही हिंदी खेडे आढळणार नाही. तुलसीरामायण हा सर्वांच्या अवीट गोडीचा विषय आहे.

या दोन्ही लोकप्रिय ग्रंथांच्या कर्त्यांचे आपण सदैव ऋणी आहोंत!

* *

अनुक्रमणिका

# संत तुलसीदास व काही मराठी संत कवि

तुलसीदासजींनी रामचरितमानस या ग्रंथाच्या प्रास्ताविकात 'स्वांतःसुखाय तुलसी रघुनाथगाथा। भाषानिबंधमतिमंजुलमातनोति' असे म्हणून ही रामगाथा स्वानंदाप्रीत्यर्थ गाइल्याचे सांगितले आहे. हा स्वानंद व हे स्वांतःसुख 'आनंदाचे आवार मांडू जगा' या उदात्त भावनेने प्रेरित झालेल्या संताचे आहे. येथील 'स्व' साऱ्या विश्वाला व्यापून उरणारा आहे. तो केवळ स्वतःपुरता मर्यादित नाही. साधुसंतांच्या 'स्व' मध्ये सारे जग सामावलेले असते. 'आत्मवत्सर्वभूतेषु' ही वृत्तीच संतरूपाने मूर्तिमती झालेली असते. स्वाभाविकच त्यांच्या स्वांतःसुखाची लयलूट अखिल मानवजातीला बरोबर घेऊन ते करीत असतात. 'सर्वेनः सुखिनः संतु' हा त्यांचा उदात्त हेतू असतो. याच दृष्टीने तुलसीदासांच्या वरील प्रतिज्ञोक्तीचा विचार व्हावयास हवा. विचारभावनांची अशी एकरूपता साऱ्याच संतांत पाहावयास मिळते. ज्ञानेश्वरांनीदेखील अभंगरचनेचा आपला हेतु 'आनंदे भरीन तीन्ही लोक' असाच सांगितला आहे ना? त्रिभुवनाला आनंदाने उजळून काढणाऱ्या संतांच्या अमृतमधुर वाणीचे गुणधर्म प्रायशः समानच असावयाचे. या दृष्टीने आपण तुलसीजींच्या रचनेतील काही उदाहरणे व मराठीतील काही प्रमुख संतांच्या आणि भगवद्भक्त पंडित कवींच्या रचनेतील काही अंश उदाहरणादाखल घेतल्यास त्यांच्यातील विलक्षण साम्य सहजच नजरेत भरते. विधात्याने साऱ्याच भागवतांची अंतःकरणे एकाच सर्वमंगलकारी द्रव्याने घडविली आहेत असेच ही उदाहरणे पाहून म्हणावेसे वाटते. येथे अशा काही साम्य स्थळांचा परिचय करून घेऊ.

**संत ज्ञानेश व संत तुलसी**

(१) रामकथेचे विवरण करणे हे आपल्या आटोक्याबाहेरचे काम असल्याची जाणीव विनम्रपणे प्रगट करताना बालकांडात तुलसीदास म्हणतात–

जौं बालक कह तोतरि बाता। सुनहिं मुदित मन पितु अरु माता॥ (दो ८ : १५).

अगदी असलीच भावना गीतार्थाचे मराठीत विवरण करणाऱ्या ज्ञानेशांनी आपली या संदर्भातील मर्यादा कबूल करताना प्रगट केली आहे—

जैसा स्वभावो मायबापांचा। अपत्य बोले बोबडी वाचा।
तरि अधिकच तेयाचा। संतोष आथी॥ (ज्ञाने. अ. १ : ६४)

आणि पुन्हा एकदा या शब्दात –

आणि बालक बोबडां बोलीं। कां वांकुडा विचुकीं पाउलीं।
चोज करूनि माउली। रिझवी जेवि॥ (अ. ९ : ६)

(२) मानसरचनेतील व्यासादी कवि पुंगवांचे ऋण स्वीकारणारी ही चौपाई पहा –

एहि प्रकार बल मनहिं देखाई। करिहउं रघुपति कथा सुहाई।
व्यास आदि कवि पुंगव नाना। जिन्ह सादर हरि सुजस बखाना॥ (बाल. १४ : १)

अनुक्रमणिका

आणि गीतेचा मराठीत भावार्थ सांगताना आपण व्यासादींचे कसे ऋणी आहोंत याचा ज्ञानेश्वरांनी कृतज्ञतापूर्वक असा उल्लेख केला आहे –

तैसा व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकारांते पूसतु ।
अयोग्य ही मी न पवतु । कें जाईन ॥ (अ. १८ : १७०१)

(३) देवाधिदेव शिवशंकराचे चरित्र वर्णून सांगण्याच्या बाबतीत आपण कसे असमर्थ आहोंत याची तुलसीदासांनी दिलेली कबुली अशी –

चरित सिंधु गिरिजारमन वेद न पावहिं पारु ।
बरनै तुलसीदास किमि अति मतिमंद गंवारु ॥ (बाळ. दो. १०३)

आणि गीतेचे विवरण हे महा कठिण कर्म आहे असे ज्ञानेश्वरही अशाच शब्दात म्हणतात—

ऐसे जे अगाध । जेथ वेडावती वेद ।
तेथ अल्प मी मतिमंद । काइ होथे ॥ (अ. १ : ७३)

येथे विशेष लक्षणीय गोष्ट ही की दोन्ही संतांनी अत्यंत विनयाने, निःसंकोचपणे स्वतःला मतिमंद म्हणून घेतले आहे.

(४) रामचरितमानसाच्या अरण्यकांडात सुतीक्ष्ण मुनीने प्रभुरामचंद्राना समर्पक शब्दात त्यांची स्तुति करणे आपल्या सामर्थ्याबाहेरचे कसे आहे ते अशा शब्दात सांगितले—

कह मुनि प्रभु सुनु बिनती मोरी । अस्तुति करौं कबन बिधी तोरी ॥
महिमा अमित मोरि मति थोरी । रवि सन्मुख खद्योत अंजोरी ॥ (अरण्य ११ : १)

गीतेवर मराठीत भाष्य लिहिण्याचे आपले हे कार्य म्हणजे अचाट धाडसच नाही का असे ज्ञानेश्वरांनीही विचारले आहे—

हे अनावरत न विचारिता । वांयाचि धिंवंसा उपनला चित्ता ।
एरवीं काइ भानु तेजीं खद्योता । शोभा आथी ॥ (ज्ञाने. अ. १ : ६७)

वरील दोन उदाहरणामध्ये केवळ कल्पनांचेच साम्य आहे असे नाही तर दोघांनी जी शब्दयोजना केली आहे तिच्यातदेखील विलक्षण सारखेपणा आहे ही गोष्ट विस्मय उत्पन्न करणारी आहे. वेदांची असमर्थता, सूर्यासमोर काजव्याचे क्षुद्र तेज इत्यादी कल्पनाबरोबरच मतिमंद व खद्योत या शब्दांचा दोघांनीही वापर केलेला आहे याचे आश्चर्य वाटते. यावरून असेही म्हणण्याचा मोह टाळता येत नाही की आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या ज्ञानेश्वरांच्या रचनांचा तुलसीदासांनी निश्चितपणे परिचय करून घेतला असावा. आणि यात असंभवनीय असे काही नाही. तीर्थाटनाच्या निमित्ताने पुण्यपावन क्षेत्रांना भेट देणाऱ्या नाना प्रदेशातील साधुसंतांना परस्परांच्या सहवासाचा लाभ सहजासहजी घडत असावा. याच भेटीगाठीत विचारांची

अनुक्रमणिका

देवाणघेवाण करून संत एकमेकांच्या ग्रंथरचनेचाही आदरपूर्वक आस्वाद घेत असावेत. एकाहून एक सरससुंदर विचार-कल्पनांचे साम्य या आंतरविनिमयाचाच दृष्य परिणाम असावा असा तर्क करणे अप्रस्तुत ठरणार नाही.

**तुलसीदास व इतर मराठी संत**

संत एकनाथांना सामान्यतः तुलसीदासांचे समकालीनच म्हणता येईल. त्यांच्या भावार्थरामायणातील हे एक उदाहरण आहे. अरण्यकांडात सीताहरणाचा निंद्य हेतु बाळगून पर्णकुटीत आलेल्या रावणाचे एकनाथकृत वर्णन असे आहे—

गुंफे नसतां श्री रामलक्ष्मण। शून्य मंदिरी रिघेश्वान।
तेंवी आला दशानन। सीताहरण कार्यार्थी॥ (अ. १६ : २)

आता रामचरितमानसाच्या अरण्यकांडात आश्रमाकडे जाणाऱ्या रावणाचे तुलसीदासांनी केलेले हे वर्णन पहा—

सो दस सीस स्वान की नाई। इत उत चितइ चला भडिहाई॥ (अरण्य. २८ : ५)

दोघांनाही रावणाला श्वान म्हणावेसेच वाटावे हा केवळ योगायोगच असेल असे वाटत नाही. संतांच्या परस्पर परिचयाच्या वर व्यक्तविलेल्या कल्पनेला यामुळे पुष्टीच मिळत नाही काय?

तुलसीदासोत्तर काळात झालेल्या मराठी कवीत वामन पंडित आपल्या भक्तिपर रचनेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नामसुधेतील हा श्लोकार्ध पहा—

अजित नाम वदों भलत्या मिसें।
सकल पातक भस्म करीतसे।

आणि तुलसीदासांच्या मानसातील ज्या चौपाईचा तो अनुवादच वाटावा ती अशी—

बिबसहुं जासु नाम नर कहहीं। जनम अनेक रचित अघ दहहीं॥ (बाल. ११९ : २)

अहेतुपूर्वक जरी ईश्वराचे नामस्मरण केले तरी त्याचा परिणाम पातकांच्या दहनातच व्हावयाचा ही कल्पना वरील दोन्ही समानार्थी उद्धरणांत पहावयास सापडते.

आणखी एका उदाहरणाने वामन पंडितांचे तुलसीदासांशी साम्य दाखविता येईल. रामचरितमानसातील अयोध्याकांडात भरत रामाला भेटण्यासाठी वनात आलेले आहेत. आपल्या आप्तजनांशी बोलताना भरताने आपल्या केविलवाण्या अवस्थेचे वर्णन अशा प्रकारे केले आहे.

अनुक्रमणिका

ग्रह ग्रहीत पुनि बात बस तेहि पुनि बीछी मार ।
तेहि पिआइब बारुनी कहहु काह उपचार ॥ (अयोध्या. दो. १८०)

दोन भिन्न भाषा भाषी कवींच्या विचारात देखील केवढे अद्‌भुत सारखेपण असू शकते ही गोष्ट वामनपंडितांच्या 'आधीच मर्कट तशातहि मद्य प्याला' या प्रसिद्ध श्लोकाशी तुलसीदासांच्या वरील दोह्याची तुलना केल्यास सहजच कळून येण्यासारखे आहे. वामनपंडितांनी वानराच्या संबंधात क्रमशः अंमल वाढविणाऱ्या ज्या अवस्थांचे वर्णन प्रस्तुत श्लोकात केलेले आहे त्याच शुद्धबुद्ध हरपवून टाकणाऱ्या परिस्थितीचे वर्णन भरताने स्वतःच्या संदर्भात वरील दोह्यात केलेले दिसून येईल. मद्यपान, विंचवाचा दंश, भूतबाधा इत्यादी विषय दोन्ही ठिकाणी सारखेच आलेले आहेत ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

आता तुलसीदास व तुकाराम या दोन संतकवींमधील समानता पाहू. स्वतः ब्राह्मण नसूनही तुकारामबोवांनी एका अभंगात ब्राह्मणाच्या श्रेष्ठतेचे वर्णन असे केले आहे—

जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तीन्ही लोकीं ॥

आणि तुलसीदास तर स्वतः ब्राह्मणच होते. त्यांनी विप्रगौरव करावा यात फारसे आश्चर्य नाही. पण तुकोबांशी त्यांच्या शब्दांचे साम्य आहे ते असे—

पूजिअ विप्र सील गुन हीना । सूद्र न गुन गन ग्यान प्रबीना ॥ (अरण्य. ३४ : १)

साधुसंतांचे एक वैशिष्ट्य असे की व्यक्तिशः ते स्वतः कोणत्याही एका विशिष्ट देवतेचे उपासक असले अथवा कोणत्याही विशिष्ट पंथाचे अनुयायी असले तरी इतरांची या विषयासंबंधीची मतभिन्नता त्यांना असह्य वाटत नाही. उपास्य दैवत अथवा उपासना संप्रदाय यांच्याबाबतीत त्यांची भूमिका पूर्णपणे अनाग्रही असते. साऱ्या आराधना उपासनांची परिणति व्हावयाची ती ईश्वर-शरणत्वातच अशी त्यांची अढळ श्रद्धा असते. तुलसीदासांच्या 'विनयपत्रिके'तून येथे एक पद निवडले आहे. त्या पदाचे निष्कलंक असे प्रतिबिंबच ज्याला म्हणता येईल असा एक अभंग तुकोबारायांचाही आहे. या उभयतात आशय आणि अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टींनी असलेले साम्य मनात सहजच भरण्याइतके ठळक आहे.

विनयपत्रिकेतील पद असे आहे—

जा कें प्रिय न राम वैदेही ।
तजिये ताहि कोटि बैरी सम यद्यपि परम सनेही ॥ १ ॥
नाते नेह रामहि के मनियत सुहृद सुसेव्य जहां लों ।
अंजनु कहा आंखि जेहि फूटै बहुत हों कहों कहां लों ॥ २ ॥
तज्यो पिता प्रहलाद बिभीषन बंधु भरत महतारी ।
बलि गुरु तज्यो कंत ब्रजबनितनि भये जग मंगलकारी ॥ ३ ॥
तुलसी सो सब भांति परमाहित पूज्य प्रान ते प्यारो ।
जाते होइ सनेह राम ते इतनोह मतो हमारो ॥ ४ ॥ (विनयपत्रिका : पद १७४ : पृ. २४५)

**अनुक्रमणिका**

वरील पद तुकारामांच्या पुढील अभंगाशी तुळून पाहता मनोरंजक व आल्हादायक ठरेल असेच आहे. पहा—

जेणे घडे नारायणीं अंतराय । होत बापमाय वर्जावी तीं ॥ १ ॥
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिताति दुःखा पात्र शत्रू ॥ २ ॥
प्रल्हादे जनक बिभीषणीं बंधू । राज्य माता निंदू भरतें केली ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणिक उपाय दुःख मूळ ॥ ४ ॥

तुलसीदासांचे पद व तुकोबारायांचा अभंग यात अनुक्रमे रामभक्ति व हरिभक्ति यांचे अनन्यसाधारण महत्त्व वर्णिलेले आहे. दोहोमध्ये यासाठी त्याग करणाऱ्या प्रल्हाद, बिभीषण आणि भरत यांची उदाहरणे समान रूपाने देण्यात आली आहेत. यावरून साहजिकच असा तर्क करता येतो की तुकारामांनी आपल्या पूर्वकालीन तुलसीदासांच्या भक्तिपर काव्याशी परिचय करून घेतला असावा आणि कदाचित या अभंगात त्यांनी तुलसीदासांचे अनुसरणही केले असावे.

प्रस्तुत लेखात साम्यस्थळांची केवळ काही उदाहरणे नमुन्यादाखल घेतली आहेत. संतांच्या मानसात जेवढे अवगाहन करावे तेवढे थोडेच होणार आहे. त्यात त्यांच्या विचारभावनांची अगणित रत्नमाणके सामावलेली आहेत. त्याचे जेवढे म्हणून मननचिंतन करावे तेवढा आपला हर्ष उल्लास वाढीसच लागणार आहे. त्याची रुचि दिवसेंदिवस अधिकाधिक वृद्धिंगत होत जाणारी आहे. ज्या संतमहात्म्यांनी आपल्या विचार संपदेने आपल्या संस्कृतीची यशःश्री दिगंतात पसरविली आहे त्यांजविषयी विनीत भाव व श्रद्धाभक्ति बाळगण्यातच आपला गौरव आहे.

अनुक्रमणिका